


९८५०
म. ग्रं. सं. ठाणे
विषय भू-प्रवास
क्र. नं. २५२
REFBK-0011391

# यूरोपांतून ....

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. २६३५७
अनुक्र. २६०७१ लि. ४ अथाय
क्रमांक ... ९१०२ ... नों. दि. ...
२५५२

REFBK-0011391
REFBK-0011391

... डी.

मराठी ... ठाणे
ग्रं. क्र. ११३८१
शाखा

मूल्य रु. ...

व्हीनस प्रकाशन : पुणें

आवृत्ति पहिली :
जानेवारी १९६०

◆ ◆ ◆

सर्व हक्क प्रकाशकांचे स्वाधीन

◆ ◆ ◆

मूल्य रु. पावणेचार

◆ ◆ ◆

प्रकाशक :
स. कृ. पाध्ये
व्हीनस प्रकाशन
४१० शनिवार पेठ : पुणें २

◆ ◆ ◆

मुद्रक :
रा. ना. सरनाईक
सुलभ मुद्रणालय
२९१ शनिवार पेठ : पुणें २

# थोडें प्रास्ताविक

'युरोपांतून ...' हें आम्ही एक नवें प्रवासवर्णनात्मक पुस्तक प्रसिद्ध करीत आहोंत. नवमहाराष्ट्राच्या निर्मितीच्या काळांत सर्वसामान्य वाचक-वर्ग व तरुण जिज्ञासु विद्यार्थी यांच्या गरजा व ज्ञानलालसा यांची जी इष्ट अशी वाढ होत आहे ती लक्षांत घेऊन मराठींत चांगलीं प्रवासवर्णनें प्रसिद्ध करण्याचा आमचा संकल्प आहे. दोन-तीन वर्षांपूर्वी डॉ. प्र. न. जोशी यांचें अमेरिकेच्या प्रवासावरील व श्री. वि. वा. पत्की यांचें युरोपच्या प्रवासावरील अशीं दोन पुस्तकें आम्ही प्रसिद्ध केलीं. आतां या वर्षीं डॉ. द. वि. नवाथे व म. म. द. वा. पोतदार यांचीं प्रवासवृत्तात्मक पुस्तकें जवळ जवळ एकाच वेळीं आम्ही वाचकांच्या हातीं देत आहोंत. मराठींत उत्तम अशीं प्रवासवर्णनें फार थोडीं आहेत. मागच्या काळांत नुसती माहिती देणारीं, गांवांची, देशांची माहिती देणारीं व क्वचित्प्रसंगीं लोकजीवना-संबंधीं वा रमणीय स्थळांसंबंधीं वर्णन करणारीं मराठींत थोडीं-फार प्रवास-वृत्तात्मक पुस्तकें प्रसिद्ध झालीं, पण या नव्या युगाच्या जमान्यांत प्रवास-वृत्तात्मक पुस्तकाचेंहि शास्त्र बनलें आहे; त्यांचीं कलात्मक अंगेंहि वाढीस लागलीं आहेत. नवी भूमि, नवीं शहरें, नवें लोकजीवन, नवी संस्कृति, नवे आचारधर्म, नवीन नवलाईची सृष्टि इत्यादींचे संस्कार जिज्ञासु व हौशी प्रवासी लेखकांच्या मनावर जे होतात त्यांचे मनोज्ञ आविष्कार आज मराठींतून प्रकट होत असतांना दिसत आहेत.

याच पार्श्वभूमीवर आम्हीं प्रवासवृत्तांचीं हीं प्रकाशनें हातीं घेतलीं आहेत. आज सर्व जग एक झालें आहे असें आपण मानतों, अलास्काच्या माणसाचें नातें न्यू झीलंडच्या माणसाशीं जमावें अशी आपली नवी दृष्टि आहे. पण जगाच्या पाठीवर जे नाना लोक नाना प्रकारच्या जीवनपद्धतींनीं वावरतात त्यांचें बारकाईनें दर्शन आपणांस होईल तें प्रवासवृत्तात्मक लिखाणांतूनच. सर्व मानव येथून तिथें एक असें आपण म्हटलें तरी खाणें–पिणें, कुटुंब-व्यवस्था, पोषाख, चालीरीती, शिक्षण-व्यवस्था, सामाजिक, राजकीय परिस्थिति, आवडी–निवडी, रोजचें व्यावहारिक जीवन, उत्सव-समारंभ

इत्यादींत जी भिन्नता व विचित्रता दिसून येते तिच्याइतकें रोचक वर्णन दुसरें कोठें मिळणार ? पाहणारा मात्र पाहिजे, त्याचे डोळे तयार हवेत, त्याचें मन संस्कारक्षम हवें. ज्ञानविद्येच्या अभिरुचीनें त्याचें व्यक्तिमत्त्व बहरून निघालेलें असावें आणि मग त्यानें वर्णन केलेलें लोकजीवन चटका लावणारें, हृद्य व रंजक होतें. म. म. द. वा. पोतदार व डॉ. द. वि. नवाथे या दोन रसिक व व्यासंगी लेखकांनीं युरोपमध्यें काय काय पाहिलें तें तुलनेनेंहि निरखून पाहण्यासारखें आहे.

पुण्याच्या वा महाराष्ट्रांतील शिक्षणक्षेत्रांतील पुष्कळ लोकांना डॉ. द. वि. नवाथे यांचें नांव अपरिचित नाहीं. संस्कृत विषयाचे एक पहिल्या प्रतीचे अध्यापक म्हणून त्यांचा लौकिक होता. हौस, धडाडी, व्यासंग, कल्पकता, रसिकपणा, चोखंदळ दृष्टि यांची जोड त्यांच्या स्वभावास असल्यानें त्यांचे नांव बहुतेकांना परिचित असें आहे. कांहीं वर्षांपूर्वीं डॉ. नवाथे यांनीं इंग्लंडमध्यें अभ्यास करून शिक्षण-क्षेत्रांतील सर्वोच्च अशी 'डॉक्टरेट'ची पदवी मिळविली. त्यांच्या अध्ययनाची कीर्ति व त्यांच्या संशोधनाचें महत्त्व इंग्लंडमधील शिक्षण–तज्ज्ञांनींहि मान्य केलें. पुढें परत भारतांत आल्यावर केंद्र सरकारच्या शिक्षणखात्यांत एक वरिष्ठ अधिकारी शिक्षणविषयक प्रश्नांचे सल्लागार म्हणून डॉ नवाथे काम पाहूं लागले. हल्लीं ते आफ्रिकेंत नैरोबी येथें भारत सरकारचे प्रतिनिधि म्हणून काम पाहत आहेत.

डॉ. नवाथे इंग्लंडमध्यें असतांनाच त्यांनीं आपल्या इष्टमित्रांना व विद्यार्थ्यांना उद्देशून जीं मर्मग्राही व उद्बोधक पत्रें लिहिलीं त्यांत थोडी-फार भर घालून या पुस्तकाची रचना केलेली आहे यांतील बहुतेक सर्व लिखाण त्या वेळच्या 'काळ' वृत्तपत्रांत प्रसिद्ध झालें होतें. त्याच वेळीं त्यांची लोकप्रियता व त्यांतील रुचिसंपन्नता ध्यानांत आलेली असल्यामुळें ह्या पत्रांचा संग्रह करावा असें फार दिवसांपासून मनांत होतें. तो योग आज येत आहेसा पाहून फार अ नंद वाटतो. डॉ. नवाथे यांच्या या प्रवास-वृत्तात्मक पत्रांतून अनेकांना पाश्चात्त्य रीतिरिवाजांचें यथार्थ दर्शन होईल असें वाटतें. डॉ. नवाथे यांची दृष्टि चौकस व चोखंदळ असल्यानें कोणत्याहि

दृश्यांतील बारीकसारीक भागहि त्यांच्या मर्मग्राही नजरेंतून सुटलेले नाहींत. त्यांची दृष्टि साहित्यकलाभिरुचीनें संपन्न असल्यानें पत्रांतून इकडचे तिकडचे जे मनोज्ञ व समर्पक असे वाङ्मयीन उल्लेख आलेले आहेत त्यांमुळें या वृत्तान्तास एक प्रकारची सजीवता प्राप्त झालेली दिसून येईल. एडन बंदर, पोर्टसैयद, सुएझ कालवा, स्ट्रांबोलीचा ज्वालामुखी, नेपल्स, जिनोवा, लंडन, स्कॉटलंड यार्ड, हॅम्पटन कोर्ट, लंडन टॉवर, स्कॉटलंडची भूमि, डव्हकॉटेज, केंब्रिज इत्यादि ठिकाणचीं डॉ. नवाथे यांनीं काढलेलीं शब्दचित्रें मराठी वाचकांना मनोरंजक व उद्बोधक वाटतील. ब्रिटनमधील लोकजीवनाचें जें निरीक्षण डॉ. नवाथे यांनीं केलें आहे तें तर याहिपेक्षां अधिक सरस व यथार्थ स्वरूपदर्शक बनलें आहे. ख्रिस्तमसचा सण, गाय फॉक्स डे, पॉपी डे, ब्रिटनचा फेस्टिव्हल, इंग्लिश रंगभूमि इत्यादि विषयांच्या वर्णनांतून ब्रिटिश लोकजीवनांचीं जीं मार्मिक चित्रें डॉ. नवाथे यांनीं रंगविलीं आहेत तीं वाचकांना विशेष उद्बोधक वाटतील यांत शंका नाहीं. राणीचें राज्यारोहण व सहाव्या जॉर्जची अंतिम यात्रा यांसारख्या सुखदुःखमिश्रित प्रसंगीं ब्रिटिश लोक कसे संयमानें व प्रसंगोचित वागतात तें मुळांतूनच वाचण्यासारखें आहे. डॉ. नवाथे यांच्या पत्रांचा तिसरा विभाग म्हणजे त्यांनीं तेथील शिक्षण-संस्था, तेथील शिक्षण—व्यवस्था, तेथील अभ्यासक्रम यांसंबंधीं जीं पत्रें लिहिलीं त्यांचा असून तोहि अभ्यासक व सर्वसामान्य जिज्ञासु वाचक यांना उपयुक्त वाटल्यावांचून राहणार नाहीं.

डॉ. नवाथे यांच्या या पत्रात्मक प्रवासवृत्ताच्या आणखी एका गुणाचा उल्लेख आम्हांस आवर्जून करावासा वाटतो. सहसा असें दिसतें कीं, मनुष्य एकदां परदेशीं निघाला कीं त्याचे डोळे उघडे राहण्याऐवजीं ते दिपूनच जातात. तेथील सभ्यता, तेथील ऐश्वर्य, तेथील हास्य-विलास, तेथील मायावी सौंदर्य यांची भुरळ मनावर पडून जे जें आपले भारतीय त्याची मात्र मनांत अरुचि निर्माण होते दूरदूरच्या देशांचें हास्य-विलास, शृंगारक्रीडा, नृत्यमंदिरें यांचेंच मनसोक्त वर्णन करणारीं प्रवासवृत्तें मराठींत नाहींत असें नाहीं. पुनः येथें दृष्टीचा फरक हाच मुद्दा महत्त्वाचा मानावा लागेल. डॉ. नवाथे यांनीं या प्रकारच्या विश्वाकडे कोणत्या दृष्टीनें पाहिलें तें मधून मधून प्रत्ययास येईल. डॉ. नवाथे यांना भारतीय वृत्तीचा विसर केव्हांहि

घडलेला दिसत नाहीं. या प्रवासवृत्तांत तुलनेसाठीं त्यांनीं वापरलेले संस्कृत साहित्यांतील उल्लेख या दृष्टीनें वाचण्यासारखे आहेत. तिकडचीं दृश्यें पाहिल्याबरोबर डॉ. नवाथे यांना आपल्याकडील हिमालय, काश्मीर, त्रिवेंद्रम, म्हैसूर इत्यादि स्थळांची आठवण होते याचा अर्थ डॉ. नवाथे यांच्या भारतीय दृष्टींतून पहावयास हवा. लंडनकडे निघालेल्या बोटीवर गणेशचतुर्थी साजरी करणाऱ्या, आपल्या मित्रमंडळीसमवेत 'यान्तु देवगणाः सर्वे: ' म्हणून शास्त्रोक्त विधि करणाऱ्या डॉ. नवाथे यांच्या स्वाभिमानाचें आणखी वर्णन तें काय करावें ! स्वतः वाचकांनींच त्यांच्या या रम्य मनास उत्साह देणाऱ्या वृत्तीशीं मैत्री करावी. असो.

हें पुस्तक छापलें जात असतांना, आमचे स्नेही डॉ. प्र. न. जोशी यांनीं, उपस्थित झालेल्या शंकांचें निरसन केल्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोंत. तसेंच प्रसिद्ध चित्रकार श्री. वि. स. पाथरकर यांनीं मुखपृष्ठावरील चित्र लवकर काढून दिल्याबद्दल व सुलभ मुद्रणालयानें नेहमींप्रमाणें चांगली छपाई करून दिल्याबद्दल त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच होतील.

१ जानेवारी १९६०  — प्रकाशक

# अनुक्रम


**१. प्राथमिक तयारी आणि मुंबई ते लंडन प्रवास :** १ ते ४८

प्राथमिक तयारी-आमची इटालिय बोट-' आदन ' म्हणजे एडन-हा सुवेझ कालवा-भूमध्यसमुद्रावर-इटालींतील स्ट्रांबोली व नेपल्स आणि जिनोबा-युरोपियन आगगाडींतून लंडनला.

**२. ब्रिटनची राजधानी लंडन :** ४९ ते ८७

लंडन शहराचें ओझरतें दर्शन-स्कॉटलंड यार्ड-लंडनमधील नगरपालिका-' फ्रायरब्रिगेड ' व ' ओल्ड बेली '-लंडनमधील-वृत्तपत्रें वाय्. एम्. सी. ए.—आंतरराष्ट्रीय शांतिसेवादल संघटना-इंग्लंडमधील कोच सर्व्हिसेस.

**३. लंडनच्या परिसरांत :** ८८ ते १२१

हॅम्पटन कोर्ट-सेंट अल्बान्स-लंडन टॉवर-टिलमनस्टन कोलियरी—स्कॉटलंडची सफर-वर्ड्स्वर्थच्या लेकलॅंडमधून.

**४. इंग्लिश लोक आणि सामाजिक जीवन :** १२२ ते १६७

लंडनवासीय-प्रामाणिक लोक-ब्रिटिश कुटुंब व हिंदी विद्यार्थी-गाय फॉक्स डे व पॉपी डे-ख्रिस्तमस-आदर्श ग्रहाचें दर्शन-सहाव्या जॉर्जची अंतिम यात्रा.

**५. कांहीं शैक्षणिक विचार :** १६८ ते १९७

ब्रेनट्रस्ट हिंदुस्थान-पोहोण्याच्या स्पर्धा-विद्यापीठांतील अभ्यासक्रम—वसतिगृहें-केंब्रिज विद्यापीठ-इंग्लंडमधील परीक्षा-पद्धति—सर रोलंड हिल स्कूल.

**६. ऑलिंपिक स्पर्धा १९५२ :** १९८ ते २१६

ब्रिटनची तयारी-चलो हेलसिंकी-सामन्यांतील कांहीं प्रसंग-ऑलिंपिक नगरींतील संचार : १—२—३—४.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ११३५१

॥ १ ॥

# प्राथमिक तयारी आणि मुंबई ते लंडन प्रवास

## प्राथमिक तयारी

एडन

ता. २५-९-१९५०

स. न. वि. वि.

अनंतरत्नप्रभव अशा रम्य महोदधीच्या सान्निध्यांत गेले पांच दिवस इतके आनंदांत गेले आहेत. कीं, सर्व माहितीसह वर्णन लिहून कळविण्याचें मी विसरलोंच असतों. पण 'आदन'— लक्षांत ठेवा एडन असें आपण भूगोलांत वाचतों त्याचा उच्चार तद्देशीय लोक 'आदन' असा करतात— जवळ आलेलें पाहून बहुतेक सर्व लोक आपापल्या घरीं पत्रें लिहूं लागले आहेत व त्यामुळें मला सुद्धां पत्र लिहिण्याची स्फूर्ति आली आहे व एडनहून नव्हे—आदनहून—हा पहिला हप्ता मी माहितीकरितां पाठवीत आहें.

पुण्यनगरींत विद्यापीठ निर्माण झाल्यामुळें ज्या अनेक सोयी झाल्या आहेत त्यांपैकीं आपल्या दृष्टीनें परदेशांतील विद्यापीठांतून असणाऱ्या अभ्यासक्रमासंबंधीं माहिती व तिकडे प्रवेश मिळवून देण्यासंबंधीं खटपट, ह्या दोन सोयी झाल्या आहेत. भरपूर वेळ काढून एकदां गणेशखिंडींत जावें व ह्या परदेशीय विद्यापीठ माहिती खात्यांत जाऊन चांगले तीन-चार तास वाचीत बसावें.

प्रत्यक्ष परदेशांत जाणें आवश्यक आहे असें मुळींच नाहीं. पुष्कळ माहिती मिळते व खूपसें ज्ञान पदरांत पडतें. बाहेर लोकांशीं बोलतांना या सामान्यज्ञानाचा खूप उपयोग होतो, असें गेल्या कांहीं दिवसांत माझ्या अनुभवास आलें आहे. मी एकदां असाच जाऊन वाचीत असतां लंडन विद्यापीठांतील शिक्षणशास्त्राच्या उच्च परीक्षांच्या अभ्यासक्रमानें माझें लक्ष वेधलें व त्यासंबंधीं मी जास्त खोल चौकशी सुरू केली. Institute of Education नामक एका संस्थेचें माहिती-पत्रक मला वाचावयास मिळालें व त्यावरून मी हा सध्यांचा अभ्यासक्रम स्वीकारला आहें.

एकदां विद्यापीठ व विषय निश्चित झाले कीं, त्यांचेकडे एक फॉर्म मिळतो तो आणावा. दोन प्रती मिळतात. त्या भरून द्यावयाच्या असतात; फॉर्ममध्यें सर्व माहिती भरून दिली कीं, तो प्रथम रजिस्ट्रारकडून त्या त्या देशाच्या हायकमिशनरकडे जातो व त्यांच्यातर्फे आपण मागितलेल्या विद्यापिठाकडे जातो. नंतर आपणास प्रवेश मिळाला किंवा नाहीं हें त्यांच्याकडून पुणें विद्यापीठामार्फत कळतें. माझ्या अर्जाबाबत एक गंमतच झाली ! मी पुणें विद्यापीठाच्या M. Ed. चें अध्ययन करीत आहें, असें लिहिलें होतें,— पण !

लंडन विद्यापीठाकडे पुणें विद्यापीठ स्थापन झाल्याची दखल नव्हती. तसेंच पुण्याची M. Ed. म्हणजे काय तोलाची परीक्षा आहे याचीहि त्यांना माहिती नव्हती. अर्थातच त्यांनीं मला उच्च परीक्षेस प्रवेश देण्याचें नाकारलें. मग मी M. Ed. चा अभ्यासक्रम वगैरे पाठविल्यावर " विद्यापीठांत तूर्त प्रवेश दिला आहे " असें पत्र आलें. हें प्रवेश दिल्याचें पत्र हा फार मोठा महत्त्वाचा दस्तऐवज समजण्यास हरकत नाहीं. पासपोर्ट मिळविण्यासाठीं, नंतर एक्स्चेंज मिळविण्यासाठीं व शेवटीं बोटींत प्रवेश मिळविण्यासाठीं फारच उपयुक्त असा हा कागद अतिशय काळजीपूर्वक जपून ठेवावा लागतो. मला हा इतक्या वेळां निरनिराळ्या अधिकाऱ्यांना द्यावा लागला व इतक्या वेळां तो सांपडेनासा झाला कीं शेवटीं तो संभाळणें हेंच एक महत्त्वाचें काम होऊन बसलें.

प्रत्यक्ष प्रवेशाचें पत्र हातांत पडतांच जर कोणतें महत्त्वाचें काम करावयाचें असेल तर तें एखाद्या प्रवासाची व्यवस्था करणाऱ्या कंपनीला आपला

प्रवासमार्ग ठरविण्यास सांगणें. 'पॅसेज बुक करणें' असा याकरितां रूढ शब्दप्रयोग आहे. 'पासपोर्ट' मिळविण्यापूर्वीसुद्धां हें करणें इष्ट असतें. आपणास नको असल्यास पॅसेज रद्द करतां येतो, पण वेळेवर तो मिळविणें हें मात्र आयत्या वेळीं दुर्घट होतें. मी 'थॉमस कुक' या सुप्रसिद्ध कंपनीमार्फत प्रवासाची व्यवस्था करण्याचें ठरवून, त्यानुसार पत्र लिहून टाकलें. थॉमस कुक-सारख्याच अमेरिकन एक्स्प्रेस्, ग्रिंड लेज, ली अँड म्युरहेड इत्यादि कंपन्या आपल्याकडून थोडेंसें द्रव्य घेऊन कांहीं वेळां बरीच सोय करतात. त्यांना परस्पर बोट कंपन्यांकडून भरपूर कमिशन असतेंच. हे पैसे आपणाकडून न घेतां सुद्धां त्यांना मिळत असल्यानें आपली सोय पाहण्याची त्यांना जरूर भासते, व म्हणूनच बहुतेक सर्व कंपन्या आपापल्या उतारूंना योग्य तें मार्गदर्शन करण्यास उत्सुक असतात. दुर्दैवानें अजून एकहि हिंदी प्रवासी कंपनी हें काम करूं लागलेली नाहीं.

पी. अँड ओ. हें नांव अनेक वेळां ऐकलें असेल; पण तें कोणत्या कंपनीकरितां आहे हें अनेकांना माहीत नसावें. 'पेनिन्शुलर अँड ओरिएंटल' असें या बोट कंपनीचें नांव असून त्यांच्या बोटी मोठ्या प्रशस्त, आरामशीर व राजशाही असतात. ह्यांची जर जाहिरात पाहिली असेल तर तींत बोटीच्या मोठ्या खांबावर कावळे बसलेले दाखविलेले असतात. "We always travel by P.&O. This is something to crow about." 'आम्ही याच बोटीनें प्रवास करतों आणि ही एका मोठ्या अभिमानानें सांगण्यासारखी गोष्ट आहे.' ह्याशिवाय लॉइड ट्रेस्टिनो कंपनीच्या इटालियन बोटीहि मोठ्या छान असतात. ह्या फक्त इटालीच्या जिनोआ किंवा व्हेनिस बंदरापावेतों जातात व तेथून पुढचा युरोपांतील प्रवास आगगाडीनें करावा लागतो. शिंद्या स्टीम नॅव्हिगेशन कंपनीच्या 'जल-आझाद' इत्यादि बोटी इंग्लंडमध्यें लिव्हरपुल पावेतों जातात.

आपण आपलें प्रवासस्थळ निश्चित केल्यावर मग बोट कंपनी व बोटीचा क्लास वगैरे ठरवावें. पहिला वर्ग हा सर्वत्रच महाग, पण सुखाचा असतो. नंतर टूरिस्ट वर्ग असतो व कांहीं ठिकाणीं डॉर्मिटरी वर्ग असतो. ह्यांत एका दिवाणखान्यांत २०–२५ कॉटस् दवाखान्याच्या वॉर्डांसारख्या टाकलेल्या असतात. कांहीं ठिकाणीं कॉटस् एकावर एक रेल्वेंत जसे एकावर एक बर्थ

असतात तशा जुळविलेल्या असतात. टूरिस्ट क्लासच्या केबिन्सचें भाडें सुद्धां त्या केबिनच्या बोटीवर असणाऱ्या स्थानावर अवलंबून असतें. मध्यभागीं असणाऱ्या केबिन्सना जास्त भाडें असतें व बाजूच्या केबिन्सना कमी भाडें असतें. हें सर्व लक्षांत घेऊन आपल्या आर्थिक परिस्थितीस झेपेल असा पॅसेज आपण ठरविणें इष्ट असतें. असो.

पॅसेजसंबंधींचें पहिलें पत्र पाठविलें जात असतांनाच कलेक्टर कचेरींतून परदेशगमनार्थ परवाना–पासपोर्ट–मिळविण्यासाठीं एक अर्जाचा फॉर्म आणणें इष्ट असतें. पासपोर्टचा अर्ज केल्यापासून पुढें बरेंच सव्यापसव्य असल्यानें तोहि लवकर करणें इष्ट असतें. पासपोर्टबरोबर आपल्या नव्या फोटोच्या तीन प्रती द्याव्या लागतात. तसेंच—

'हा गृहस्थ परदेशांत कंगाल झाला, तर त्याला स्वखर्चानें परत आणीन व तसें झाल्यास सरकार जो खर्च करील तो मी भरून देईन' अशा अर्थाचा एक जामिनकीचा फॉर्महि भरून द्यावा लागतो. हा अर्ज स्थावर मिळकत असणाराच फक्त भरून देऊं शकतो.

पासपोर्ट हा सर्वांत महत्त्वाचा दस्तऐवज होय. भारताचा किनारा सोडण्याचा वेळेपासून सर्वत्र तो प्रतिक्षणीं लागतो. वैदिक वा धार्मिक कार्यांत जसें प्रतिक्षणीं यज्ञोपवीत लागतें, तसा हा पासपोर्ट सर्व कार्यांत सर्वत्र लागतो. कोठें पैसे घेतले, कोठें उतरलें, कोठें ओळख पटविण्याचा प्रसंग आला तरी हा सर्वत्र लागतोच; अतएव हा फारच काळजीनें जतन करून ठेवावा लागतो.

पासपोर्ट मिळाल्यानंतर आणखी एक महत्त्वाचें कार्य करावयाचें राहतें, तें म्हणजे रुपयांचे पौंड किंवा डॉलर्स करण्याची रिझर्व बँकेकडून अनुज्ञा मिळविणें. सामान्यतः प्रवाशास ४५० पौंडांपावेतों एक्स्चेंज देण्यांत येतें व विद्यार्थ्यांस ती पुरणें शक्य नसल्यामुळें अधिक पौंडांकरितां मागणी करावी लागते. त्याकरितां रिझर्व बँकेकडे एक फॉर्म भरून पाठवावयाचा असतो. त्यासोबत दोन महत्त्वाचे कागद जोडावे लागतात. एक म्हणजे परदेशी विद्यापीठांत प्रवेश मिळवल्याबद्दलचें पत्र व दुसरें एक सर्टिफिकेट. हें नवें सर्टिफिकेट एका डिस्ट्रिक्ट ऑफिसर किंवा मॅजिस्ट्रेटनें द्यावें लागतें.

"सदर इसमानें परदेशांतील वास्तव्यास पुरेसा द्रव्यनिधि संग्रहित केला आहे." ह्या अर्थाचें हें एक सर्टिफिकेट लागतें. मला जेव्हां हें समजलें तेव्हां सर्टिफिकेट मिळविण्याकरितां मी कलेक्टर कचेरींत नंतर शिवाजीनगर कोर्टांत व अखेर खडकावरील मामलेदार कचेरींत खूप हिंडलों. डिस्ट्रिक्ट ऑफिसर या हुद्द्याबद्दल फारच मतभेद होते व मॅजिस्ट्रेट कांहीं सर्टिफिकेट देण्यास तयार होईनात! "तुम्ही एक प्रतिज्ञा-लेख (ॲफिडेव्हिट) लिहा व माझ्या समक्ष सही करा. मी त्यावर माझ्या समक्ष सही केली असा शेरा मारून सही करून देईन." असें सर्वसामान्य उत्तर होतें. अखेर ऑनररी मॅजिस्ट्रेटचें सर्टिफिकेट चालतें असें निश्चयानें कळल्यावर पुण्यांतील एका प्रतिष्ठित मॅजिस्ट्रेटसाहेबांची स्वाक्षरी घेऊन व तीन सिंहांचा शिक्का–'मुद्रा' मारून मी हें सर्टिफिकेट पाठविलें व तें उपयोगासहि आलें.

ह्या सर्व कागदी खटपटी चालू असतांनाच कपडे, साहित्य ह्यांचीहि तयारी करावी लागते व यासंबंधीं नवीन निघणाऱ्याची मोठी धांदल उडते. विलायतेंत कपडे इ. संबंधीं शिस्त फार कडक असते म्हणतात व तिकडून परत आलेले लोक त्यासंबंधीं प्रतिपादन मोठ्या निःसंदिग्ध शब्दांनीं करीत असतात. आपण नवीनच असल्यानें आपणांस सर्व लक्षांत घेऊन वागावें लागतें. परंतु, मला जो अनुभव आला तो मी मुद्दाम कळवीत आहें. कारण, तळीरामाच्या दोन्ही बाजूंस बसून डॉक्टर व वैद्य जशीं एकमेकांविरुद्ध विधानें करतात, नेमकी तशीच मला मिळणाऱ्या उपदेशासंबंधींची हकीकत आहे. हकीकत सांगणाऱ्या सर्वांची ती हकीकत सांगण्यांत मोठी सद्बुद्धि असते यांत वादच नाहीं. पण तरीहि त्या माहितींतील उलटसुलटपणा पाहून मोठा विस्मय वाटतो. मला एका गृहस्थांनीं भारतांतून किमान ६ सूटस् व २४ शर्टस् करून घेण्यास सांगितलें. तिकडे कापडाची फारच टंचाई व म्हणून येथूनच सर्व कपडे न्यावेत असें त्यांचें मत, तर येथून फक्त बोटीवर घालण्याइतपत व तेथें सुरुवातीला घालतां येतील एवढेच कपडे न्या, तेथें गेल्यावर कपडे करा, येथल्यापेक्षां तेथें चांगले व स्वस्त मिळतील, असें दुसऱ्या एका गृहस्थांनीं सांगितलें. बुटांची तीच तऱ्हा. तेथें बूट महाग आहेत. येथूनच चार-पांच तरी जोड्या न्या, असें एकानें सांगितलें; तर येथील बूट तेथें उपयोगी नाहींत, तेथें वॉटरप्रूफ बूट लागतात व तेथेंच घेणें इष्ट;

येथून फक्त एकच जोडी घेऊन जा असें दुसऱ्याचें मत. हीच तऱ्हा टॉवेल, चादरी इत्यादींसंबंधीं.

जें साहित्याबद्दल तेंच तेथें वागण्याच्या पद्धतीबद्दल. मी थोडासा तऱ्हेवाईक वागणारा आहें अशी माझ्याबद्दलची सर्वच मित्रमंडळींची समजूत असल्यामुळें मी तेथें कसें वागावें, याबद्दल आपुलकीनें मला खूपच सूचना देण्यांत आल्या. त्यांतील विसंगतीहि मोठी मजेदार आहे. पण ती सर्व देऊन मी उगीच सूचना देणाऱ्यांचा उपमर्द करीत नाहीं. एक जातां जातां सांगतों. एका गृहस्थांनीं सांगितलें कीं, बोटीवर गेल्याबरोबर गच्च जेवा, पोट भरलेलें ठेवा व सारखें हिंडत रहा, म्हणजे आजारी पडणार नाहीं व जलप्रवास सुखाचा होईल. दुसऱ्यानें सांगितलें, गेल्यावर कशाला, जाण्यापूर्वी शक्य तों हलकें अन्न घ्या, पाहिला दिवस. दोन दिवस फारसें खाऊंच नका. कॉफी–फळें एवढेंच घ्या व सारखें केबीनमध्यें पडून रहा. दोन दिवसानंतर बरें वाटेल व पुढें सर्व जलप्रवास मोठा सुखाचा होईल. ह्या बाबतींतील हीं उलटसुलट मतें लक्षांत घेऊन मी माझ्या नित्यक्रमांत कांहींहि बदल न करतां वागलों. गच्च जेवलोंहि नाहीं, उपाशीहि राहिलों नाहीं. सारखा हिंडतहि राहिलों नाहीं, पण सारखा झोपलोंहि नाहीं आणि सर्वांत महत्त्वाचें म्हणजे मला यत्किंचितहि बोट लागल्याचा त्रास झाला नाहीं. मला वाटतें 'ऐकावें जनाचें आणि करावें मनाचें' हेंच सर्वांत उपयुक्त सूत्र ठरेल. प्रवास-साहित्याची तयारी व प्रवासांत वागण्याची पद्धत ही आपल्या स्वतःच्या कल्पनेनुसार ठेवावी.

यानंतर कर्मकांडापैकीं एक महत्त्वाचें कार्य राहतें, तें म्हणजे कॉलरा व देवी टोंचून घेणें हें होय. हीं किंवा ह्या प्रकारचीं सर्टिफिकिटें हीं इंटरनॅशनल फॉर्मवर लागतात व त्यासाठीं तीं म्युनिसिपल दवाखान्यांतून किंवा सरकारी दवाखान्यांतून घ्यावीं लागतात. हीं वैद्यकीय सर्टिफिकिटें फारच महत्त्वाचीं असून तीं पासपोर्टलाच डकवून ठेवावीं लागतात. प्रत्येक बंदरावर उतरण्यापूर्वीं पासपोर्ट तपासतात व तीं असलीं तरच खालीं उतरूं देतात. एका गृहस्थाचें सर्टिफिकेट 'आदन'ला सांपडेना, तर त्याला खालीं उतरूं दिलें नाहीं. एवढेंच काय ह्या सर्व प्रवासांत पासपोर्ट, वैद्यकीय सर्टिफिकिटें व ॲड्मिशन पत्रें ह्या कागदांना फारच महत्त्व आहे. मी हें सर्व

महत्त्वाचे कागदपत्र एका पिशवींत घालून ती सदैव जवळ बाळगीत असतों.

भारतांतून परदेशांत पैसे नेण्याची सोपी पद्धत म्हणजे येथें एखाद्या बँकेंत पैसे भरून नंतर तें खातें तिकडे बदलून घेणें ही होय. लॉइड्स्, ग्रिंडलेज इत्यादि मोठ्या बँकांत ही सोय असते व तीच पद्धत मोठी चांगली असल्यानें मी स्वीकारली आहे. मी मुंबईच्या ग्रिंडले बँकेंत पैसे भरून खातें लंडनला सुरू करण्यासंबंधीं त्यांना पत्र दिलें आहे. त्याच्या परिणामीं मी जेव्हां आतां लंडनला जाईन तेव्हां पार्लमेंट स्ट्रीटवर गेल्याबरोबर तेथील बँकेंत, माझें खातें-पुस्तक, चेक-बुक, इत्यादि तयार झालेलें असेल; नमुन्याच्या सह्या मुंबईस करून दिलेल्या तिकडे पाठविण्यांत येतात व पैसे भरण्यास किंवा काढण्यास कांहींच अडचण येत नाहीं.

प्रत्यक्ष प्रवासांत प्रत्येकाबरोबर खर्चासाठीं पैसे लागतातच. हे पैसे रुपयांच्या स्वरूपांत असल्यास सर्वत्र चालत नाहींत. इटालींत लीरा लागतात, तर फ्रान्समध्यें फ्रँक्स लागतात. हीं नाणीं मिळण्याऐवजीं सर्वत्र बँका असलेल्या थॉमस कुकचे ट्रॅव्हलर्स चेक्स घेणें हें फार सोयीचें असतें. कुकचे प्रवासी चेक्स घेणें हे सर्व नोटांप्रमाणें चालवितां येतात. व हे दोन पौंड, पांच पौंड, दहा पौंड, वीस पौंड अशा वेगवेगळ्या किंमतीचे असतात. प्रत्येक प्रवासी आपापल्या इच्छेनुसार हव्या तेवढ्या पौंडांचें अर्थात् ४५० पौंडांच्या आंत चेक्स घेतो. मी माझ्याबरोबर ४५ पौंडांचे चेक्स व ५ पौंड रोख घेतले आहेत.

युरोपखंडांतून प्रवास करावयाचें ठरविलें म्हणजे आणखी एका महत्त्वाच्या गोष्टीची आवश्यकता असते. त्यास 'व्हिसा' असें रूढ नांव आहे. इटालींतून तुम्हांस जावयाचें असलें किंवा थोडे दिवस मुक्काम करावयाचा असला तर त्यास इटालीच्या सरकारची अनुज्ञा लागते. ही अनुज्ञा इटालीची भारतांत जी वकिलात असते तेथून मिळते. ही अनुज्ञा मिळविण्यास अर्थात्च निराळे पैसे लागतात. उदाहरणार्थ, मला इटालीचा व्हिसा मिळविण्यास रु. २३–४–० व फ्रान्सचा व्हिसा मिळविण्यास रु. ६–८–० पडले. हे पैसे घेण्याचा मुख्य उद्देश त्यांना वकिलातीचा खर्च भागविण्यासाठीं मदत म्हणून असतो व याव्यतिरिक्त जे कर घेतले जातात ते त्या देशांतील हवा–पाणी यांचा उपयोग केल्याबद्दल असतात. उदाहरणार्थ,

इटालींत जिनोआला उतरून इटालींतून आरपार आगगाडींतून तडक जरी गेलें तरी जातांना जो रस्ता तुम्ही वापराल व जी हवा व जें पाणी तुम्ही सेवन कराल त्याबद्दल १ पौंड कर द्यावा लागतो.

सर्व युरोपखंडांतील देशांत जाण्यासाठीं 'व्हिसा प्रकरण' हें प्रथम घ्यावेंच लागतें व हे सर्व व्हिसा मिळाल्यावर मगच प्रवासांत निर्बंधपणें राहतां येतें. थॉमस कुकतर्फे जर आपण प्रवास करीत असलों तर ते आपणासाठीं सर्व व्हिसा मिळवून आणतात. पण अर्थात्च आपणांस पैसे जास्त पडतात. आपण स्वतंत्रपणें त्या त्या वकिलातींत गेलों तरी आपणांस ते व्हिसा मिळवतां येतात व खर्च कमी येतो. दगदग मात्र पडते.

हें सर्व झालें—पासपोर्ट, व्हिसा, एक्स्चेंज, मेडिकल सर्टिफिकेटस् यासंबंधीं सर्व हातांत आलें म्हणजे संपूर्ण पैसे भरून बोट कंपनीचें तिकिट हातांत पडतें व मग आपणांस बोट निघण्याची निश्चित तारीख, वेळ, आपली बोटींतील जागा इ. कळतें. ह्या कागदास 'एम्बार्केशन नोटीस' म्हणतात. तिकिटास जोडून एक फॉर्म असतो, त्यावर निघण्याच्या वेळीं वेगवेगळे अधिकारी पासपोर्ट, वैद्यकीय तपासणी इत्यादि पाहून शिक्के मारतात व प्रत्यक्ष बोटीवर चढतांना तो फॉर्म पोलिस काढून घेतात. एकदां बोटीवर चढलें, कीं कोणत्याहि कारणासाठीं परत खालीं येतां येत नाहीं. त्यामुळें मित्रमंडळींस वा नातलगांस भेटण्याचा, निरोप घेण्याचा सर्व कार्यक्रम मनसोक्त उरकल्यानंतर मग बोटीवर जावें हें उत्तम.

माझी बोट दि. ५ रोजीं मंगळवारीं रात्रीं १० वाजतां सुटणार असें निश्चित ठरलें होतें. परंतु प्रत्यक्ष बंदरांतून १० वाजतां निघणार कीं, बंदरांतून ५ वाजतां निघून १० वाजतां मार्ग आक्रमणार हें कोणासच नक्की सांगतां येईना. मुंबईतील माझे चार दिवस सर्व बँक व इतर अशाच महत्त्वाच्या कामांत गेले होते. पाऊसहि अगदीं सारखा लागलेला होता. त्यामुळें माझ्या बरोबर हिंडण्यासाठीं व दोन दिवस मजेंत घालविण्यासाठीं आलेलीं मुलें फारच हिरमुसलीं झालीं होतीं. त्यांतच मुंबई बंदर कॉलरापूर्ण समजलें गेलें असल्यानें बोटीवर येण्यास कोणासच परवाना मिळत नव्हता. कांहीं लोकांनीं त्यांतच अन्य मार्गांनीं बोटीवर येण्याची खटपट केली होती. पण हे अन्य

मार्ग मला अमान्य असल्यानें माझ्या स्नेही-मंडळींपैकीं कोणीहि बोटीवर येणार नव्हता.

दि. ५ रोजीं मंगळवारीं ठीक ३ वाजतां मी सर्व सामानासह मुंबई बंदरावर हजर झालों. लगेच सामानाचें वजन करविलें व कस्टम तपासणीसाठीं फॉर्म भरला. आपणाजवळ असलेले सर्व कांहीं सोनें, चांदी, हिरे-माणकें, मोतीं, रेशमी कापड इ. ह्या फॉर्मांत भरून द्यावयाचें असतें. हा फॉर्म भरणें मला फारच सोपें होतें त्यामुळेंच सर्वत्र Nil हीं अक्षरें पाहून कस्टम अधिकाऱ्यानें सहज एक पेटी उघडल्यासारखें केलें व एका निमिषार्धांत सर्व पेट्यांवर, स्वाक्षऱ्या ठोकल्या. मजसारखा सोज्ज्वल माणूस कांहीं लबाडी करणारा नाहीं असें त्याला वाटलें, कीं निष्कांचन असा हा इसम काय नेणार ह्या पेट्यांतून, असें वाटलें तें त्याच्या चेहऱ्यावरून मला नीटसें ओळखतां आलें नाहीं. तपासणी झालेल्या पेट्यांवर नांवाचीं लेबलें लावलेलीं होतींच. ती एका पोर्टट्रस्टच्या हमालाच्या स्वाधीन करून मी मित्रमंडळींकडे गप्पा मारण्यास आलों. वैद्यकीय तपासणी ५ वाजतां सुरू व्हावयाची होती व आतां कोठें साडेतीन वाजत होते. बंदरावर मला निरोप देण्यास पुण्याहून खूपच मंडळी आली होती. त्या सर्वांशीं पोटभर गप्पा मारल्या. १० वाजेपावेतों कोणासच थांबवून घेणें इष्ट नसल्यानें मी बहुतेकांना गटागटानें निरोप दिला व सुमारें ७।। वाजतां वैद्यकीय तपासणीस गेलों. सर्व तांत्रिक शिक्कामोर्तब झाल्यावर परत उरलेल्या मित्रमंसळींकडे आलों. तेथेंच सर्वांसमवेत कॉफीपानाचा कार्यक्रम झाला. आतांपावेतों मनाला जड वाटत नव्हतें तें आतां वाटूं लागलें. ही सर्व मित्रमंडळी अगदीं जवळची व जिव्हाळ्याची होती. त्यांचा निरोप घेतांना पुन; एकदां घरून निघतांना झालेल्या मनःस्थितीची उजळणी झाली. शाकुंतलाच्या चौथ्या अंकाचें स्मरण झालें. कण्ठ स्तम्भित झाला. दर्शन बाष्पवृत्तिकलुषित झालें. "मलयतरोन्मूलितचंदनलतेव विषयान्तरे जीवितं कथं धारयिष्ये" याची आठवण होऊन क्षणमात्र भावनावश झालों. 'एषः पन्थाः एतत् कर्म' ह्या सुहृद्वाक्यानें पुनश्च स्थिर झालों व तडक बोटीवर गेलों. जिन्यावरून जातांना मायभूच्या किनाऱ्यावरून आपण निघत आहोंत याची पुनश्च जाणीव झालीच !

ही सर्व हकीगत लिहून होईतों आपण आदनला पोहोंचूं असें वाटलें

होतें. पण अजून थोडा अवकाश दिसतो आहे. तरी हें पत्र येथेंच पुरें करून इटालियन बोटीसंबंधीं वेळ मिळाला तर 'आदन' येण्यापूर्वींच दुसऱ्या पत्रांत लिहीन म्हणतों. कळावें.

आपला,

×××

ө ө ө

## आमची इटालियन बोट

एडन

ता. २५-९-१९५०

स. न. वि. वि.

आमच्या बोटीनें मुंबईचा किनारा सोडला आणि डेकवर थोडा वेळ उभें राहून आम्ही सर्वजण आपापल्या खोल्यांकडे वळलों. आंत शिरतांच बोटीवरील दिव्याच्या लखलखाटानें, तेथील अंथरलेल्या गालिचानें व अधिकाऱ्यांच्या पांढऱ्याशुभ्र पोषाखानें थोडें बरें वाटलें. तिकीट तपासून मला एका अधिकाऱ्यानें माझी खोली व क्रमांक सांगितला व त्यानुसार एका कर्मचाऱ्यासमवेत मी माझ्या खोलींत दाखल झालों. सामान माझ्या कॉटजवळ जुळवून ठेवलें व कपडे काढले. एवढ्यांतच त्या खोलीचा अधिकारी – स्टुअर्ड – आला व आधीं जेवण करून घ्या मग उशीर झाला तर जेवण बंद होईल म्हणून गर्दी करूं लागला. जेवणाची इच्छा नव्हतीच. भूकहि नव्हती. पण 'एकदां पाहावें तरी' असें म्हणून त्याच्या मागोमाग गेलों. जेवणास जाण्यासाठीं बोटीच्या मागच्या अंगास खालीं उतरून जावें लागलें. तीन प्रशस्त मोठ्या दिवाणखान्यांत एकूण ५० टेबलें मांडलीं होतीं. प्रत्येक टेबलावर १० माणसें बसण्याची योजना होती. कप, बश्या, कांटे, चमचे व सुऱ्या सर्व दिव्यांच्या लखलखाटांत चमकत होतें. वास मात्र चमत्कारिक सुटला होता. मी गेलों. थोडेंसें खाल्लें. फळें खाल्लीं व वर परत आलों. पिण्यास बर्फाचें गार पाणी व जेवणहि बरें नव्हतें.

अनु. क्र. २८३६० वि. नों. दि. क्रमांक २४८२

वर डेकवर आलों तों पाऊस कोसळत होता. बोटीवर येण्याचे जिनें काढून घेण्यांत आले होते. बंदरावर फक्त पोलिस अधिकारी दिसत होते. पोहोंचाविण्यासाठीं आलेले बहुतेक सर्व लोक घरोघर परतले होते व सर्वत्र सामसूम व अंधार होता. १० वाजले, बोटीनें भोंगा वाजविला व पोलिसांनीं शिट्या वाजविल्यावर आमच्यासह बोटीनें भारताचा किनारा सोडला. प्रतिक्षणीं आम्ही बंदरापासून दूर जाऊं लागलों. माझ्या आसपास उभ्या असलेल्या अनेकांचे डोळे पाणावलेले मला दिसले. " पुनरिदं तपोवनं प्रेक्षिष्ये " विचारणारी शकुंतला समोर दिसूं लागली.

मी मानसशास्त्राचा अभ्यास करणारा, प्रत्येक भावनेची व मनोव्यापाराची चिकित्सा करणारा, दुःख होतें म्हणजे काय होतें हें विश्लेषण करून पाहूं इच्छिणारा, त्या मला हें सर्व दृश्य मोठें विलोभनीय वाटलें.

त्या पाण्यांत मोहक दिसणाऱ्या रंगीबेरंगी दिव्यांनीं चकाकणाऱ्या गंधर्वनगरीप्रमाणें भासणाऱ्या मोहमयीला सोडून मोहार्तात झालेल्या स्थितप्रज्ञाप्रमाणें मी किती तरी वेळ उभा होतों. नंतर बोटीनें तोंड फिरवलें व मुंबई दिसेनाशी झाली.

खालीं गेलों व कर्मचाऱ्यानें अंथरून ठेवलेल्या स्वच्छ बिछान्यावर स्वस्थ झोंपलों. माझ्या खोलींत आणखी बरेच महाराष्ट्रीय होते. प्रा. चाफेकर, श्री. साने, गोडबोले, चिपलकट्टी, कुलकर्णी, पाटील इ. आम्ही सर्व एकत्रच होतों.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं उठून पाहतों तों बरीच मंडळी प्रकृतीनें अस्वस्थ झालेली. भडाभड होणाऱ्या उलट्यांनीं जेरीस आलेली दिसली. शेंकडा नव्वद लोकांना बोट लागली होती. डेकवर आलों व स्वच्छ गार वाऱ्यावर उभा राहिलों. मला यत्किंचितहि कांहीं होत नव्हतें. पण इतरांकडे पाहून सहसंवेदनेनें कांहीं होईल अशी भीति वाटूं लागली म्हणून डेकवर एका बाजूस जाऊन कोपऱ्यांत वाऱ्यावर उभा राहिलों. न्याहारीची घंटा होईपावेतों मी असाच स्वस्थ होतों. न्याहारीसाठीं खालीं गेलों. भटारखान्याच्या वासानें मलाहि गरगरूं लागलें. म्हणून खालीं न जातां वरच थांबलों व न्याहारीस सुट्टी दिली. एवढ्यांत कांहीं मित्रमंडळी आली. त्यांच्या आग्रहा-

वरून खालीं जाऊन थोडी कॉफी प्यालों व ब्रेड आणि मुरंबा खाल्ला. सुमारें दोन दिवस लोकांना बोट लागण्याचा त्रास चालू होता. बोटीचा वेग थोडा कमी करण्यांत आला व शुक्रवारपासून लोक थोडे हुषार व खुशींत दिसूं लागले.

आमची बोट १९४७ सालीं बांधलेली असून जवळ जवळ नवीनच आहे. ९००० टनी बोटीवर १००० उतारूंची सोय आहे. सध्यां आमच्या बोटीवर ७५० उतारू असून त्यांतील आदनपर्यंतचे सुमारें २५० आहेत. बोटीस चार मजले असून तळमजला व चौथा मजला राहण्याकरितां उपयोगांत आणलेला आहे. दुसरा व तिसरा मजला येथें सर्वांना बसण्याकरितां मोकळ्या जागेंत खुर्च्या, रेस्टॉरंट, अधिकाऱ्यांच्या खोल्या, दवाखाना, सलून इत्यादि सर्व आवश्यक व्यवस्थेच्या भागानें व्यापला आहे.

बोटीवर सर्वत्र लाऊडस्पीकर्स लावलेले असून एका ठिकाणाहून लावलेल्या रेकॉर्डस्, रेडिओ कार्यक्रम सूचना व रोजच्या माहितीपत्रकांत त्या दिवशीं बोट ज्या अक्षवृत्तावर व रेखावृत्तावर असेल ती माहिती बॅरोमीटर—उष्णतामान, हवेची दिशा, गेल्या चोवीस तासांत आक्रमलेले मैल व एकूण मागच्या बंदरापासून झालेले मैल अशी माहिती असते.

आपण श्रीबागला गेलों असतां ताऱ्यावरून घड्याळ लावतात तें यंत्र पाहिलें होतें. तसेंच यंत्र येथें बोटीवर आहे. मात्र येथें रोज रात्रीं ९ वाजतां घड्याळ बदलण्यांत येतें व रोज दुपारीं १२ वाजतां ‘ लॉग ’ म्हणजे वरील माहिती बदलली जाते. मुंबईहून आदनपावेतों आम्ही तडक पश्चिमेकडे जात असल्यानें घड्याळ जवळ जवळ रोज तासभर मागें न्यावें लागतें. आतां आम्ही तांबड्या समुद्रांत असून जवळ जवळ उत्तरेस जात आहोंत. तरी रोज १२ ते १५ मिनिटें घड्याळ मागें न्यावें लागतेंच.

बोटीवर सर्व अधिकारी इटालियन असल्यानें व बोट इटालियन असल्यानें सर्व सूचना इत्यादि, प्रथम इटालियन भाषेंत असतात. नंतर त्यांचें इंग्रजी भाषांतर सांगितलें जातें वा लिहिलें जातें. सुरुवातीला इटालियन पाट्या वाचून त्यांचा अर्थबोध करून घेणें हा मोठा करमणुकीचा विषय होऊन बसला होता.

बोटीवर स्वच्छता बरी आहे. संडास, स्नानगृहें पुष्कळ आहेत. दिवे सर्वत्र भरपूर आहेत व पाणी रेलचेल असल्यानें स्नान वगैरेची चैन आहे.

प्रत्येक ठिकाणीं वॉशबेसीन्स बसविलीं असून सर्वत्र आरसे व त्यावर दिवे बसविले आहेत. प्रत्येक बेसीनमध्यें थंड व ऊन पाण्याचे नळ ठेवले असून दोन्ही एकत्र करून पाणी आणण्याची सोय आहे. स्नानगृहांत फक्त फवाऱ्याचीच ( शॉवर ) सोय आहे. त्यांतहि गरम पाणी व थंड पाणी ज्या प्रमाणांत मिसळून हवें असेल त्या प्रमाणांत नळ फिरवून घेण्याची सोय आहे. खोलींत कपडे धुण्याचीहि सोय उत्तम आहे. मला ही सोय इतकी पसंत पडली आहे कीं, रोज स्नान व कपडे धुणें ह्यांत सुमारें १।। तास तरी मी मजेंत घालवितों. एकूण हे चार-पांच दिवस तरी निवान्तपणा भरपूर मिळून आनंदांत गेले आहेत. कळावें.

आपला,
×××

ө ө ө

## " आदन " म्हणजे एडन

एडन
ता. ९–१०–१९५०

स. न. वि. वि.

गेल्या वेळचीं पत्रं लिहून तीं पोस्टांत टाकण्यासाठीं आम्ही एडनची वाट पाहत होतों. एडन दिसूं लागलें तसतशी आमची उत्सुकता वाढूं लागली.

ह्याच एडनला–आदनला–दोन मोठे माननीय सद्गृहस्थ राहतात. श्री. जोशी हे तेथें ॲडव्होकेट असून आदन येथील हिन्दी वकिलात ही ह्याच गृहस्थांच्या खटपटीमुळें प्रस्थापित झाली आहे. ह्यांचें तेथील सरकारांत मोठें वजन असून सर्व राजकीय बाबतींत त्यांच्या मताला फार मोठा मान आहे. दुसरे श्री. सबनीस; हे तेथील मुख्य एक्साइज कमिशनर असून त्यांचेंहि तेथें मोठें वजन आहे. मला या उभयतांनाहि भेटण्याची फारच इच्छा होती. दोघांनाहि माझ्या युरोप–गमनाची वार्ता पुण्याहून पत्रद्वारें

आधींच कळविण्यांत आलेली असल्यानें तेहि माझ्या आगमनाची प्रतीक्षा करीत असतील हें संभवनीय होतें. त्यामुळें खालीं उतरण्यासाठीं माझी चुळबूळ सुरू झाली. उतरणाऱ्या सर्व उतारूंचे पासपोर्ट इ. चें कार्य आटोपून मग जर आमच्यासारख्यांना परवाना मिळणार असला तर बहुधा पहांट उजाडणार असें वाटूं लागलें, पण एमिग्रेशन ऑफिसरचा शिक्का मिळाल्याशिवाय जमिनीवरच काय पण गॅंगवेवर ( खालीं उतारण्याच्या जिन्यावर ) सुद्धां प्रवेश मिळविणें अशक्य होतें. माझ्या नित्याच्या स्वभावानुसार मी थोडी धडपड करून कांहीं उपायानें लवकर परवाना मिळविण्याच्या खटपटीला लागलों. एवढ्यांत माझ्याच नांवाची चौकशी करीत एक गृहस्थ एक पाकीट घेऊन आले. पाकीट श्री. जोशी यांच्याकडून आलें असून त्यांत मला सत्वर खालीं उतरविण्यासंबंधींची व्यवस्था केल्याचें लिहिलें होतें. तें पत्र घेऊन मी एमिग्रेशन ऑफिसरकडे गेलों मात्र, ताबडतोब एका शिपायास बोलावून त्यानें मला त्याच्याबरोबर स्पेशल पोलिस-लॉंचनें बंदरावर पोहोंचवून दिलें.

श्री. जोशी ह्यांच्या शब्दास तेथें असलेला हा मान पाहून मला फारच बरें वाटलें व यं देशं श्रयते तमेवकुरते बाहुप्रतापार्जितं ' असें जें विद्वानासंबंधीं म्हटलें आहे तें आठवलें.

८ ह्याप्रमाणें बोटीवरून खालीं उतरणारा मीच पहिला होतों. बंदरावर उतरविल्यावर त्या शिपायानें मला एका अधिकाऱ्याच्या स्वाधीन केलें व त्यानें मला तेथून एका हांकेच्या अंतरावर असणाऱ्या श्री. सबनिसांच्या घरीं नेऊन पोहोंचविलें. एव्हांना रात्रींचे ११।। झाले होते. तरी श्री. सबनीस व सौ. सबनीस यांनीं उत्तम आतिथ्य केलें. हिंदुस्थानांतील ओळखीच्या लोकांबद्दल प्रथम व सामान्य हिंदुस्थानासंबंधीं नंतर, खूप गप्पा झाल्या. फराळ वगैरे झाल्यावर त्यांनीं श्री. जोशी यांना फोन केला व आम्ही सर्व श्री. सबनिसांचें गाडींतून तेथून ५ मैल अंतरावर असणाऱ्या क्रेटर नांवाच्या भागांत श्री. जोशी यांच्या घरीं गेलों. सौ. जोशी यांनीं माझ्याकरितां जेवण तयार करून ठेवलें होतें. प्रथम आमची बोट ८ च्या सुमारास येईल अशा कल्पनेनें त्यांनीं सर्व बेत केला होता. पण आमच्या बोटीस फारच उशीर झाला होता. इतकी रात्र झाली तरी ते उभयतां माझ्यासाठीं जागेच होते.

तेथेंहि भरपूर फराळ झाला व खूप गप्पा झाल्या. हिंदुस्थानांतील राजकीय परिस्थितीबद्दलहि बोलणें झालें. जवळ जवळ चार वाजतां पहाटेची कॉफी घेऊन मी त्यांचा निरोप घेतला व श्री. सबनिसांच्या गाडींतून बंदरावर आलों. ४॥ च्या सुमारास बोटीवर येऊन झोपलों.

आदन हें बंदर 'मुक्तद्वार' आहे म्हणजे तेथें जकात नाहीं. कितीहि माल येथें विकत घेतला तरी तो जकात न भरतां नेतां येतो. ह्याचा फायदा बोटीवरील उतारूंना मिळावा म्हणून लहान लहान होड्यांत वेगवेगळ्या प्रकारचा माल भरून तद्देशीय किरकोळ व्यापारी बोटीजवळ येतात व एखाद्या दोरखंडानें आपलें होडगें बोटीस अडकवून ठेवतात. नंतर बोटीवरच्या लोकांशीं संभाषण सुरू करून एका लांब दोरीच्या सहाय्यानें तो व्यापारी वरच्या गिऱ्हाइकांशीं आपला संबंध स्थापन करतो, नंतर त्या दोरीच्या मध्यभागीं एक टोपली बांधून त्यांतून माल वर पाठविला जातो व त्याच टोपलींतून पैसे खालीं पाठविले जातात. नेहमीं दोरीचें एक टोंक खालीं व्यापाऱ्याच्या हातांत व एक वर गिऱ्हाइकाच्या हातांत व मधोमध टोपली असते. आदनला विकायला आलेल्या मालांत अमेरिकन मालाचें प्रमाण खूपच होतें. सिगारेटस्, सिगारेट लाइटर्स्, शर्ट, जर्सीज, नेकटाय, साबण, टूथपेस्टस्, कॅमेरे, फिल्मस् इत्यादि सामान खूप आलें होतें.

हिंदुस्थानपेक्षांसुद्धां येथें माल स्वस्त मिळत होता. प्रत्यक्ष हिंदुस्थानांत तयार झालेला "हमाम" येथें हिंदुस्थानपेक्षां स्वस्त पाहून आश्चर्य वाटलें. कॅमेरे व फिल्मस्ची किंमत हीं आश्चर्यकारक वाटली. प्रत्यक्ष एडनला कांहींच तयार होत नाहीं. पण सर्व जगांतून आलेला माल येथें जकात नसल्यामुळें स्वस्त विकला जातो.

हा माल घेऊन येणारे व्यापारी जातीनें अरब दिसले. किंचित् हबशी दिसणारे हे लोक सांगितलेल्या किंमतीच्या $\frac{1}{3}$ ला सुद्धां माल देत. प्रथम काय पाहिजे, हें विचारल्यावर आपण त्याला किंमत विचारावी. तो नंतर प्रश्न विचारतो तो प्रथम आपणांस कळतच नाहीं. "काय पैसा ? What Money ?" ह्याचा अर्थ असा कीं, तुमच्या जवळ कोणत्या प्रकारचा पैसा-नाणें आहे ? आपण सांगितलें Indian Money कीं तो किंमत रुपयांत सांगतो. Italian Money सांगितलें कीं लीरांत व English Money सांगितलें

कीं शिलिंगांत किंमत सांगतो. आदनच्या या बाजारांत जसा सर्व जगांतील माल येतो जसा सर्व जगांतील पैसा येथें चालतो.

ऑस्ट्रेलियन पौंड असला तर त्याला इंग्लिश पौंडापेक्षां कमी किंमत असते व सीलोनच्या रुपायाला हिंदुस्थानच्या रुपयापेक्षां कमी लेखलें जातें हें येथें आमच्या निदर्शनाला आलें. ब्लेडचीं पाकिटें हिंदी रुपयाला तीन तर सीलोन रुपयाला दोनच मिळतात. मात्र, कोणतेंहि नाणें येथें स्वीकारलें जातें हा या ठिकाणचा विशेष आहे.

आमच्या बोटीवर या ठिकाणीं जितक्या सिगारेटस् विकत घेतल्या गेल्या तेवढ्या मला वाटतें सर्व पुण्याला एक आठवडा तरी पुरतील. ५० सिगारेटस्‌चे १२ टिन्स एका पेटींत घातलेले, अशा पेट्यांच्या पेट्या डझनवारी एकेकानें विकत घेतल्या. या व्यतिरिक्त मोठालीं २००-२०० चीं पाकिटें असंख्य खपलीं. तेंच ब्लेडस्‌च्या बाबतींत. ह्या सर्व भानगडींत भाग घेऊन मीहि एक ब्लेडचें १०० चें पाकीट व एक भेट देण्यासारखी छोटीशी वस्तु विकत घेतली. अनेकांनीं अनेक वस्तु विकत घेतल्या. हे सौदे ठरतांना पाहणें मोठ्या मौजेचें होतें. प्रथम तो 'सॅंबो'—सर्व व्यापाऱ्यांना हांक मारण्याकरितां त्या सामान्यनामाचा उपयोग होत असे. वर दोरी टाकून गिऱ्हाईक गांठीत असे. नंतर गिऱ्हाईक ज्या भाषेंत बोलेल त्या मग ती हिंदी, इंग्रजी, इटालिन, फ्रेंच कोणतीहि असो—भाषेंत वस्तूंचें गुणवर्णन करून आपण ती खास तुमच्यासाठीं फारच स्वस्त देत आहोंत असें आवर्जून सांगत असे. नंतर पैसे कोणत्या नाण्यांत देणार ते विचारून तो भराभर रुपये, त्यांच्या लीरा, त्यांचे शिलिंग वगैरे सांगत असे. गिऱ्हाइकानें Too much ! म्हटलें कीं "You say !" आलेंच ! मग त्यानें हवी तेवढी किंमत सांगावी. शेवटी सॅंबो एकदां लास्ट ऑफर सांगे व सौदा पटे किंवा मोडे. हा आंतरराष्ट्रीय बाजार मोठा ज्ञानदायक व अनेक गोष्टी एकाच वेळीं शिकवणारा असा लाभदायक आहे.

प्रत्यक्ष आदन बंदर हें विस्तीर्ण असून तेथें एकाच वेळीं मुंबईपेक्षां किती तरी जास्त बोटी राहूं शकतात. बोटीवरून बंदरावर जाण्यासाठीं मोटारलॉंच किंवा होडग्यीं असून भाडें दहा आणे पडतें. धक्क्यावर लगेच सरकारी इमारती सुरू झाल्या आहेत. एक्साइज कचेरी इत्यादि येथेंच

बंदराला लागून आहे. ह्या भागास स्टीमर पॉइंट म्हणतात. प्रत्यक्ष गांव हें येथून ६ मैल आंत असून त्यास क्रेटर अशी संज्ञा आहे. हें ज्वालामुखीचें एकेकाळचें तोंड आहे अशी कल्पना आहे. स्टीमर पॉइंटकडून क्रेटरकडे जातांना सर्वत्र घाटांतील रस्त्यासारखी रचना आहे. सर्वत्र बोडके डोंगर असून झाडाझुडुपाचें नांव सुद्धां नाहीं. यावरून पूर्वी येथें ज्वलत ज्वालामुखी असावा याबद्दल खात्री पटते. गांवांत घरें, बाजार इत्यादि चांगला मोठा आहे. हिंदु देवळें येथें आहेत व हिंदु वस्तीहि बरी आहे. लोक मात्र फारसे सुधारल्यासारखे दिसत नाहींत. गांवांत रात्रीं गेलों होतों व सकाळीं गेलों तों फक्त बंदरावरच हिंडलों. त्यामुळें अर्थात्च कांहीं विधानें मला थोडीं जपूनच करावीं लगत आहेत. पण सर्वसामान्यपणें आढळलेल्या गोष्टीं-वरून तेथील लोकांसंबंधीं केलेलें अनुमान फारसें चुकीचें ठरणार नाहीं.

आदनहून आम्ही निघालों व तांबड्या समुद्रांत शिरलों. आतां समुद्र अगदींच संथ वाटूं लागला. उष्णता मात्र जास्तच भासूं लागली. समुद्राचें पाणी इतकें सुंदर नीलवर्णाचें पूर्वी कधींहि पाहण्यास मिळालें नव्हतें. आतां सर्व उतारूंचा बोट लागण्याचा त्रास संपला होता. आदनला जवळ जवळ २५० उतारू गेले होते व त्यामुळें आम्ही सर्व खुष होतों. डेकवर गप्पा व करमणूक हा आमचा आवडीचा कार्यक्रम असे. संध्याकाळीं कोणाचे तरी डबे उघडून चिवडा-लाडूचा फराळ करायचा व त्याच वेळीं प्रत्येकानें आपल्या शिदोरींतील कांहीं विनोद, कांहीं चुटके, कांहीं प्रवासाचे अनुभव इत्यादि सांगायचे. या कार्यक्रमांत वेळ मोठ्या मजेंत जात असे. इतरांचे कार्यक्रम तीन शब्दांत वर्णन करण्या जोगे आहेत—Beer, Bridqe or Bed—ब्रिज खेळत बसणें, बीर पीत बसणें वा झोपणें.

आदन सोडल्यानंतर दुसऱ्या दिवशीं म्हणजे दि. १२ सप्टेंबर मंगळवारीं सकाळीं १० वाजतां बुडत्या जहाजावरून निघण्याच्या तयारीची कवायत झाली. त्याला Abandonship drill असें नांव होतें. आमच्या प्रत्येकाच्या गादीखालीं एक Life Belt ठेवलेला असतो. तो घेऊन व गळ्यांत बांधून प्रत्येकानें आपापल्या नियोजित जागीं जाऊन उभें राहावें अशी योजना होती. वास्तविक या कार्यक्रमास फारच गंभीर व व्यवस्थित स्वरूप यावयास हवें होतें. नेहमीं लहान मुलांस व स्त्रियांस आधीं वांचवावयाचें,

त्यांना लाइफ बोटींत आधीं बसविण्याची व्यवस्था करावयाची असा शिरस्ता ! पण आमच्या गबाळ लोकांना त्यांचें काय होय ? त्यांनीं ही गर्दी केली ! अधिकारी पडला इटालियन. तो बोले तें कोणालाच कळेना. तरी त्यानें खुणांनीं सर्व समजावून देऊन बायकांना व मुलांना पुढें लाइफ बोटीशीं जवळ उभें केलें. आमचे कांहीं पंजाबी बंधु याबद्दल बरेंच आश्चर्य व राग प्रकट करते झाले. पण आम्हीं त्यांना गप्प केलें. मायक्रोफोनवरून आज्ञा सांगितल्या जाऊं लागल्या. खलाशी लाइफ बोटीवर चढून सज्ज उभे राहिले. भोंगा वाजूं लागला बोटीचा वेग कमी झाला व सर्वत्र किंचित्काल शांत झालें. सर्वांनीं रांगेप्रमाणें पुढें सरकावें असें कळविलें गेलें. पण भोंगा होण्याचा अवकाश सर्वच्चजण असे कांहीं जोरांत पुढें सरकले कीं अपघात होण्याचें थोडक्यांत बचावलें ! कॅप्टन वरून हें सर्व पाहत होताच. त्याला बहुधा आमची शिस्त पाहून कींव आली असावी. त्यानें लगेच संपल्याचा भोंगा वाजवून सर्वांना मोकळें केलें. त्यामुळें एकहि लाइफ बोट खालीं उतरण्यापूर्वींच ड्रिल संपली. असो.

गैरशिस्तपणाचा नमुना हा अगदीं संपूर्ण हिंदी स्वरूपाचा झाला हें लिहितांना मला फार खेद होत आहे. बोटीवर खालच्या डेकवर असणारे सर्वच हिंदुस्थानांतून परदेशाला निघालेले हिंदी लोक आहेत. त्यांच्यांत तेथें असणारा शिस्तीची अभाव एकदम नाहींसा कसा होणार ? ही बेशिस्त आदनचे उतारू होते तों पावेतों फारच भासत होती. पुढें गाडी सुधारेल असें वाटलें होतें, पण तसें कांहीं घडलें नाहीं व गैरशिस्तपणा दाखविण्याचा कोणताहि प्रसंग मंडळींनीं वायां जाऊं दिला नाहीं. असो.

तांबड्या समुद्रांत सर्व बाजूंनीं गरम वारे वाहत असल्यानें उष्णता फारच होती. आम्ही आतां उत्तरेकडे निघालों होतों व दोन्ही बाजूंस किनारा दिसत नव्हता. गुरुवारीं दिवसा किनारा दिसूं लागला. आम्ही सुवेझच्या जवळ येऊन पोहोंचलों. आतां पूर्वींपेक्षां गलबतें जवळून चाललीं म्हणजे एकमेकांना हात हालवणें, शिट्या वाजविणें इत्यादि कार्यक्रम बराच होऊं लागला. सुवेझच्या कालव्यांतून बाहेर पडलेलीं बरींच जहाजें आतां हारीनें निघालेलीं दिसलीं. संध्याकाळीं व रात्रीं दोन्ही बाजूंनीं बोटींची रहदारी सारखी सुरू होती. प्रचंड मोठ्या जलाशयावर दिव्यांच्या चमचमाटांत खुलून

दिसणाऱ्या त्या निरनिराळ्या देशांच्या नौका पाहून डोळ्यांचें पारणें फिटलें. हरद्वारला रात्रीं आरतीच्या वेळीं नदींत दिवे सोडतात व त्यांची शोभा मोठी अपूर्व दिसते. ती अनेकवार पाहिली असल्यानें मला साहजिकच त्या दृष्टपूर्व दृश्यांचें पुनः स्मरण झालें. आज रात्रभर चाललेल्या गडबडीमुळें झोंप लागणें शक्य नव्हतें. पण दुसरा दिवस सबंध कालवा पाहण्यांत घालवावयाचा असल्यानें तसाच झोंपलों. पुढच्या पत्रांत सुवेझचें वर्णन करूं असा संकल्प मनाशीं होताच. कळावें.

आपला,
×××

# ह्या सुवेझ कालवा

जिनोवा
ता. १६–१०–१९५०

स. न. वि. वि.

सुवेझ कालव्यांत बोट शिरण्यापूर्वींची रात्र होती ती ! सबंध रात्रभर बोटीवर गडबड आणि गोंधळ चालू होता. थोड्याशा झोपेनंतर आम्ही जागे झालों तों पहांट होत होती. त्या भल्या पहांटेलाच 'सुवेझ' दिसूं लागलें. दोन्ही बाजूंस रेताड वाळवंट, खजुरीचीं झाडें व छपरें, सपाट असलेलीं घरें सर्वत्र दिसूं लागलीं. तांबडा समुद्र व भूमध्य समुद्र ह्यांना जोडणारा हा कालवा निर्माण करण्याची कल्पना फर्डिनंड द लेसेप्स या फ्रेंच स्थापत्य-विशारदास प्रथम सुचली व ह्या भूप्रदेशांत 'बिटर लेक', 'टिमशा लेक' व 'मेंझाले लेक' अशीं तीन मोठीं सरोवरें असल्यानें तीं मूर्त स्वरूपांत उतरलीहि. त्या तीन सरोवरांचा उपयोग सध्यां बोटींचें क्रॉसिंग करण्याकडे केला जातो. कालव्याचा समग्र इतिहास व त्याची लांबी-रुंदी देण्याचा मी प्रयत्न करीत नाहीं; परंतु ह्या कालव्यानें ईजिप्तचें उखळ मात्र चांगलेंच

पांढरें झालें आहे—हा त्याचा उपयोग मात्र सांगतों. कालव्यांतून जाणाऱ्या प्रत्येक जहाजाला ईजिप्तला जबर कर द्यावा लागतो. त्या कराबद्दल एक पोर्टसैदला घडलेली हकीगत सांगतों. एका इंग्रज गृहस्थानें बरेंचसें औषधी-सामान व बराचसा कांचेचा माल वगैरे स्वस्त दरानें एका ठिकाणाहून मिळविला व तो सर्व माल एका गलबतांत भरून तो इकडे हिंदुस्थान इत्यादि ठिकाणीं त्याचा व्यापार करण्यासाठीं निघाला. माल भरपूर होता, पण पैसे नव्हते. पोर्टसैदला आल्यावर कालव्याचा कर भरण्याचा प्रसंग आला. ती जबर रक्कम ऐकून त्यानें टोलवाटोलवी आरंभिली. पोर्टसैद बंदरांत तीन दिवसांवर जहाज उभें करण्याससुद्धां परवानगी नसते. तेव्हां पोर्टट्रस्टच्या लोकांनीं जहाजाचा ताबा घेतला. पुढें हा गृहस्थ नादार ठरला व सर्व मालाचा पोर्टसैदला लिलांव झाला. लिलावांतून आलेल्या पैशांतून खलाशांचे पगार भागविले व बोटीचें थकलेलें भाडें वसूल केलें. सदर गृहस्थ तूर्त तेथील कस्टडींत असून त्या जहाजावरच्या सुटलेल्या खलाशांनीं आमच्या बोटीवर परत जाण्यासाठीं प्रस्थान ठेवलें आहे. त्यांच्यापैकीं एकाकडून ही हकीगत आम्हांला समजली.

सुवेझला एकदां बोट कालव्यांत शिरली कीं, अगदीं संथ पाण्यांतून जशी जावी तशी हळूहळू जाते. आपण हरद्वारला मोठा कालवा पाहिला ना? त्यापेक्षां थोडा मोठा हा कालवा असेल. सुमारें ३०० मीटर्स रुंदी भरावी. दोन्ही बाजूंस बांधून काढलेला हा कालवा पाहिला म्हणजे मोठें कौतुक वाटतें. उजव्या किनाऱ्यावर सर्वत्र वाळवंट दिसतें व डाव्या किनाऱ्यावर मात्र लोकवस्ती दिसते. डाव्या किनाऱ्यावर खजुरीचीं झाडें, सपाट छपरांचीं घरें उंटांचे थवे व उत्तम डांबरी रस्ता कालव्याला समांतर असा दिसतो. ह्या रस्तावरून आम्ही अनेक मोटारींची रहदारी सुरू असलेली पाहिली. थोडें पुढें गेल्यावर डाव्या बाजूस रेल्वेहि दिसली व त्यावरून प्रत्यक्ष एक आगगाडी पळतांनाहि आम्हांस पाहावयास मिळाली. सर्व कालवाभर ठिकठिकाणीं रेती उपसण्याचें काम सुरू होतें. मध्यें मध्यें कांठ ढासळलेला आढळला. तेथेंहि दुरुस्तीचें काम सुरू होतेंच. मसूरीचा घाट जसा अद्वितीय व तो सारखा दुरुस्तींत ठेवून जसा सुंदर राखला आहे, तसाच हा कालवाहि अद्वितीय आहे व सारखी दुरुस्ती चालू ठेवून उत्तम राखला आहे. मसूरीला जसा

जबर कर भरावा लागतो, तसा येथेंहि भरावा लागतो. मसूरीला जसें गेट आहे म्हणजे कांहीं एका वेळेपर्यंत गाड्या वर जातात व नंतर त्या गेटजवळ थांबविण्यांत येतात व वरच्या गाड्या खालीं येतात; म्हणजे एका वेळीं एकाच बाजूची वाहतूक सुरू असते तसेंच येथेंहि आहे. एकदां सुवेझपासून निघालेलीं दहा जहाजें बिटरलेकमध्यें आलीं कीं तेथें त्यांनीं मुक्काम करावयाचा. तळें चांगलें मोठें आहे तेथें बाजूला जाऊन उभें राहावयाचें, मग उलट बाजूनें येणाऱ्या जहाजांना रस्ता द्यावयाचा. हाच कार्यक्रम पुढच्या तळ्याच्या वेळीं करावा लागतो.

त्यामुळें ९० मैल लांबीचा हा कालवा ओलांडण्यास जहाजास सरासरी १३ तास लागतात. पहिल्या बिटर लेकमध्यें आम्ही थांबलों तों जेवणाची वेळ झाली होती. प्रथम क्रॉसिंगचें तंत्र आम्हांस कळलें नव्हतें. त्यामुळें बोटीनें नांगर टाकला याचें आम्हांस आश्चर्यच वाटलें. मग ही हकीगत समजल्यावर मला प्रथम आठवण झाली असेल तर आपल्या हिमालयाच्या प्रवासाची. तेथें मोटारींकरितां अशींच क्रॉसिंग स्टेशनें आहेत. मोठा फरक असा कीं, तेथें आपण खालीं उतरून नदीवर जाऊन ती अस्वलांवरून पोहणाऱ्या पोरांची गंमत पाहूं शकलों तसें तेथें करतां आलें नाहीं, पण येथें एक करमणूक होतीच. उलट बाजूनें येणारीं जहाजें जवळून चाललीं म्हणजे त्यांच्याकडे हात हलवायचे, आरोळ्या ठोकायच्या इत्यादि.

पहिलें तळें सोडून पुढें निघालों तों जवळच एक विमानतळ दिसला. आमची बोट तेथून जाईपावेतों तीन विमानें तेथें आलीं व एक तेथून निघालें. कैरोचा विमानतळ तो हाच असें आम्हांस सांगण्यांत आलें. निघणाऱ्या विमानानें एकदां आमच्या बोटीच्या डोक्यावरून जवळून एक घिरटी घातली व आणखी थोडी करमणूक झाली. तेथून पुढें सतत दाट झाडी व दुतर्फा उंच सफेद्याच्या झाडासारखीं झाडें असलेला सुंदर डांबरी रहदारीचा रस्ता लागला. जवळच पलिकडे रेल्वेचे रूळहि दिसत होतेच. थोड्याच वेळांत आम्ही दुसऱ्या तळ्यांतूनहि बाहेर पडलों व आतां अगदीं मानवी वस्तीच्या जवळून निघालों. एक टुमदार सुंदर शहरहि डाव्या व उजव्या किनाऱ्यावर दिसलें. दोन अप्रतिम नव्या पद्धतीच्या इमारतीहि डाव्या किनाऱ्यावर दिसल्या. तेथें सेक्रेटरिएटसारखी कांहीं इमारत असावी

अशी माझी कल्पना आहे. पण कोणीहि निश्चित सांगूं शकलें नाहीं. संध्याकाळीं ईजिप्तच्या बाजूस डाव्या किनाऱ्यावरून दोन आगगाड्या—पॅसेंजर गाड्या—जातांना दिसल्या. आमचें रात्रींचें जेवण झालें व आम्ही डेकवर येतों तों, पोर्टसैदच्या बंदरावरील दिवे आम्हांला दिसूं लागले. कालवा ओलांडून आतां आम्ही भूमध्य समुद्रांत प्रवेश करणार होतों. येथें माल पुष्कळ उतरावयाचा होता. व बोटीचा मुक्कामहि बराच होता. पोर्टसैद पाहण्यासाठीं इमिग्रेशन ऑफिसरचा शिक्का पासपोर्टवर घेतला व खालीं उतरलों. बंदर बोटीपासून सुमारें दीड फर्लांगावर तरी आंत असेल. जाण्यायेण्याचें लॉंचचें भाडें ३ शिलिंग घेतलें. बंदरावर सर्वत्र झगझगीत प्रकाशाचे दिवे लावले असल्यानें व आजूबाजूस सर्वत्र निऑनच्या मोठाल्या जाहिराती असल्यानें अगदीं दिवसा उतरावें तसें वाटलें.

बंदराबाहेर येऊन पाहिलें तों उंच इमारती, स्वच्छ व मोठाले रुंद रस्ते व भरपूर रहदारी. त्यामुळें शहराबद्दल प्रथमच मत चांगलें झालें. येथील सर्व रस्ते अगदीं काटकोनांत बांधलेले असून सर्वत्र चौकांतून रस्त्यांच्या पाट्या इंग्रजींतून आहेत. चुकण्याची भीति मुळींच नाहीं. फ्रेंच पद्धतीप्रमाणें रस्त्यावर टेबलें-खुर्च्या टाकून कॉफी, चहा, पाव-लोणी खातांना लोक दिसले. पुढें थोड्या लोकांशीं बोलण्याचा संबंध आला. त्यांना इंग्रजी येत नाहीं. पण फ्रेंच-इटालियन येतें असें आढळलें. सर्वच वातावरणावर फ्रेंच लोकांच्या सुखोपभोगलालसेची, विलासी वृत्तीची व रंगेलपणाची छाप दिसली. लोक उंच, तांबूस रंगाचे, लठ्ठ व राकट दिसले. स्त्रिया मात्र गोऱ्या व नाजुक दिसल्या. कांहींच्या मतें खुद्द ईजिप्तमधील स्त्रिया आम्हांस दिसल्याच नाहींत. ज्या दिसल्या त्या बहुतेक इटालियन वेश्या होत्या. पण हें विधान सर्वस्वीं खरें वाटलें नाहीं.

येथील लोक फसवे, उतारूंना लुबाडणारे व बिलंदर असतात, अशी धोक्याची सूचना आम्हांला बोटीवरच देण्यांत आली होती. तसेंच येथें वेश्या-व्यवसाय प्रचंड प्रमाणावर असल्यानें सांभाळून राहण्याबद्दलहि सूचना होत्याच; त्यामुळें आम्ही मोठ्या हुशारीनें खिसे सांभाळून पण डोळे व कान उघडे ठेवून हिंडत होतों. एक रस्ता ओलांडून जातांच दोन इसम आम्हांकडे येऊन फाउंटन पेन्स हवींत का? पार्कर '51' दोन पौंडांत देतों अशी

चौकशी करूं लागले. शक्यतों कोणासहि दाद द्यावयाची नाहीं, असें आम्हीं ठरविलें होतेंच. नको म्हणून सांगितल्यावर त्यांपैकीं एकानें खिशांतून नग्न स्त्रियांचीं ३–४ चित्रें काढलीं व तुम्हांस येण्याची इच्छा आहे काय? मी तुम्हांस उत्तम ठिकाणीं नेतों इत्यादि सांगूं लागला. मुली कशा तरुण सुंदर आहेत याचें त्यानें रसभरित वर्णन सुरू केलें व कांहीं केल्या तो जाईचना! शेवटीं मी एक दणका देईन अशी जेव्हां त्याला भीति वाटली तेव्हां माझ्या आकाराकडे पाहून तो वळला.

पुढें आम्ही गांव पाहत बरेच हिंडलों. तेवढ्या कालांत असे अनेक लोक आम्हांस भेटले. त्यावरून तेथील व्यवहारासंबंधीं आम्ही ऐकलेले प्रवाद खरे आहेत अशी खात्री पटली. मुख्य रस्ते व चर्चे-मशिदी यांच्याकडे नजर टाकून कॉफी घेऊन बोटीवर आम्ही परत आलों. गांवांत प्रथम जेवढी स्वच्छता वाटली तेवढी खरोखर नाहीं. अगदीं गलिच्छ म्हणतां येणार नाहीं इतपतच स्वच्छता आहे. मुख्य म्हणजे लोक घाणेरडे आचारानें व विचारानेंहि आहेत. दुसऱ्या दिवशीं बोटीवर आम्हांला नव्या नव्या हकीगती समजल्या. आमच्या बोटीवरील पांच ख्रिश्चन मुलें गांवांत गेलीं होतीं. तीं 'कॅबरा'-मध्यें नाचण्यासाठीं थांबलीं. कॅबरा हें या बाजूस नृत्यमंदिर समजलें जातें. परंतु त्याची मर्यादा नृत्यांतच थांबत नाहीं. ह्या मुलांना प्रत्येकीं ५-५ पौंड खर्च आला. इटालियन, फ्रेंच, जर्मन, अरब इत्यादि सर्व जातींच्या मुली तेथें होत्या, असें त्या मुलांनीं सांगितलें.

आमच्या बोटीवर एक मध्यम वयाचे गृहस्थ आहेत. ते सरकारी शिष्यवृत्ति घेऊन निघाले असल्यानें त्यांना पैशाची ददात नाहींच. बोटीवर बीर व ब्रिज यांमध्यें वेळ घालवितात. ते पोर्टसैदला जाऊन रात्रीं २० पौंड म्हणजे २६५ रुपये संपवून आले, अशी आम्हांस कर्णोपकर्णीं बातमी समजली. ते गृहस्थ मोठ्या खुषींत येऊन फुशारकीनें हें सांगत होते, हें ऐकून अशा गृहस्थाला शिष्यवृत्ति मिळाल्याबद्दल कौतुक वाटलें. पुढें नेपल्सलाहि हे गृहस्थ असेच उद्योग करून आल्याचें आम्हांस कळलें. पण हें सारें जास्त विस्तारानें लिहूनहि कांहीं उपयोग नाहीं, तेव्हां थांबतों. कळावें.

आपला,

×××

# भूमध्य समुद्रावर

जिनोवा

ता. १६–१०–१९५९

स. न. वि. वि.

पोर्टसैद बंदरावर उतरून आम्ही परत आलों. आणि खूपच वेळ झाल्यानें आपापल्या खोल्यांमध्यें जाऊन झोंपलों. सकाळीं जागे होतों तों बोट पोर्टसैदहून सुटली होती. परंतु बंदरावरील देखावा मात्र स्पष्ट दिसत होता. रात्रीं दोन्ही बाजूंनीं आलेलीं बरींच जहाजें नांगरून इतस्ततः पडलेलीं होतीं. सूर्य वर आल्यावर त्याच्या कोवळ्या उन्हांत तर हें सर्व दृश्य अगदीं चित्रकारानें काढून चिरंजीव करावें असें सुंदर दिसत होतें. गांवांतील रहदारी, समुद्रकिनाऱ्यावरील रंगीबेरंगी छत्र्या व तेथेंच जवळ निर्माण केलेलीं उपभोगगृहें, समर रिसॉर्टस, जलविहारार्थ छोट्या छोट्या शिडाच्या होड्या काढून बाहेर गेलेलीं दांपत्यें सर्वच मोठें रमणीय दिसत होतें. भूमध्य समुद्रांत जेथें आम्ही आंत शिरलों तेथें फर्डिनंड द लेसेप्सचा एक भव्य हिरव्या रंगाचा पुतळा उभा केलेला आहे. ४० फूट उंचीच्या चौथऱ्यावरील २० फूट उंचीचा हा पुतळा पाहून मनांत अनेक विचारांची गर्दी झाली. लेसेप्सनें एक हात कालव्याच्या बाजूस केला असून ही पहा मी केलेली कामगिरी असा भाव त्याच्या चेहऱ्यावर भासमान होत आहे. तें प्रचंड कालव्याचें काम पाहिल्यावर कोणीहि थोडासा गर्व मनांत आणला तर तें क्षम्य होईल हें खरें आहे व ही कल्पना प्रथम डोक्यांत आणणाऱ्या व नंतर ती अंमलांत आणणाऱ्या लेसेप्सचें कौतुक करावें तेवढें थोडेंच हेंहि खरें आहे. पण का कुणास ठाऊक मला मी लहानपणीं वाचलेली 'ऑझिमँडिस' ही कविता आठवली. एका मोठ्या रेताड वाळवंटांत एका प्रवाशाला एका छिन्नविच्छिन्न झालेल्या पुतळ्याचे अवशेष सांपडतात. हात एकीकडे व पाय एकीकडे पडलेल्या, त्या पुतळ्याच्या चेहऱ्यावरील गर्वाची व अहंभावाची कल्पना कवीनें उत्कृष्ट दिली आहे. त्या पुतळ्याखालील चौथऱ्यावर ' मी सर्व जगताचा राजा, हें अजूबाजूला निर्माण केलेलें माझें वैभवसंपन्न

साम्राज्य आहे ' अशा अर्थाचा मजकूर असतो. एवढ्या मोठ्या वैभवसंपन्न साम्राज्याचें वाळवंट पाहून कवीच्या मनांत आलेले विचार पुढें वर्णन केलेले असतात. असो.

लेसेप्सनें जगावर केलेले उपकार लक्षांत आणून त्याच्यापुढें आदरानें मान लववावीशी वाटते.

आतां आम्हांला प्रत्यक्ष निरीक्षण करण्याजोगें समुद्रांत कांहींच नव्हतें. कालव्यांत असतांना पोहऱ्यानें पाणी ओढतात तशी रेती उपसून काढणारीं यंत्रें–ड्रेजिंग मशीन्स–११ आंकड्यांचींच घड्याळें—ह्यांना एकच कांटा असतो व हीं घड्याळें काय दाखवितात हें कोणालाच समजलें नाहीं. ठिकठिकाणीं सूचना देण्यासाठीं उभीं केलेलीं स्थानकें इत्यादि अनेक गोष्टी पाहण्यास मिळून करमणूक होत असे. आतां तें कांहींच नव्हतें. पुनश्च एकवार सर्वत्र पाणी व आकाश दिसूं लागलें, व आम्ही आपापल्या लेखन-वाचनांत गुंतलों.

बोटीवर सध्यां आम्ही १४ महाराष्ट्रीय होतों. दि. १५ ला सुवेझ येण्यापूर्वीं गणेशचतुर्थीनिमित्त कांहीं कार्यक्रम करावा असें मनांत आलें. आमच्यांतील साने नामक चित्रकारानें गणपतीचें सुंदर चित्र काढलें व दि. १५ ला श्रींची मोठ्या थाटानें वरच्या डेकवर प्रतिष्ठापना केली. समंत्र कार्यक्रम व्हावा असा आग्रह पडल्यानें सुसंस्कृत असा मी उपाध्याय झालों. नंतर आरती, मंत्रपुष्प होऊन प्रसाद वांटला. बोटीवरील सर्वांच्या मनांत मोठें कुतूहल निर्माण झालें. दुसऱ्या दिवशीं पोर्टसैदला पुनः एकदां आरती, थोडी करमणूक, व्याख्यान इत्यादि कार्यक्रम केला व शेवटीं भूमध्य समुद्रांत चांगलें मध्यभागीं आल्यावर, "यान्तु देवगणाः सर्वेः" करून 'पुनरागमनाय च' श्रीचें विधियुक्त विसर्जन केलें.

भूमध्य समुद्रांत पूर्वीं गणपतीला स्थान मिळालें होतें कीं नाहीं हें माहीत नाहीं, पण आम्ही तें मिळवून दिल्याचें समाधान मिळविलें.

काल एक गंमत झाली. एक मुस्ताफा मागच्या डेकवर नमाज पढूं लागला, आम्ही सर्वजण हें पाहत होतों. त्याची प्रार्थना सुरू असतांना मी आमच्याभोंवतीं असणाऱ्यांना प्रश्न विचारला, "तुम्हांस या प्रकारांत कांहीं नावीन्य आढळतें का?" अशा प्रकारचे सूचक प्रश्न विचारण्याची

माझी संवय अजून आहेच. मला त्या प्रार्थनेंत एक नवीन गोष्ट आढळली होती म्हणून मीं वरील प्रश्न विचारला. बऱ्याच वेळानंतर एका गृहस्थाच्या लक्षांत आलें. त्यांनीं सांगितलें हा पूर्वेकडे तोंड करून नमाज पढत आहे. उत्तर अगदीं बरोबर होतें. आपणाकडे मुसलमान लोक नमाज पढतांना मक्का पश्चिमेला असल्यामुळें पश्चिमेकडे तोंड करून नमाज पढतात. आतां आम्ही मक्केच्याहि पश्चिमेला आलों होतों. त्यामुळें हा मुस्ताफा पूर्वेकडे तोंड करून नमाज पढत होता. एकदां एकानें उत्तर दिल्यावर मग सर्वांच्याच हें लक्षांत आलें व कारणहि सर्वांना बरोबर कळलें. आपणाकडे 'रेवायाः उत्तर तीरे—दाक्षिण तीरे' असा बदल संकल्पांत नर्मदेच्या उत्तरेस किंवा दक्षिणेस गेल्यानंतर करावा लागतो, असें मग मीं त्यांना सांगितलें. अर्थात् त्यांनीं माझ्या निरीक्षणाबद्दल माझी प्रशंसा केली हें सांगणें नलगे.

असाच एक निरीक्षणाचा भाग आणखी सांगतों. आमची बोट बंदरास लागली म्हणजे माल उतरविण्याचें काम सुरू होई. पण कोणता माल खालीं उतरत आहे त्याकडे कोणीहि लक्ष देत नसत. एडनला तेलाचीं पिपेंच्या पिपें आंत कां चढलीं, कालव्यांत सर्वत्र पेट्रोल व तेलाच्या बोटी हिंडतांना कां दिसल्या, त्याचा कोणीहि कधींच विचार केला नाहीं. पोर्टसैद सोडून पुढें आल्यावर मीं सहज विचारलें कीं पोर्टसैदला कोणता माल उतरला हें कोणीं पाहिलें का? अर्थातच नाहीं. हेंच उत्तर आलें. आपण मुलांना नेहमीं टिपणें करून ठेवण्यास सांगतों त्यानुसार मीं टिपण केलें होतें तें त्यांना दाखविलें.

ऑस्ट्रेलियांतून फळें, मोरंबे, चीज व लोणी हें खूप प्रमाणांत येथें उतरलें होतें. हिंदुस्थानांतून साबू व व्हॅसलिन हेंहि खूप उतरलें. हिंदुस्थानांतून एवढा साबू निर्यात होतो हें मला सुद्धां माहीत नव्हतें व व्हॅसलिन हिंदुस्थानांतून निर्यात झाल्याबद्दल आम्हां सर्वांनाच आश्चर्य वाटलें. येथें 'शेल' तेलाचीं खूप पिपें वर चढलीं ESSO चें पेट्रोल या भागांत फार लोकप्रिय दिसलें; कारण ठिकठिकाणीं 'एसो' च्या पाट्या खूप होत्या. बोटीवर आम्ही खात होतों तीं फळें सुद्धां ऑस्ट्रेलियांतून आलेलीं होतीं.

पोर्टसैदला होडग्यांतून विकायला आलेल्या मालांत द्राक्षें, डाळिंबें व ओला खजूर खूप होता. तसाच कातडी माल वेगवेगळ्या प्रकारचा व खूप

प्रमाणांत होता. भूगोलांत वाचण्यापेक्षां ह्या गोष्टी प्रत्यक्ष पाहिल्यानें देशाच्या संपन्नतेचें, तेथील लोकांच्या स्वभावाचें, तेथील आयात-निर्यातीचें व सामाजिक परिस्थितीचें सम्यग्ज्ञान लवकर होतें हें अगदीं खरें आहे. मात्र, पाहणाऱ्यानें सदैव चौकस बुद्धि व उघडे डोळे ठेवले पाहिजेत.

रविवारीं बोटीवर आम्हांला प्रत्येकाला एकेक तिकिट देण्यांत आलें. संध्याकाळीं लॉटरीचा कार्यक्रम होता त्यासाठीं हीं तिकिटें देण्यांत आलीं होतीं. संध्याकाळीं जेवणाच्या वेळीं सर्व बायकांना रंगीबेरंगी चित्रविचित्र आकाराच्या टोप्या देण्यांत आल्या होत्या. जेवणानंतर फॅन्सी ड्रेस-बॉल-नाचाचा कार्यक्रम होता. जेवणें झाल्यावर एका सर्वांत लहान तीन वर्षांच्या मुलीला टेबलावर उभें करून तिच्या हातून लॉटरीचीं तिकिटें काढण्यांत आलीं. ज्यांचे नंबर आले त्यांना गंमतीच्या लहान लहान वस्तु देण्यांत आल्या. सर्व बोटीवर त्या दिवशीं रात्रीं सर्व दिवे लावून रोषणाई करून मोठी दंगल उडविण्यांत आली. सर्वच लोक मोठ्या चैनींत व आनंदांत होते. रात्रीं नृत्याचा—सामुदायिक संलग्न नृत्याचा—कार्यक्रम १ वाजेपावेतों चालला होता. आज हवेंत गारवा वाटूं लागला होता व युरोपमध्यें आल्याचें पूर्वचिह्न भासूं लागलें होतें. मंगळवारीं हवा चांगलीच गार वाटूं लागली. डेकवर झोंपणें रविवारींच बंद झालें होतें. मंगळवारीं सर्वांचे गरम सूट बाहेर पडले. गळ्याभोंवतीं मफलर किंवा टाय आला. युरोपियन पोषाखास प्रारंभ झाला. सकाळींच इटाली व सिसिली यांतील चिंचोळ्या सामुद्रधुनींतून आम्ही निघालों. उजवीकडे इटालीचा किनारा व डावीकडे सिसिलीचा असे दोन्ही किनारे मानवी वस्तीनें गजबजलेले, शोभिवंत घरांनीं भूषविलेले व निसर्गानें नटलेले असे दिसत होते. सर्वांत चिंचोळ्या ठिकाणीं समोरासमोरील दोन गांवांतील अंतर पांच मैल असावें सिसिलीच्या किनाऱ्यावर मर्सीना नांवाचें अप्रतिम बंदर आहे. मासेमारी करणाऱ्या अनेक होड्या येथें आढळल्या. समोरासमोरच्या दोन बंदरांत वाहतूक करणाऱ्या छोट्या फेरी-बोटीहि दिसल्या. उंच दीपगृहेंहि दोन्ही बाजूंस दिसलीं. पण इटलीच्या किनाऱ्यासंबंधीं आतां पुढच्या पत्रांत लिहीन. कळावें.

आपला,

×××

# इटालींतील स्ट्रांबोली व नेपल्स आणि जिनोवा

जिनोवा
ता. २३-१०-१९५०

स. न. वि. वि.

इटालीच्या दक्षिण किनाऱ्यावरून आमची बोट जात होती. सामुद्रधुनींत शिरल्यावर सिसिली बेटाला डावीकडे ठेवून आम्ही तडक उत्तरेकडे निघालों. लवकरच डाव्या बाजूस स्ट्रांबोली नांवाचा ज्वालामुखी दिसणार आहे असें सांगण्यांत आलें. म्हणून न्याहारी आटोपून कपडे घालून कॅमेरा घेऊन डेकवर जाऊन बसलों. लवकरच स्ट्रांबोली दिसूं लागला व त्यांतून धुराचे लोटच्या लोट बाहेर पडतांना स्पष्ट दिसूं लागले. आम्ही त्याच्या जवळूनच जात असल्यामुळें ज्वालामुखींतून बाहेर पडणारी राख, लाव्हा रसाचा थर व प्रत्यक्ष धुमसणारा धूर हीं सर्व उत्तम पाहाण्यास मिळालीं. जिवंत ज्वालामुखी पाहिल्याचें समाधान झालें. ह्या पर्वताच्या उतरणीवर एक खेडेगांव वसलें आहे. वस्ती मात्र फारशी वाटली नाहीं. येथें राहणें म्हणजे खरोखर धोतरांत निखारा बांधून फिरणें आहे. येथें सारखे उद्रेक होत असतात असें समजलें व आमच्या मागून येणाऱ्या स्ट्रेथेड बोटीस तर प्रत्यक्ष लाव्हारसाचें तांबडें लाल कारंजें उडतांना रात्रीं स्पष्ट दिसलें असें त्या बोटीवर असलेल्या एका मित्रानें सांगितलें. भूगोलांत इटालींतील ज्वालामुखींची माहिती वाचली होती; पण प्रत्यक्ष पाहण्यांत येणें व तोहि धुमसतांना दिसणें हें भाग्यच समजलें पाहिजे. निसर्गाच्या या कृतीबद्दल आश्चर्य प्रगट करीत मीं त्याचीं दोन छायाचित्रें काढून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

आज संध्याकाळीं नेपल्सला बोट पोहोंचणार असें फलकावर जाहीर झालें व नेपल्समधील एका संस्थेनें पुलमन मोटारींतून ५ तासांत सर्व नेपल्स-मधील मुख्य ठिकाणें दाखविण्याची सोय केली असल्याचें जाहीर झालें. या सहलीस ११०० लीरा म्हणजे अदमासें १० रुपये खर्च येणार होता. नेपल्स पाहवें व मग मरावें एवढी नेपल्सची प्रसिद्धि! त्यांतून दुपारपासून

टेकडीच्या उतरणीवर वसलेलें, उंच उंच इमारतींमुळें अमेरिकेची आठवण करून देणारें तें रेखीव शहर डोळ्यांसमोर दिसत होतेंच. मागें व्हेसुव्हीयस पर्वताची भयाण पार्श्वभूमि असूनहि येथें इतकें सुंदर गांव वसविणाऱ्यांच्या धाडसाची कमाल वाटत होती व ह्या सर्वांमुळें नेपल्स खूप पाहयला मिळावें अशी तीव्र इच्छा होती. मी पुढाकार घेऊन जावयाचें ठरवून पैसे भरण्यास निघालों व सर्वांनींच अनुकरण केलें! आमचा सर्वच्या सर्व महाराष्ट्रीय संघ या सहलींत सहभागी झाल्यानें नेपल्स हिंडण्याची फारच गंमत आली.

संध्याकाळीं ५ च्या सुमारास बोट नेपल्स बंदरांत आली. आमची बोट इटालियन. बोटीवरील खलाशी बरेचसे नेपल्स व जिनोवा येथील होते. बंदर-जवळ आल्याबरोबर सर्वजण उत्सुकतेनें आपलें कोणी बंदरावर आलें आहे कीं नाहीं हें पाहूं लागले. आमच्या टेबलावर जेवण वाढणारा एक इटालियन वाढपी ‘ नताले ’ नांवाचा होता. आम्ही दहा जणांनीं मिळून त्याला १००० लीरा बक्षिशी दिली होती. तो खालीं उतरतांना दिसला म्हणून मी जरा चौकस बुद्धीनें खालीं पाहूं लागलों. बोटीचा जिना उतरून खालीं दाराकडे जातों तोंच समोरून तीन-चार वर्षांची गुटगुटीत छोकरी आपलीं पिंगट झुलपें हलवीत धांवतच त्याच्याकडे आली व त्यानें चटकन् तिला उचलून घेतलें. बापलेकींचें हें सम्मीलन होत असतांनाच मुलीची आई तेथें आली. त्या भेटीचें वर्णन करणें दुरापास्त आहे. त्या उभयतांच्या मनांतील ओसंडणारा आनंद पाहून आमच्या पाहणाऱ्यांच्या डोळ्यांत पाणी तरळलें. पहिला आवेश नाहींसा झाल्यावर त्यानें खिशांतून १००० लीराची ती आम्ही दिलेली नोट आपल्या छोकरीला दिली. त्या मुलीकडे पाहून व तिच्या चेहऱ्यावर निर्माण झालेलें हास्य पाहून आम्हांस त्या दिलेल्या बक्षिसाचें सार्थक झाल्याचें समाधान वाटलें. आमच्या त्या ‘ नताले ’च्या आनंदांत आम्हीहि वर असलेले सर्व सहभागी झालों. थोड्याच वेळांत इटालीचा इमिग्रेशन ऑफिसर बोटीवर आला. आणि इटालीच्या भूमीवर पाय ठेवण्यास आम्हांला पासपोर्टावर परवानगी देण्यांत आलेली आहे किंवा नाहीं हें त्यानें तपासलें. पासपोर्टावर शिक्कामोर्तब करून घेऊन आणि थोड्याशा लीरांच्या नोटा खिशांत घालून गटागटानें आम्ही सर्व बोटीवरून नेपल्सच्या त्या प्रचंड नाविक-स्थानकावर उतरलों. बाहेरच्या

मोठ्या फलाटावरून आंत शिरतांच कस्टम-तपासणीसाठीं एक खूप मोठा दिवाणखाना बांधलेला होता. आकारविल्ह्यानें सामानाची रचना करून उतारूंना जकात तपासण्याच्या टेबलावरून भरभर मोकळें करण्याचा अधिकाऱ्यांचा कार्यक्रम सुरू होता. कामांतील एकूण चातुर्य आणि शिस्त चांगली होती. प्रवाशांना उगीचच त्रास देण्याची वृत्ति ही युरोपमध्यें कोठल्याच देशांत अस्तित्वांत नाहीं असें पुढेंहि आमच्या दृष्टीस पडलें. आम्हांस जकातीशीं कांहींहि कर्तव्य नसल्यामुळें दारावर फक्त आमचे पासपोर्ट दाखवून आम्ही पुढच्या प्रवेशद्वाराजवळील दिवाणखान्यांत आलों. इटालींतील शिल्पसौंदर्यास आणि अप्रतिम चित्रकलेस साजेसा असाच हा दिवाणखाना होता. प्रवेशद्वाराजवळील भिंतीवर इटालीच्या बंदरांतून मोठाल्या बोटी सामानानें भरून बाहेर जात आहेत अशा तऱ्हेचें इटलीचें वैभव दाखविलेलें होतें. डाव्या व उजव्या अंगाचा दोन्ही भिंतिंवर दोन खूप मोठमोठालीं अतिशय प्रमाणबद्ध व सुंदर चित्रें आहेत. एका बाजूस कोलंबस नव्या जगताचा शोध लावण्यास निघाल्याचें व दुसऱ्या बाजूस एका मोठ्या लढाईचें चित्र आहे. येथें आंतच एक बँक एक्स्चेंज खातें, जकात खातें व आरोग्य खातें आहे. हें बंदराचें स्थानक पाहण्यासच आम्हांस सुमारें तास लागला.

बाहेर पडल्याबरोबर डाव्या हाताला एक मोठा किल्ला चारहि बाजूंस मोठाले बुरूज असलेला असा आहे. तो प्रसिद्ध रोमन साम्राज्याचा संस्थापक शार्लमेन यानें बांधलेला आहे असें सांगतात. किल्ल्यासमोर भव्य पटांगण आहे व एका मोठ्या चौकाच्या चारहि कोपऱ्यांना ब्रॉंझचे चार सुंदर पुतळे आहेत. आम्ही ह्या म्युनिसिपल चौकाच्या चारहि बाजूंस हिंडून एका रस्त्यावरून बरेंच अंतर चाललों व आमच्या मोटारीची वेळ होत आल्यानें बंदरावर परत आलों. येथील रस्ते रुंद असून सर्वत्र फरशीचे आढळले. ट्राम्स सर्व एक मजलीच पण जास्त चांगल्या व जास्त वेगानें जाणाऱ्या आढळल्या. बसेस मात्र मुंबईसारख्याच दुमजली पण जास्त दिवे असलेल्या अशा फारच चांगल्या दिसल्या. युरोपमधील पहिलेंच शहर आम्ही पाहत होतों.

सर्वच लोक गोरे व व्यवस्थित होते. मुली सर्व तांबड्यालाल छानछोकीचे पोषाख केलेल्या व उच्छृंखल दिसल्या. पोर्टसैदचा अनुभव येथेंहि आला व

पोर्टसैदप्रमाणें येथेंहि वेश्याव्यवसाय बऱ्याच मोठ्या प्रमाणावर असल्याचें समजलें. नृत्यगृहें व पानगृहें आम्हांला रस्त्यावर खूपच दिसलीं व त्यावरूनहि लोकांचा रंगेलपणा ध्यानीं आला.

येथें आम्ही उतरलों त्याच वेळीं एक मोठा महोत्सव सेंट ऑगस्टसच्या स्मरणार्थ सुरू होता. त्यामुळें गांवांत रोषणाई केली होती व लोकहि जास्त प्रमाणांत हिंडत होते. आम्हांला आज संपूर्ण नेपल्स मोटारींत बसून पहावयास मिळणार होतें व त्यामुळें आजच्या रोषणाईचा आम्हांला जास्तच आनंद वाटत होता. बंदरावर परत येऊन मोटारींत स्थानापन्न झालों. फारच आरामशीर खुर्च्या होत्या त्या! युरोपांतील विलासी साधनांपैकीं तें एक होतें. मोटारींतील वाटाड्यानें मोटार सुरू होण्यापूर्वीं कोणाला कोणती भाषा समजतें हें विचारून घेतलें. बऱ्याच जणांना इंग्रजी येत होतें फक्त तिघे फ्रेंचमन होते. त्यांना इंग्रजी समजत नव्हतें.

बंदर सोडून बाहेर आल्यावर मोठा म्युनिसिपल चौक होता. त्याचें नांव रोमा, असें त्यानें सांगितलें. तेथून पुढें सॅलव्हॅटोर, रोझा गॅलरी इत्यादि इमारती दाखवून त्यानें आम्हांस डान्टे चौकांत आणलें. येथें रोषणाई उत्तम केलेली होती. आम्ही खालीं उतरलों. वाङ्मयांत आपलें नांव चिरस्थायी करणाऱ्या त्या विद्वानाच्या पुतळ्याचें निरीक्षण केलें. रोषणाई पाहिली व पुनः मोटारींत बसलों. सान्-मार्टिनो नांवाच्या एका उंच भागावर आम्ही गेलों. तेथून सर्व नेपल्स—एकमात्र अर्थात्-साकल्यानें दिसत होतें. वरच्या आकाशाशीं स्पर्धा करणारें तारांगण खालीं फुललें असल्याचा भास होत होता. म्हैसूरला चामुंडी टेकडीवर गेलों व तेथून म्हैसूरच्या रोषणाईची प्रशंसा करण्याचा प्रसंग येतो तसेंच झालें. त्याच्या शतपट सौंदर्य येथें भासलें. एवढेंच सांगतों मी कॅमेरा बरोबर घेतलाच होता. दोन फोटो घेऊन ठेवले आहेत.

बराच वेळ आजूबाजूला हिंडून परत आल्यावर आम्ही व्हामेरो, टॅसो, व्हिला-नोव्हा या येथील सुप्रसिद्ध गोष्टी पाहिल्या व नंतर " ऑरेंज ग्रेव्ह " जवळ थांबलों. आपण बंगलोरला लालबाग पाहिली ना? तशीच मोठी थोरली बाग असून सर्व प्रकारचीं झाडें येथें आहेत म्हणतात. लालबागचेंहि

हेंच वैशिष्टय आपण ऐकलें होतें का ? रात्र असल्यामुळें बागेची शोभा फारशी दिसूं शकली नाहीं. आमच्यापैकीं बऱ्याच जणांना बागेंत कांहींच पाहण्याजोगें वाटलें नाहीं. ते मोटारींतच बसून होते. तेथून आम्हांला 'ल अकांत' नांवाच्या उपाहारगृहांत नेण्यांत आलें. गांवाच्या उच्च भागांत हें उपाहार-गृह आहे. त्याला बाहेरच्या अंगास मोठी गच्ची केली असून तेथून खालीं बंदराचा व शहराचा फार मोठा भाग दिसतो. गच्चींत गोल टेबलें भोंवतालीं ठेवलीं असून मध्यभागीं गुळगुळीत कांचेच्या फरशीनें आच्छादलेलीं ९ इंच उंचीची अंडाकृति मोठी फरशी आहे. ही नृत्याकरितां आहे. संगीत सदैव सुरूच असतें व त्याच्या तालावर तरुण युग्में त्या गुळगुळीत फरशीवर नृत्याचा आनंद उपभोगीत असतात. उपाहारगृह फारच उत्तम दिसलें. आम्हांला आइस्क्रिम, कॉफी इ. देण्यांत आलें. आइस्क्रिम वगैरे घेतल्यावर इतर लोक नृत्यगीतांत रंगलेले पाहून मी वाटाड्याला विचारून उपाहार-गृहाची पाहणी करण्याचें ठरविलें व निघालों. प्रवेशद्वारांतून आंत येतांच ओव्हरकोट, छत्री, टोपी इ. घेण्याकरितां दोन सेविका होत्या व हें साहित्य ठेरण्याकरितां लगेच जवळ एक खोली होती. तेथून आंत आल्यावर उजव्या भिंतीस लागून एका हिरव्या फरशीनें बांधून काढलेली उथळ व निळ्या पाण्यानें भरलेली पुष्करिणी होती. तांबडे-निळे मासे तिच्यांत विहार करीत होते. एक छोटेंसें कांसवहि पाण्यांत सोडलें होतें. पुष्करिणींत भिंतीच्या बाजूनें दिवे लावून प्रकाश सोडला होता. त्या प्रकाशांत माशांची हालचाल मोठी रम्य वाटत होती. सर्व उपाहारगृहांत कुंड्या ठेवल्या होत्या. व संगम-रवराचे व ब्रॉंझचे लहान लहान पुतळेहि ठेवले होते. भिंतीचा रंग, खुर्च्यांचा, टेबलांचा रंग व दिव्यांचा रंग सारखाच होता. येथून ५ पायऱ्या खालीं उतरलें म्हणजे खालच्या मजल्यावरील उपाहारगृह सुरू होई. येथें झुंबरें, तोरणें व लोंबणाऱ्या माळा ह्यांनीं सर्व दिवाणखाना सुशोभित केला होता. गालिच्यांचा, खुर्च्यांचा व दिव्यांचा रंग येथें निराळाच होता. येथें मध्यभागीं एक गोल चक्राकार कडें करून बँड वाजविणारे बसले होते व संगीत सुरू होतें. येथून बाहेर पडलें म्हणजे बाहेरची मोठी गच्ची होती व तेथेंच मधोमध नृत्यांगण होतें. हें ऐश्वर्यसंपन्न उपाहारगृह पाहून येथील विलासी लोकांच्या रंगेलपणाची चांगलीच कल्पना आली.

येथून पुन्हां मोटारींत बसलों व नेपल्सच्या निरनिराळ्या भागांतून खूप हिंडलों. मोठी गॅलरी व राजाचें चर्च या मोठ्या इमारती आंत जाऊन पाहिल्या व नंतर 'सान्ता लुशीया' ह्या ठिकाणीं आलों. बंदरापासून थोड्या अंतरावर आंत पाणी घेऊन व बाहेरून कृत्रिम बांध घालून एक छोटेंसें सरोवर निर्माण करण्यांत आलें आहे. आपण काश्मिरांत पाहिले तसे शिकारे दोघां-दोघांकरितां सज्ज होते. सरोवराच्या सर्व बाजू फरशीनें बांधून काढल्या असून टेबलें-खुर्च्या टाकून तेथें फराळाची सोय केलेली आहे. सर्व बाजूस उपाहारगृहेंच आहेत. शिकाऱ्यांतून मनसोक्त जलक्रीडा करावी, तेथेंच बसून फराळाचें ताट मागवावें व फराळ आटोपून जलविहार आटोपला कीं बाहेर यावें अशी सोय आहे. आम्ही येथें आलों तेव्हां इतकी गर्दी दिसली व लोक आपापल्या सुखोपभोगांत इतके रंगलेले दिसले कीं, थोड्याच काळापूर्वी येथें लढाईमुळें एवढा अनर्थ झाला असेल याची आठवण सुद्धां होत नाहीं.

भूमध्य समुद्रांत आंतपर्यंत शिरल्यामुळें इटाली हा देश इतिहासकाळा-पासून अनेक संस्कृतींचें दर्शन घेऊन सुसंस्कृत झाला आहे. नेपल्स व जिनोवा येथें हजारों वर्षांपासून वेगवेगळ्या देशांचें, वेगवेगळ्या वेषांचे, वेगवेगळ्या भाषांचे, वेगवेगळ्या विचारांचे व वेगवेगळ्या संस्कृतींचे लोक आले आहेत. त्याचमुळें विद्येचें पुनरुज्जीवन ह्याच ठिकाणीं सुरू झालें. सर्व युरोपांत वैचारिक क्रांति घडविण्यांत नेपल्स व जिनोवाचा वांटा फार मोठा आहे. असें हें इतिहासप्रसिद्ध नेपल्स पोटभर पाहून रात्रीं १ वाजतां बोटीवर परत आलों व ह्याच विचाराची उजळणी मनांत करीत झोंपलों.

सकाळीं निघतांना नेपल्सचें समग्र दर्शन बोटींतून घडलें. एका टेकडीवर सुंदर घरें बांधलेलीं प्रथम दिसतात. नंतर सर्व उतरणीवर नंतर एकासारखीं एक उंच व एकाच रंगाचीं घरें आहेत. मसूरीस जशीं मजल्याखालीं मजले पद्धतीचीं घरें आहेत तशींच येथें आहेत. पण मसूरीच्यापेक्षां नेपल्सचा विस्तार फारच मोठा आहे. काश्मीरला जातांना मरीला थांबलों असतां तेथून जसें दृश्य दिसतें तसाच उतरणीवरचा भाग थेट दिसतो. पण येथें घरें मरीपेक्षां जास्त उंच आहेत. आणखी एका स्थळाचें स्मरण मला नेपल्स पाहून झालें. तें म्हणजे आपलें देवप्रयाग ! जगांतील पहिल्या दहा सौंदर्य-

स्थळांत देवप्रयागचा क्रमांक लागतो त्याचें कारण त्याचें नैसर्गिक सौंदर्य हें आहे. येथेंहि नेपल्सला एक उंच पर्वत, त्याच्या पार्श्वभूमीवर छोटीशी वाटणारी टेकडी, उतरणीवर सुंदर व उंच घरें, समोर नीलवर्ण विस्तीर्ण जलाशय ! ग्रामरचना उत्तम, रस्ते रुंद व स्वच्छ, लोक देखणे व ऐटबाज आणि हवापाणी व फळें-फुलें मुबलक. मग नेपल्स सर्वांत सुंदर ठरावें यांत नवल काय ! नेपल्स पाहावें आणि मग मरावें असें भूगोलाच्या क्रमिक पुस्तकांत म्हटलें आहे तें खरें वाटतें.

आतां समुद्र जास्त उचंबळूं लागला होता. लाटा मोठाल्या येऊं लागल्या होत्या. जहाज जास्त हलूं लागलें होतें. पुनः एकदां मळमळणें, ओकाऱ्या इत्यादि सुरू होणार अशी भीति सर्व उतारूंना वाटूं लागली होती. पण उद्यां सकाळीं जिनोवा येणार व बोटीचा प्रवास संपणार म्हणून सर्व आनंदांत होते. आवराआवरी, सामानाची व्यवस्था इत्यादि गडबडींत लोक गुंतले.

आमच्या बोटीवर पंजाब, बंगाल, गोवा, महाराष्ट्र, संयुक्तप्रांत व मध्यप्रांत या भागांतून युरोपांत निघालेले विद्यार्थी होते. या सर्व विद्यार्थ्यांची एक सभा घेऊन एक कॅब्रोटो-बोटीवरील विद्यार्थ्यांचें आंतरराष्ट्रीय विद्यार्थी संघांत रूपांतर करावें अशी एक कल्पना डॉ. गोप गुरुबक्ष यांच्या मनांत आली. त्यानुसार संध्याकाळीं एक सभा झाली. पण सभेपूर्वी कोणी तरी बोटीवरील ख्रिश्चन मुलांचा कांहीं शब्दांनीं अपमान केला. झालें, सभा जेमतेम संपली. सभेंत ही कल्पना प्रसवल्याबद्दल डॉ. गोप यांचें अभिनंदन व " आपण सर्व हिंदी विद्यार्थी, आपल्या देशाचे अनधिकृत परराष्ट्रमंत्री होऊं, आपल्यावर फार जबाबदारी आहे. आपल्या वर्तनावरून आपली किंमत म्हणजे आपल्या देशाची किंमत करण्यांत येईल." अशा स्वरूपाचीं भाषणें झालीं. भाषण करणाऱ्यांचा भर बहुतांशीं उपदेशावरच होता. दुर्दैवानें उपदेश करणाऱ्यांचें वर्तन ( निदान गेल्या १० दिवसांतलें ) आमच्या डोळ्यांसमोर होतें. त्यामुळें ह्या सभेंतून कांहीं निष्पन्न होणार नाहीं हें सहज लक्षांत येण्याजोगें होतें. सभा आटोपल्यानंतर समारोपांत प्रथम घडलेल्या प्रकाराबद्दल क्षमायाचना इत्यादि झालें.

सभागृहांतून बाहेर पडतां क्षणींच निमंत्रकांना व त्यांच्या साहाय्यकांना

त्या ख्रिश्चन मुलांनीं घेरलें व गुद्द्यांपर्यंत मजल आली. एका इंग्रज गृहस्थानें हें पाहून दुःखानें उद्गार काढले, " हीं मुलें हिंदुस्थान सोडून आलीं आहेत पण ह्यांच्या हिंदुस्थानांतील संवयी अजून त्यांनीं सोडल्या नाहींत. असो. सभेचें विसर्जन त्या प्रकारानें झाल्याबद्दल सर्वांनाच खेद झाला.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं आमची बोट जिनोवा बंदरांत शिरली. एकदां बंदरांत बोट आल्यानंतर एंजिन बंद करण्यांत येतें व मग दोन लहान बफर बोटीला नेऊन नीट धक्याला लावतात. आम्ही कांहींहि सामानास हात न लावतां फक्त पासपोर्ट दाखवून खालीं उतरावें व कस्टम-तपासणीच्या खोलींत जावें अशा सूचना आम्हांस देण्यांत आल्या. आमचें सामान तेथील पोर्टट्रस्टचे हमाल कस्टम कचेरींत नेऊन ठेवतात. कस्टम कचेरी अवाढव्य मोठी असून तिचे ५ मोठाले भाग केले होते. प्रत्येक भागांत एक एक स्वतंत्र बोटीचें सामान उतरविलें जात होतें. आमच्या विभागांत इतर सर्व विभागांप्रमाणें आद्याक्षरानुसार वेगवेगळ्या जागा राखून ठेवल्या होत्या. माझ्या N अक्षराजवळ मी जाऊन उभा राहिलों. ५-१० मिनिटांत माझ्या तीनहि पेट्या तेथें सुखरूप आल्या हें पाहून मला आश्चर्य व आनंद वाटला. नंतर एक जकात तपासणीचा फॉर्म भरून दिला व तो वाचून उगाच थोडीशी पेटी तपासून ' विद्यार्थी ' असल्यामुळें कांहीं गफलत मी करणार नाहीं अशा विश्वासानें त्यानें सर्व पेट्या तपासल्याचें निदर्शक असे शिक्के मारले व तिकिटें डकविलीं. येथें सामानावर ' जकात कचेरीनें तपासलें ' अशा अर्थाची पोस्टाच्या तिकिटांसारखीं तिकिटें डकविण्याचा प्रघात आहे. हें झाल्यावर दुसरा एक फॉर्म भरून दिला. त्यांत आपल्याजवळ असलेल्या द्रव्याची मोजदाद लिहावयाची असते. फ्रँक्स किती ? पौंड किती ? लीरा किती ? डॉलर किती ? इत्यादि. ह्या फॉर्मवर शिक्कामोर्तब झालें म्हणजे सामान घेऊन स्टेशनावर जातां येतें. जातांना कस्टमचीं तिकिटें तपासून त्यावर सह्या करतात व मगच खोलीच्या बाहेर पडतां येतें.

तपासलेलें सामान तेथेंच ठेवून आम्ही जिनोवा गांव पाहण्यास निघालों. मॅझिनी, गॅरिबाल्डी, मुसोलिनीचें जिनोवा ! संस्कृतीचें संगमस्थान जिनोवा ! विद्यांचें व कलांचें माहेरघर जिनोवा ! सुंदर सुंदर फळांफुलांचें आगर

जिनोवा ! रमणीय, मनोहर इमारतींनीं नटविलेलें जिनोवा ! प्रथम बाहेर पडल्याबरोबर समोरच सुंदर टपोरीं, काळीं द्राक्षें दिसलीं. येथें जवळच ह्या द्राक्षांचे मळे असल्यानें द्राक्षें स्वस्त होतीं. पोटभर द्राक्षें व सफरचंदें खाऊन मी एका ट्राममध्यें बसलों व ग्रामदर्शनास निघालों.

रुंद रस्ते, फरसबंदी पदपथ, सुभूषित दुकानें, प्रशस्त चौक, मोठाले पुतळे व सुंदर इमारती जिनोवांत सर्वत्र आहेत. दोन बागाहि दिसल्या, पैकीं एक खास मुलांना खेळण्यासाठीं सोयी असलेली अशी होती. एका भागांत ४०-५० बाबागाड्या उभ्या होत्या व जवळच्याच गवतावर हारीनें वेताच्या टोपल्या ठेवलेल्या होत्या. टोपलींतील अर्भकें ऊन खात व खेळणें चोखीत भोंवतालच्या जगाची पर्वा न करतां मजेंत खेळत होतीं. हें सर्व दृश्य पाहून फार बरें वाटलें. जिनोवाची प्रसिद्धि येथील अति प्राचीन विद्यापीठाबद्दल व त्यांतील संग्रहाबद्दल आहे. मी माझ्या M. Ed. च्या शिक्षणशास्त्राच्या इतिहासांत त्यासंबंधींचें वाचलें असल्यानें हा संग्रह पाहण्यास फार उत्सुक होतों व तो पाहावयास मिळाल्यामुळें मला फार आनंद झाला.

येथें एक मोठा नामांकित चित्रसंग्रहहि आहे. तो जवळच असल्यामुळें तेथें गेलों. मोठमोठाल्या चित्रकारांच्या अमर कृतींनीं हा चित्रसंग्रह भूषविलेला आहे. सामान्य रचना ही फारशी मनोवेधक नसल्यानें मला या चित्रसंग्रहाचें फारसें कौतुक वाटलें नाहीं. त्रिवेंद्रमला आपण राजा रविवर्म्याचा चित्रसंग्रह पाहिला. तो आठवतो ना तुम्हांला ? अगदीं याच पद्धतीचा हा चित्रसंग्रह आहे. रविवर्म्याचीं जशीं छोटीं छोटीं पेन्सिलस्केचेस त्रिवेंद्रमला ठेवलीं आहेत, तशींच येथेंहि आहेत. एकूण चित्रसंग्रह चांगला आहे. पण मला त्याचें फार महत्त्व वाटलें नाहीं.

हे दोन संग्रह पाहिल्यानंतर मी थोडासा बाजारांत हिंडलों. थोडीं जिनोवाचीं चित्रें विकत घेतलीं. पत्रें पोस्टांत टाकलीं व परत हिंडत हिंडत बंदरावर आलों. लंडनला बरोबर येणारे स्नेही अजून सर्व आले नव्हते. हळूहळू सर्व जमले व सामान घेऊन आम्ही सर्व जिनोवा रेल्वे स्टेशनावर आलों. जिनोवांत इंग्रजी जाणणारे फारच थोडे लोक आढळले. बहुतेकांनीं

फ्रेंच व इटालियन भाषेंत समजाविण्याचा प्रयत्न केला. रेल्वेस्टेशनवर मात्र चौकशी खात्यांत इंग्रजी बोलणारे नोकर होते. इकडे युरोपांत हिंडणें असेल तर फ्रेंच येणें आवश्यक आहे असें दिसतें. कळावें.

आपला,
× × ×

० ० ०

## युरोपियन आगगाडींतून लंडनला

लंडन
ता. ३०–१०–१९५०

स. न. वि. वि.

जिनोवा शहरांत हिंडून आम्ही जिनोवा स्टेशनवर आलों. आम्हांला तिकिटें आधींच बोटीवर मिळालेलीं होतीं. आमच्याकरितां एका गाडीचे तीन डबेहि रिझर्व केलेले होते. सामानासकट आम्ही गाडींत जाऊन स्थानापन्न झालों. आमच्या सामानावर ‘ थेट लंडन ’ अशीं लेबलें मुद्दाम डकविण्यांत आलेलीं होतीं. त्यामुळें सरहद्दी ओलांडतांना आम्हांस कोठेंहि पेट्या उघडून दाखवाव्या लागल्या नाहींत. फक्त इटालियन सरहद्द संपली तेव्हां पासपोर्टावर एक शिक्का बसला व फ्रेंच सरहद्दींतून आंत शिरलों तेव्हां फ्रेंच सरकारनें एक शिक्का आमच्या पासपोर्टावर मारला.

बोटीवर असतांना कंपनीनें सामान परस्पर आमच्या मुक्कामीं पाठविण्याची सोय आहे, असें कळविलें होतें. अशा प्रकारच्या सवलतीचा फायदा घ्यावा कीं नाहीं याबद्दल आमच्यामध्यें मतभेद झाले. मी अर्थात्च सर्व सामान आपल्याबरोबर आपल्या गाडीनें व शक्य तर आपल्याच डब्यांतून न्यावें ह्या मताचा होतों. सर्वांचेंच सामान गडगंज असल्यानें कोणी माझ्या मताकडे झुकेना.

यूरोपमध्यें प्रत्येकास फक्त ६६ पौंड ( ३० किलोग्रॅम्स ) वजन फुकट

नेतां येतें. ह्यापेक्षां जास्त असलेल्या सामानावर प्रत्येक २० किलोग्रॅम्सना १४ शिलिंग अशा दरानें पैसे भरावे लागतात. हिंदुस्थानांतून निघतांना प्रत्येक जण भरपूर सामान घेऊं निघतोच. बोटीवर सामानाच्या वजनाची मोजदादच नसते. प्रत्येकाला सरासरी ३० क्यूबिक फूट सामान कांहीं ज्यादा आकार न भरतां नेतां येतें. ३० क्यूबिक फुटांची कल्पना तुम्हांला सहज येईल. आपण जे पेटारे सहलींत बरोबर नेतों ना तसे ७ पेटारे प्रत्येकाला नेतां येतात. बोटीवर ह्याप्रमाणें सामानाच्या वजनाची मोजदाद नसल्यानें जेव्हां आपण जमिनीवर उतरतों व आगगाडींत बसतों तेव्हां त्याची खरी कल्पना येते. आतां आमच्या सर्वांच्याच पुढें हा मोठा प्रश्न होता. शिवाय इकडे स्टेशनवर व्यवस्था फार चोख असल्यानें मोठाल्या ट्रंका किंवा पेटारे हे बसण्याच्या डब्यांत किंवा वाटेंत ठेवतांच येत नाहींत. आपल्या-कडे संडासाजवळ बहुधा सामान गच्च एकावर एक चढविलेलें असतें. येण्या-जाण्याच्या रस्त्यावर तें हमखासच असतें. युरोपांतील गाड्यांत तसें होऊं शकत नाहीं. बाकाखालीं व डोक्यावरील फळीवर जेवढें सामान राहील तेवढेंच डब्यांतून नेतां येतें. बाकीचें सारें लगेज व्हॅनमध्यें जावें लागतें.

आमचें साऱ्यांचें सामान 'थेट लंडन'ला जाणारें होतें व म्हणून आमच्या सामानाची व्यवस्था लगेज व्हॅनमध्यें सुखानें लवकर झाली. एक सर्वांत लहान ट्रंक बरोबर घेऊन मी माझ्या डब्यांत येऊन बसलों. आगगाडीचे डबे आपल्या डेक्कन क्वीनच्या पहिल्या वर्गाच्या डब्यासारखे असतात. प्रत्येक डब्यांत सहा जणांची सोय. समोरासमोर दोन आरसे, आगगाडीचा नकाशा व (चहाकरितां) बंद करून ठेवतां येण्याजोगें एक टेबल, सर्व डब्यांचे बाहेर एक मोठी गॅलरी-कॉरिडॉर व त्यांतून आंत येण्यासाठीं झडपेचें सरकतें दार, आंत दोन्ही बाजूंना पडदे असतात व दोन दिवे पांढरे व एक निळा असतो. रात्रीं पांढरे दिवे बंद केले कीं, आपोआप निळा लागतो. याशिवाय डब्यांत वाफ सोडून उष्णता निर्माण करण्याचें एक यंत्र असतें. इकडे पंख्यांची जरूर कधींच नसते.

अपघाताच्या वेळीं गाडी थांबविण्याकरितां सांखळीऐवजीं एक हॅंड्ल असतें. तें ओढण्यासंबंधीं सूचना असतात. त्यांतील विशेष माझ्या लक्षांत आला तो असा कीं, त्यांत दंडाचा उल्लेख नव्हता. अर्थातच निष्कारण

कोणीहि गाडी थांबविणार नाहीं हें त्यांत गृहीत धरलें आहे. किती साधी गोष्ट आहे पाहा ! आपण कधींहि निष्कारण गाडी थांबवीत नाहीं. उगाच खेळ खेळून सांखळी ओढीत नाहीं. पण दंडाचें कलम मात्र आपल्या सांखळीला घट्ट चिकटविलेलें आहे. कदाचित् तसें कलम न घातल्यास सर्वजण गंमत म्हणून सांखळी ओढतील अशी आपल्या रेल्वेला भीति वाटत असावी !

प्रत्येक चोवीस जणांच्या गटाला म्हणजे चार डब्यांना दोन्ही कडेला एकेक टॉयलेटची सोय असते. आरसा, साबू, टॉवेल इ. ठेवलेलें असतें व सर्व अत्यंत स्वच्छ ठेवण्याची सोय केलेली असते. "This is stolen from G. I. P." असे शिक्के मारलेलें साहित्य आपल्या रेल्वेंत आढळतें तसें येथें कोठेंहि दिसलें नाहीं. गाडीची एकूण सर्व व्यवस्था मला फार आवडली. गाडींत मध्यभागीं मोठा जेवणाचा डबा असतो व जेवणाची वेळ झाली कीं, एक सेवक घंटा वाजवीत जेवणाची तयारी आहे असें कळवीत जातो. या व्यतिरिक्त मोठाल्या स्टेशनवर "येथें गाडी इतका वेळ थांबणार आहे," किंवा "हें इटालियन हद्दीवरचें शेवटचें स्टेशन आहे" इत्यादि घोषणा केल्या जातात. मी जिनोवांत घेतलेल्या दोन चित्रमालिकांचीं पत्रें लिहून तयार ठेवलीं होतीं. त्यांना इटालींत स्टॅम्स लावले होते व तीं इटालीची हद्द ओलांडण्यापूर्वीं टाकावयाचीं होतीं. शेवटचें स्टेशन म्हटल्यावरून मीं तीं तेथील पोस्टांत टाकलीं व परत डब्यांत आलों.

जिनोवा सोडल्यापासून बराच वेळ पावेतों आम्हांस जिनोवाचेच भाग दिसत होते. लहान लहान सुटे बंगले व सिमेंट कॉंक्रीटचे रस्ते, बागा, द्राक्षांचे मळे व शेतें दिसूं लागलीं. वेळ संध्याकाळची असल्यामुळें क्रीडोद्यानामधून मुलें झोपाळ्यावर झोके घेतांना व रिंगणांत 'मेरी गो राउंड' वर फिरतांना दिसलीं. आश्चर्य म्हणजे हॉकी व फूटबॉलचा खेळ फारच थोड्या ठिकाणीं दिसला. उत्तम तयार केलेलीं मैदानें होतीं. पण खेळाडू दिसले नाहींत. इटालींतूनच जात असतांना अंधार पडला व बाहेरचें सौंदर्य दिसनासें झालें. रात्रीं आम्ही झोंपेंत असतांनाच एका स्टेशनवर फ्रेंच अधिकाऱ्यांनीं येऊन

पासपोर्ट तपासूनच शिक्के मारले व आम्ही फ्रेंच हद्दींत शिरल्याचें आम्हांस कळलें.

सकाळीं उठलों तों फ्रेंच वातावरणांतच ! स्टेशनचें नांव कांहीं औरच होतें. एका मोठ्या हातगाडीवर सॉसेज, सँड्विचेस्, पाव, लोणी आणि कॉफीचा एक मोठा बंब घेऊन एक फ्रेंच ललना फलाटावर आली होती. येथें फ्रॅंकशिवाय नाणें चालत नव्हतें. लीरा तर कोणी घेईचना. इंग्रजी शिलिंग मात्र घेतले जात होते. कॉफी मागितली कीं, एका कागदाच्या पेल्यांत ती दिली जात असे. हे पेले इतके स्वस्त व सुंदर असतात कीं, ते घेऊन ठेवण्याची मला इच्छा झाली होती. कॉफी पिऊन पेला चुरगाळून टाकून द्यायचा अशी पद्धत आहे. आपणाकडे उत्तर हिंदुस्थानांत दूध किंवा मिठाईसाठीं अशींच मातीचीं सुंदर भांडीं मिळतात व दूध पिऊन झाल्यावर तीं फोडून टाकावयाचीं असतात. तीं टाकून देत असतांना जसें वाईट वाटतें तसेंच येथेंहि कॉफीचा पेला टाकून देतांना क्षणभर वाटलें ! पेला कागदाचाच पण सुबक केलेला होता. कॉफी पिण्यापुरतां मिनिटभरच हातांत राहणार, त्यावर कशाला मेहनत घ्या ! या बुद्धीनें केलेला नव्हता. एका बाजूस द्राक्षाच्या डोंगराचें चित्र व एका बाजूस सूर्योदयाचें चित्र होतें. येथें कॉफीस २० फ्रॅंक्स म्हणजे सुमारें चार आणे पडले. कॉफी दुधाशिवायची पण छान होती.

यानंतर सतत १० वाजेपावेतों आम्ही फ्रान्सचा तो उंच-सखल भूभाग पाहण्यांत गढून गेलों होतों. अलेक्झांडर ड्यूमानें रंगवलेला फ्रान्स, नेपोलियनमुळें एके काळीं जगाला थरकांप निर्माण करणारा फ्रान्स आम्ही मनश्चक्षूंपुढें आणीत होतों. मधून मधून थोडेसे पर्वत दिसत, पण एकूण सारा भाग बराचसा सपाटच वाटे. शेतें आकारानें मोठीं असत. सामुदायिक शेतीचा प्रयोग सुरू असावा असें सुद्धां एकदां वाटलें; इतकीं मोठीं शेतं दिसलीं. लहान लहान कारखाने, थोडीशीं मोठालीं खेडीं व द्राक्षाचे मळे हेंच दृश्य बहुधा सर्वत्र दिसत होतें. १० वाजण्याच्या सुमाराला दोन्ही बाजूंना मोठाल्या इमारती दिसूं लागल्या व १०-१५ ला आम्ही पॅरिस लिऑनवर स्टेशनवर आलों. गाडींतून आम्हांला पॅरिसमधील विख्यात एफेल टॉवर दिसला होताच. आणखी पॅरिसचें दर्शन घेण्याची आमची इच्छा होती. पण पॅरिसला आल्यावर आम्हांस असें कळविण्यांत आलें कीं, आमचे राखीव

डबे थेट कॅलेपर्यंत जात नसून येथपर्यंतच संपत होते. पॅरिस नॉर्ड नांवाचें पॅरिसचें आणखी एक स्टेशन आहे तेथून कॅलेला जाणाऱ्या गाडीला तीन डबे आमच्याकरितां राखून ठेवण्यांत आले होते व तेथें जाऊन आम्ही त्या डब्यांत बसावयाचें होतें. आमचे डबे एका स्पेशल इंजिनानें ओढून पॅरिस नॉर्डला नेऊन उभे केले व आम्ही तेथें उभ्या असलेल्या आमच्या डब्यांत जाऊन बसलों. ह्या सर्व गडबडीला सुमारें दोन तास लागले व भुकेची वेळ झाल्यानें उरलेला एक तास फराळ वगैरेंत संपला. एतावता जे तीन तास आम्ही पॅरिसचें पहिलें धांवतें दर्शन घेण्यासाठीं उपयोगांत आणणार होतों ते असे वायां गेले. पॅरिस नॉर्डला स्टेशनांतच फराळ न करतां आम्ही कांहीं थोडे लोक स्टेशनाबाहेर गेलों होतों व फराळाच्या निमित्तानें स्टेशनासभोंवारचा जो भाग आम्ही पाहिला तेवढेंच पॅरिसचें दर्शन आम्हांस घडलें. सुविख्यात बॅस्टिलचा तुरुंग, राज्यक्रांतीमुळें अमर झालेला बॅस्टिल, नेपोलियनचें स्मारक, वगैरे पुष्कळच गोष्टी पाहण्याच्या मनांतल्या मनांतच राहिल्या. असो.

पॅरिस नॉर्डहून आमची गाडी न थांबतां कॅलेला जावयाची होती. इकडे अशा ‘ नॉन्-स्टॉप गाड्या ’ बऱ्याच आहेत. फ्रान्सचें धांवतें दर्शन पुनः घडूं लागलें. तीन तास समुद्रकांठचा फ्रान्स आम्ही पाहत होतों. बुलोन स्टेशनपाशीं गाडी किंचित् थांबल्यासारखें वाटलें. बुलोन ! चक्रवर्ती नेपोलियननें येथेंच सर्व आरमार जमविलें होतें. येथूनच इंग्लंडवर स्वारी करून जग पादाक्रान्त करण्याचा त्याचा मनोदय होता. याच स्वारीबद्दल त्यानें मोठाले मनोरथ रचले होते व आपल्या नांवाचीं नाणींहि त्यानें पाडून घेतलीं होतीं. “ दोन तास फक्त इंग्लंडची खाडी माझ्या ताब्यांत द्या. मी सर्व युरोपचा बादशहा होईन. ” हे शब्द याच बुलोनमध्यें त्या महत्त्वाकांक्षी बादशहानें काढले होते. समुद्र दिसूं लागला व हां हां म्हणतां आम्ही कॅले येथें आलों.

कॅले हें नांव अनेक कारणांनीं इतिहासप्रसिद्ध झालें आहे. ‘ मी मेलें तर माझ्या हृदयांत तुम्हांला कॅले हीं अक्षरें दिसतील ’ असें म्हणणाऱ्या राणीपासून ड्यूमाचा डार्टा व डिकन्सचा चार्लस् एव्हरमाँडपावेतों सर्वांचीं ‘ कॅले ते डोव्हर ’ चीं गमनागमनें आठवलीं म्हणजे कॅलेचें वाङ्मयीन स्थानहि लक्षांत येतें. कॅले ते डोव्हर हें अंतर सर्वांत कमी २१ मैलांचें असून

हवा उत्तम असली तर बोटींत असतांना दोन्ही किनारे दिसतात म्हणे ! हवा उत्तम नसते हेंच यांतलें फक्त खरें आहे !

कॅले येथें आपल्याकडील सेतु रामेश्वराप्रमाणें थेट बोटीपर्यंत रेल्वे नेली आहे. बोटीवरून उतरावें व समोरच उभ्या असलेल्या आगगाडींत बसावें. तसेंच आगगाडींतून आलेल्यांनीं उतरून लगेच बोटींत बसावें अशी योजना आहे. दर दोन आगगाड्यांनंतर बोट सुटते.

इंग्लिश खाडींतील प्रवास थोडासाच असला तरी अनेकांना फारच जाचला. खाडींत समुद्र फारच खवळलेला होता. त्यांतून आमची बोट फारशी मोठी नसल्यानें चांगलीच डोलत होती. कॅले सोडून दहा मिनिटें गेलीं नाहींत तोंच लोकांच्या ओकाऱ्या वगैरे सुरू झाल्या. पण या बोटींत एक महत्त्वाचा फरक आढळून आला, तो म्हणजे उतारूंना दिली जाणारी वागणूक. कोणाला ओकारी येते असें वाटतांच त्यासाठीं तयार ठेवलेलीं भांडीं त्यांच्यापुढें धरण्यास कुणी तरी सेवक तयारच असे. खालीं ओकल्यास तें लगेच धुऊन टाकण्याची खबरदारीहि घेतली जात असे. उतारूंबद्दल आपुलकी, जिव्हाळा त्या सर्व वागणुकींत दिसत असे.

बोट सुरू झाल्यावर पासपोर्ट वगैरेसंबंधीं सूचना दिल्या गेल्या व त्या प्रथमच इंग्रजींतून झालेल्या घोषणा ऐकून खरोखरच फार बरें वाटलें. ५ सप्टेंबरपासून गेले १५ दिवस शुद्ध व स्वच्छ इंग्रजी कधीं ऐकण्यासच मिळालें नव्हतें. इटालियन बोट असल्यामुळें सर्व सूचना-घोषणा इटालियन भाषेंत व मोडक्या-तोडक्या इंग्रजींतच असत व गेले दोन दिवस युरोपांत इंग्रजी ऐकण्याचा योगच नव्हता. त्यामुळें बोटीवर जेव्हां इंग्रजींतून सूचना दिल्या गेल्या तेव्हां बरें वाटलें. परत एकदां आपल्या नेहमींच्या माणसांत आलों असें वाटूं लागलें. बोट खूप डोलत असली तरी वेगानें जात होती. मी बाहेरच उभा राहून खाडीचें निरीक्षण करीत होतों. कॅले ते डोव्हर अंतर पोहून जातात हें माहीत असल्यानें त्या दृष्टीनें मी समुद्राकडे पाहत होतों. आज खवळलेला होता तेवढा नसल्यास समुद्र पुष्कळसा कुलाब्याच्या दांडी-जवळून मुलें पोहण्यास सोडतात त्यासारखाच संथ असतो. अर्थात् पोहोण्यास उतरण्यापूर्वीं वेधशाळेकडून सर्व माहिती घेऊन बरोबर स्टीमलॉंचेस ठेवून मग तयारी करतात असें मला चौकशी केल्यावर समजलें.

एका तासांतच आम्ही डोव्हरच्या बंदरांत येऊन पोहोंचलों. येथेंहि बोटीच्या जवळच आगगाडी आणलेली आहे. पण येथें जकात-तपासणी व पासपोर्ट-तपासणी हें एक तंत्र जास्तीचें आहे. आम्ही बोट बंदरास लागतांच सामान बाहेर उतरून घेऊन थांबलों. आमचे पासपोर्ट तपासले गेले व पुनः सामानाकडे येण्यासाठीं आम्ही दाराकडे वळतों तों आम्हांस बाहेर जाऊंच दिलें जाईना. आमचे सातजणांचे मिळून ३५ डाग बंदरावर बाहेर होते. व ते आमच्या देखरेखीखालीं जकातीकडे नेले जावेत अशी आमची इच्छा होती. दारावरच्या पोलीस अधिकाऱ्यानें सांगितलें—'चिंता मुळींच करूं नका. तुमचें सारें सामान मोठ्या गाडींतून जकात-तपासणीच्या तेथें नेलें जाईल. तुम्ही तेथें जाऊन उभे राहा.' ऐकण्यावांचून आम्हांस गत्यंतरच नव्हतें. हमालाच्या प्रामाणिकपणाबद्दल साशंक असणें हें आम्हांस हिंदुस्थानांतील उदाहरणांनीं शिकविलें होतें. त्यामुळें आम्ही थोडें साशंक होतों. तथापि, आम्ही जकात-तपासणीचे जागीं जातों तों सामान गाडींत भरलेलें तयार आलें होतें. हमालानें आम्हांस विचारलें—शुद्ध व स्वच्छ इंग्रजींत विचारलें, "आपण सर्वच विद्यार्थी आहांत ना?" इतके सुशिक्षित हमाल मिळण्याचा हा आमचा पहिलाच प्रसंग होता! आम्ही 'होय' असें उत्तर दिलें. त्यानें जाऊन जकात अधिकाऱ्याला बोलावून आणलें. दोनच वेंचक प्रश्नोत्तरें झालीं. "विद्यार्थी आहांत ना? सिगारेटस् आहेत काय? नवीन घड्याळें आणलीं आहेत का?" आम्ही "नाहीं" म्हणतांच त्यानें एकाहि वस्तूकडे न पाहतां आम्हांस मोकळें केलें. हाहि अनुभव अगदींच नवीन होता. हिंदुस्थानांतील जकातीच्या ठिकाणीं व इटलींतील जकातीच्या ठिकाणीं आम्ही पूर्वी अनुभव घेतलेला होताच. अवघ्या दहा मिनिटांत गाडी सुटावयाची होती. पण हें सर्व पांचच मिनिटांत उरकल्यानें पहिली 'बोट-ट्रेन' आम्हांस मिळणार असा विश्वास वाटूं लागला. हमालानें गाडी ढकलली ती थेट इंजिनाजवळील लगेज व्हॅनपर्यंत! तेथें सर्व सामान लगेज व्हॅनमध्यें टाकून आम्ही दिलेली दहा शिलिंगांची नोट खिशांत घालून 'गुड-बाय्!' करून तो दिसेनासा झाला.

इंग्लंडांत उतरतां उतरतांच अशा प्रकारें येथील हमाल या संस्थेबद्दल आमचा ग्रह फार चांगला झाला.

हिंदुस्थानांतील सर्वसामान्य हमालांसंबंधीं जरी वर साशंकपणाचें चित्र काढलें असलें तरी याच ठिकाणीं लंडनमधील हमालांबद्दल चांगला ग्रह झाला म्हटल्यावर मला आपल्या हिमालयांतील श्रीनन्दजींची आठवण झाली. हिमालयांतील हमालांचा प्रामाणिकपणा, त्यांची सचोटी व त्यांचा काटकपणा यांच्या बरोबरीला लंडनचे हमाल टिकणारच नाहींत ! १५-१५ दिवस सकाळपासून संध्याकाळपर्यंत पाठीवर ओझें घेऊन धन्याबरोबर जावयाचें व सामानांतील एका काडीलामुद्धां मनानेंहि स्पर्श करावयाचा नाहीं त्या गोष्टीला मला वाटतें इतरत्र तोडच नसणार !

याच निमित्तानें इकडे पाहिलेली एक दुसरी गोष्ट सांगतों. इतक्या दिवसांत मी अजून एकहि हमाल डोक्यावरून ओझें वाहतांना पाहिला नाहीं. फलाटावर सर्वत्र सामान-वाहतुकीसाठीं गाडया व त्याहि यंत्रप्रेरित अशाच आढळल्या. छोट्या छोट्या मोटार सायकली असाव्यास ना तशा गाडया व पुढें सामानाचा ढीग रचण्यासाठीं जागा अशा अनेक गाडया एकमेकांस आगगाडीसारख्या जोडण्याचीहि योजना असतेच.

बोट-ट्रेन डोव्हरहून निघते ती कोठेंहि न थांबतां सरळ लंडनमधील व्हिक्टोरिया स्टेशनावर येते. तिचा बहुतेक सर्व भाग औद्योगिक विभागांतून गेला असल्यानें गाडींतून जातांना बहुशः औद्योगिक इंग्लंडचेंच दर्शन घडतें या गाडीचीहि रचना पुष्कळशी युरोपांतील गाडयांप्रमाणेंच असते. आम्ही ज्या बोट-ट्रेननें प्रवास केला तिला तर वर्गहि नव्हते. सर्वच दुसऱ्या वर्गाचे डबे होते, त्यामुळें गाडींत फराळाच्या डब्याचीहि भरपूर सोय होती व आपण बसल्याजागीं वेटर फराळाचें आणून देत होता. आम्ही भरपूर फराळ केला व इंग्लंडच्या वायव्य कोपऱ्याचा भाग निरीक्षण करीत बसलों.

लंडनमध्यें गॅस कामगारांचा संप सुरू असल्यामुळें लंडनचा कांहीं भाग अंधारांत व्यवहार करीत आहे असें आम्ही डोव्हरला घेतलेल्या वर्तमान-पत्रांत वाचलें होतें. त्यामुळें जसजसे आम्ही अंधाराच्या भागाकडे जाऊं लागलों तसतसें लंडन जवळ आल्याचें भासूं लागलें. रात्रीं ८ वाजतां म्हणजे तुमच्याकडील रात्रीं १॥ वाजतां लंडनमधील मुख्य व्हिक्टोरिया स्टेशनवर उतरलों. आगगाडींतून बाहेर पडावें तें रस्त्यावरच अशी येथील रचना

आहे. फलाटावरच मोटारी व टॅक्सी गाड्या उभ्या होत्या. गाडी थांबतांच रेल्वे हमालांनीं इंजिनाजवळच्या लगेज व्हॅनमधून आमचें सामान खालीं उतरून ठेवलें होतें. आमच्यापैकीं वसंत चाफेकरनें जाऊन प्रथम श्री. कानेटकरांकडे फोन केला व नंतर दोन टॅक्सीज ठरवून आम्ही निवासस्थानाकडे निघालों. घर बरेंच लांब असल्यानें जातांना वाटेंत लंडनचा बराचसा भाग अनायासेंच दृष्टीखालून गेला. येथें घरनंबरांना फार महत्त्व आहे. घरनंबर बरोबर सांगितला तर प्रत्येक घरावर नंबर ठळक व प्रमुख ठिकाणीं लिहिला असल्यामुळें गाडी नेमकी घरासमोर नेऊन उभी करतां येते. टॅक्सी ड्रायव्हर बरोबर नंबर मोजत नेमका ३४ पाशीं थांबला व पांचच मिनिटांत सामानासह आम्ही लंडनमधील आमच्या निवासस्थानांत येऊन पोहोंचलों. खुद्द लंडनमध्यें थंडी बरीच होती व म्हणून श्री. कानेटकरांकडे हॉलमध्यें शेगडीसभोंवतीं बसल्यानंतर फारच बरें वाटलें.

प्रथम ऑगस्ट महिन्याच्या २५ तारखेस निघणाऱ्या बोटीवर माझें नांव नोंदलें गेलें असल्यानें प्रवासांतच इटालीला उतरल्याबरोबर रोम, व्हेनिस इ. पाहून आल्प्स् ओलांडून फ्रान्समध्यें यावयाचें असा बेत मी रचला होता. पण २५ तारखेस निघणारी बोट २७ तारखेला पुढें पुढें २ सप्टेंबरला असें करतां करतां ५ सप्टेंबरला व तीहि रात्रीं निघाली. अर्थात् लंडनमध्यें प्रत्यक्ष विद्यापीठांत जें फार महत्त्वाचें काम तें करावयास लागणारा वेळच तेवढा मजजवळ उरल्यानें मला वाटेंत कोठेंच थांबतां आलें नाहीं. तसेंच आल्प्स् वगैरे प्रकरणहि तसेंच थांबलें. परंतु केवळ अशक्य झाल्यामुळेंच मी मध्यें थांबलों नाहीं. आतां सुटींत तिकडे जाईन म्हणतों. गेलों तर—आणि जाणारच म्हणा तिकडचें वृत्त अवश्य लिहीनच.

आज ह्या सर्व गोष्टींबरोबरच कांहीं बारीक मुद्देहि मी लिहिणार आहें. आपल्यासारखे जे विद्यार्थी इकडे येतात त्यांच्यांत आणि सरकारी शिष्यवृत्ति घेऊन येणारे विद्यार्थी ह्यांत फरक हा पडतोच. आपणासारख्यांनीं ध्यानांत घेण्याजोग्या एक-दोन गोष्टी सांगणार आहें. त्यांतली पहिली म्हणजे 'कुक' कंपनीच्या ट्रॅव्हलर्स चेक्ससंबंधीं सर्व जगांत बँकेच्या शाखा आहेत म्हणून कुक कंपनीचा चेक वाटेल त्या गांवांत कुणीहि घेतो. इत्यादि जें वर्णन येतें तें तितकेंसें खरें नाहीं. कुक कंपनीचे चेक्स त्या त्या गांवांतील कुक कंपनीच्याच

कचेरींत मोडून मिळतात. गांवांत इतरत्र आम्हांस त्यांचा उपयोग झाला नाहीं. बरें हे चेक्स् घेतांना दर शंभर रुपयांवर १२ आणे कामिशन द्यावे लागतें. शिवाय बदल-शुल्क म्हणून ५ रुपये द्यावे लागतात ते वेगळेच. हें झाल्यावर प्रत्येक चेक मोडतांना येथें २ पेनी कापून द्याव्या लागतात. हें चेक-प्रकरण किंचित् महागांतच पडतें. ज्यांना सरळ इंग्लंडला यावयाचें आहे. त्यांनीं तर फारसे चेक घेण्याचेंसुद्धां कारण नाहीं. बोटीवर थोडेसे पैसे लागतील व तेथें लंडनमध्यें आल्यावर लागतील तेवढेच. येथें आल्यावर बँकेंतील खातें सुरू झालें म्हणजे चेक्स घेतांनासुद्धां २ पौंडांचे वा ५ पौंडांचे फारसे न घेतां जास्त म्हणजे दहा व वीस पौंडांचेच घ्यावेत. कारण, २ पौंडांच्या चेकलाहि मोडण्यास २ पेनी व १० पौंडांसहि २ पेनीच द्याव्या लागतात. हें माझ्या ध्यानांत आधीं न आल्यानें माझे कांहीं शिलिंग या व्यवहारांत उगीच खर्चीं पडले आहेत.

याच्या उलट बँकेंत भरलेले रुपये इकडे पाठविण्यासाठीं फारच कमी खर्च येतो. माझे ५०० रुपये इकडे पाठविण्यासाठीं बँकेतर्फे मला अवघा साडेतीन रुपये खर्च आला. तेच जर चेक्सच्या स्वरूपांत घेतले असते तर जवळजवळ ५० रुपये खर्च आला असता.

कुक कंपनीतर्फे बोटीचें तिकीट अवश्य काढावें कारण त्यापेक्षां कमी किंमतीला प्रत्यक्ष कंपनीसुद्धां आपणाला तिकीट विकूं शकत नाहीं. परंतु त्याच्याबरोबर जर सामानाचें व आपल्या विम्याचें कांहीं काम करावयाचें असलें तर तें त्याच कंपनीकडून करून घेण्यांत मोठेंसें तात्पर्य नाहीं.

मुंबईला इटाली, फ्रान्स, स्वित्झर्लंड इ. सर्व देशांच्या वकिलाती आहेत. व आपणासारख्यांनीं तर अवश्य जातीनें त्या त्या वकिलातींत जाऊन आपले परवाने मिळवावयास हवेत. स्वतः जाण्यानें माहिती जास्त होईल, काम लवकर होईल, स्वावलंबनानें होईल व पैसे पुष्कळ वांचतील. म्हणून व्हिसा मिळविण्याचें कार्य ज्याचें त्यानेंच करावें असा माझा आग्रह आहे.

बोट निघण्याच्या दिवशीं सामान बंदरावर नेण्याची कुक कंपनीची एक योजना आहे त्यास किमान रु. १० पडतात व मग ज्यादा आकार आपल्या सामानांतील नगांच्या संख्येवर असतो. मोठमोठाल्या राजेमहाराजांनीं वा

प्रचंड सामान नेणाऱ्यांनीं या योजनेचा अवश्य फायदा हवा तर घ्यावा. पण आपल्यासारख्यांनीं आपल्याबरोबर टॅक्सींतून सामान नेणें हें सोयीचें व कमी खर्चाचें होतें असा माझा प्रत्यक्ष अनुभवहि आहे.

प्रत्यक्ष विद्यार्थी नसणाऱ्यांना बंदर सोडण्यापूर्वी एक सर्टिफिकेट लागतें. ह्यास No objection certificate असें म्हणतात. हें मुंबईच्या प्रोटेक्टर ऑफ इमिग्रँटस्च्या कचेरीनें द्यावयाचें असतें. विद्यार्थी असण्याचा दाखला ज्याच्याजवळ आहे त्यास ह्याची जरूर नसते असें सांगतात. पण हें घेऊन ठेवणें इष्ट आहे असें मी स्वानुभवावरून सांगतों.

मुंबईतील ह्या प्रोटेक्टर ऑफ एमिग्रँटस् कचेरीचा उल्लेख आला म्हणून जातां जातां त्यांतील कार्यपद्धतीचा नमुना सांगून टाकतों. आतां पुढें मी येथील लंडनमधील कचेरींतील कार्यपद्धतीचे नमुने सांगणार असल्यानें त्या नमुन्यांच्या पार्श्वभूमीवर ते खुलून दिसण्याचा संभव आहे.

प्रथम कचेरींत गेल्याबरोबर नेमकें काय करावयाचें हें सांगणारें तेथें कुणीच नाहीं. द्वारपाल फक्त आंतमध्यें कोणासहि न जाऊं देण्याचें–रौप्यमुद्रेचा प्रयोग झाल्यास जाऊं देण्याचें–आपलें कार्य चोख पार पाडीत असतो. आपणाकडून कांहीं लाभ घडेल असें त्याला वाटलें तर तो एक फॉर्म भरण्यासाठीं आणून देतो. मग भरलेला फॉर्म व पासपोर्ट आंत कचेरींत नेऊन दिला जातो. बऱ्याच वेळानें–सुमारें दोन तासानें–मुलाखतीसाठीं आंत बोलावणें येतें. बाहेर सुमारें १००-१२५ लोक तिष्ठत बसलेले असतातच. आंत मुलाखती घेण्यासाठीं फक्त तीन अधिकारी असतील, त्यांत दोन मुलींची मुलाखत एका मुलीनेंच घेतली. तिला इंग्रजी येत होतें हें मान्य करणें प्राप्तच आहे. पण मी जेव्हां विलायतेला पीएच. डी. होण्यासाठीं जात आहें, असें सांगितलें तेव्हां तें कांहीं तिला समजेना. शेवटीं तिनें लिहून घेतलें तेव्हां P. H. D. असें घेतलें व मग ही काय डिग्री आहे बुवा ? अशी चौकशी केली. (डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी) सांगितल्यावर मग पुढचा प्रश्न आला. फिलॉसॉफी कीं एज्युकेशन ? आणि एज्युकेशनला फिलॉसॉफी कशाला लागते ? अखेर मला तिची समजूत काढणें अशक्य आहे म्हणजे एकूण मला आपलें यथातथाच ज्ञान आहें असें तिला वाटलें

व तें सर्व तिनें आपल्या रिपोर्टांत लिहिलें. मी एम्. एड्. झालों ह्याचेंहि तिला आश्चर्य वाटलें असावें. हा रिपोर्ट पासपोर्टासह व मी भरलेल्या फॉर्मसह ह्यानंतर थोरल्या साहेबांच्या टेबलावर गेला. माझ्या मुलाखतीस लागलेल्या वेळावरून प्रत्येकाची मुलाखत जर ह्याच प्रकारें घेतली जात असेल तर किमान बोट सुटण्याचे एक आठवडा तरी आधीं ह्या सर्टिफिकिटासाठीं अर्ज करावा असें वाटूं लागलें. बाहेर शें-सव्वाशें लोक असतांना मुलाखत काय व किती वेळांत आटोपावी ह्याचें धोरण मला वाटतें ठरलेलें नाहीं. मला लंडनमध्यें येऊन आतां थोडे दिवस झाले असल्यानें प्रत्यक्ष लंडन-संबंधींहि लिहिण्याजोगें बरेंच आहे, पण तें पुढच्या पत्रांत. कळावें.

आपला,
×××

: २ :

# ब्रिटनची राजधानी लंडन

## लंडन शहराचें ओझरतें दर्शन

लंडन

स. न. वि. वि.

प्रवास संपवून मी आतां लंडनमध्यें येऊन पोहोंचलों आहें. स्वतंत्र राष्ट्र म्हणून आज आपण जगाच्या उंबरठ्यावर उभें असल्यानें स्वातंत्र्यकालांतील तपश्चर्येनें विकसित झालेल्या जगांतील विविध भागांचें सम्यक् स्वरूप कसें आहे हें उघड्या डोळ्यांनीं पाहणें अत्यंत उद्‌बोधक आहे व त्याच दृष्टीनें खुद्द लंडनचें स्वरूप कसें आहे हें आज लिहीत आहें.

सर्व जगांतील सर्वांत मोठें शहर, असें लंडनचें कागदोपत्रीं वर्णन आहे आणि गेल्या माझ्या अनेक दिवसांच्या सतत हिंडण्यानंतरसुद्धां मीं जेव्हां त्याचा फक्त थोडासाच भाग पाहिला आहे असें नकाशावरून माझ्या लक्षांत आलें, तेव्हां लंडनच्या त्या वर्णनाशीं मीं सहमत होण्याचें ठरविलें. अर्थातच एवढ्या मोठ्या शहराचे कार्याच्या सोयीसाठीं भाग पाडणें आवश्यकच होतें व तसे लंडनचे सुमारें ६५ भाग पाडण्यांत आले आहेत. पोस्टाच्या सोयीसाठीं खुद्द लंडन हें केंद्र कल्पून त्याच्या आठहि दिशांना कल्पित रेषा ओढल्या

आहेत व त्या त्या भागास ( N. ) ( N. W. ) ( W. ) ( S. W. ) असे प्रत्यय जोडले आहेत. प्रत्यक्ष लंडन शहराचेहि असेच भाग असून C म्हणजे City असा त्याचा संकोच केला आहे. W. C. म्हणजे प्रत्यक्ष शहरांतील पश्चिमेचा तुकडा.

ह्या वेगवेगळ्या विभागांना नांवें आहेत. त्यांना 'बरो' (Burrough) म्हणतात. हे 'बरोज' म्हणजे आपल्या येथील पेठाच समजा घटकाभर. प्रत्येक पेठेचा विस्तार खूपच आहे. आमच्या 'होबर्न' पेठेचें क्षेत्रफळ ४०५ एकर आहे व लोकसंख्या सुमारें ४०,७५० आहे. सुप्रसिद्ध ब्रिटिश म्यूझियम, लंडन युनिव्हर्सिटी, आर्टस् अॅन्ड क्राफ्टस् सेंट्रल स्कूल इत्यादि पुष्कळशा महत्त्वाच्या गोष्टी आमच्या ह्या 'होबर्न' पेठेंत आहेत. आमच्या पलीकडची पेठ ही 'वेस्ट मिनिस्टर' पेठ होय. ही फारच मोठी असून तिचा विस्तार २५०० एकर आहे आणि तिची लोकसंख्या १ लक्ष ३० हजार ५०० आहे. बकिंगहॅम राजवाडा, डाउनिंग स्ट्रीट, १० डाउनिंग स्ट्रीट हें मुख्य प्रधानांचें वसतिस्थान, पार्लमेंटगृहें, लॉ कोर्टाच्या इमारती, नॅशनल गॅलरी, ट्रॅफलगार स्क्वेअर आणि नेल्सन्चा पुतळा, वॉटर्लू ब्रिज, वेस्ट मिन्स्टर अॅबे ह्या सर्व जगाला माहिती असणाऱ्या गोष्टी ह्या पेठेंत आहेत. वेगवेगळीं कॉलेजेस् व टेक्निकल शिक्षण संस्था अठ्ठावीस आहेत. सहा लहान मुलांच्या शाळा, पंधरा प्राथमिक शाळा, नऊ सेकंडरी स्कूल्स् आहेत. बावन्न सभागृहें आहेत. अकरा रुग्णालयें आहेत. पांच सार्वजनिक ग्रंथालयें तर तीन अगदीं लहान मुलांकरितां असलेलीं ग्रंथालयें आहेत. नाट्यसंस्था सात, वाङ्मयप्रवर्तक संस्था दोन, गायनसंस्था नऊ, स्काउट क्लब्स् बावीस, गर्ल गाईडस् पंधरा, क्रीडासंस्था सदतीस आणि एकवीस सार्वजनिक बागा आहेत. पोहोण्याचे चार सुंदर तलाव असून त्यांतील दोन गरम पाण्याची सोय असलेले आहेत. ह्या पेठेंत वर्तमानपत्रांच्या चार कचेऱ्या आहेत. आणि सदतीस पोस्ट ऑफिसें ( पत्रें टाकण्याच्या पेट्या नव्हत. ) आहेत.

प्रत्येक बरोचा कारभार अगदीं स्वतंत्रपणें चालतो. प्रत्येक बरोकरितां एक कौन्सिल निवडून आलेलें असतें व त्या त्या बरोची सारी व्यवस्था हें कौन्सिल पाहतें. प्रत्येक बरोचें मध्यवर्ती सभागृह असतें. आणि तेथें सर्व

ग्रं. क्र. ११३७९

प्रकारची माहिती उपलब्ध होते. प्रत्येक बरोचा एक स्वतंत्र विद्याधिकारी असतो आणि त्याच्या ताब्यांत त्या बरोच्या सर्व शाळा इत्यादि असतात. सर्व देखरेख, मदत इ. त्यानेंच करावयाची असते. बरोच्या सर्व नागरिकांचें जास्तींत जास्त हित साधण्यासाठीं सर्व सभासद उत्सुक असतात. व "आपल्या सूचना पाठवा" अशा पाट्या सर्वत्र लावलेल्या आढळतात.

मी ह्या बरोंत आल्यानंतर एकदां येथील बरोच्या मध्यवर्ती सभागृहांत गेलों व 'मी ह्या भागांत राहावयास आलों आहें' असें सांगितलें. तेथील चौकशी-कार्यालयांतील मुलीनें मला सर्व माहिती सांगितली आणि आमच्या बरोचा एक नकाशा ( मोफत ) दिला. बरोचें एक छापील माहितीपत्रकहि दिलें. त्यांतूनच वर सर्व माहिती दिली आहे. नाहीं तर मी इतक्या संस्था कुठल्या पाहायला जाणार? शेवटीं निघतांना 'शेजारींच ग्रंथालय आहे, तेथें गेलांत आणि कार्ड भरलेंत कीं, एका वेळेला चार पुस्तकें वाचावयास मिळूं शकतील" अशी माहिती दिली.

मी अर्थातच शेजारच्या ग्रंथालयांत तत्परतेनें गेलों. तेथील व्यवस्थापिकेनें कार्ड पुढें करून भरून घेतलें व चार तिकिटें हातावर ठेवलीं. "दोन कादंबऱ्या व दोन इतर अशीं चार पुस्तकें, हवी तीं घेऊं शकतां," असें तिनें म्हटल्यावर मी आश्चर्यचकितच झालों. कांहीं डिपॉझिट नाहीं, कांहीं वर्गणी नाहीं, 'कांहीं ओळख आणा' नाहीं. पांच मिनिटांत फक्त कार्ड भरल्याबरोबर हवीं तीं चार पुस्तकें देणाऱ्या त्या ग्रंथालयाचें मला मोठें कौतुक वाटलें. कां वाटूं नये? आपल्याकडे जबाबदार शिक्षक शिकावयास येतात अशा बी. टी. कॉलेजमध्येंसुद्धां डिपॉझिट भरल्याशिवाय पुस्तकें मिळत नाहींत. नगरवाचनमंदिरांतसुद्धां मासिक किंवा वार्षिक वर्गणी भरावी लागते, आणि ग्रंथालयाला 'मुक्तद्वार' असें नांव दिल्यावरसुद्धां पुस्तक घरीं म्हणून नेतां येत नाहीं–इत्यादि ग्रंथालयांच्या सर्व तऱ्हा मी पाहिल्या होत्या. शक्यतोंवर ग्रंथालयांतून पुस्तक बाहेरच जाऊं नये हा उत्तम मार्ग चोखाळणारे व हरहिकमतीनें पुस्तक देण्याचें टाळणारे ग्रंथपाल मी पाहिले होते, त्यामुळें ह्या बिनवर्गणीच्या व एका वेळीं चार पुस्तकें देणाऱ्या ग्रंथालयासंबंधीं माझें कुतूहल फारच वाढलें. मी क्षणमात्र स्थिर उभा राहिलों हें पाहून त्या व्यवस्थापिकेनें मला आंत बोलाविलें व तेथील कॅटलॉगची

माहिती करून दिली. नंतर ग्रंथालयाच्या सोयीसंबंधींचें एक विस्तृत पत्रकहि तिनें मला दिलें.

आपणाला हवें असलेलें जगतांतलें—इंग्रजी भाषेंतलें कोणतेंहि पुस्तक मिळण्याची ह्या प्रकारच्या ग्रंथालयांत सोय केलेली आहे. पुस्तक कॅटलॉगमध्यें असलें पण कपाटांत नसलें तर राखून ठेवण्यास सांगतां येतें व कॅटलॉग-मध्येंच नसलें तर एका कार्डावर नांव लिहून दिल्यास तें वाटेल तेथून मागवून आणून दिलें जातें. अशा प्रकारें अत्यंत दुर्मिळ पुस्तकेंसुद्धां ह्या सार्वजनिक ग्रंथालयांतून मिळूं शकतात. आणखी एक मोठी सोय ह्या ग्रंथालयांची आहे. ती अशी कीं कोणत्याहि ग्रंथालयांतून एकदां तुम्हांला चार तिकिटें मिळालीं कीं, त्या तिकिटांवर हव्या त्या सार्वजनिक ग्रंथालयांतून पुस्तकें घेतां येतात. मला माझ्या ‘ होबर्न ’ ग्रंथालयाच्या तिकिटावर ‘ वेस्ट मिन्स्टर ’ च्या ग्रंथालयांतून सुद्धां पुस्तकें घेतां येतील. पोस्ट ग्रॅज्युएट विद्यार्थी म्हणून मला आणखी सहा ज्यादा तिकिटें मिळणार आहेत. ग्रंथालयाची ही पद्धत इतकी उत्तम आहे कीं, ह्या एकाच गोष्टीमुळेंसुद्धां मला लंडनबद्दल आदर वाटूं लागला आहे.

ह्याच प्रकारें प्रत्येक बरोच्या स्वतंत्र “ लिटररी सोसायटीज् ” असतात. ह्या संस्थेचे कोणाहि वाङ्मयप्रेमी माणसाला मोफत सभासद होतां येतें. ह्यांच्या सभा दर गुरुवारीं किंवा आठवड्यांतील कोणत्या तरी नेमलेल्या दिवशीं होतात. एखाद्या नव्या पुस्तकासंबंधीं किंवा एखाद्या जुन्या नामांकित ग्रंथासंबंधीं चर्चा होते. आपणांस एखाद्या ग्रंथकारासंबंधीं बोलावयाचें असल्यास विचारतां येतें. चर्चा मोठी उद्‌बोधक होते. असा माझा अनुभव आहे. आपल्याकडे मराठी वाङ्मयमंडळ किंवा साहित्य-परिषद् ह्या प्रकारच्या संस्था आहेत तशाच ह्या संस्था आहेत असें म्हटलें तरी चालेल. मात्र ह्या मोफत आहेत एवढाच फरक.

ओघानेंच आलें म्हणून येथील विनामूल्य औषधपाण्याची माहिती सांगतों. येथें येतांच प्रत्येक पाहुण्याला एक ‘ आयडेंटिटी कार्ड ’ घ्यावयाचें असतें. नंतर आपल्या घराजवळच्या कोणत्याहि डॉक्टरकडे त्यानें नांव नोंदवावयाचें असतें. एकदां त्या डॉक्टरच्या यादीवर तुमचें नांव लागलें कीं मग सर्व औषधोपचार फुकट मिळतात. डॉक्टर फक्त तपासून औषधें लिहून

देतात घराजवळच्या कोणत्याहि केमिस्टच्या दुकानांत तें प्रिस्क्रिप्शन दाखवलें कीं, औषध तयार करून मिळतें. पैसे कुठेंच द्यावे लागत नाहींत. ह्याहि पद्धतीची मला मोठी गंमत वाटली. केमिस्ट मागाहून सर्व बिलें एकत्र करून त्या सर्वांचे पैसे सरकारकडून घेतो. डॉक्टरला त्याच्या यादीवरील प्रत्येक नांवागणिक तेरा शिलिंग मिळतात. माझें नांव मीं ज्या डॉक्टरकडे नोंदविलें आहे त्याला, मी एकदांहि त्याच्याकडे गेलों नाहीं तरीसुद्धां, माझ्या नांवें पैसे मिळतच राहणार. अर्थातच दर आठवड्याला चार पेनी म्हटल्या तरी डॉक्टरला त्याच्याकडे हजार नांवें असल्यास आठवड्याला सोळा सतरा पौंड मिळणारच. ही सर्व औषधपाण्याची व्यवस्था 'नॅशनल हेल्थ स्कीम' ह्या नांवानें चालू आहे. ह्याशिवाय प्रत्येक बरोतर्फें मोठमोठालीं रुग्णालयें चालवलीं जातात व जास्त गंभीर स्वरूपाच्या सर्व रोगांवर येथें उपचार केले जातात. सूतिकागृहें, डोळ्यांचे दवाखाने, लहान मुलांच्या रोगांवरील उपचार इ. सर्वांकरितां ह्या प्रकारच्या मोठाल्या रुग्णालयांची व्यवस्था करण्यांत आली आहे. हा सर्व खर्च सरकार म्हणजे—नॅशनल हेल्थ स्कीम करते. ह्याचा बरोच्या अंदाजपत्रकाशीं संबंध नसतो.

इंग्लंडच्या शासनपद्धतीसंबंधीं किंवा ह्या प्रकारच्या बरोजच्या अंतर्गत व्यवस्थेसंबंधीं जास्त लिहून वाचकांना कंटाळविण्याचा माझा बेत नसल्यानें हें प्रकरण येथेंच थांबवितों.

लंडनमध्यें येऊन राहिल्यानंतर येथील पहिलें वैशिष्ट्य जर कोणतें लक्षांत आलें असेल तर येथील चमत्कारिक हवामान हें होय. येथें कुणीहि भेटला तरी हवेसंबंधीं बोलण्याची प्रथा आहे, असें आपण हिंदुस्थानांत नेहमीं ऐकतों. आणि तें अगदीं खरें आहे. येथें कोणीहि कुणासहि भेटलें कीं, पहिली सलामी हवेसंबंधींच व्हावयाची ! गारवा असला कीं "A bit cold ! Isn't it?" ह्यानेंच सुरुवात व्हावयाची. आमच्या युनिव्हर्सिटी हॉलमध्यें आमच्या कॉलेजच्या पहिल्या दिवशीं डायरेक्टरसाहेबांचें प्रारंभिक भाषण झालें. त्यांतसुद्धां सुरुवातीला हवामानाचाच उल्लेख होता. आम्ही येथें आलों तेव्हां गॅस कामगारांचा संप असल्यामुळें घरोघर गॅसची टंचाई जाणवूं लागली होती. त्याचा उल्लेख भाषणांत येणें अपरिहार्यच होतें.

आणि येथील हवामान आहेहि तसेंच लहरी. सकाळीं बाहेर पडतांना

ऊन्ह असलें, म्हणजे सूर्य दिसत असला, तरी संध्याकाळीं परत येतांना चिंब भिजून घरीं येण्याची शक्यता असते. एवढेंच नव्हे तर, तासातासांत हवामानामध्यें पराकाष्ठेचा बदल घडलेला येथें आढळतो. ह्या लहरी हवामानाबद्दलच बोलतांना आमचे प्राध्यापक सर फ्रेडक्लार्क ह्यांनीं त्याला चंचल अमेरिकन युवतीच्या मनोविकारांची उपमा दिली होती. " Divorce while you wait. " ह्या प्रकारचें आमचें येथील हें हवामान असतें असें त्यांनीं सांगितलें होतें.

येथें बहुधा बाराहि महिने पाऊस पडतो. म्हणजे कोणत्याहि दिवशीं पडण्यास त्याला प्रत्यवाय नाहीं. ऊन्ह मात्र रोज पडत नाहीं. थंडी आतां चांगलीच जाणवूं लागली असून उष्णतामान किती आलें ह्याबद्दल प्रत्येकाला कुतूहल असतें. संध्याकाळीं धुकें चांगलें दाट पडूं लागलें आहे. काल संध्याकाळीं फारच दाट धुकें पडलें होतें. त्याचा परिणाम म्हणून विमानतळावर एक विमान कोसळून अठ्ठावीस लोक दगावले. तीस यार्डांपलीकडचें दिसत नव्हतें. इतकें धुकें मी प्रथमच पाहत असल्यानें मला मोठी गंमत वाटली ! खरोखरच पुण्याच्या सिटी पोस्टाच्या दारांत उभें राहिल्यास बेलबाग चौकाचा कोपरा दिसावयाचा नाहीं इतकें दाट धुकें होतें तें. येथें डिसेंबरमध्यें कांहीं कांहीं वेळां पांच-सात यार्डांवरचेंसुद्धां दिसत नाहीं इतकें दाट धुकें पडतें, असें येथील लोक सांगतात.

सध्यां येथील उष्णतामान दिवसां ४२° ते ४४° असून रात्रीं ३२° पर्यंत उतरतें. परंतु ह्यापेक्षां पुष्कळच जास्त थंडी पुढें पडावयाची आहे असें येथील लोक आम्हांस नेहमीं सांगत असतात.

ह्या थंडीचा, धुक्याचा, पावसाचा येथील लोकांवर मात्र कांहीं परिणाम घडतांना दिसत नाहीं. काल रात्रीं येथें ' आर्क लॅम्प्स् ' लावून एक सॉकरची मॅच झाली. प्रेक्षकांना क्रीडांगणावरचें जवळजवळ शून्य दिसत होतें. प्रत्यक्ष खेळाडूंनासुद्धां कितपत दिसत होतें राम जाणें ! प्रवेश-फी एक शिलिंग होती. पण सहा वाजतां सर्व प्रेक्षकांना फुकट आंत सोडण्यांत आलें. मॅच संपूर्ण खेळण्यांत आली. गोल मात्र कुणाचेच झाले नाहींत ! ह्या ' आर्क लॅम्प ' प्रयोगाकरितां सहाशें पौंड खर्च करण्यांत आले असें म्हणतात. मला ह्या मॅचच्या एकूण सर्व प्रकारच्या प्रयोगांची मोठी मजा वाटली.

नों. दि.

प्रत्येक वर्तमानपत्रांत आपल्या दैनिकांत जसें पंचांग येतें त्याप्रमाणें 'येथील आजचें हवामान' अशी छोटीशी माहिती येते. इंग्लंडचा नकाशा काढून त्यांतील वेगवेगळ्या महत्त्वाच्या जागीं काल किती उष्णतामान होतें तें नकाशावर दाखविलेलें असतें.

लंडनचें दुसरें वैशिष्ट्य सहज लक्षांत येण्याजोगें आहे तें म्हणजे येथील वाहनांची सुबत्ता. एवढें मोठें प्रचंड शहर, इतकी अमाप लोकवस्ती आणि प्रत्येकाला अमुक एका वेळीं अमुक एका जागीं जाण्याची घाई त्यामुळें इतकों वाहनें असल्याशिवाय येथील व्यवहारच चालणार नाहींत, हें सहज लक्षांत येण्याजोगें आहे. 'डबल डेकर' (दुमजली) बसेस आणि ट्रॉली बसेस, ट्रॅम्स् आणि टॅक्सीज् हीं रस्त्यावरून जाणारीं वाहनें सतत भरून चाललेलीं असतात. ट्रॉली बसेस म्हणजे साध्या 'डबल डेक'च्या बसेस-सारख्याच बांधलेल्या पण विजेवर चाललेल्या मोटारी होत. त्यांच्या डोक्यावर ट्रामप्रमाणेंच दोन दांड्या असतात. दिल्लीला 'नया बझार'मध्यें ह्या प्रकारच्या ट्रॉली बसेस आहेत. इतर सर्व ट्रामसारखेंच, पण फक्त खालीं रूळ नाहींत. सर्व बसेस ह्या प्रशस्त व सुंदर आहेत. हैदराबादला पाहिल्या त्या बसेस आठवल्या--तर त्यासारख्याच आहेत म्हटल्यानें समजेल. मुंबईपेक्षां किती तरी पटींनीं हैदराबादच्या बसेस चांगल्या आहेत !

ह्या बसेसचे ठराविक मार्ग व वेळापत्रक असतें. पण ह्या बसेस इतक्या आहेत व इतक्या लवकर एकामागें एक येत असतात कीं तें वेळापत्रक पाहण्याची आपल्याला कधींच जरूर भासत नाहीं. त्यांनीं त्याच्या सोयी-करितां वेळेवर बस गेली किंवा नाहीं हें पाहण्यासाठीं एक साधन ठेवलें आहे तें मोठें मौजेचें असल्यानें सांगतों. एका मार्गानें बस चालली असतां सहा-सात स्टॉप्स् गेल्यावर रस्त्यांत फूटपाथवर पोस्टाच्या पेटीसारखें एक लहानसें मशीन उभें केलेलें आढळतें. कंडक्टर खालीं उतरतो व उतारूंची चढउतार होते तेवढ्यांत त्या मशीनजवळ जाऊन आपल्या बसचें 'टोकन' त्या यंत्रांत दाबून एक दांडा दाबतो. त्या टोकनवर ह्यामुळें वेळ-निदर्शक चिह्न उमटतें. उदाहरणार्थ, बस एका कोपऱ्यावर आली कीं, तेथें ११-५ झाले असले तर त्या टोकनवर ती वेळ उमटते. अशा प्रकारें एकूण प्रवासांत जर दहा पेट्या असतील तर त्यांच्या वेळा अनुक्रमें त्या टोकनवर उमटतात

व बस कोणत्या ठिकाणीं किती वाजतां होती हें अधिकाऱ्यांना समजतें. येथें बसेसमध्यें कंडक्टर्स बऱ्याच अंशीं स्त्रिया आहेत. किमान ४० टक्के बस कंडक्टर्स स्त्रिया असल्याचें मला चौकशी केल्यावर समजलें. बस कंडक्टरला बहुधा बसच्या एका प्रवासांत सहस्र वेळां तरी 'थँक् यू!' म्हणावें लागत असेल. तिकीट द्यावयास येतांना एकदां व दिल्यावर पैसे घेतांना एकदां असा प्रत्येक उतारूकरितां दोनदां तरी 'थँक् यू!' चा उच्चार होतोच. दुसरें म्हणजे येथें चेकिंग नाहीं! बस कंडक्टरवर संपूर्ण विश्वास असल्याचें हें द्योतक आहे. गेल्या कांहीं दिवसांत येथें घेतलेल्या अनुभवावरून प्रामाणिकपणाबद्दल येथें मूलभूत सिद्धान्त गृहीत धरलेले आहेत असें आढळलें. व ते अस्थानीं आहेत असें कोठेंच आढळलें नाहीं. अनेक व्यवहार हे ह्याप्रमाणें प्रामाणिकपणा गृहीत धरून बसविलेले आहेत व ते अव्याहत चालू आहेत. ह्यावरून गृहीतकृत्य सत्य आहे असेंच अनुमान निघतें.

ट्राम्स ह्या लंडनच्या फार थोड्या भागांत प्रवास करण्याकरितां उपयोगी आहेत. बहुतेक वाहतूक ही ट्रामशिवाय इतर वाहनांनीं होते. मी अद्याप ट्राममध्यें बसलों नाहीं ह्यावरून तुमच्या लक्षांत येईल कीं, ट्राम हें वाहन येथें फारसें चालत नाहीं.

टॅक्सीज् दिसायला अगदीं जुन्या पद्धतीच्या असल्या तरी फारच आरामशीर व अद्ययावत् आहेत. येथील टॅक्सीड्रायव्हरच्या शेजारीं बसायला जागा नसते. चारहि उतारू आंतच बसतात. ड्रायव्हरशेजारीं एक रिकामी पेटीसारखी जागा असते. येथें सामान ठेवलें जातें. सामान पट्ट्यानें बांधण्याची व्यवस्था त्यांतच केलेली असते. त्यामुळें उतारूंना आंत सामानाची अडचण यत्किंचित्‌हि न होतां आरामशीर बसतां येतें. प्रत्येक टॅक्सीच्या डोक्यावर "For hire" अशी पाटी असून जेव्हां ती आंतल्या प्रकाशानें चमकते तेव्हां ती टॅक्सी मोकळी आहे असें ओळखतां येतें. टॅक्सी मोकळी नसल्यास वरच्या पाटीमागील दिवा बंद असतो. आपण कादंबऱ्यांत नेहमीं वाचतों त्यांत बहुधा टॅक्सी शोधण्याचा प्रसंग कधींच येत नाहीं. कोठेंहि उभें राहिलें, हात वर केला किंवा टाळी वाजवली कीं, टॅक्सी तयार! हें सर्व कादंबरींतच असावें असें मला सतत वाटत असे. परंतु येथें तसें प्रत्यक्ष घडत असतांना दीसत असल्यामुळें आतां तें असत्य वाटत नाहीं. ह्या सर्व जमिनीवरून

जाणाऱ्या वाहनांवरून वेगळें—सर्वांपेक्षां वेगानें जाणारें व सर्व लंडनभर जाळ्यासारखें पसरलेलें असें वाहन म्हणजे येथील ' ट्यूब्ज् ! ' आपण रस्त्यावरून चालत असतांना त्याच वेळीं आपल्या पायाखालून सुमारें शंभर फूट अंतरावरून लोक आगगाडींतून जात आहेत ह्याची आपल्याला कल्पनाहि येत नाहीं. इंजिनियरिंगचा विजय ह्या ट्यूब रेल्वेनें जाहीर केला आहे. हें ट्यूब प्रकरण मोठें मनोरंजक आहे. मला त्यासंबंधानें अजून संपूर्ण माहिती मिळाली नसल्यानें मी आजच्या पत्रांत त्याचा फक्त उल्लेख करीत आहें. पण त्यावर एक स्वतंत्र पत्र होण्याइतकी मनोरंजक माहिती मला लवकरच मिळणार आहे एवढें आज सुचवून ठेवतों.

ह्या सर्व प्रकारच्या वाहनांच्या सुखसोईनीं संपूर्ण भरलेलें लंडन शहर सुद्धां साकल्यानें पाहण्यास दोन महिने तरी लागावेत.

लंडन शहर म्हणजे इतिहास आहे. लंडन शहराच्या सर्व भागांत भूतकाळ अद्याप जिवंत आहे. येथील लोक ह्या इतिहासाला जिवापलीकडे जपतात. त्याची सतत आठवण ठेवतात. आणि इतरांना त्याची आठवण करून देतात. वाङ्मयांत प्रसिद्ध पावलेल्या अनेक इमारती येथें आहेत. चार्लस्-डिकन्सचें ' ओल्ड क्युरिऑसिटी शॉप ', कॉननूडॉईलनें आपल्या नामांकित शर्लोक होम्स्मुळें अजरामर केलेला बेकर स्ट्रीट, प्रिस्टले गाल्सवर्दींनीं वर्णिलेला चेरिंग क्रॉस व वेस्ट मिन्स्टर हें सर्व येथें आहे. तसेंच दोन लहानग्या राजपुत्रांचें बंदिस्थान झालेलें व अनेकांचे शिरच्छेद पाहिलेलें ' टॉवर ऑफ लंडन ', अनेक इतिहासप्रसिद्ध घटनांनीं परिपूर्ण असें पार्लमेंटगृह, अनेकांचे अवशेष सांठविलेलें ' वेस्ट मिन्स्टर ॲबे ' हेंहि येथेंच आहे. पार्लमेंटची हकालपट्टी करून ' हें घर भाड्यानं देणें आहे ' अशी पाटी लावणाऱ्या राजाला नामोहरम करून लोकसत्ता स्थापन करणाऱ्या इंग्रजांची कर्मभूमि लंडन ही आहे. किटलींतून निघणाऱ्या वाफेपुढें चमचा धरून बसणारा जेम्स वॅट व पडणाऱ्या फळाकडे लक्ष देणारा न्यूटन, खाणींतील लोकांनीं चिरंजीव केलेला ' सर हॅम्प्री डेव्ही ' व जगाला प्रकाशमान करण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणारा फॅरडे ह्या सर्वांचीं स्मारकें लंडनमध्यें आहेत.

१८५० सालीं ट्रॅफलगार येथें फ्रेंच व स्पॅनिश आरमाराचा धुवा

उडविणाऱ्या व न दिसणाऱ्या डोळ्याला दुर्बिण लावणाऱ्या नेल्सनचें स्मारक येथील ट्रॅफलग्गार स्क्वेअरमध्यें उभें आहे. नेपोलियनवर विलिंग्टननें मिळविलेला अखेरचा विजय येथील वाटर्लु पुलानें चिरस्मृत केलेला आहे !

ह्या प्रकारच्या अनेकविध ऐतिहासिक, भौगोलिक व शास्त्रीय स्मृतींनीं परिपूर्ण असें हें लंडन पाहणें घाईघाईनें उरकणें इष्ट नव्हे असा विचार मीं केला असून आमचे प्राध्यापक सर फ्रेड क्लार्क ह्यांनीं सांगितल्याप्रमाणें थोडें वाचून मग तें तें स्थान पाहणें इष्ट आहे असें मीं ठरविलें आहे. मी जें जें जसजसें पाहीन तसतसें त्यासंबंधीं लिहीत जाईनच. कळावें.

आपला,
×××

## स्कॉटलंड यार्ड

लंडन

स. न. वि. वि.

गेल्या पत्रांत लंडन शहराच्या व्यापाविषयीं, तेथील ग्रंथसंग्रहालयें आणि वाचनालयें, चमत्कारिक हवामान, वाहनांची सुबत्ता इत्यादिविषयीं मीं थोडक्यांत लिहिण्याचा प्रयत्न केला होता. आज सर्व वाहतूक ताब्यांत ठेवणाऱ्या आणि जनतेला सुरक्षित राखणाऱ्या पोलिसांच्या कार्यालयाविषयीं-स्कॉटलंड यार्डविषयीं—लिहीत आहें.

वेस्टमिनस्टर विभाग हा इंग्लंडचा सर्वांत महत्त्वाचा विभाग आहे असें म्हटल्यास फारसें वावगें होणार नाहीं. पार्लमेंटगृहें, परराष्ट्रीय कार्यालय, बकिंगहॅमराजवाडा, डाऊनिंग स्ट्रीट, वेस्ट मिनस्टर ॲबे व ज्या पुलावरून लंडनसंबंधीं World has nothing to show more fair असें वर्ड्स्वर्थनें म्हटलें तो सर्व विभाग याच बाजूस आहे. अर्थातच लंडनचें मुख्य

पोलिस-कार्यालय ह्याच भागांत असणें हें स्वाभाविकच आहे. न्यू स्कॉटलंड-यार्ड हें मुख्य पार्लमेंट स्ट्रीटवरच थोडें आंत असून पार्लमेंटगृहाच्या अगदीं जवळच आहे. येथील पब्लिक रिलेशन ऑफिसरच्या निमंत्रणानुसार ठीक ४-० वाजतां आम्ही एका कार्यालयांत गेलों. एका अधिकाऱ्याची प्रथम ओळख करून देण्यांत आली व नंतर हवापाणी, थोडें राजकारण यांवर गप्पा झाल्या. आम्हांला फक्त दोनच तास वेळ असल्यानें त्या अधिकाऱ्यानें एकच विभाग चांगल्या प्रकारें पाहण्याची शिफारस केली व आम्हांसहि तेंच पटलें. प्रथमतः आम्ही जो एक विभाग पाहणार होतों, त्याची त्यानें थोडक्यांत माहिती दिली व मग आम्ही मोठ्या प्रत्यक्ष दिवाणखान्यांत गेलों.

ह्या विभागास ' इनफर्मेशन रूम ' असें नांव आहे. लंडन व आसपासचा विभाग असा एकूण १५० स्क्वेअर मैलांचा टापू या कार्यालयाच्या कक्षेंत आहे. ह्या सर्व टापूचा एक प्रचंड मोठा नकाशा ४ तुकड्यांत मिळून तयार केला असून तो चार चौकोनी टेबलांवर कांचेंत फ्रेम करून ठेवला आहे. खुद्द लंडन शहर विभागाचे चार स्वतंत्र भाग पाडून ते चार लोखंडी पत्र्यांवर मढवून भिंतीस टांगून ठेवले आहेत.

त्याच खोलींत एका भिंतीशीं ६ टेलिफोन रिसीव्हरचीं टेबलें मांडलेलीं आहेत. बाहेरून पोलिस ॲंब्युलन्स व आग यांच्याकरितां येणारे सर्व फोन येथें घेतले जातात. येथें पोलिस-मदतीकरितां ९९९ व व्हाइट हॉल १२१२ असे दोन नंबर आहेत. ९९९ ह्या नंबरला पैसे पडत नसल्यानें बहुतेक लोक ९९९ चाच उपयोग करतात. मदतीकरितां किंवा माहितीकरितां येणाऱ्या टेलिफोन कॉल्सची संख्या सरासरीं ( दिवसाला ) ८५० पडते, असें आम्हांला सांगण्यांत आलें. आम्ही ही खोली पाहत होतों तेवढ्या वेळांतच तेथें सारख्या येणाऱ्या टेलिफोन्सवरून आम्हांला या खात्याच्या कामाची कल्पना आली.

टेलिफोनवरून मदतीची मागणी आली कीं, ती घेतल्याबरोबर तेथील ऑपरेटर मदत कोणत्या ठिकाणीं पाहिजे व तेथें काय घडलें आहे याची एका फॉर्मवर नोंद करतो. आग, घरफोडी, वस्तु हरवणें, चोरी, अपघात, इत्यादि सर्व प्रकारच्या माहितीकरितां एक सांकेतिक भाषा ठरविलेली

आहे. याच्या साहाय्यानें संदेश चटकन् पांच सेकंदांत टिपून घेतां येतो. ११२ गॉवर स्ट्रीटवर येथून आग लागल्याचा संदेश दिला तर तो दहा सेकंदांत तेथें घेतला जाऊन, त्याच्यासंबंधींच्या व्यवस्थेस सुरुवातहि होते. ऑपरेटर हा संदेश घेऊन उठतो व त्या चार टेबलांपैकीं एका टेबलाजवळ येतो ( ज्या टेबलावर तो विभाग असेल त्या टेबलाजवळ ) व जेथें मदत हवी असेल त्या जागेवर एक तबकडी ठेवतो आणि तो संदेश वाहकाजवळ देतो. ह्या चार टेबलांवरच्या नकाशांत असलेल्या विभागांत दोन रेडिओ चॅनल्सची व्यवस्था केली असल्यानें संदेश त्वरित पोंचण्याची व्यवस्था होऊं शकते.

दोन अधिकारी सतत मायक्रोफोनजवळ बसलेले असतात व आपल्या भागांत असणाऱ्या पोलिस मोटारींना संदेश देत असतात. आंत रेडिओ टेलिफोनची व्यवस्था असलेल्या अशा १७० पोलिस गाड्या शहराच्या ह्या सर्व भागांत हिंडत असल्यानें जी मोटार अपघाताच्या वा मदतीच्या ठिकाणीं जवळ असेल ती त्वरित तेथें जाऊन पोहोंचते व अशा प्रकारें पोलिसांची मदत अत्यंत त्वरित मिळूं शकते !

टेबलावरील नकाशांवर ह्या गाड्या कोठें कोठें आहेत हें दाखविण्यासाठीं वेगवेगळ्या रंगांच्या व आकाराच्या तबकड्या ठेवलेल्या असतात. त्यामुळें टेबलावर पाहिलें कीं, ह्या क्षणीं लंडनच्या कोणत्या भागांत काय चाललें आहे, आग कोठें लागलेली आहे, रस्त्यावरील रहदारीचा अपघात कोठें झाला आहे, चोरी कोठें झाली आहे. हें क्षणांत कळतें. तबकड्या पिवळ्या-तांबड्या रंगाच्या असून चौकोनी गोल व त्रिकोणी असतात. गोल तबकड्या आग लागलेलें ठिकाण, चौकोनी तबकड्या गुन्हा घडलेलें ठिकाण व त्रिकोणी तबकड्या अपघाताचें ठिकाण दाखवितात. आतां आम्ही हें सर्व पाहात असतांना घडलेल्या एका उदाहरणाच्या सहाय्यानें काम कसें घडतें तें सांगतों. आम्हांस हें सर्व समजून दिलें जात असतांना लंडनच्या नंबर ४ च्या विभागांतून एका मोटार–अपघाताची बातमी टेलिफोनवरून आली. ती येतांच येथील ऑपरेटरनें ती सांकेतिक भाषेंत टिपून घेऊन तो टेबलाजवळ आला व त्या भागाकडे दृष्टि टाकून तेथें कोणत्या मोटारी ( पोलीस ) आहेत हें पाहिलें व त्या जागेवर एक त्रिकोणी तबकडी ठेवली.

नंतर तो रेडिओ मायक्रोफोनजवळ गेला. तो संदेश त्यानें तेथें दिला. रेडिओ मायक्रोफोनवरून अधिकाऱ्यानें तो संदेश प्रक्षेपित केला व ह्या भागांत असलेल्या मोटारीला तो संदेश पोहोंचण्याची व्यवस्था झाली. निमिषार्धातच तेथें रेडिओ टेलिफोनसह असणाऱ्या एका मोटारीनें तो संदेश घेऊन आपण तेथें चाललों आहोंत हें कळविलें.'

सुमारें मिनिट कांटा एक मिनिट पुढें सरकतो त्याच्या आंत अपघाताच्या जागेवरून मोटारीनें रेडिओवरून आपण मदतीस पोहोंचलों आहोंत हें कळविलें. हा सर्व प्रकार आमच्या समक्षच चालू असल्यानें आम्हांस याचें फारच आश्चर्य वाटलें.

ह्या १७० रेडिओ मोटारींव्यतिरिक्त खुद्द लंडन शहरांत ७० मोटार-सायकलींवरहि रेडिओ टेलिफोनची व्यवस्था करण्यांत आली आहे. मोटार-सायकलींचा उपयोग प्रायः गुन्हेगार धरण्याच्या बाबतींत जास्त होतो असें आम्हांस सांगण्यांत आलें. भविष्यकाळांत पायीं चालणाऱ्या पोलिसालाहि आम्हांला रेडिओ कम्युनिकेशन देतां येईल असें ह्या अधिकाऱ्यानें विनोदानें सांगितलें.

ह्या व्यतिरिक्त २४ खास टेलिफोन्सची व्यवस्था व टेलिप्रिंटरवरून संदेश पाठविण्याची व्यवस्थाहि आम्हांस पाहावयास मिळाली. पण ती वर्तमानपत्रांतल्या कार्यालयासारखीच असल्यानें तिचें वर्णन अनावश्यक आहे.

स्कॉटलंड यार्ड ही संस्था जगप्रसिद्ध होण्याच्या मागें त्या संस्थेंतील ही क्षणार्धांत व्यवस्था करण्याची कार्यदक्षता आहे हें निर्विवाद आहे. ती पाहावयास मिळाल्यानें ब्रिटिशांच्या कार्यदक्षतेचा एक चांगला नमुना पाहावयास मिळाल्याचें आम्हांस समाधान लाभलें. कळावें.

आपला,
× × ×

# लंडनमधील नगरपालिका

लंडन

•

स. न. वि. वि.

जेथें लोकशाही मुरली आहे अशा देशांत सार्वजनिक संस्था जनतेच्या साहाय्यानें कामें करीत असतात. आणि नगरपालिका ही संस्था तर जनतेच्या संपूर्ण साहाय्याशिवाय व्यवस्थितपणें कार्य करणेंच अशक्य. लंडनमधील नगरपालिका जनतेच्या साहाय्यानें उत्कृष्ट काम करूं शकते म्हणून मला फार आनंद वाटला. आजच्या लेखांत नगरपालिकेविषयींच मी लिहीत आहें.

" Those who pay the piper should know the tunes." हें येथील नगरपालिकांचें नागरिकांना सांगणें आहे. प्रत्येक नागरिकानें नुसती तीन वर्षांनीं एकदां मतदानाच्या वेळेपुरती नगरपालिकेची भेट घ्यावी हें येथें मान्य नसून नगरपालिकेच्या कारभारांत हस्तें परहस्तें होईल त्या मार्गानें सतत सहाय्य देत जावें अशी येथील नगरपालिकेची कळकळीची मागणी आहे. वर सांगितल्याप्रमाणें, तुम्ही पैसे देतां मग हक्कानें तें वसूल करून घ्या ना ! हें तत्त्व सदैव मनांत ठसेल अशी व्यवस्था केलेली असते. साधें उदाहरण घ्या– फुटपाथवरून रस्ता ओलांडून समोरच्या फुटपाथवर जाण्यासाठीं ठिकठिकाणीं " क्रॉसिंग्ज " केलेलीं असतात. स्टीलचे डायमंड्स् रस्त्यांत पक्के बसवून ह्या क्रॉसिंग्जच्या मर्यादा आंखलेल्या असतात. अर्थात् ह्या खर्चाचे पैसे हे नागरिकांच्याच खिशांतून आलेले असतात. असें असूनहि नागरिक नेहमीं ह्या क्रॉसिंग्जचा उपयोग करतातच असें नाहीं. तेव्हां कांहीं महत्त्वाच्या रस्त्यांवर अपघात होण्यासारख्या ठिकाणीं क्रॉसिंग्जजवळ एक पाटी आढळते–You pay for these crossings—why not use them? मानसशास्त्राचा उपयोग केलेला आहे पाहा ह्यांत ! ही तुम्ही विकत घेतलेली वस्तु आहे, तुमच्या हक्काची आहे, असें म्हटल्यावर माणसाला थोडें बरें वाटतें व खरेंच आपण क्रॉसिंग्जचा उपयोग करावा अशी इच्छा होते.

अशा प्रकारच्या क्रॉसिंगजवळचें स्टॅटिस्टिक्स घेतलें असतां ९७ टक्के लोक योग्य प्रकारें वागतात असें आढळून आलें आहे.

इंग्लंडमधील नगरपालिका नागरिकांच्या मनांतील वेगवेगळ्या भावनांना आवाहन करून शिस्त व स्वच्छता अप्रतिम सांभाळतात ह्याचीं उदाहरणें शेकड्यानें देतां येतील. रस्त्यावर घाण होतां उपयोगी नाहीं म्हणून 'पेट्या' थोड्या थोड्या अंतरावर लटकावलेल्या असतात. "Keep BRITAIN tidy" म्हटल्यावर हातांतील चॉकलेटचा गुंडाळलेला कागद चटकन् रस्त्यावर न फेकतां पुढच्याच Litter Box मध्यें टाकणें माणसास आवश्यक वाटतें. "Who would like to swim in a filthy bath?" किंवा "Take a shower before a dip." अशी पाटी पाहिल्यावर व विशेषत: शॉवरचे तेथें उत्तम साबण व अंग घासण्यासाठीं स्पंज ठेवलेला पाहून सामान्यत: त्याचा उपयोग न करण्याकडे माणसाची प्रवृत्ति होत नाहीं. "You would not like to read trash! Suggest some good books." अशी विनंति प्रत्येक ग्रंथालय आपल्या वाचकांना सदैव करीत असतें. पुस्तकावर रेघोट्या ओढणाऱ्या एखाद्या मुलाचें व्यंगचित्र काढून "He does not know! You should." अशी काय करूं नये याची सौम्यपणें जाणीव दिलेली असते. व्यवहाराच्या सर्वच बाबतींत थोडक्यांत पुष्कळ साधायचें हें येथलें सूत्र आहे.

प्रत्येक नगरपालिकेच्या बाहेर मोठ्या अक्षरांत "Help us to help you." अशी मोठी पाटी असते. नागरिकांच्या हार्दिक सहाय्यावर नगर-पालिका सदैव अवलंबून असते असें म्हटल्यास वावगें होणार नाहीं.

सामान्यत: नगरपालिका तीन प्रकारच्या आहेत. कांहीं ग्लासगो, लीड्स, एडिंबरो, ब्रिस्टल, बर्मिंगहॅम इ. मोठाल्या शहरांत मोठ्या एकजिनसी नगर-पालिका आहेत. ह्या प्रकारच्या नगरपालिकांना 'कौंटीबरो' असें नांव आहे. पाणीपुरवठा, गॅस, इलेक्ट्रिक, रस्ते, वाहतूक, फायर ब्रिगेड इ. सर्वांचा अंतर्भाव वेगवेगळ्या खात्यांच्या स्वरूपांत नगरपालिकेंत झालेला असतो.

परंतु छोट्या छोट्या गांवांची मिळून एक मोठी नगरपालिका असते. ह्या सर्व छोट्या गांवांतील वीज, गॅस, पाणीपुरवठा, शिक्षण इ. मोठीं खातीं

मोठ्या नगरपालिकेकडे असतात. पण किरकोळ खातीं प्रत्येक गांवांत स्वतंत्रपणें अस्तित्वांत असतात.

खुद्द लंडनची नगरपालिका " तृतीयः पन्थाः " स्वरूपाची आहे. लंडनचे प्रयोगाच्या सोयीसाठीं २८ भाग पाडण्यांत आलेले असून प्रत्येक भागास बरो अशी संज्ञा आहे. प्रत्येक बरोची स्वतंत्र नगरपालिका आहे. ज्या त्या बरो-(ह्याला मी ' पेठ ' म्हणतों ) मधील लोक तीन वर्षांनीं एकदां कौन्सिलवर निवडून देतात. निवडणुका राजकीय पक्षानुसार लढवल्या जातात. निवडणुका झाल्यावर निवडून आलेल्या उमेदवाराला पेठेचा एक भाग देखरेखीसाठीं देण्यांत येतो व त्या भागांतील सर्व प्रकारच्या तक्रारी सुधारणा त्याच्या खटपटीनुसार लक्षांत घेतल्या जातात. पण येथें एक गंमत असते— कौन्सिलच्या सभेला गॅलरी असते व त्याला नागरिकांनीं उपस्थित राहावें अशी व्यवस्था असते. ज्या नागरिकांनीं सुधारणा सुचविल्या असतील, किंवा पेठेच्या ज्या भागांत सुधारणा करण्यासंबंधीं चर्चा व्हावयाची असेल तेथील लोकांना मुद्दाम निमंत्रण देऊन बोलावण्यांत येतें. अशा प्रकारें आपण निवडून दिलेला उमेदवार काय कुवतीचा आहे व तो आपल्या कामासाठीं किती लक्ष देतो हें प्रत्यक्ष नागरिकांना कळूं शकतें.

कौन्सिलच्या वेगवेगळ्या समित्या असतात व प्रत्येक समितीची किमान मासिक तरी सभा असतेच. समितीचा रिपोर्ट तयार झाला कीं तो सर्व-सामान्य कौन्सिलकडे येतो. सर्वसामान्य कौन्सिलची सभा महिन्यांतून एकदां तरी होतेच.

आतां उदाहरणादाखल आमची पेठ घेतली तर आम्ही निवडून दिलेले ३७ मेंबर्स वेगवेगळ्या समित्यांतून कामें करतात व आपल्या मागण्या मांडतात. परंतु शिक्षणखातें, आरोग्यखातें, इ. खातीं हीं लंडन कौंटी कौन्सिलकडे असतात. पोलिस, संरक्षण इ. खातीं मेट्रोपोलिटन पोलिस फोर्सकडे आहेत व वीज आणि पाणी हीं स्वतंत्र खातीं आहेत. त्यामुळें आमच्याकडून घेतलेल्या करापैकीं जवळ जवळ ७५ टक्के पैसे लंडन कौंटीकौन्सिल व पोलिस फोर्सला द्यावे लागतात. उरलेले २५ टक्के आमची नगरपालिका कसा खर्च करते हें विस्तारानें देत बसण्यांत स्वारस्य नाहीं; पण नगरपालिका नागरिकांच्या सुखासाठीं काय काय करते हें थोडक्यांत सांगण्यास हरकत नाहीं.

मला सर्वांत कौतुक वाटतें तें येथल्या पेठेच्या ग्रंथालयांचें ! प्रत्येक नागरिकाला मोफत वाचनालयाची सोय उत्तम प्रकारची आहे. नवीं नवीं पुस्तकें सतत येत असतात. बाइंडिंग सतत सुरू असतेंच. वर्तमानपत्रें, मासिकें यांची व्यवस्था रीडिंग रूममध्यें उत्तमच आहे. अशा प्रकारें नागरिकांची वाचनाची व्यवस्था फारच उत्तम केलेली आहे व ती अगदीं मोफत आहे. मुलांकरितां वाचनालयें आहेतच !

मोठमोठाल्या बागांतून उन्हाळ्यांत सार्वजनिक करमणुकीचे कार्यक्रम मोफत होतात. आमच्या रसेल स्क्वेअरमध्यें रोज एखादें कॉन्सर्ट म्हणा, पियानो-वादन म्हणा, नकला-नाटकें म्हणा, मुलांकरितां खेळ म्हणा, कांहीं तरी चालू असतेंच. पण ही करमणूक फक्त उन्हाळ्यापुरतीच असते.

उन्हाळ्यांत पोहण्याच्या तलावांची उत्तम व्यवस्था येथें करण्यांत येते. ३ पेनी प्रवेश, २ पेनी टॉवेल व १ पेनी साबण अशा ६ पेनी तिकिटास घेतात. पण तलाव अत्यंत स्वच्छ व सुंदर ठेवतात. त्याचप्रमाणें येथें पब्लिक टेनिस कोर्टस् आहेत. २ पेनी भाडें ( ४५ मिनिटांकरितां ), २ पेनी रॅकेट व २ पेनी बॉल अशा सहा पेनी घेण्यांत येतात. अर्थात् रॅकेट विकत घेण्याचा, बॉलचा इ. खर्च आपणांवर पडत नाहीं. ह्यामुळें पुष्कळसे नागरिक ह्याचा लाभ घेऊं शकतात. ज्याप्रमाणें तलावावर तज्ज्ञ लोक मदतीसाठीं ठेवलेले असतात तसे कोर्टांवरहि चांगले खेळणारे नेमलेले असतात. उदयोन्मुख खेळाडूंना सूचना देण्याचें व माझ्यासारख्या नवीन खेळाडूला खेळ सुधारण्यास सांगण्याचें काम हे लोक करीत असतात.

बॉक्सिंग रिंग्ज ह्या येथील लोकांत फार लोकप्रिय आहेत असें म्हटलें तर आश्चर्य वाटण्याजोगें कांहींच नाहीं. सर्वसामान्य लोकांत आवड निर्माण करण्यासाठीं प्रत्येक पेठेंत १–२ तरी रिंग्ज तयार केलेल्या असतात. सर्व व्यवस्था उत्तम असते हें आलेंच !

डे नर्सरी नांवाच्या एका संस्थेचा उल्लेख केला नाहीं तर नगरपालिकेवर मोठा अन्याय केल्यासारखें होणार आहे. आई कामाला जातांना आपल्या लहान मुलाला ह्या डे नर्सरींत ठेवून जाते व संध्याकाळीं येऊन परत घेऊन जाते, असें ह्या संस्थेचें थोडक्यांत कार्य आहे. पण ह्यासाठीं दाया, मोफत

दूध, मुलांना खेळायचें सामान, झोपण्याच्या कॉटस् इ. सर्व साहित्य नगरपालिकेला ठेवावें लागतें. लंडन कौंटी कौन्सिल प्रामुख्यानें हा खर्च देते. पण कांहीं भाग पेठेच्या नगरपालिकेला द्यावा लागतोच. डे नर्सरी ह्या संस्था फारच प्रेक्षणीय वाटल्या मला ! एक मानसशास्त्रज्ञ ह्या संस्थेंतील बालकांची मधून मधून पाहणी करतो हें कळल्यावर गंमतच वाटली !!

गृहिणींकरितां प्रत्येक बरो एक स्वैंपाकाची व एक शिवणकामाची छोटी शाळा चालवते. गृहिणींकडून फी कांहीं घेतली जात नाहीं. शिक्षकांना वेतन भरपूर असतें व सर्व खर्च बरो करते. मात्र शिवलेल्या कपड्याबद्दल नाममात्र पैसे तेथील मशीनदुरुस्ती इ. खर्चांकरितां गोळा केले जातात.

कपडे धुण्याची सोय प्रत्येक घरांत असतेच असें नाहीं. त्यामुळें आमच्यासारख्या ब्रह्मचाऱ्यांना कपडे धुण्याकरितां एखादी जागा असली तर बरी असें, वाटणें स्वाभाविक असतें. ह्याची सोयहि अर्थात् पेठेनें एक लॉंड्री काढून केलेली आहे. १ तासाला ६ पेनी द्याव्या लागतात. पण कपडे धुण्याच्या मशीनचा, इस्त्रीचा उपयोग करतां येतो व कपडे लवकर व स्वस्त धुतां येतात.

नागरिकांच्या सुखासाठीं आणखीहि इतर अनेक गोष्टी आहेत; सर्वांचा उल्लेख करणें असंभाव्य आहे. पण आपणासाठीं ह्या सर्व गोष्टी केल्या जाव्यात, हा आपला हक्कच आहे, हें ध्यानांत घेऊन प्रत्येक नागरिक आपलें त्यासंबंधींचें शिस्तपालनाचें व स्वच्छता राखण्याचें कार्य तत्परतेनें करतो.

" परस्परं भावयन्तः श्रेय परमवाप्स्यथ "

यानुसार येथील नागरिक व नगरपालिका यांचे अन्योन्य संबंध आहेत असें सूत्ररूपानें म्हणतां येईल.

आपला,

×××

# 'फायर ब्रिगेड' व 'ओल्ड बेली'

लंडन

स. न. वि. वि.

सध्यां सर्व लंडनमध्यें जर कसली धामधूम असेल तर ती म्हणजे फ्ल्यू-प्रतिबंधक उपायांची. येथें 'नॅशनल हेल्थ स्कीम' आहे हें मागें एकदां मीं लिहिलें होतेंच. सर्व डॉक्टर व हेल्थ-मिनिस्टर हे फ्ल्यू-प्रतिबंध चळवळ जोरांत चालवीत आहेत. बसमध्यें, ट्यूबमध्यें-सर्वत्र जाहिराती व विनंतिपत्रकें फ्ल्यूसंबंधींचींच आहेत. सर्व गांव एकाच गोष्टीबद्दल कसा तत्पर असतो हें येथें कळतें.

इतकीं फुकट औषधें पुरविलीं जात असतां आणि इतकी दक्षता घेतली जात असतांनासुद्धां कांहीं थोड्या लोकांना ह्या फ्ल्यूनें म्हणजे इन्फ्ल्युएंझानें तडाखा दाखवलाच. ह्या थोड्या लोकांत मीहि सांपडलों हें कबूल केलें म्हणजे पत्र न पाठविण्याचें कारणहि कळविल्यासारखेंच झालें.

येथील पद्धत कळावी म्हणून ह्या आजारपणासंबंधींहि चार शब्द लिहिणें आवश्यक आहे. पहिल्या दिवशीं थोडा ताप येतांच डॉक्टरना टेलिफोन केला. येथें आल्याबरोबर एका डॉक्टरकडे नांव रजिस्टर केल्याचें मीं मागें कळविलेंच आहे. त्यांना फोन पोहोंचतांच डॉक्टर आले. सर्व कसून तपासणी झाली. टेंपरेचर दर तीन तासांनीं टिपून ठेवण्यासाठीं एक तक्ता देण्यांत आला व एक थर्मामीटर स्वाधीन करण्यांत आला. जेवणाखाणाचें काय? असें विचारतांच "जितक्या वेळेला व जितकें खाववेल तेवढें खा आणि हवें तें खा," असें सूत्र सांगण्यांत आलें. मला ह्याचें खरोखरच आश्चर्य वाटलें. ताप असतांना कांहींहि अन्न खायला देणें हें आपणाकडे मान्य केलें जात नाहीं. पण येथें तसें कांहीं नाहीं. दुसऱ्या एकाला चांगला भरपूर ताप आला असतांनासुद्धां सर्व प्रकारें भरपूर जेवायला परवानगी देण्यांत आलेली होती. नंतर डॉक्टरांनीं प्रिस्क्रिप्शन लिहून दिलें व दुसऱ्या दिवशीं सकाळीं ९ वाजतां फोन करायला सांगून ते निघून गेले. येथें डॉक्टर

स्वतः औषधें कधींच देत नाहींत. त्यांचें प्रिस्क्रिप्शन घेऊन कुणाहि केमिस्टकडे गेलें कीं, औषधाच्या बाटल्या भरून मिळतात. घरून बाटली न्यावी लागत नाहीं. मला २४ गोळ्या व एक मोठी बाटली भरून औषध आणून देण्यांत आलें. चार दिवस संपूर्ण विश्रांति. खोलीच्या बाहेर निदान घराच्या बाहेर तरी पडायचें नाहीं, अशी बंदी मात्र होती. दुसऱ्या दिवशीं टेलिफोनवरून तापाचे आंकडे कळविल्यावर 'संध्याकाळीं येतों' असें डॉक्टरसाहेबांनीं कळविलें. त्याप्रमाणें संध्याकाळीं येऊन त्यांनीं एक इंजेक्शनहि दिलें. दुसऱ्याच दिवशीं तापाचें प्रमाणहि कमी झालें व पडसेंहि आटोक्यांत आल्यासारखें वाटलें. माझ्या शेजारीं येथें राहणाऱ्या एका मुलाच्या तापाचें प्रमाण थोडेंसें वाढतांच त्याला तावडतोब दवाखान्यांत नेण्यांत आलें. आठवड्यानंतर तोहि आतां परत आला आहे. ह्या सर्व औषधोपचारांत आपल्याला कुठेंहि एक पैचाहि खर्च करावा लागत नाहीं ही मोठी सोय येथें आहे.

प्रिस्क्रिप्शनप्रमाणें औषधें तयार करून देणाऱ्या कंपन्यांत सर्वांत मोठी जर कोणती संस्था असेल तर ती म्हणजे बूट्स्– केमिस्टची होय. ह्यांचा एक मोठा प्रचंड कारखाना येथून तीस मैलांवर असून तेथून सर्व औषधें तयार होऊन येथें येतात. नुसत्या लंडनमध्यें ह्यांच्या दीडशें मोठ्या शाखा असून लहान दुकानेंहि असंख्य आहेत. बूट्स्चें सर्वांत मोठें दुकान येथें पिकॅडेलीमध्यें असून तें सदैव चोवीस तास उघडें असतें आणि मध्यरात्रीं सुद्धां तेथें औषधाकरितां गर्दी असते असें म्हणतात. बूट्स्चा हा धंदा इतक्या मोठ्या प्रमाणावर आहे कीं, त्यांच्याकरितां बाटल्या तयार करण्याचें काम एक कांचेचा कारखाना सतत वर्षभर करीत असतो असें सांगतात. आपल्याकडे टॉमकोच्या तेलाच्या बाटल्या करण्याचें काम अलवाईला ओगले सतत वर्षभर करीत असतात तसेंच हें आहे.

आजारी पडण्याच्या आदल्याच आठवड्यांत येथील आणखी एक समाजकार्य-संस्था पाहण्याचा योग मला आला. त्यासंबंधींहि चार ओळी आतांच लिहितों.

तुम्हीं फ्री-प्रेसमध्यें माझें नांव वाचलेंत त्यासंबंधींचीच ही हकीगत आहे. मी गॉवर स्ट्रीटवर जेथें राहतों तेथेंच मागें युनिव्हर्सिटी कॉलेजची मोठी इमारत आहे. नॅशनल सेंट्रल लायब्ररी येथेंच असून लायब्ररीच्या व

आमच्या इमारतीच्या मध्यें एक युनिव्हर्सिटीची छोटी बॉयलर रूम आहे. एके दिवशीं पहांटे पांचच्या सुमारास माझ्या खोलींत धूर शिरल्याचा मला वास येऊं लागला. झोंपेंत असतांनासुद्धां मला ह्या वासानें थोडें बेचैन केलें. पण माझ्या खोलींत मी रात्रीं गॅस फायर कधींहि ठेवत नाहीं त्यामुळें मी निर्धास्त होतों. तथापि, वास जास्तच येऊं लागला तेव्हां उठलों. व मागच्या खिडकींतून पाहतों तो बॉयलर रूम धडाकेबंद पेटत होती. माझा शेजारीहि एव्हांना जागा झाला होता व त्यानेंहि ही आग पाहिली होती. पण तो इतका घाबरला होता कीं त्याच्या तोंडांतून शब्दहि फुटेना. मी त्याला त्याच्या खोलींतील सामान आवरण्यास सांगून ड्रेसिंग गाऊन अगावर टाकून अनवाणीच बाहेर पळालों. पब्लिक टेलिफोनमधून पैसे न टाकतां पोलिसला व आगीच्या बंबांना फोन करतां येतो. तेथून मी टेलिफोन करून फायर ब्रिगेडला आगीचें ठिकाण कळविलें. लंडनमध्यें एक ज्यादा सोय आहे. ती ही कीं, कोणत्याहि एका टेलिफोन बूथमधून आपण ९९९ नंबर वाजवला कीं एक्सचेंज फक्त एकाच शब्दांत विचारतो "Fire?" आपण 'होय' म्हटलें कीं तो कनेक्शन देतो. त्या वेळीं त्या विभागांतील सर्व फायर-स्टेशन्सच्या घंटा वाजूं लागतात. कनेक्शन मिळालें कीं तो फक्त पत्ता विचारतो. आणि आपण पत्ता सांगितला कीं सर्व फायर स्टेशन्सवरून आगीचे बंब तयार होऊन त्या ठिकाणाकडे यावयास निघतात. मी पत्ता सांगून घरीं परत येतों व वर खोलींत जातों तो भराभर एकामागें एक असे आगीचे बंब आमच्या दारासमोर येऊन थडकले. टेलिफोन पोहोंचण्याच्या मिनिटापासून चौथ्या पांचव्या मिनिटाला तीन बंब आमच्या दारापाशीं आले हें पाहून मला ह्या संस्थेच्या कार्यकौशल्याची शर्थ वाटली. आमच्या दारांतूनच होज पाईप्स आंत आणून त्यांनीं कामाला प्रारंभ केला. आमच्या इमारतींतून एक, शेजारच्या इमारतींतून एक व मागच्या बोळांतून एक, असे सर्व बाजूंनीं "होज पाईप्स" लावून दहा मिनिटांत त्यांनीं आग आटोक्यांत आणली.

एव्हांना बाहेर एक ॲम्ब्युलन्स, एक कॅंटिन, एक वायरलेस व टेलिफोननें सज्ज असलेली ऑफिसकार व आणखी चार बंब येऊन धडकले होते. फायर ब्रिगेडचे मुख्य अधिकारी व पोलिस अधिकारीहि एव्हांना येऊन पोहोंचले होते. सर्वत्र पाहणी करून त्यांनीं ज्यादा आलेले बंब वाटेस लावले व सुमारें

तासाभरांत सर्व मंडळी सर्व काम आटोपून आपापल्या स्थानीं पोहोंचली. हें सर्व घडत असतांना बाहेर रस्त्यावर लोकांची झुंबडहि जमा झाली नाहीं आणि रस्त्यावरच्या नेहमींच्या रहदारीस कांहीं प्रतिबंधहि झाला नाहीं! तसेंच इतके बंब उभे असलेले पाहून व काम सुरू असलेले पाहूनसुद्धां कुणी मुद्दाम घरांत येऊन आंत गर्दीहि केली नाहीं. नाहीं म्हणायला तीन वृत्तपत्रांचे बातमीदार मात्र कसे कुणास ठाऊक नेमके तेथें आले होते. त्यांनीं मला जे प्रश्न विचारले त्यावरूनच हें वृत्त येथील वृत्तपत्रांत आलें व त्यांतूनच तें फ्री-प्रेसमध्यें आलें असावें. मागच्या दारींच लागलेल्या आगीमुळें येथील फायर ब्रिगेडचें कार्यकौशल्य जवळून पाहायला मिळालें व तेवढेंच वृत्तपत्रांत नांव आलें!

मागच्या आठवड्यांत येथील आणखी एक प्रसिद्ध इमारत व तेथील कार्यपद्धति पाहण्याचा योग आला. त्यासंबंधीं चार ओळी लिहून आजचें पत्र पुरें करणार आहें. येथें लंडनमध्यें ज्या कांहीं इतिहासप्रसिद्ध इमारती आहेत त्यांत 'ओल्ड बेली' ही फारच प्रसिद्ध आहे. ही खरी मध्यवर्ती क्रिमिनल कोर्टाची इमारत असून तिला 'ओल्ड बेली' असें नांव आहे. एका हातांत तराजू व दुसऱ्या हातांत तलवार घेतलेली व डोळ्यांना फडकें बांधलेली न्यायदेवतेची अंध मूर्ति ह्या इमारतीच्या घुमटावर उभी केलेली असून पहिला जेम्स व दुसरा चार्लस् ह्यांचे भव्य पुतळेहि दारांतून आंत जातांच दर्शनीं भागांत ठेवलेले आहेत.

येथील न्यायाधीश व वकील काळे झगे घालून डोक्यावर आपण चित्रांत पाहतों तसे टोप घालतात. हें सर्व दृश्य मोठें विचित्र दिसतें. इमारतींत सहा कोर्टें असून प्रवेशद्वारांतच कोणत्या कोर्टांत कोणता खटला चालणार आहे ह्याचें वेळापत्रक असतें. एका कोर्टांत शक्यतोंवर सकाळपासून संध्याकाळपर्यंत एकच खटला सतत चालतो व तो संपेपर्यंत बहुधा दुसरें काम तेथें चालत नाहीं. महिन्यापंधरा दिवसांच्या अंतरानें तारखा पडण्याची आपल्याकडील पद्धत येथें रूढ नाहीं. येथील हॅमिल्टन हौसमधील खुनाचा खटला तीन दिवस सतत चालून खून घडल्यापासून पंधरवड्याच्या आंत खटल्याचा निकालमुद्धां लागला. थोडक्यांत म्हणजे दीर्घसूत्री कारभाराचें येथें वावडें आहे.

मुख्य न्यायाधिशांचें आसन सर्वोच्च ठिकाणीं असून त्यांच्या उजव्या हातास ज्यूरींतील अकरा सभासदांना बसण्यास खुर्च्या असतात. न्यायाधिशांच्या आसनाच्या पुढें व थोड्या कमी उंचीवर मुख्य अधिकाऱ्याचें आसन असतें. त्याच्या डाव्या हातास वकिलांकरितां बाकें असतात. त्यांच्या समोरच पुस्तकें व कागद ठेवण्याजोगीं 'डेस्कें' असतात. न्यायाधिशाच्या समोर एक उंच बंदिस्त आसन केलेलें असून तेथें आरोपींची बसण्याची व्यवस्था असते. हॉस्पिटलमध्यें ऑपरेशन पाहण्याकरितां जशी वर गॅलरी असते तशी न्यायाधिशाच्या डाव्या हातास वर दुसऱ्या मजल्यावर गॅलरी असते. तेथें नेमके नातेवाईक व इतर थोडेसे प्रेक्षक फक्त पूर्वपरवानगीनें बसूं शकतात.

एक गोष्ट जातां जातां सांगणें जरूर वाटतें. येथें शपथविधीसाठीं बायबल असतें व दुसरा ग्रंथ म्हणजे कुराण असतें. हिंदुधर्म ग्रंथाची अजून येथें स्थापना झालेली नाहीं. मला जेव्हां शपथ घेण्याचा प्रसंग आला तेव्हां न्यायाधीश मला धर्मग्रंथासंबंधीं विचारूं लागले. मी बायबल व कुराण दोन्हींवर शपथ घेण्याचें नाकारल्यानंतर त्यांनीं 'सदसद्विवेक बुद्धीस स्मरून' एवढ्यावरच माझ्या शपथेस मान्यता दिली. गैरसमज होऊं नये म्हणून सांगणें जरूर आहे कीं, येथील 'ओल्ड बेलींत' सध्यां चालू असलेल्या खटल्यांत आरोपींशीं माझा कांहींहि संबंध नाहीं फक्त आरोपी व्यक्तींतील एक महाराष्ट्रीय मुलगी असून तिला मराठीशिवाय कोणतीहि भाषा येत नाहीं. त्यामुळें व दुभाष्याचें काम चोख व उत्तम करण्यास समर्थ असा मी आढळल्यामुळें मला दुभाष्याच्या कामासाठीं बोलावण्यांत आलेलें आहे. रोज ६० रुपये मेहनताना मिळणार असल्यानें मींहि तें काम स्वीकारलें आहे. येथें साडेदहा म्हणजे अगदीं साडेदहाला कोर्टाचें काम मिनिटावर सुरू होतें. फक्त एक तासाचा मध्यंतर घेऊन चारला वक्तशीरपणें कोर्टाचें काम संपतें. न्यायाधीश येतांनाचें कर्मकांड व कोर्टांतील कामाची पद्धत पाहण्याचा हा योग अनायासें आल्यानें ह्या चार ओळी लिहूं शकलों आहे. कळावें.

आपला,

×××

-o- -o- -o-

# लंडनमधील वृत्तपत्रें

लंडन

स. न. वि. वि.

लंडनला आल्यावर ज्या अनेक गोष्टी ठळकपणें डोळ्यांत भरतात त्यांतली सर्वांत मोठी कोणती गोष्ट असेल तर ती म्हणजे येथील लोकांची वर्तमानपत्रें वाचण्याची संवय व हौस. अर्थात् प्रत्येकजण स्वतःचें वर्तमानपत्र विकत घेऊन वाचतो, हें येथें नमूद करणें जरूर आहे. आपणाकडे आगगाडींत एखाद्याजवळ वर्तमानपत्र असल्यास त्याचें वाचन चालू असतांना बाजूनें आंत डोकावण्याची किंवा पाठीचा मजकूर वाचण्याची वृत्ति अनेकांत आढळते. त्या गृहस्थाचें वाचन संपल्यावर तर जवळ जवळ हक्कानें त्याज-जवळून तें मागून घेतलें जात असतांना आपण पाहतों. पण येथें तसें चुकून सुद्धां घडलेलें माझ्या इतक्या दिवसांच्या पाहण्यांत नाहीं. ऑफिस सुटल्यावर घरीं जातांना प्रत्येकजण आपापलें वृत्तपत्र ( संध्याकाळची आवृत्ति ) विकत घेऊन मगच ट्यूबच्या स्टेशनांत शिरतो. ठराविक लोक ठराविकच वृत्तपत्रांचे वाचक असतात. पक्षोपपक्षाप्रमाणें वाचक वेगवेगळ्या मतांचीं वर्तमानपत्रें विकत घेतात. आपणाकडेहि हें आहेच. अर्थात् कांहीं घरांत एक विशिष्ट वृत्तपत्रच घेतलें जातें व त्याचें कारण बहुशः त्या घराच्या मालकाचें राजकीय मत त्या वृत्तपत्राच्या राजकीय पक्षाचें असतें. येथें ' मँचिस्टर गार्डियन ', ' डेली मेल ', ' टाईम्स् ', ' न्यू स्टेटस्मन ॲन्ड नेशन ' इत्यादि विविध पत्रें विविध मतांना वाहिलेलीं आहेत. म्हणूनच प्रत्येकाचा वाचक-वर्ग हा भिन्न आहे.

येथील ट्यूब रेल्वेंत एक विलक्षण संकेत असा आहे कीं, शें-दीडशें लोक बसलेल्या डब्यांतसुद्धां एक शब्दहि ऐकूं येत नाहीं. एस्कलेटर्स म्हणजे चढत्या-उतरत्या जिन्यावरून खालीं पाताळांत गाडीसाठीं उतरलें कीं, तोंड अगदीं बंदच म्हणानात. गाडींत बसलें कीं, वर्तमानपत्राचें प्रत्येकाचें वाचन सुरू कांहीं जणांजवळ पुस्तकें असतात, तर कांहीं मुली विणकाम सुरू करतात. पण

शेजाऱ्याशीं एक शब्द—छे ! त्याच्याकडे पाहणेंसुद्धां घडत नाहीं. आपल्याकडे लोकल्समध्यें डब्यांत सहा ते सात दिवे रांगेनें मध्यभागीं लावलेले असतात व त्यांचा उपयोग डब्यांत उजेड पडावा एवढाच असतो. पण येथें ट्यूबमध्यें बारीक टाइपाचीं वृत्तपत्रेंसुद्धां वाचतां यावींत अशी आवश्यकता असल्यानें प्रत्येकाच्या बसण्याच्या जागेवर वरच्या अंगाला दिवा लावलेला असतो. त्यामुळें एका छोट्याशा डब्यांतसुद्धां ८५ ते ९० दिवे असतात.

थोरांकरितां जशीं वृत्तपत्रें असतात तशीं लहान मुलांकरितांसुद्धां चित्रें असलेलीं छोटीं छोटीं साप्ताहिकें आहेत. तीं वृत्तपत्रांप्रमाणेंच न्यूजप्रिंटवर छापलेलीं असून मोठीं आकर्षक असतात. मीं हीं साप्ताहिकें ट्यूबमध्यें प्रथमच मुलांच्या हातांत पाहिलीं. शनिवारीं आईबरोबर मुलगी बाजाराला निघाली कीं, घरीं परत जातांना हें साप्ताहिक घेतल्याशिवाय ती घरींच जावयाची नाहीं. आईनें आपलें वृत्तपत्र विकत घेतलें व मुलीकरितां तिचें साप्ताहिक घ्यावयाचें ती विसरली तर मुलगी "Mummy, Punch & jduy for me, please !" अशी आठवण करून देऊन तें घेतल्याशिवाय निघायची नाहीं.

वृत्तपत्रांचा इतका प्रचंड खप सकाळीं व संध्याकाळीं असल्यानें तीं विकणें हें एक फार अवघड काम होऊन बसलें असतें व अनेक लोक त्या कामासाठीं अडकले असते. ह्यासाठीं ठिकाठिकाणीं कोपऱ्यावर एका उंच स्टुलावर एक पेटी ठेवून त्यांत घड्या घालून वर्तमानपत्रें उभीं करून ठेवलेलीं असतात. खोक्यांत पेनी टाकावी आणि पत्र घेऊन पुढें चालावें. आपण आपल्या येथें ही गोष्ट नेहमीं ऐकतों ह्याचें कारण, येथील ही एक प्राथमिक गरज आहे. क्वचित् ठिकाणीं दुपारच्या वेळीं किंवा संध्याकाळीं लढाईंत जखमी अपंग झालेले लोक वृत्तपत्र विकण्यास उभे असतात. पण जास्त भर प्रत्येकाच्या सचोटीवरच ! तीन दिवसांपूर्वीं वॉरनस्ट्रीट स्टेशनावर मीं ह्या सचोटीचा एक छोटासा नमुना पाहिला. एका मुलीनें आपली पर्स उघडून पाहिलें तों त्यांत सुटी पेनी नसावी बहुधा ! तिनें वृत्तपत्र तर घेतलें होतें थोडीशी गोंधळल्यासारखी झाली ती ! आणि ती आंत स्टेशनांत सटकली. मी हें मुद्दाम पाहत नव्हतों, पण काय झालें तें माझ्या ध्यानांत आलें होतें. तेव्हां ह्या सचोटीच्या अपवादाबद्दल मी मनांतल्या मनांत नोंद करीत होतों.

आंत जाऊन एका स्लॉट मशीनमधून तिनें आपलें तिकिट काढलें व परत आलेल्या मोडींतील एक पेनी तिनें बाहेर येऊन त्या खोक्यांत टाकली. आणि मला माझी नोंद खोडून टाकावी लागली ! ( येथें स्टेशन्सवर रांगेनें स्लॉट मशीन्स उभीं केलेलीं असतात. त्यांत नाणीं टाकलीं तर तिकिटें तर मिळतातच, पण आपण मोठें नाणें टाकलें तर तिकिट आणि मोडहि मिळते.)

वृत्तपत्राचा इतका मोठा खप पाहिल्यामुळें त्यांपैकीं एखाद्या वृत्तपत्राची कचेरी जवळून पाहावयास मिळावी अशी फार दिवसांपासून माझी इच्छा होती आणि मी त्या खटपटींतहि होतों. त्याला यश येऊन मला काल येथील सुप्रसिद्ध ' डेली मेल 'ची सर्व कचेरी मनसोक्त पाहावयास मिळाली. माझ्याबरोबर अर्थात्च आणखीहि कांहीं विद्यार्थी होते. आम्हांला रात्रीं ९।। वाजतां कचेरींत बोलावलेलें होतें. डेली मेल हें येथील एक प्रभावी वृत्तपत्र असून तें एकाच वेळीं लंडन, मँचेस्टर, एडिंबरो व पॅरिस ( Continental edition ) इतक्या ठिकाणीं छापलें जातें. त्याचा रोजचा खप २५ लक्ष असल्याचें मला सांगण्यांत आलें.

आम्ही ठीक ९।। ला डेली मेलच्या कचेरींत जाऊन पोहोंचलों, तों आम्हांला सर्व व्यवस्था दाखवण्यासाठीं नियुक्त केले गेलेले गृहस्थ लिफटच्या दारांतच भेटले. इमारतीच्या निरनिराळ्या मजल्यांवर असलेल्या निरनिराळ्या खात्यांची माहिती त्यांनीं थोडक्यांत दिली व मग आम्ही संपादकीय कचेरींत शिरलों. ही कचेरी तिसऱ्या मजल्यावर आहे. सर्व कचेरीभर डोक्यावरून एक फिरती तारांची गाडी नेलेली असून त्या गाडींतून बातम्यांचे कागद भराभरा एका ठिकाणाहून दुसरीकडे नेले जातात. कचेरीच्या एका टोकाला जगांतील सर्व न्यूज एजन्सींचीं टेलिप्रिंटर यंत्रें बसविलेलीं आहेत. व तीं सर्व सतत चालू असतात. येथेंच एका बाजूस कंपोझ खात्याशीं संबंध जोडणारें व्हॅक्यूमच्या तत्त्वावर बसवलेलें न्युमॅटिक ट्यूब मशीन आहे. टेलिप्रिंटरवरचा कागद फाडून घेतला कीं, एक संपादक त्यावर नजर टाकून त्यांपैकीं काय काय नको त्यावर फुल्या करून व आपणाला हव्या असलेल्या बातमीवर खूण करून कागद डोक्यावरच्या गाडींत खुपसतो. ह्या गाड्या सतत चक्राकार फिरत असतात. त्यांतून तो कागद दुसऱ्या संपादकाकडे जातो. त्याच्या दृष्टीनें तो त्या बातमीकडे पाहून फुल्या केलेल्या

बातम्या कापून टाकतो व हवी ती बातमी आपणाला हव्या त्या सुधारणा लिहून पुन्हां गाडींत खुपसतो. येथून ती एका मुख्य संपादकाकडे जाते. ह्याच्याकडे फक्त बातम्या तपासण्याचें व त्यांना आकर्षक शीर्षकें देण्याचें काम असावें बहुधा ! कारण, तो त्यावर शीर्षक घालून तीं कशी छापावयाची एक कॉलम कीं दोन कॉलम—इत्यादि सूचना घालून पुन्हां त्या गाडींत खुपसतो. आतां ती गाडी त्या न्युमॅटिक ट्यूब मशीनजवळ येते. तेथें ती गाडींतून काढून घेतात. व तेथील घड्याळाच्या मशीनवर त्या कागदावर वेळ छापली जाते. नंतर ती एका पुंगळींत बंद केली जाते व त्या मशीनमध्यें घातली कीं, क्षणार्धांत कंपोजखात्यांत जाते. तेथें ती पुंगळींतून काढून घेतली जाते व लगेच कंपोज केली जाते. बातमी संपादकीय खात्यांतून गेल्यापासून पांच मिनिटांच्या आंत तिचें प्रूफ आलें पाहिजे असा दंडक आहे. ह्या संपादकीय खात्यांतील ही बातम्यांची भिरभिरती हालचाल पाहून आम्हांला फारच गंमत वाटली. येथें रात्रपाळीला चोवीस संपादक असतात. रात्रींत मिळून डेली मेलच्या सहा आवृत्त्या निघतात. दर तासा-नंतर आवृत्ति बदलते व शेवटची सहावी आवृत्ति आपल्या भाषेंत म्हणजे City Edition पहांटे पांचला बाहेर पडते.

ही कचेरी पाहून नंतर आम्ही कंपोज खात्यांत गेलों. तेथील यंत्रसामुग्रीचें वर्णन करण्याचें कारण नाहीं. लायनोटाईप मशीन्ससंबंधीं आतां खूप माहिती आपणाकडे आलेली आहे. तसेंच यंत्रेंहि आपणांकडे आतां आलेलीं आहेत. येथें मजकूर कॉलमच्या मापाच्या ओळींत कंपोज केला जातो. प्रत्येक ओळ टाईपरायटरप्रमाणें टाईप केल्याबरोबर ते ते ठसे एकत्र येतात. व त्यांत शिशाचा रस ओतला जाऊन तयार झालेली ओळच्या ओळ खालीं स्टिकमध्यें येऊन उतरते. त्या ओळींचे ठसे त्यांचें काम आटोपतांच चटकन् वर उचलले जातात व प्रत्येक ठसा आपोआप आपापल्या स्थानीं जातो.

संपादकाकडील पुंगळींतून बातमी आली कीं, ती लगेच कंपोज करून तिचें प्रूफ काढून पुंगळींतून परत पाठवून देतात. अशाप्रकारें बातम्या भराभर कंपोज होत असतांना बातम्यांवरील मोठालीं शीर्षकें दुसरीकडे ओतलीं जात असतात व सर्व बातमी एकत्र करून ठेवली जाते. संपादकीय कचेरींतून

'पेज' बांधण्यासाठीं भराभर नकाशे येत असतात. एका ग्राफ पेपरवर चौरस दाखवलेले असतात व त्यांत कोणती बातमी कोणत्या कॉलमांत कोठें टाकावयाची, कोणती जाहिरांत कोणत्या पानावर कोठें बसवायची इत्यादि-संबंधीं संपूर्ण नकाशा ह्या ग्राफ पेपर्सवर दिलेला असतो. त्यानुसार पेज बांधून त्यांचें प्रूफ पाठवलें जातें. ह्या सर्व प्रकारांत एकहि संपादक उठून इकडे येऊन पाहत नाहीं. ह्याचें मला फारच आश्चर्य वाटलें.

छापायची ऑर्डर आली म्हणजे पेज एका प्रेसिंग मशीनवर नेतात व तेथें एका मुद्दाम तयार केलेल्या खास कार्डबोर्डावर त्या सर्व पेजचा ठसा उमटवितात. आणि तो ठसा उमटविलेला कागद–ह्याच्या तीन प्रती असतात–खालीं मोल्डिंग खात्यांत एका स्पेशल लिफ्टमधून सोडून देतात.

हें सर्व होत असतांना बांधलेल्या 'पेज'चीं प्रुफें खालीं एका न्यूज–डिस्पॅच रूममध्यें जातात. येथें 'मेल'चें स्वतंत्र न्यूज ट्रान्समिटिंग मशीन असून त्यावरून स्पेशल लाईन्सवरून सर्व पानावरच्या बातम्या मँचेस्टर, एडिंबरो व पॅरिस येथें पाठविल्या जातात. एका टेपवर त्या प्रथम टंकलिखित केल्या जातात. व ती टेप एका मशीनमधून सरकविली कीं टेलिप्रिंटरप्रमाणें बातमी तिकडे टाईप होऊन बाहेर पडते. आम्ही ह्या खात्यांत आलों व हें पाहात होतों तों पॅरिस व एडिंबरोहून टेलिप्रिंटरवर आमच्या स्वागताची बातमी आली. आम्ही आंत ९॥ वाजतां शिरलों तेव्हांच येथून एडिंबरोला व पॅरिसला आमच्या आगमनाची एक बातमी पाठविण्यांत आली होती. त्याच्या उत्तरार्थ म्हणून आतां तेथून आमचें स्वागत करणारी बातमी आणि ह्या आमच्या भेटीचा उपयोग दोन्ही राष्ट्रांच्या म्हणजे भारत व इंग्लंड ह्यांच्या परस्पर उत्कर्षास साहाय्यक होईल असा संदेश देणारी बातमी तेथून आली होती. आमच्यापैकीं प्रत्येकासच ह्याबद्दल आश्चर्य वाटल्याविना राहिलें नाहीं.

ह्यानंतर जमिनीच्या खालीं पंचवीस फुटांखालीं असलेल्या छपाईखात्यांत आम्ही गेलों. प्रचंड मोठालीं यंत्रें येथें बसविलेलीं आहेत. आधुनिक अशा ह्या यंत्रसामुग्रीचें वर्णन करण्याची आवश्यकता नाहीं. ह्या यंत्राच्या पलिकडच्या खोलींत रोटरीसाठीं गोल रोल तयार करण्याचें काम चाललेलें

अनुक्र. २६३८४ दि. भू-प्रकाश
१७२ नों: दि: ........

आम्हीं पाहिलें. वरून आलेल्या कार्डबोर्डवरचा ठसा गोल वाकवून आंत बसवितात व त्यांत शिशाचा रस ओततात. रोटरी मशीनला आवश्यक असे त्याचे चोवीस ठसे बनविले जातात. हे ठसे मशीनवर चढविले कीं, छपाईस सुरुवात होते. प्रत्येक मशीन दर तासाला तीस हजार प्रती छापून घड्या घालून मोजून बाहेर पाठवितें. छापलेले अंक एका सतत फिरत्या चक्रावरून वर पॅकिंगरूममध्यें जातात व तेथून गठ्ठे बांधून मेलच्या स्वतःच्या मोटारींतून वेगवेगळ्या स्टेशन्सवर पाठविले जातात.

हें सर्व होत असतांना तिकडे संपादकीय खात्यांत नव्या नव्या बातम्या येतच असतात. त्या सर्व निवडून कंपोज करून पुढच्या आवृत्तींत घालण्यासाठीं तयार केल्या जातात. नंतर आजच्या आवृत्तींतल्या कांहीं बातम्या काढून टाकून, कांहीं बातम्यांचें पानावरचें स्थान बदलून कांहींना पहिल्या पानावरून काढून आंतल्या पानावर घालून आणि नव्या बातम्या पहिल्या पानावर घालून दुसऱ्या आवृत्तीस सुरुवात होते. येथें सुमारें दर तासाला एक आवृत्ति बाहेर पडते. प्रत्येक आवृत्तींत मागच्या आवृत्तींच्या मानानें खूपच बदल असतो.

एक आणखी नवलाची गोष्ट येथें पाहिली. ह्या मशीन्सच्या खालीं तळघरांत कागदाचें फीडिंग रोलर्स असतात. मशीन चालू असतांनाच तें बंद न करतां एक रोलर संपल्यावर दुसरा रोलर सुरू केला जातो—हें पाहण्यास मोठी मौज वाटली. खालीं तळघरांत जाऊन पाहतां फीडिंग रोलर्स एका यंत्राखालीं चार एका मोठ्या चाकावर बसविलेले आढळले. एक रोलर संपला कीं, दुसऱ्याच्या सुरुवातीस डिंक-पट्या चिकटविलेल्या असतात. तो भाग पहिल्यास नेवून भिडवितात. पहिला रोल संपतो व दुसरा येथपासूनच नवा सुरू होतो. फक्त हें होत असतांना मशीनची गति थोडीशी कमी केली जाते.

आज इंग्लंडांत सर्वांत जास्त खप ‘ डेलि एक्स्प्रेस ’ ह्या वृत्तपत्राचा असून त्याची कचेरी म्हणजे एक प्रचंड मोठा कारखानाच आहे असें ऐकलें. ‘ एक्सप्रेस ’ रोज ४५ लक्ष छापलें जातें असें म्हणतात.

सर्वसामान्य जनतेला योग्य तें मार्गदर्शन करण्यास व त्यांच्या आवडीनिवडीसुद्धां नियंत्रित करण्यास वृत्तपत्र हें किती प्रभावी साधन होऊं शकतें

ह्याचा एकच छोटा नमुना सांगतों : ' येथील एका नाट्यगृहांत एक नाटक फारच लोकप्रिय होऊं पाहतें आहे असें आढळल्यावर कांहीं वृत्तपत्रांचे संपादक ह्या नाटकास गेले होते. नाटकांत थोडा अश्लीलपणा, थोडा अतिरंजित कामुकपणा, थोडा स्वैर आचार ' असावा बहुधा. दुसऱ्या दिवशींच्या संध्याकाळचा वृत्तपत्रांत " Is it this you want ? " असें सात कॉलमी शीर्षक टाकून त्यांत स्वैराचार इत्यादि गोष्टी इंग्रज स्वभावांत नसतांना सुद्धां हें नाटक लोकप्रिय झाल्याबद्दल आश्चर्य व्यक्त केलें होतें आणि त्या नाटकावर चांगलीच ताशेरा झाडला होता. जनतेच्या कोणत्या भावनांना आवाहन करावयाचें, त्यांचें मन व मत कसें वळवावयाचें ह्या मानसशास्त्राच्या विषयांतसुद्धां वृत्तपत्रें फार मन घालून मजकूर छापतात असें आढळलें.

ह्या राष्ट्रांत शिक्षण सक्तीचें असल्यानें प्रत्येकास लिहितां-वाचतां येतें व त्यामुळेंच वृत्तपत्रांचा खप एवढा प्रचंड होऊं शकतो. वृत्तपत्र वाचणें ही इंग्रज माणसाची एक जन्मजात संवय आहे असें कुणासहि वाटावें इतकी ही गोष्ट त्यांच्या रक्तांत भिनलेली आहे. कळावें.

आपला,
×××

# वाय्. एम्. सी. ए.

लंडन

स. न. वि. वि.

पुण्यांतील सुप्रसिद्ध रेसकोर्सच्या समोरच बरेंचसें अप्रसिद्ध असें वाय्. एम. सी. ए. चें एक कार्यालय आहे. अनेक वेगवेगळ्या कॉलेजांत जाणाऱ्या तरुणांना पुण्यांतील इतर पुष्कळ गोष्टी माहीत असल्या तरी ही गोष्ट मात्र माहीत नाहीं, अशी तक्रार तेथील संचालक श्री. आयमन् हे माझ्याकडे

करीत होते व ती दूर करण्याचा प्रयत्न मी अवश्यमेव करीन असें आश्वासनहि मी त्यांना त्या वेळीं दिलें होतें. तरुणांना आवश्यक असे सर्व खेळ ( बिलियर्डसुद्धां ) व सार्वजनिक सहकार्याचे मार्ग तेथें उपलब्ध असून तरुण त्याचा लाभ कां घेत नाहींत याचें कोडें त्यांना उलगडत नव्हतें. पण त्याचा खुलासा मी जेव्हां त्यांना केला कीं, हीं यंग मेनस् ख्रिश्चन ॲसोसिएशन असल्यानें तेथें ख्रिश्चन धर्मानुरूपच कांहीं व्यवहार होत असावेत अशी शंका येणें स्वाभाविक आहे व म्हणून परधर्मीय तरुणांना येथें येण्यास संकोच वाटत असावा. तेव्हां त्यांनीं ही संस्था धर्माधिष्ठित नसल्याचें व संस्थेच्या कार्य-पद्धतीचें विस्तृत विवेचन मजजवळ केलें होतें.

इ. स. १८४४ सालीं लंडनमध्ये १२ तरुणांनीं ‘ सेवा आणि प्रेम ’ यांचा प्रचार आणि प्रसारासाठीं ही यंगमेन्स संस्था स्थापन केली. तरुणांनीं फावल्या वेळांत समाजकार्य करावें, गरिबांना मदत करावी, शेतावर जाऊन शेतकऱ्यांना मदत करावी, इत्यादि कार्य सुरुवातीस चालू झालें. येथील लोकांना त्या संस्थेच्या कार्याचें महत्त्व इतकें आवडलें कीं, लंडन व इंग्लंड-मधील कॉलेजमधील होतकरू तरुणांनीं या संस्थेंत प्रवेश मिळविला व सर्व लंडनभर संस्थेच्या शाखा वाढूं लागल्या. येथून हें बीज यूरोपमध्यें जाण्यास मुळींच वेळ लागला नाहीं व अवघ्या अकरा वर्षांत संस्थेचा पसारा जगभर पसरूं लागला. १८५५ या वर्षीं संस्थेची पहिली जागतिक परिषद् पॅरिस येथें भरविण्यांत आली. तन्निमित्त लक्षावधि तरुण वेगवेगळ्या ठिकाणांहून आलेले होते. ही संस्था जरी नांवानें ख्रिश्चन असली तरी कार्यांत धर्मातीत आहे. अर्थात् ख्रिश्चन नसणाऱ्यांना संपूर्ण सभासदत्व प्राप्त होत नाहीं. परंतु त्यांना संस्थेच्या सर्व कार्यपद्धतीचा व पुण्याईचा लाभ मिळूं शकतो. ह्या प्रकारच्या सभासदांना ‘ ॲसोशिएट सभासद् ’ म्हणतात. ‘ सेवा व प्रेम ’ हें ध्येय मान्य करून तन्निमित्त काम करणाऱ्या कोणासहि या प्रकारें सभासद होतां येतें. एका देशांत सभासदत्व घेतलें कीं, तें साऱ्या जगभर चालूं शकतें. ह्याप्रमाणें पुण्यास यंग मेन्सचे सभासद झाले तर तेंच सभासदत्व येथेंहि स्वीकारलें जातें. मी इकडे येण्यापूर्वीं या संस्थेचा पुण्यांत सभासद झालों होतों. व त्याचा फायदा येथें आल्याबरोबर कसा मिळाला हें मी मागेंच सांगितलें आहे. पण या फायद्यासाठींच फक्त यंगमेन्सचें सभासदत्व घेणें असा त्याचा

अर्थ होऊं नये. पुण्याला श्री. आयमन् हे अनेकविध वेगवेगळ्या प्रकारचीं कामें करूं इच्छीत आहेत. लहान मुलांकरितां क्रीडांगणें तयार करून त्यांना खेळ शिकविणें, निरक्षर अशा समाजांत जाऊन साक्षरता प्रसार करणें, खेड्यांत परिषदा भरवून तेथें आवश्यक असें कार्य सुरू करणें इत्यादि अनेक कल्पना त्यांच्यासमोर आहेत; पण कार्यप्रवृत्त असे तरुण त्यांच्या हातीं नसल्यानें त्यांचें कार्यक्षेत्र मर्यादित झालें आहे. येथें सध्यां येणारे तरुण हे बॅडमिंटन, पिंगपॉंग व बिलियर्डस् खेळण्यासच मुख्यत्वें करून येत असल्यानें त्यांच्या ह्या कार्यास हातभार लागणें दुरापास्त झालें आहे.

आज जगांतील ७५ देशांत यंग मेन्सच्या शाखा असून सभासद-संख्या ३ कोटि ७५ लक्ष आहे. त्यांचीं ३००० प्रमुख केंद्रें असून त्यांनीं वेगवेगळ्या ठिकाणीं २०,००० वसतिगृहें व भोजनगृहें बांधलेलीं आहेत. शिक्षण-केंद्रें स्थापन करून यांत्रिक, औद्योगिक शिक्षण देण्याच्या योजनाहि अनेक ठिकाणीं आहेत.

युद्धकालांत यंग मेन्सनें ब्रिटिश सरकारला प्रचंड मदत केली. अनेक युद्ध-आघाड्यांवर यंग मेन्सचीं पथकें मदतीस तयार होतीं व सैनिकांकरितां फिरत्या-गाड्यांतून भोजन, करमणूक इत्यादि सोयहि या संस्थेनें केली होती.

युद्धोत्तर कालांत पुनर्घटना-कार्यांत यंग मेन्स हिरीरीनें कार्य करीत आहे. ५ महाविद्यालयें स्थापन करून त्यांतून प्रतिवर्षीं १००० नायक ( Leaders ) निर्माण करण्याची योजना सुरू झाली आहे. शेतांवर काम करण्याची संधि देऊन शेतीकामाची आवड निर्माण करण्यासाठीं इंग्लंडमध्यें ४ केंद्रें स्थापन केलीं गेलीं असून त्यांतून १०,००० विद्यार्थ्यांना पाठविण्याचें कार्य दरवर्षीं करण्यांत येत आहे.

दरवर्षीं मार्चमध्यें येथील यंग मेन्स एक प्रचार सप्ताह साजरा करतें. त्या वेळीं मागील कार्याचा आढावा घेऊन येत्या उन्हाळ्यांत काय काय योजना चालू होणार आहेत याचें प्रदर्शन भरविण्यांत येतें. ह्या वर्षाचें प्रदर्शन सध्यां येथील चेरिंग क्रॉसच्या भव्य दिवाणखान्यांत भरलेलें असून त्यांत नव्या वर्षाच्या अकरा वेगवेगळ्या योजना मांडलेल्या आहेत.

ही सर्व माहिती याच प्रदर्शनांत साकल्यानें मिळाली म्हणून मुद्दाम

पाठवून देत आहें. ह्या अकरा योजनांपैकीं एखादीचा लाभ मला घेतां आला तर अवश्य घेऊन त्यासंबंधीं पुढें केव्हां तरी लिहीनच. कळावें,

आपला,
×××

-o- -o- -o-

# आंतरराष्ट्रीय शांतिसेवादल संघटना

लंडन

स. न. वि. वि.

१९४९ च्या मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यांत एका नितान्तरम्य ठिकाणीं आठवडाभर राहण्याचें भाग्य मला लाभलें होतें. काश्मीरमधील ‘पेहलगम’ हें स्थान तेथील अप्रतिम निसर्गसौंदर्याबद्दल प्रसिद्ध आहे. त्यांतून आम्हांला तर गांवाच्या एका टोकाला एका टेकडीच्या उतरणीवर बांधलेला, उंच देवदारूच्या सान्निध्यांत असलेला व दोन झुळझुळ वाहणाऱ्या झऱ्यांच्या मध्यप्रदेशांत असलेला असा एक बंगला निवासासाठीं मिळाला होता. चारहि बाजूंस हिमाच्छादित शिखरें दिसत व दुसऱ्या मजल्याच्या सज्जांत उभें राहिलें कीं, पायथ्याशीं निळ्या पाण्याची ‘शेषनाग’ वाहत असलेली ममलेश्वराची टेकडी मन आकर्षून घेत असे व सकाळीं लौकर उठून हिंडावयास गेलें असतांना देवदाराच्या फांद्यांच्या टोकांशीं सांपडलेल्या दंवबिंदूंतून दिसणारें इंद्रधनुष्याचे रंग पाहतांना मनास समाधान लाभत असे.

इंग्लंडमध्यें निसर्गसौंदर्यासाठीं केंट हा परगणा फार प्रसिद्ध असून दक्षिण किनाऱ्याजवळ असलेलीं समुद्रकांठचीं गांवें हीं त्याविषयीं फारच नांवाजलीं जातात. कँटरबरी हें निसर्गसौंदर्यासाठीं व अर्थात्‌च आद्य धर्मगुरूचें पीठ म्हणूनहि फार प्रसिद्ध आहे. सेंट स्टीफन्स हिल नांवाच्या एका छोट्याशा टेकडीचा पायथ्याशीं गांव वसलेलें आहे व टेकडीवर तुरळक बंगले आहेत. टेकडीच्या वरच्या अंगाला आणखी एक टायलर हिल

नांवाची छोटी टेकडी आहे व उंच व्होडें, ड्रान्स डॅफडिल्स, कॅटकिन्स, इत्यादींच्यामुळें ही फारच मनोहर झाली आहे. टेकडीवर देवदाराच्या दाट जंगलांत मध्यभागीं एक छोटासा बंगला यूथ होस्टेल ॲसोसिएशनला लाभला आहे व तेथेंच ह्या आठवडाभर माझा मुक्काम आहे. मधुमासाचा प्रारंभ असल्यानें सर्वत्र वसंतऋतूचें वैभव पसरूं लागलें आहे. येथेंहि सकाळीं लवकर उठून हिंडायला जाण्याचा कार्यक्रम चालू आहेच. व त्या वेळीं जी निसर्गशोभा दिसते तीमधूनच मला माझ्या काश्मीरमधल्या पेहलगमची आठवण झाली.

येथें लंडन युनिव्हर्सिटींत कोणत्याहि विषयाचा उच्च अभ्यास करणाऱ्याला त्याचा प्राध्यापक व संदर्भ-ग्रंथ यांखेरीज इतर गोष्टींकडे पाहायलाहि वेळ सांपडत नाहीं, असा अनुभव आहे. ज्यांना कांहीं काम मनापासून करावयाचें आहे. त्यांचीच अर्थात् ही गोष्ट आहे ! इतरांना सर्वच वेळ मोकळा असतो. मला गेला दीड महिना येथें फारच जिकिरीनें काम करावें लागल्याचें माझ्या प्राध्यापकांच्या लक्षांत आलें होतें. आतां एप्रिल–मेमध्यें पुन्हां दोन महिने पराकाष्ठेचा ताण पडणार आहे. याची त्यांना कल्पना होती व म्हणूनच त्यांनींच आठवडाभर सुट्टी घेऊन कोठें तरी बाहेर हिंडून यावयाची सूचना केली होती. माझ्या समजुतीप्रमाणें प्राध्यापक विद्यार्थ्यांच्या अभ्यासासह सर्व गोष्टींवर लक्ष ठेवीत असावेत. त्यांनींच मला ह्या कॅंटरबरीच्या यूथ हॉस्टेलमधील कामाची माहिती दिली व त्यानुसार मी येथं येण्याचें ठरविलें.

पहिल्या युद्धानंतर १९१९ सालीं फ्रान्समधील सरहद्दीवरील एका खेड्यांत वेगवेगळ्या देशांतील सात लोकांची एक छोटीशी बैठक झाली. आंतरराष्ट्रीय जागतिक इत्यादि मोठ्या नांवाच्या हव्यास न धरतां प्रत्यक्ष काम करणारीं माणसें एकत्र आलीं असल्यानें युद्धोत्तरवाताहतीच्या काळांत आपल्या आपद्ग्रस्त देशांना मदत देण्याची योजना या बैठकींत आंखली गेली व जर्मनींतील एक खेडें व फ्रान्समधील एक खेडें पुनर्वसाहतीच्या कामासाठीं नेमलें गेलें. त्या लोकांना अनुयायी मिळवण्यास फारसें कष्ट पडले नाहींत व फ्रान्समधील एक खेडें वसविण्याकरितां जर्मन तरुणहि उपस्थित झाले. राष्ट्राराष्ट्रांत ही तेढ इतक्या पराकोटीला असतांनाची ही गोष्ट आहे. जर्मन हद्दींतील खेड्याची पुनर्वसाहती-

साठीं बांधणी करण्याकरितां फ्रेंच इंग्रज झेक इत्यादि सर्व देशांतील तरुण स्वयंसेवक उपस्थित होते.

या संघटनेंतून पुढें इंटरनॅशनल व्हॉलंटरी सर्व्हिसेस फॉर पीस म्हणजेच आंतरराष्ट्रीय शांततावादी स्वयंसेवक दल स्थापन झालें. आज ह्या संस्थेच्या शाखा जगांतील सर्व मोठ्या राष्ट्रांत आहेत. आपद्‌ग्रस्त लोकांना वा आंतरराष्ट्रीय संघटनांना त्यांच्या कामांत मदत करणें हें या संस्थेच्या कामापैकीं मुख्य काम आहे. 'सर्व्हिस सिव्हिल इंटरनॅशनल' ह्या संस्थेशीं ही संस्था संलग्न आहे. म्हणून निरनिराळ्या देशांतील मदतीच्या अपेक्षा असणाऱ्या संस्था हिच्याकडे मदतीची मागणी करतात. आय्. व्ही. एस्. पी. च्यानुसार वेगवेगळ्या देशांत वर्कस् कॅम्पस् भरविते. आज वर्षानुवर्षें हें काम चालू आहे. एवढेंच नव्हे, तर १९३० सालीं बिहारमध्यें झालेल्या भूकंपांतील आपद्‌ग्रस्तांना मदत करण्यासाठीं ह्या संस्थेंतून २० सदस्य भारतांत आले होते व त्यांनीं १९३४ ते १९३७ तेथें विनावेतन काम केलें आहे. असें असूनहि या संस्थेची मुळींच माहिती नाहीं, असें सांगतांना मला संकोच वाटावा यांत नवल नाहीं.

१९४९-५० या वर्षी वेगवेगळ्या देशांत ह्या संस्थेनें ५० वर्कस् कॅम्पस् भरवले व त्यांतून २००० स्वयंसेवक काम करीत होते, हें सर्व काम विनावेतन व स्वखुषीनें काम करणाऱ्या स्वयंसेवकांनीं केलेलें असल्यानें चांगलें झालें आहे. एका स्विस खेड्यांतील वर्क कॅम्पमध्यें १६ वेगवेगळ्या देशांतील तरुण आले होते.

कार्याचें स्वरूप वेगवेगळ्या ठिकाणीं वेगवेगळ्या प्रकारचें असतें. खोरीं, कुदळीं, फावडीं, यांच्या कामापासून तों कलापूर्ण सजावटीपर्यंतचें सर्व प्रकारचें काम असतें. समाजाच्या सर्व थरांतून स्वयंसेवक येतात, पण बहुसंख्य भरणा विद्यार्थिविद्यार्थिनींचाच असतो. आज माझ्या बरोबर येथें सर्व प्रकारचे बारा स्वयंसेवक आहेत—७ मुलें व ५ मुली आहेत. लीडस्, ग्लासगो व बर्मिंगहॅम् येथील युनिव्हर्सिटींतील आठ असून लंडनचे आम्ही चौघे आहोंत. भारतीय असा मी एकटाच आहें. वातावरण अगदीं कुटुंबपद्धतीचें आहे. Unskilled labour हें एकच सूत्र असें आहे कीं ज्यावर सर्व लोक एका पातळीवर

येऊं शकतात व सर्व विभाजक भिंती नाहींशा होतात. दिवाणखान्याच्या भिंतीला कागद डकविण्याच्या कामांत मी व लीडस्‌चे एक डॉक्टर सारखेच अनभिज्ञ आहोंत. त्यामुळें काम व गप्पा मजेंत व सारख्याच पातळीवर होतात. रात्रीं शेकोटीच्याभोंवतीं करमणुकीचा कार्यक्रम फारच मजेचा होतो. मीं या लोकांना दोन भजनें व 'रघुपति राघव राजाराम' म्हणून दाखवलें व आतां रोज कोरससाठीं एक 'धून' पसंत करण्यांत आली आहे. ह्या दहा दिवसांच्या कँपसाठीं मला फक्त १० शिलिंग खर्च येणार आहे. व तोही फक्त प्रवासाचाच ! आय्. व्ही. एस्. पी.चे कांहीं स्वयंसेवक लवकरच भारतांत आसाम रिलीफ वर्क्ससाठीं येणार आहेत. कळावें.

आपला,
×××

## इंग्लंडमधील कोच सर्व्हिसेस्

स. न. वि. वि.

इंग्लंडमधील हिंवाळा हा अधिकृतरीत्या संपला असून वसंत ऋतूस प्रारंभ झाला आहे. उद्यां दिनांक १५ एप्रिल या दिवशीं घड्याळ एक तास पुढें सरकवलें जाणार आणि सर्वांना संध्याकाळीं जास्त हिंडावयास मिळणार ! येथें थंडींत एक तास घड्याळ मागें जातें व तें उन्हाळ्यांत एक तास पुढें जातें. याप्रमाणें दिवसाचा जास्तींत जास्त उपयोग करून घेण्याचें येथलें धोरण असतें.

हवा कशीहि असली तरी येथें सर्व ऋतूंत वेगवेगळेपणा पहावयास मिळतो याबद्दल वाद नाहीं. मी येथें आलों तों थंडीस कोण सुरुवात झाली होती ! झाडांच्या पानांचा हा खच बागेतून पडलेला असे. तो स्वच्छ करण्यास सकाळीं म्युनिसिपालिटीची मोटार येतांना मला रोज भेटत असे. खुद्द थंडींत झाडांच्या सर्व फांद्यांवर केवळ खराटे—शुष्क पर्णहीन फांद्या—

दिसत व त्यांवर बर्फ सांठलें म्हणजे एक वेगळीच शोभा दिसे. रस्त्यावर मुलें थोडीं व क्वचित् दिसत आणि प्रत्येकजण जाड ओव्हरकोट चढवून हात खिशांत घालून वेगानें जातांना दिसे. बाजारांत सर्व शोकेसेसमधून जाड स्वेटर, हातमोजे, ओव्हरकोट इत्यादि दिसत.

आतां सर्वत्र सर्वच बाबतींत बदल घडलेला आढळून येत आहे. सूर्यदर्शन नियमानें व्हावयास लागलें आहे. झाडांवर सर्वत्रच नवी पालवी स्पष्टपणें दिसत आहे. लवकर फुलें येणाऱ्या फुलझाडांना तर बहर आलेला आहे. लोकांच्या पेहरावांत–विशेषतः मुलींच्या पेहरावांत–तर बराच फरक झालेला असून लहान मुलेंहि आतां जास्त प्रमाणावर छोट्या छोट्या ट्रममधून ( सपाट तळांच्या बोटी ) बागांत उन्हांत ठेवलेलीं आढळूं लागलीं आहेत. बाजारांतहि सर्वत्र Welcome the spring चें वातावरण फलक व वस्तु दिसूं लागल्या आहेत. ह्याचा परिणाम–अर्थात् मानसिक ( Psychological ) लोकांच्यावरहि झाला तर फारसें आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. त्यामुळें मीं जर असें म्हटलें कीं, लोकहि जास्त उत्साही व आनंदी दिसत आहेत, तर त्यांत बरेंचसें सत्य आहे असें समजण्यास हरकत नाहीं.

ह्या आनंदाचा संपूर्ण उपभोग घेण्याचे जे येथील लोकमान्य प्रकार आहेत त्यांत सप्ताहान्त सुटींत समुद्रकिनाऱ्यावर वा निसर्गाच्या सहवासांत मोकळ्यावर हिंडण्यास जाणें व मनसोक्त बागडणें, हा सर्वांत लोकप्रिय आहे. ह्यासाठीं शनिवारीं दुपारीं स्वतंत्र व खास आगगाड्या सोडण्याची योजना आतां उन्हाळ्यांत सुरू होते. व्हिक्टोरिया, चेरिंग क्रॉस व वॉटर्लू या स्टेशनांवरून दर दोन-तीन मिनिटांनीं गाड्या सुटतात व भरगच्च वाहतूक शनिवारीं-सोमवारीं होते.

याव्यतिरिक्त येथें “ Travel by Coach ” नांवाचें जें एक अप्रतिम साधन आहे त्यासंबंधींच आज चार ओळी मी परिचयात्मक लिहिणार आहें. आपणांकडे स्टेट ट्रान्सपोर्ट झाल्यानंतर प्रवास जास्त सुखाचा झाला किंवा नाहीं ह्यासंबंधीं मी लिहीत नाहीं. वर्तमानपत्रांतून स्टेट ट्रान्सपोर्टसंबंधीं अनेक वेळां मजकूर आलेला माझ्या वाचनांत आहे. खाजगी मालकीच्या गाड्या असतांना होणारा प्रवास व आतां स्टेट ट्रान्सपोर्ट झाल्यानंतर होणारा प्रवास ह्यांतील ‘ तर–तम ’ तुम्हीच जास्त चांगलें सांगूं शकाल.

येथील " कोच-सर्व्हिस " ही " स्टेट "ची नाहीं, स्वतंत्र आहे. अनेक कंपन्या—ईस्ट केंट, थेम्स व्हॅली, साऊथ डाऊन, रॉयल व्ल्यू, मिडलँड नॉर्थ, ईस्टर्न कौंटीज् इत्यादि. ह्या वेगळ्या परगण्यांतील वेगवेगळ्या मार्गांवर आलेल्या मोटारी धांवतात. आणि ह्या सर्व कंपन्यांचें एक संयुक्त कार्यालय सर्व मोटारींची व्यवस्था पाहतें. प्रत्येक कंपनीची ' कोच ' ही प्रशस्त, सुंदर व आरामशीर बनविलेली आहे. ३२ उतारूंची बसण्याची व्यवस्था असणाऱ्या ह्या कोचमध्यें विमानाप्रमाणें प्रत्येकास स्वतंत्र खुर्ची असते व ती उत्तम मखमलीनें मढविलेली व ऐटदार असते. मोटारींत १२ पासून १६ पर्यंत दिवे असतात. डोक्यावर असलेल्या शेल्फवर छोट्या सूटकेसेस् इ. ठेवण्याची सोय असते. जास्त वजनाचें लगेज मागें एका बंद खोलींत असतें.

ह्या कोचेसचें वेळापत्रक असून त्या नेमक्या वेळेवर सुटतात व ठराविक ठिकाणींच थांबून आपापल्या नियोजित स्थळीं जातात. ह्यांचीं तिकिटेंहि ८–१५ दिवस आधीं रिझर्व करावीं लागतात.

मात्र येथील कोचमध्यें प्रथमवर्ग, द्वितीय वर्ग इत्यादि वर्गवारी नसते. सर्व उतारू एकाच वर्गाचे असतात. तसेंच येथें " कंपार्टमेंट सीटस् " नसतात. " टपावर " उतारू बसण्याची तर नव्हेच, सामान ठेवण्याचीहि सोय नसते. आणि एकहि उतारू जास्त घेण्याची मुभा नसते. एवढेंच काय ह्या ' कोच 'ना कंडक्टरहि नसतो. एकदां सर्व सीटस् तपासून घेऊन चक्रधर आपल्या जागेवर बसला कीं कोच सुरू. मध्यें कंडक्टरचें कामच नाहीं. येथें चेकिंग इन्स्पेक्टर वगैरे अधिकारीहि नसतात. त्यामुळें एस्टॅब्लिशमेंटचा खर्च कमी असतो. म्हणूनच कमी भाड्यांत कोचचा प्रवास घडूं शकतो. कोचचें भाडें रेल्वेच्या मानानें फार स्वस्त असतें. ऑक्स्फर्डला जायला रेल्वेनें १७॥ शिलिंग पडतात, तर कोचनें अवघे ७॥ शिलिंग. कँटरबरीच्या आगगाडीनें १९॥ शिलिंग पडतात. तर कोचनें अवघे १०॥ शिलिंग. शिवाय कोच-प्रवासांत ' दिवसांत परत ' ( Day Return ) प्रवास व ' महिन्यांत परत ' ( Period Return ) अशींहि सवलतीचीं तिकिटें मिळतात.

कोच ही लहान लहान खेड्यांमधून व गांवांतून जाते व त्यामुळें कोचचा प्रवास जास्त मजेचा व ज्ञानदायी होतो. शिवाय, स्वतंत्र व आरामशीर

जागा, स्वस्त भाडें इत्यादि सवलती असल्यानें कोच–प्रवास हाच जास्त फायदेशीर ठरतो.

व्हिक्टोरिया कोच स्टेशनवर सकाळीं गेलें तर एकामागून एक सुटणाऱ्या शेंकडों वेगवेगळ्या कंपन्यांच्या वेगवेगळ्या रंगांच्या वेगवेगळ्या कोचेस तेथून निघतांना दिसतात. १४ वेगवेगळे प्लॅटफॉर्मस् यासाठीं करण्यांत आले असून वेगवेगळ्या भागांत जाणाऱ्या मोटारींना त्यानुसार नंबर देण्यांत आलेले असतात. सर्व व्यवस्था मोठी सूत्रबद्ध व चोख असते.

आतांच्या सुट्टीसाठीं व उन्हाळ्यांतील सुट्यांसाठीं ह्या वेगवेगळ्या कोच कंपन्यांनीं आपापलीं पत्रकें तयार केलेलीं आहेत. ५ दिवस समुद्रकिनाऱ्यावरील रम्य ठिकाणें दाखवून लंडनला परत आणून पोहोंचविणारी सहल, आठवड्याची सहल, स्कॉटलंडची सहल, इंग्लंडमधील वेगवेगळ्या प्रेक्षणीय स्थळांची संयुक्त ७ दिवसांची सहल इत्यादि अनेक आकर्षक योजना ह्या पत्रकांतून मांडण्यांत आलेल्या आहेत. माझ्यासारख्या प्रवासाचा हव्यास असलेल्याला तर ह्या योजना म्हणजे मोठी पर्वणीच आहे. पण यांपैकीं किती व कोणत्या योजना आपणास आर्थिक दृष्ट्या व अभ्यास सांभाळून स्वीकारतां येतील ह्याचा विचार करणें कठिण आहे.

“Festival” साठीं जादा काम पडणार असल्यानें नवीन कोचेस बांधून तयार होत आहेत. प्रवास कंपन्या मोटारीच्या मोटारी रिझर्व करीत असून जास्तींत जास्त सवलतींत जास्तींत जास्त काय दाखवितां येईल ह्याचा अंदाज बांधीत आहेत.

मधुमासाच्या प्रारंभानें व वसंताच्या आगमनानें उत्पन्न झालेल्या उत्साहांत आपला जास्तींत जास्त फायदा कसा होईल ह्याचा प्रत्येकजण विचार करीत असल्यास काय आश्चर्य आहे ! “ब्रिटन हें पक्कें व्यापारी राष्ट्र आहे” हें आम्हांस कोणीं नव्यानें सांगावयास हवें काय ? कळावें.

आपला,
×××

: ३ :

# लंडनच्या परिसरांत

## हॅम्पटन कोर्ट

लंडन

स. न. वि. वि.

आजच्या पत्रांत मी शनिवारीं गेलेल्या एका ऐतिहासिक स्थळाची थोडी माहिती देण्याचा माझा विचार आहे. लंडनपासून सुमारें ४० मैलांवर टेम्स नदीच्या कांठावरच 'हॅम्पटन कोर्ट पॅलेस' नांवाचा एक राजवाडा आहे. मोटारीनें किंवा टेम्स नदींतून छोट्या होडींतून तेथें जाण्याची सोय आहे. आजहि दोन्ही प्रकारच्या वाहनांनीं तेथें जाणाऱ्या प्रेक्षकांची संख्या खूप आहे. नदींतून गेलें असतां फारच चांगलें निसर्ग-सौंदर्य पाहावयास मिळतें म्हणतात, पण तो मार्ग जास्त खर्चाचा असल्यानें मी तिकडून गेलों नव्हतों. मात्र सुखानें चैनीसाठीं जाणाऱ्यांनीं तिकडून जावें असें सुचविण्यास हरकत नाहीं. नदींतून जाण्यासाठीं ज्या लहान लहान नावा आहेत त्या बऱ्याचशा झेलममधून जाणाऱ्या छोट्या शिकाऱ्यासारख्याच आहेत. पण, शिकाऱ्यांतून ४ माणसें जाऊं शकतात. ह्या नावांतून फक्त दोनच माणसें जाऊं शकतात. यावरून या वाहनाची कल्पना येईल.

नदींत, मध्येंच एका ठिकाणीं एक हाऊस-बोटहि दिसली व दाल

सरोवराच्या किनाऱ्याला रांगेनें उभ्या असलेल्या अनेक हाऊस-बोटींची आठवण झाली. काश्मीरच्या हाऊस-बोटीपेक्षां ही आकारानें मोठी व दिसायला जास्त सुंदर दिसली. जवळ जाऊन पाहतां न आल्यानें अर्थातच अंतरंगाबद्दल सांगतां येणें असंभवनीय आहे. मोटारीचा रस्ताहि सुंदर असून सध्यां वसंत बहरला असल्यानें जास्तच सुंदर भासला. आठव्या हेन्रीच्या कारकीर्दींत थॉमस वुल्झी नांवाचा जो यॉर्कचा आर्चबिशप होऊन गेला त्यानें टेम्स नदीच्या कांठची ही विस्तीर्ण जागा घेऊन तेथें राजवाड्याच्या तोडीस तोड किंबहुना राजवाड्याहून कांकणभर सरसच असा हा प्रचंड वाडा बांधण्यास १५१४ सालीं प्रारंभ केला. आजसुद्धां नव्या राजवाड्यांतील कांहीं भाग सोडल्यास इतर बांधकाम, सामानसुमान, गालिचे, चित्रें, लढाईचीं हत्यारें इत्यादि सर्व वुल्झीच्या वेळचेंच आहे. १५१६ सालीं वुल्झी कार्डिनल इंग्लंडचा लॉर्ड चॅन्सेलर झाला. त्याच्या ५०० माणसांच्या कुटुंबास एवढ्या मोठ्या वाड्याची जरूरी होतीच. शिवाय पाहुणे इत्यादींसाठीं २८० उत्तम सजविलेल्या खोल्याहि तयार होत्या. १५२७ च्या इंग्लंड व फ्रान्समध्यें झालेल्या तहनाम्यानंतर फ्रेंच वकिलास व त्याच्या ४०० सरदारांस हॅम्पटन कोर्टच्या राजवाड्यांत चार दिवस वुल्झीच्या खर्चानें राहावयास मिळालें असा एक कागद येथें दाखवितात. यावरून थॉमस वुल्झीच्या संपन्नतेची थोडी कल्पना येते. राजवाड्यांत आंतील भिंतींवर टांगलेल्या गालिच्यांची किंमत करणें दुरापास्त आहे. अप्रतिम कलाबतूचें व रेशमाचें विणकाम असलेले हे गालिचे आज अनेक वर्षांपासून तेथें असूनसुद्धां उत्तम टिकून आहेत. ह्यांवरील चित्रें बहुधा सर्व बायबलमधील धार्मिक आहेत.

लांकडी सामान, पलंग, खुर्च्या, टेबलें इत्यादि सुद्धां सर्व जुनें पण उत्तम असून अतिशय रेखीव व सुंदर काम केलेलें असें आहे. इंग्लंडच्या राजवैभवास मागें टाकील असें वैभव वुल्झीनें कांहीं काळ उपभोगलें म्हणतात, तें हें पाहून खरें वाटलें.

पण संपत्तीचा वारा फार काल टिकणारा नव्हता. आठव्या हेन्रीची वक्रदृष्टि होण्यास कारणहि फारसें मोठें लागलें नाहीं. १५२९ तच त्याला अधिकारपदावरून दूर करण्यांत आलें. राजास खुष करण्याकरितां वुल्झीनें आपला हॅम्पटन कोर्टचा राजवाडा सर्व आजूबाजूच्या बागबागायतीसह

राजास नजर केला; पण राजानें तें सर्व गिळंकृत करूनहि त्यावर कृपा केली नाहीं. १५३० च्या नोव्हेंबरांतच त्याच्यावर राजद्रोहाचा आरोप ठेवण्यांत आला. पण यॉर्कहून लंडनला आणण्यांत यत असतां वाटेंतच त्याचा मृत्यु घडला. " Had I but served my lord as faithfully as I have severed this King......" इत्यादि त्याच्या उद्‌गारांची आठवण येथील त्याचें पुरातन वैभव पाहात असतांना आल्याशिवाय राहिली नाहीं.

आठव्या हेन्रीच्या ताब्यांत हा वाडा येतांच त्यानें त्यांत खूपच वाढ व सुधारणा करण्यास सुरवात केली. पूर्वीच्या वुल्झीच्या वाड्याचीं तीन दालनें तशींच ठेवून इतर सर्वत्र नवीन प्रकारचें बांधकाम सुरु झालें व १६८९ सालीं सर क्रिस्तोफर रेन ( सेंट पॉल बांधलें तोच महापुरुष ) यानें अद्यावत पद्धतीनें सर्व राजवाडा पुनः सजविला. आज सर्व राजवाड्याचे बेस कोर्ट, क्लॉक कोर्ट व फौंटन कोर्ट असे तीन मोठाले विभाग असून सर्वच फार प्रेक्षणीय आहेत. तत्कालीन दारू भरून ठेवण्याचीं तळघरें, तत्कालीन मोठालीं स्वयंपाकगृहें व संपूर्ण डुक्कर भाजण्याचीं लोखंडी साधनें हीं सर्व येथें पाहावयास मिळतात.

सर्वांत प्रेक्षणीय वाटलेल्या तीन–चार गोष्टींचा उल्लेख करणें जरूर आहे. त्यांपैकीं पहिली गोष्ट म्हणजे १५४० सालीं निकोलस नांवाच्या एका विख्यात गणितज्ञ कारागिरानें राजाकरितां बांधलेलें ज्योतिषशास्त्रीय घड्याळ. ह्याचा व्यास ७ फूट १० इंच असून ह्याला एकच कांटा आहे. पण एकाच वेळीं ह्यावर वेळ, दिवस, महिना, वर्षप्रारंभापासून गेलेले दिवस, चंद्राच्या कला, लंडन ब्रिजजवळची भरतीची वेळ हें सर्व दाखविलें जातें. ह्यास नेहमींच्या घड्याळाप्रमाणें १२ आंकडे नाहींत तर चोवीस आहेत हें एक वैशिष्ट्य आहे. घड्याळ अजून उत्तम चालू स्थितींत असून सर्व गोष्टी नेमक्या दाखवूं शकतें.

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे अँटोनियो नांवाच्या सुप्रसिद्ध इटालियन चित्रकारानें रंगविलेला राजाचा दिवाणखाना. भिंती व छत ह्यांवर सर्व बाजूंनीं मिळून एक मोठें थोरलें चित्र काढलेलें असून चित्रांत अनेक रोमन देवदेवतांच्या कथा आहेत. इतकें मोठें व तरीहि इतकें प्रमाणबद्ध, इतकें सुंदर चित्र इतरत्र कोठेंहि पाहण्यांत आल्याचें मला स्मरत नाहीं. Ministry

of Works च्या सध्यांच्या कारागिरांनीं नुकताच त्या चित्रास रंगाचा नवा हात दिला आहे; पण तरीहि अजून चित्रांचें पूर्वींचें सौंदर्य जसेंच्या तसें आहे.

एक प्रेक्षणीय गोष्ट राजवाड्यांत पाहावयास मिळाली, ती म्हणजे येथील शस्त्रागार! King's Guardroom असें यास नांव आहे. भिंतींच्या खालच्या सहा फुटांत उत्तम लढायांचीं चित्रें आहेत व वरच्या सहा फुटांत सर्व वेगवेगळ्या प्रकारचीं शस्त्रें इतकीं कलापूर्ण पद्धतीनें व इतकीं मनोहर जुळवून ठेवलीं आहेत कीं प्रथमदर्शनीं पाहतां तीं शस्त्रें आहेत हें ध्यानींच येत नाहीं. वेगवेगळ्या वेलबुट्टींचे गालिचे टांगले असावेत असेंच प्रथम वाटतें. सूक्ष्म दृष्टीनें पाहू जातां मात्र मग तीं शस्त्रें ओळखूं येतात. सर्व प्रकारची शस्त्रांची रचना येथें प्रथमच पाहावयास मिळाली. फोटो घेऊन ठेवण्याची इच्छा होती, पण पुरेसा उजेड नसल्यानें मात्रा चालली नाहीं.

याव्यतिरिक्त राजाचें शयनगृह, राणीचें शयनगृह, राजाचें ग्रंथालय, राणीचा दिवाणखाना इत्यादि हें सारें सामान्यच आहे. त्यांत वैशिष्ट्य असें कांहीं नाहीं. ॲन् बुलीनसाठीं खास बांधलेलें अंतःपुर पूर्ण होण्यापूर्वींच बिचारीचा शिरच्छेद झाला व येथें प्रथम राहण्याचें भाग्य जेन सेमूरला लाभलें. भुताटकीचा दिवाणखाना ( Haunted gallery ) म्हणून एक कमी उजेड असलेला भाग येथें दाखवितात. कॅथरिन हॉवर्ड हिला लग्नानंतर अवघ्या सोळा महिन्यांतच वाईट चालीची ठरवून मृत्यूची शिक्षा सुनावल्यानंतर ती येथें होती व तिचें भूत तेथें येत असावें असें सांगतात.

आमच्या मानसशास्त्राच्या पुस्तकांत प्रसिद्धि पावलेली " हॅम्प्टन कोर्ट मेंझ " भुलभुलावणी येथेंच आहे. सहा फूट उंचीच्या मेंदीसारख्या झुडपांनीं ही तयार केलेली आहे. उंदरांचे भुलभुलावणींतले अनेक प्रयोग मीं पाहिले आहेत व हॅम्प्टन कोर्ट मेंझचें मानसिक चित्रहि माझ्या समोर आहे, असें असूनहि मी प्रथम आंत शिरलों तसा बाहेर पडूं शकलों नाहीं. मात्र, या चक्रव्यूहांत बराच वेळ अडकून पडणाऱ्यांप्रमाणें मला फार काल गुरफटून राहावें लागलें नाहीं. चक्रव्यूहांत शिरल्यावर आंत चुकलें कीं, जी एक मानसिक गंमत लाभते तिचा आनंद मोठा आहे असें वाटलें व संसारांत गंमत वाटणाऱ्यांना ती कां वाटते हें माझ्या मनांत असलेलें कोडें अनायासें सुटलें.

वाड्याभोंवतालची बाग इ. वर्णन करून वेळ घालवीत नाहीं. इंग्लंडच्या मुक्कामांत एकदां अवश्य पाहण्याजोगें एक स्थळ आहे एवढें वर्णन पुरें ! ह्यानंतर सर्व जगांत प्रसिद्ध असलेली ' इटन ' ची शाळा मी पाहण्यास गेलों. ' वॉटर्लूची लढाई इटनच्या क्रीडांगणावर जिंकली गेली, ' असें एक सूचक वाक्य आहे. त्या ' इटन 'संबंधीं सवडीनेंच लिहिणें भाग आहे. कळावें.

आपला,
×××

ө ө ө

## सेंट अल्बान्स

सेंट अल्बान्स

स. न. वि. वि.

मी सध्यां लंडनमध्यें नसून येथें सेंट अल्बान्स नामक ठिकाणीं आलों आहें. सेंट अल्बान्स हें लंडनपासून अवघ्या २२ मैलांवर आहे व रेल्वेनें किंवा बसनें येथें अर्ध्या-पाऊण तासांतच येतां येतें. नाताळांत किंवा नूतन वर्षाच्या उत्सवांत चार दिवस एखाद्या इंग्रजी कुटुंबांत राहावयास मिळावें ह्यासाठीं व तेणेंकरून कुटुंबांतील अंतर्गत चालीरीति जवळून पाहावयास मिळाव्यात यासाठीं मी येथें नांव दिलें होतें. त्यानुसार सेंट अल्बान्समधील एका कुटुंबांत राहण्यासाठीं मला निमंत्रण मिळालें व म्हणूनच मी आज येथें बसून हें पत्र लिहीत आहें.

येथें लंडनमध्यें व आसपास अशीं अनेक कुटुंबें राहतात कीं, ज्यांनीं बरींच वर्षें हिंदुस्थानांत घालविलेलीं आहेत व ज्यांना हिंदी जनतेबद्दल बराच आदर आहे. दुसरीं अशीं बरींच कुटुंबें आहेत कीं, ज्यांना हिंदुस्थान-बद्दल व हिंदी विद्यार्थ्यांबद्दल खूप कुतूहल आहे. अशा सर्व किंवा बऱ्याचशा कुटुंबांनीं एकत्र येऊन एक ' इस्ट ॲन्ड वेस्ट फ्रेंडशिप असोसिएशन ' नांवाची संस्था निर्माण केली आहे. हिंदी विद्यार्थ्यांना त्या संस्थेबद्दल माहिती

दिली जाते व त्यांनीं सहकार्य करावयाचें ठरविल्यास त्यांना ह्यापैकीं कांहीं कुटुंबांकडून पाहुणचारासाठीं निमंत्रण येतें. सप्ताहांत सुटीसाठीं व मोठ्या सुटींतील कांहीं दिवसांसाठीं ह्या प्रकारचीं कांहीं निमंत्रणें येतात व त्यानुसार कांहीं विद्यार्थी ह्या कुटुंबांतून दोन-तीन दिवसांसाठीं राहावयास जातात. हीं कुटुंबें चांगलीं श्रीमंत असल्यानें येणाऱ्या विद्यार्थ्यांकडून त्यांना पैशाची मुळींच अपेक्षा नसते. पाहुणचाराचे दिवसांत ते मुद्दाम पाहुण्यांकरितां नवीन कांहीं करीत नाहींत. परंतु, त्यांची नेहमींचीच राहणी मोठी थाटाची असल्यानें पाहुण्याला मात्र आपल्यासाठीं कांहीं खास पक्वान्न केलें आहे असें वाटतें. पाहुणा कुटुंबांत खेळीमेळीनें व लहान मुलांशीं खेळून वगैरे वागला तर हे लोक त्याचें खूप कौतुक करतात व मग त्या पाहुण्यास त्या कुटुंबाच्या पाहुणचाराचीं बरींच निमंत्रणें येतात असें मला समजलें. अशाच प्रकारचें बोलावणें मला आल्यानें मी नाताळासाठीं सेंट अल्बान्स येथें आलेलों आहें.

अतिप्राचीन काळीं म्हणजे ख्रिस्तपूर्व पहिल्या शतकांत वेसलामियम नांवाचें एक शहर येथें अस्तित्वांत होतें व अल्बन नांवाच्या एका रोमन शिपायाला ख्रिश्चन धर्माच्या एका उपदेशकाला आपल्या घरांत आसरा दिल्याबद्दल देहान्त प्रायश्चित्त घ्यावें लागलें होतें. ख्रिश्चन धर्मासाठीं हुतात्मा होणारा अल्बन हा पहिला होय आणि म्हणूनच त्याच्या स्मरणार्थ ह्या गांवाचें नांव मागाहून ' सेंट अल्बान्स ' असें ठेवण्यांत आलें आहे. आतां हें सर्व आधुनिक सुखसोयींनीं परिपूर्ण असलें तरीहि येथें सेंट अल्बान्सपूर्वींच्या इतिहासाची स्मृति घडविण्याइतपत जुनें आहे. इंग्लंडमधील छापखान्यांच्या धंद्यांत सेंट अल्बान्सचा क्रमांक वर आहे. कारण, अगदीं सुरुवातीला जे कारखाने इंग्लंडांत स्थापन झाले त्यांत वेसलामियम येथील छापखाना हा तिसरा होता. सध्यांसुद्धां उत्तम छपाईचें काम सेंट अल्बान्सलाच होतें.

सर्व इंग्लंडमध्यें एकमेव व अद्वितीय असें जें रोमन थिएटर आहे तें येथें असल्यानें अनेक प्रसिद्ध इतिहाससंशोधकांचें येथें सारखें येणें-जाणें चालू असतें. सुमारें ५०′ × ३०′ चें मोठें स्टेज व समोर अर्धवर्तुळाकृति बसण्याची सोय असें हें थिएटर आहे. बसण्याची सोय आपण स्टेडियम पाहतों त्या प्रकारची पायऱ्या पायऱ्यांनीं बनविलेलीं अशी आहे. इसवी सनापूर्वीं येथें मानवाच्या, हिंस्र पशूंच्या तसेंच इतर प्राण्यांच्या आपापसांतील लढाया

होत व ह्या स्टेडियमवर बसून हजारों प्रेक्षक तें दृश्य पहात—असा लेख ह्या थिएटरच्या जवळ लावलेला आहे. ह्या सर्व भागांत उत्खनन करून अनेक प्राचीन अवशेष खोदून काढण्यांत आलेले आहेत व त्या सर्वांचें एक छोटेंसेंच पण सुंदर म्यूझियम् तयार करण्यांत आलें आहे. प्राचीन पद्धतीचीं घरें, त्यांतील उजेडाची व्यवस्था, रात्रीचे दिवे, भांडीं, नाणीं इ. सर्व प्रकारच्या वस्तूंचें हें फारच छान प्रदर्शन आहे. पण ज्यालां अतिप्राचीन वस्तूसंबंधीं फारसें प्रेम नसेल त्याला ह्या म्यूझिअममध्यें सहा पेनी देऊन पाहण्याजोगें कदाचित् कांहीं आढळणार नाहीं. ह्या म्यूझियमव्यतिरिक्त ह्रायपोकस्ट नांवाची एक जागा येथें प्रेक्षणीय आहे. येथें जमिनीच्या सपाटीवर असलेल्या एका कुंडांत पाणी गरम होण्याची योजना असून तें तापविण्यासाठीं केलेली योजना ही त्या स्थानापासून दूर कुठें तरी जमिनीच्या खालीं आहे. त्यामुळें विस्तवाशिवाय पाणी गरम होतें. ही जादू वाटावी अशी कल्पना आहे. दिल्लीच्या लाल किल्ल्यांत बादशाही हमाम पाहिले होते ते येथें आठवले. तेथेंहि अशीच पाणी तापविण्याची एक गुप्त योजना अस्तित्वांत होती. पण तें कसें तापतें हें शोधण्याच्या प्रयत्नांत कोणा इंग्रज संशोधकानें ती संपूर्ण नाहींशी केली असें लाल किल्ल्यांत सांगितलें जातें.

येथेंच पलिकडे रोमन भिंतींचे अवशेष अजूनहि उभे आहेत. ग्राम-संरक्षणार्थ मानवानें उभ्या केलेल्या ह्या भिंती. त्यां काळीं बांधतांना मानवाला वाटलेला अहंकार इत्यादि सर्व लक्षांत घेऊन फार गंमत वाटली. येथें पुरातन काळीं फार वैभवसंपन्न शहर होतें. अभेद्य अशा तटांनीं त्याचें संरक्षण केलेलें होतें. तत्कालीन सुखसोयींचीहि तेथें वाण नव्हती. सध्यां ज्याला सेंट्रल हीटिंग असें म्हणतात तशाच प्रकारची आंतून घरें तापविण्याची सुरेख योजना त्या काळींहि ह्या गांवांत असल्याची खातरजमा तज्ज्ञांनीं केली आहे. पण त्यांपैकीं आतां कांहींच शिल्लक नाहीं. ‘सा रम्या नगरी महान् स नृपतिः’ इत्यादि स्मरून कालाय तस्मै नमः असें म्हणावेंसें वाटावें असें हें सारें दृश्य आहे! आपण विजयनगर, हम्पी येथील उत्खनन पाहातों. त्यांत आपला इतिहास गुंतलेला असल्यानें आपणांस जास्त आपुलकी वाटते. येथें हें पाहात असतांना कुतूहल जास्त वाटतें—असा माझा अनुभव आहे.

हें अतिप्राचीन शहर सोडलें तरी अकराव्या शतकांत बांधलेलें सेंट

अल्बान्सचें चर्च, बाराव्या शतकांत बांधलेला मोठा थोरला मठ—येथें सध्यां शाळेची इमारत बांधलेली आहे—तेराव्या शतकांत बांधलेलें एक क्लॉक टॉवर ह्याहि गोष्टी प्रेक्षणीय आहेत. ह्यापैकीं सेंट अल्बान्सचें चर्च मला थेट वरच्या टोकापर्यंत जाऊन पाहावयास मिळालें. तीनशें फूट लांबीचा येथील सभामंडप हा सुद्धां मोठा प्रेक्षणीय आहे. इतका लांब सभामंडप इतरत्र कोठेंहि नाहीं असें म्हणतात. ३०० फूट लांब व १९५ फूट उंच अशा ह्या मंडपांत एका टोंकाला दोन मोठे ऑर्गन्स ठेवलेले आहेत व त्यांचे सूर उंच नळकांड्यांतून वरच्या छतावर आपटून प्रतिध्वनित व्हावेत अशी मुद्दाम योजना करण्यांत आली आहे. उंच चौथ्या मजल्यावर घंटाघर असून प्रार्थनेच्या वेळीं व कांहीं नैमित्तिक प्रसंगीं घंटा वाजविण्यासाठीं योजना केलेली आहे. पण ह्यापेक्षां फारच गंमतीची गोष्ट मला येथें पाहावयास मिळाली. ती अद्यापपावेतों पूर्वी कोठेंहि पाहावयास मिळाली नव्हती. बडोद्याच्या मोठ्या टॉवरचे अर्ध्या तासाचे व पाव तासाचे ठोके पडतात, हें अनेकांनीं ऐकले असतील. किंवा सध्यां रेडिओवर बिग बेन ऐकूं येतें त्यांत प्रथम जें वाजतें त्याला चायमिंग ( Chiming ) असें म्हणतात. हें प्रत्येक पंधरा मिनिटांनीं वाजतें. व तासाच्या शेवटीं जितके वाजले असतील तितके टोले पडतात. येथील घड्याळांत आणखी एक सोय करण्यांत आली आहे. सिग्नलच्या दांड्यासारख्या लांकडी दांड्यांना स्प्रिंग्जनीं बांधून दोऱ्या घंटांच्या लंबकापर्यंत नेलेल्या आहेत. दांड्याला धक्का मारला, कीं स्प्रिंगनें दोरी ओढली जाते. व लंबक घंटेवर आपटून आवाज निर्माण होतो. निरनिराळ्या सुरांत वाजणाऱ्या अशा एक्षोणीस घंटा सेंट अल्बान्समधील ह्या घंटाघरांत बांधलेल्या आहेत. व त्या एका ठराविक क्रमानें वाजवल्या कीं जलतरंगावर एखादें पद वाजवावें किंवा घंटातरंगावर गोड संगीत वाजवावें तसें संगीत ऐकूं येतें. हे सिग्नलसारखे लांकडी दांडे जेथें उभे केले आहेत तेथेंच त्यांना एका विशिष्ट क्रमानें धक्का देण्यासाठीं एक फिरता ड्रम बसविलेला आहे. ह्या ड्रमला बारीक बारीक खुंट्या एका विशिष्ट पद्धतीनें ठोकलेल्या आहेत. हा ड्रम फिरूं लागला कीं, ह्या खुंट्या त्यांच्या विशिष्ट स्थानानुसार त्या त्या दांड्याला धक्का देतात. आणि त्या त्या घंटा वाजवून त्यांतून एक बसविलेलें पद वाजतें. हें सर्व एका क्लॉकवर्कवर बसविलेलें आहे व दर तीन तासांनीं हें

सुमधुर गान-संगीत ऐकूं येतें. ह्यांत कांहीं प्रार्थनाहि संगीतांत बसविल्या असल्याचें मला कळलें. असे सहा ड्रम्स् तयार करण्यांत आलेले असून रोज नवीन पद वाजावें अशीहि योजना आहे म्हणतात. मदुरेला मीनाक्षीच्या देवळांत दगडी खांबांचा घंटातरंग पाहिला होता त्याची मला येथें आठवण झाली. मदुरेला ज्या वेळेला गाईडनें आपल्याला सांगितलें कीं, ह्या खांबावर निरनिराळ्या आरत्या, स्तोत्रें वाजवितां येतात तेव्हां तें मलासुद्धां असंभवनीय वाटलें होतें. पण येथें ती कल्पना मूर्त स्वरूपांत पाहून खात्री पटली. आणखी एका जुन्या पद्धतीची कल्पना येथें पहावयास मिळाली. चर्चमधील वेगवेगळ्या खोल्यांतून वेगवेगळे अधिकारी राहतात. त्यांना त्यांच्या खोल्यांतून शिपायाला बोलाविण्यासाठीं इलेक्ट्रिक घंटा नसून दोरीची घंटा आहे. शिपाई बसतो तेथें डोक्यावर ओळीनें दहा वेगवेगळ्या सुरांच्या घंटा टांगलेल्या आहेत. कोणत्या खोलींतील घंटा वाजली हें आवाजावरून ओळखून शिपाई त्या अधिकाऱ्याकडे जातो. आधुनिक युगांत घंटेशेजारीं लावलेल्या क्रमांका-वरून खोली ओळखण्याची पद्धत असतांनासुद्धां येथें ही प्राचीन पद्धत पाहून मला गंमत वाटली.

माझ्या येथील मुक्कामांत छोट्या मुलांबरोबर बर्फावर खूप खेळण्याची, घसरगुंडी करण्याची व येथील पद्धतीप्रमाणें 'स्नो मॅन' करण्याची फार मजा आली. मी जेथें उतरलों आहें तेथें डेव्हिड नांवाचा एक नऊ वर्षांचा मुलगा व त्याच्या तीन छोट्या छोट्या बहिणी आहेत. काल आम्ही सर्वांनीं मिळून बाहेरच्या अंगणांत छोट्या रोझॅलिंडच्या उंचीचा एक 'स्नो मॅन' तयार केला आहे. माझी हिंदुस्थानांतील प्रवासाचीं चित्रें पाहून कुटुंबांतील मंडळी व हीं मुलें फारच खुश झालेलीं आहेत व डेव्हिड सर्व प्रकारचे प्रश्न विचारून भारतासंबंधीं माहिती करून घेत आहे. ह्या मुलांनीं एक छोटा पांढरा ससा पाळलेला असून त्याचें 'स्नो-व्हाईट' हें नांव अन्वर्थक आहे. रोजच्या जेवणाच्या वेळीं स्नो-व्हाईटला त्याचें खाद्य दिल्याशिवाय मुलें टेबलावर जेवावयास येत नाहींत. अनेकविध गोष्टी मी सध्यां ह्या कुटुंबांत चौकस बुद्धीनें पाहत आहें. प्रसंगोपात्त केव्हां तरी त्यासंबंधीं लिहीनच. कळावें.

आपला,

XXX

# लंडन टॉवर

लंडन

स. न. वि. वि.

लंडनमधील रीजंट पार्कमधल्या ‘ पोलर बेअर ’ ला गेल्या आठवड्यांत अगदीं आपल्या स्वगृहीं आल्याचा आनंद झाला असेल बहुधा ! उष्णतामान १७° पर्यंत खालीं उतरलें. खूप बर्फ पडलें. जेथें जेथें लहान लहान तलाव होते तेथें तलावावर बर्फाचा जाड थर तयार झाला आणि शास्त्राच्या पुस्तकांत वाचलेली पाण्याचे नळ फुटण्याची गंमत प्रत्यक्ष पाहावयास मिळाली. रस्त्यावर, घरांच्या छपरांवर, शुष्क झालेल्या झाडांच्या फांद्यांवर, रस्त्यांतील पोस्टाच्या पेट्यांवर आणि टेलिफोन बूथवर चांगला जाड बर्फाचा थर चढला. ह्याहिपेक्षां गंमत म्हणजे रस्त्यावरून पळणाऱ्या मोटारींवर जमलेल्या बर्फाच्या थराची दिसत होती. काश्मीरमध्यें असतांना ‘ खिलनमर्ग ’ वर आम्हांला बर्फाच्या वर्षावानें गांठलें होतें, पण तेथील बर्फ हें छोट्या छोट्या गारांच्या स्वरूपांत होतें. केदारनाथवरून उतरण्यास सुरुवात करतांनाहि बर्फाच्या वादळानें कित्येकांना गांठलें होतें. पण येथील हिमवर्षावाची गंमत कांहीं वेगळीच आहे ! येथें बर्फ पडतें तें अगदीं भुसभुशीत, पक्ष्याच्या आंतल्या पांढऱ्या बारीक पिसांसारखें हलकें, शुभ्र व मऊ-पोह्यासारखें असल्यामुळें तेथें ह्यास ‘ Snow-flakes ’ म्हणतात. आणि एकदां हें पडायला लागलें कीं, भुरभुरू जोरांत व खूप वेळपर्यंत पडतें. अर्ध्या तासाच्या आंत घरांतून बाहेर पडावयाच्या पायऱ्यांवर बर्फाचा चांगला जाड थर जमतो. आपण रस्त्यावर चालत असलों तर ओव्हरकोटावरहि चांगलें जोरांत बर्फ सांठूं लागतें.

हल्लीं येथें रोज बर्फ पडण्याचा मोसम सुरू झाला आहे. रस्त्यावरून चालतांना बर्फाचा करकर आवाज मोठा मनोहर वाटतो. पण थांबल्यावर पाय असे थंड झालेले असतात कीं, शेगडीसमोर पाय धरून पांच-दहा मिनिटें बसावें तेव्हां त्यांच्यांत जीव येतो. ह्या परिस्थितीमुळें आवश्यक तेवढेंच बाहेर जावें आणि इतर वेळीं खिडकींतून बाहेर पाहत बसावें असें बंधन निर्माण होतें. पण असें असूनहि येथील लोकांच्या व्यवहारांत यत्किंचित्‌हि

शैथिल्य आलेलें दिसत नाहीं. वाचणारांची गर्दी ग्रंथालयांत व नाताळासाठीं खरेदी करणारांची गर्दी येथील मोठाल्या दुकानांत पूर्वींप्रमाणेंच आहे. इंग्रज माणूस हा त्याच्या देशाच्या हवामानाप्रमाणें थंड आहे. मात्र, त्याच्या इच्छेनुसार त्याला पांढरा बर्फाच्छादित नाताळ पाहायला मिळणार असल्यामुळें तो जास्त उल्हसित झाला आहे.

गेले दोन दिवस मी ग्रंथालयांतच नऊ नऊ तास बसून वाचन करीत आहें. सतत बर्फ पडत असल्यामुळें कुठेंहि हिंडावयास गेलेलों नाहीं. पण काल शनिवारीं मात्र अशाप्रकारें बसण्याचा उद्वेग आला आणि सर्व लंडनमधील गंमत पाहाण्यासाठीं बाहेर पडलों. संपूर्ण बर्फानें आच्छादिलेल्या रसेल स्क्वेअरचें एक छायाचित्र घेऊन मी माझ्या येथील एका मित्रासह खूप दूर हिंडावयास गेलों. सर्व प्रमुख वर्तमानपत्रांच्या कचेऱ्या असलेल्या फ्लीट स्ट्रीट ओलांडून व ख्रिस्तोपर रेनचें मूर्तिमंत स्मारक असें सेंट पॉलचें चर्च पाहून आम्ही हिंडत हिंडत येथील प्राचीनतम अशा 'टॉवर ऑफ लंडन' ह्या वास्तूंत आलों. तेथें पाहिलेल्या सर्व गोष्टींचा मनावर इतका परिणाम झाला कीं, आज त्याचसंबंधीं लिहिण्याचें मीं ठरविलें आहे.

आतांपावेतों 'लाल किल्ला' पाहात असतांना किंवा आग्ऱ्याच्या किल्ल्यांत अमरसिंग दरवाजानें शिरत असतांना, किंवा फत्तेपूर शिक्रीच्या अंतर्भागांत राणी जोधाबाईचा महाल पाहत असतांना ज्या प्रकारचे भाव मनांत निर्माण होत असत त्याहून फारच भिन्न असे भाव येथें निर्माण झाले. त्यांत कोणत्या प्रकारचा भेद होता व तो कां निर्माण झाला हा मानसशास्त्राचा विषय असल्यानें तें समजाविण्याच्या भानगडींत मी पडत नाहीं.

जाड लोकरीचे कपडे घातलेले व कानासकट डोळे आच्छादणारे शहामृगाच्या पिसांनीं भूषविलेलें शिरस्त्राण चढवून संगिनीसह बंदुकी घेतलेले दोन पहारेकरी येथें प्रवेशद्वाराशीं पहारा करीत होते. त्यांच्याकडे थोडें कौतुकानें पाहून आम्ही आंत शिरलों. हिंदुस्थानांतल्याप्रमाणें येथेंहि किल्ल्याला खंदक होता. आतां खंदकांत पाणी नाहीं. पण खंदकाच्या खुणा कायम आहेत. खंदकावरील पुलावरून आंत गेल्याबरोबर उजव्या हातास माहितीपत्रकें, फोटो इ. विकण्याचें एक दुकान होतें. तेथून एक माहितीपत्रक घेऊन आम्ही पुढें निघालों. खंदकावर तीन दिशांना तीन पूल आहेत.

अनुक्रम २६३७४ वि: भू-प्रवास
क्रमांक १०३

पैकीं तमसानदीच्या दिशेस असणाऱ्या छोट्या पुलावरून आम्ही नदीची शोभा पाहण्यासाठीं गेलों. येथें जवळच नदीवर मोठा पूल असून त्यास टॉवर ब्रिज असें म्हणतात. ह्या पुलाचें वैशिष्ट्य असें आहे कीं, पुलाखालून मोठें जहाज जावयाचें असल्यास पुलाच्या मधल्या कमानीचे दोन भाग वर अधांतरीं उचलले जाऊं शकतात. जहाज गेल्यानंतर पुनश्च पूल पहिल्यासारखा रहदारीस मोकळा होतो.

नदीच्या कांठाला असलेल्या किल्ल्याच्या भागांत इंग्रजांनीं वेळोवेळीं लढायांतून जिंकून आणलेल्या मोठमोठ्या तोफा ठेवण्यांत आल्या आहेत. " ही फ्रेंच तोफ १७३५ च्या लढाईत जिंकून आणली ', ' ही जर्मन तोफ अमक्या लढाईत हस्तगत केली ' ह्या प्रकारच्या ताम्रपटांनीं ह्या तोफांचा इतिहास त्यांच्यावर लिहून ठेवण्यांत आलेला आहे. आपल्या हिंदुस्थानच्या तीन मोठ्या तोफा तेथें आढळल्या. पैकीं सर्वांत मोठी ' टिपू सुलतानानें करविलेली कर्नाळच्या किल्ल्यांतून १८३८ सालीं आणली ' असा उल्लेख सांपडला. टिपू सुलतानाचें हें ह्या प्रकारचें स्मारक येथें पाहून मनाला फार खंत वाटली. ह्या तोफा ज्या कांठाला ठेवल्या आहेत तेथेंच खालच्या अंगाला एक कालव्यासारखी योजना असून त्यांतून आंत किल्ल्यांत येण्यासाठीं एक दरवाजा केलेला आहे. इतिहासांत ह्या दरवाजाचें नांव अमर झालेलें असून ह्या दरवाजांतून आंत आलेल्या अनेक व्यक्तींनीं जगाचें अखेरचें दर्शन येथूनच घेतलेलें आहे. ह्यास ' ट्रेटर्स गेट ' असें म्हणतात. सर थॉमस मूरसारखे विद्वान् व गाय फॉक्ससारखे अपराधी असे सर्व प्रकारचे लोक ह्या ' ट्रेटर्स गेट ' मधून ह्या किल्ल्यांत प्रविष्ट झाले व येथूनच परस्पर यमसदनांतहि त्यांचा प्रवेश झाला ! पांढऱ्या रंगाच्या विटांनीं बांधलेला येथील व्हाईट टॉवर काय, किंवा संपूर्ण किल्लाच काय अनेक अपराधी आणि निरपराधी लोकांच्या रक्तानें तांबडालाल झालेला आहे.

किल्ल्यांत जेथें जेथें हिंडावें तेथें तेथें प्राचीन राजांच्या अमानुष कृतींचीं स्मारकें दिसतात. वास्तविक हा किल्ला हा खरा राजवाडा म्हणून बांधकामांत आलेला होता. परंतु आतांपावेतों त्याचा उपयोग राजवाडा, तुरुंग, जवाहीरखाना ह्या वेगवेगळ्या प्रकारानें करण्यांत आलेला आहे. सर्व राजमुगुट व मौल्यवान् हिरे-माणकें इत्यादि जवाहीर येथें सध्यां आहेत. १९४१ मध्यें

सुद्धां ह्याचा उपयोग तुरुंगासारखा करण्यांत आला होता व सुप्रसिद्ध जर्मन कैदी रुडोल्फ हेस ह्यास ह्याच किल्ल्यांत ठेवण्यांत आलें होतें. आज टॉवर ऑफ लंडन ह्यास एक वस्तुसंग्रहालयाचें स्वरूप आलेलें असून रोज अनेक परदेशस्थ लोक हें पाहाण्यास येत असतात. ठिकठिकाणीं पाट्या लावून त्या त्या स्थानाचें महत्त्व सांगणारे लेख त्या त्या ठिकाणीं लावल्यामुळें ह्या पुराण्या किल्ल्याचें खरोखरच म्यूझियममध्यें रूपांतर झालें आहे. सुमारें सातशें वर्षांचा इतिहास तेथें पाहत असतांना अनेक वेगवेगळ्या प्रकारच्या भावनांनीं मन भरून येतें.

१४८३ सालीं ड्यूक ऑफ ग्लाउसेस्टर ह्याला राज्यतृष्णेनें पछाडलें. आणि राज्याचे खरे वारसदार दोन छोटे राजपुत्र रिचर्ड व एडवर्ड ह्यांना मोठ्या युक्तीनें व लबाडीनें त्यानें ह्या टॉवरमध्यें आणून ठेवलें. अकरा व तेरा वर्षें वयाचीं अजाण निष्पाप अशीं हीं मुलें ह्या किल्ल्यांत कांहीं दिवस सुखानें राहिलीं. पुढें आपल्या चुलत्याचा राज्य बळकाविण्याचा डाव थोरल्या राजपुत्राच्या ध्यानांत आला व त्यानें त्यासंबंधीं चौकशी करण्यास सुरुवात केली. ह्यानंतर राजपुत्रांना जिवंत ठेवणें, हें धोक्याचें आहे हें लक्षांत आणून ड्यूक योग्य अशा मारेकऱ्याच्या शोधास लागला. पण ह्या सुंदर व निष्पाप राजपुत्रांच्या वधास कुणीच तयार होईना. अखेर टायरेल नांवाचा एक सुमेरसिंग त्याला सांपडला व एका रात्रीं हे दोन सुंदर राजपुत्र झोपले असतांना टायरेलनें आपल्या दोन हस्तकांच्या साहाय्यानें पुतण्यांना नाहींसें करून काकांचा राज्य बळकाविण्याचा मार्ग खुला केला. पुढें दोनशें वर्षांनंतर ह्या दोन मुलांच्या अस्थि टॉवरच्या एका जिन्याच्या खालीं सांपडल्या तेव्हां हें कृष्णकृत्य उघडकीस आलें. मध्यंतरांत त्या काकालाहि हें राज्य पचलें नाहींच. कारण तीनच वर्षांनंतर सातव्या हेन्रीनें त्याचा पराभव करून त्याचें डोकें उडविलें. रिचर्ड व एडवर्ड ह्या दोन राजपुत्रांचें एक चित्र ह्या टॉवरमध्यें असून तें फारच सुंदर आहे. मी लहान असतांना मला ' हायरोडस् ऑफ हिस्ट्री ' नांवाचीं पुस्तकें वाचण्यास दिलीं जात असत. त्यांत ह्या राजपुत्रांचें हेंच चित्र होतें असें मला आतां स्मरतें.

सर थॉमस मूर हा सुरुवातीस आठव्या हेन्रीचा परममित्र होता. आणि अनेक वेळीं राजेसाहेब मूरच्या घरीं जाऊनसुद्धां आपला स्नेह वृद्धिंगत करीत

 ग्रं. क्र. ११३८९ 

असत. पण कॅथेरीनेशीं लग्न रद्द करून अॅन् बुलीनशीं लग्न करण्यास जेव्हां थॉमस मूर संमति देईना तेव्हां हा स्नेह संपूर्णतया संपला. थॉमसला ह्या टॉवरमध्य तुरुंगांत टाकण्यांत आलें व थोड्याच काळानंतर त्याचें डोकें उडविण्यांत आलें. पण ह्याप्रकारें मूरचें डोकें उडवून ज्या अॅन् बुलीनशीं ह्या हेन्रीनें लग्न केलें तिचेंहि डोकें त्याच ठोकळ्यावर तीन वर्षांत उडविलें जावें हा प्रसंग विलक्षण नव्हे का? एवढ्यानेंच थांबलें नाहीं. ह्याच्या पुढच्याच वर्षीं आठव्या हेन्रीच्या आणखी एका राणीचें–कॅथेरीन हॉवर्डचें डोकें त्याच ठोकळ्यावर उडविण्यांत आलें.

आज ह्या इतिहासप्रसिद्ध ठिकाणीं एक ताम्रपट जमिनींत पुरला असून तेथें वर एक पाटी लावण्यांत आली आहे. त्याच्या भोंवतालीं सांखळ्यांनीं जागा संरक्षित केली आहे. आणि हा इतिहासप्रसिद्ध ठोकळा आणि ज्या कुऱ्हाडीनें एका घावांत डोकें धडापासून वेगळें केलें जात असे ती कुऱ्हाड वर संग्रहांत ठेवण्यांत आली आहे. लॉर्ड हेस्टिंग्ज, अॅन् बुलीन, मार्गारेट हॉवर्ड, लेडी जेन ग्रे-तिचा नवरा गिलफर्ड डडले इत्यादि अनेकांचे शिरच्छेद ह्या ठिकाणीं करण्यांत आले आहेत.

ह्या किल्ल्यांत ब्लडी टॉवर नांवाचा एक बुरूज आहे. ह्याच बुरुजांत मोठमोठाले नामांकित लोक तुरुंगवास भोगून गेले. जेम्सच्या मर्जींतून उतरलेल्या सर वॉल्टर रॅलेनें चौदा वर्षें येथेंच राहून जगाचा इतिहास लिहिला. तुरुंगांत पुस्तक लिहिण्याचा हा प्रसंग सर वॉल्टर रॅलेचा १६०४ ते १६१८ ह्या कालांतला आहे. ह्याच्याहि पूर्वीं ह्याच बुरुजांत लॅटिमर व रिड्ले ह्यांनाहि ठेवण्यांत आलें होतें व क्रॅन्मरला वधस्थानाकडे नेलें जात असतांना पाहूनच त्यांची आपल्या मनावरची श्रद्धा बळकट झाली होती. ‘मित्रा’ आज आपण अशी एक ज्योत पेटवूं कीं, ‘जी कधींहि कुणाच्यानें-हि विझवली जाणार नाहीं’ हे चिरंजीव झालेले शब्द ह्याच तुरुंगांत घुमले होते. सर जॉन इलियट, आर्च बिशप लॉर्ड इत्यादि अनेकांनींहि येथेंच तुरुंगवास भोगला होता. ह्या अनेक वर्षें तुरुंगवास भोगणाऱ्या व्यक्तींमध्यें शेवटची व्यक्ति हर रुडोल्फ हेस ही होय. ह्यांपैकीं अनेकांनीं ह्या बुरुजाच्या भिंतीवर अनेक लेख लिहून ठेवलेले आहेत. खोदलेले आहेत. आज ते सर्व जतन केले जावेत म्हणून त्यावर कांचेचीं तावदानें

बसविण्यांत आलेलीं आहेत. व त्यांना क्रमांक घालून त्याचें एक छोटें पुस्तकहि करण्यांत आलेलें आहे. हे सर्व खोदलेले लेख पाहिले व ते लिहिण्याच्या महान व्यक्तींना निरपराधी असतांहि सहन कराव्या लागणाऱ्या कारावासाचें स्मरण झालें कीं, ह्या बुरुजाला ठेवलेलें 'ब्लडी टॉवर' हें नांव अन्वर्थक वाटूं लागतें. पण अशा ह्या संपूर्ण बंदिस्त व कडेकोट बंदोबस्ताच्या तुरुंगांतून कैदी पळाल्याच्याहि दोन आख्यायिका येथें नमूद आहेत. लॉर्ड नीत्स डेल ह्यानें आपल्या पत्नीच्या साहाय्यानें आपली सुटका करून घेतली होती. त्या सुटकेचा वृत्तान्त आपल्या 'आग्र्याहून सुटके'च्या वृत्तान्ताइतकाच मनोरंजक व रोमांचकारी आहे, तसें म्हटलें तर ह्या किल्ल्यांत घडलेला सर्वच वृत्तान्त रोमांचकारी आहे.

ट्रेटर्स गेट, ब्लडी टॉवर आणि एक्झिक्यूशन ब्लॉक हें पाहून आम्हीं येथील नामांकित 'आरमरी' पाहण्यास गेलों. मुंबईच्या म्यूझियममध्यें जशीं सर्व प्रकारचीं शस्त्रें आतां संग्रहित केलीं आहेत. तशींच येथील व्हाईट टॉवर ह्या चार मजली इमारतींत हीं संग्रहित केलीं आहेत. एका मजल्यावर सर्व प्रकारचे भाले, बरच्या, परशु, तलवारी इ. शस्त्रें तर एका मजल्यावर सर्व प्रकारच्या बंदुका, पिस्तुलें-चिलखतें, शिरस्त्राणें इत्यादि साहित्य आहे. एका मजल्यावर घोडेस्वाराचें सर्व चिलखत, घोड्यावर घालावयाचें चिलखत, जिरेटोप इ. सर्व ठेवलेलें आहे. शिवाय दोन घोडेस्वार सर्व चिलखतासह युद्धाच्या संपूर्ण तयारींत असलेले असें सुंदर तयार करून ठेवले आहेत. हे दोन मोठे पुतळे 'लाईफ साईज' आहेत. पण प्रत्यक्ष युद्ध दाखविलेले दोन पुतळे छोट्या आकाराचे आहेत. एका मजल्यावर डोकें उडविण्यासाठीं केलेला लाकडी ठोकळा, आणि शेजारींच डोकें उडविलेली ती इतिहास-प्रसिद्ध कुऱ्हाड ठेवली आहे. ह्या कुऱ्हाडीनें कुणाकुणाचीं डोकीं धडावेगळीं केलीं त्याची नांवनिशीवार व तारीखवार यादीहि शेजारीं लावली आहे. तळमजल्यावर सर्व प्रकारच्या मोठाल्या तोफा ठेवल्या आहेत. त्यांत एक बसलेल्या वाघाच्या आकाराची असून त्या वाघाच्या तोंडांतून गोळा बाहेर पडण्याची योजना आहे. ही तोफ टिपूनें ओतवली असा उल्लेख त्यावर असून कर्नोळहून १८३८ मध्यें ती इकडे आणल्याचा लेख त्यावर मुद्रांकित केलेला आहे.

ह्या सर्वांव्यतिरिक्त पाहण्यासारखी येथें आणखी एक गोष्ट आहे. टॉवर ऑफ लंडन ही लंडनमधील सर्वांत जुनी, सर्वांत मजबूत व सर्वांत सुरक्षित अशी इमारत असल्यामुळें येथील वेकफिल्ड टॉवर ही वास्तु लंडनच्या राजाचें जडजवाहीर सुरक्षित ठेवण्याकरितां निवडण्यांत आली आहे. क्रॉम्वेलनें त्याच्यापूर्वीं अस्तित्वांत असलेलें सर्व जवाहीर विकले व सर्व सोनें आटवलें. क्रॉम्वेल हा इंग्लंडच्या इतिहासांत पुष्कळच गोष्टीविषयीं प्रसिद्ध आहे, त्यांतलीच ही एक आहे. त्यानंतर १६६० सालीं पुनः सर्व राजमुगुट, राजदंड इ. तयार करण्यांत आले व तेथपासून तयार करण्यांत आलेले सर्व राजमुगुट येथें ठेविलेले आहेत. दुसऱ्या चार्ल्ससाठीं केलेला मुगुट, व्हिक्टोरिया राणीसाठीं १८३८ मध्यें करण्यांत आलेला राजमुगुट, प्रिन्स ऑफ वेल्ससाठीं केलेला दोन कमानींचा छोटा मुगुट हे सर्व प्रेक्षणीय आहेत. दिल्ली दरबारासाठीं पांचव्या जॉर्जनें घातलेल्या मुगुटांत तीन हजार रत्नें जडविलेलीं आहेत व वर सहा हजार हिरे बसविलेले आहेत;—असें वर्णन तेथें लिहिलेलें सांपडलें. एकशें आठ कॅरट वजनाचा कोहिनूर हा सध्यांच्या राजमुगुटांत जडविण्यांत आला आहे. सध्यांच्या राजदंडांत पांचशें पंचवीस कॅरट वजनाचा आफ्रिकेंतून आणलेला एक मोठा हिरा बसविण्यांत आलेला आहे. ह्या राजदंडाव्यतिरिक्त व राजमुगुटां-व्यतिरिक्त एक सोन्याचें मोठें 'वाईन फाउन्टन' येथें ठेविलेलें आहे. सोन्याचीं अनेक छोटीं छोटीं सॉल्ट सेलर्स व तीन कॉरोनेशन रिंग्ज हींहि येथेंच ठेवलीं आहेत. का कुणास ठाऊक पण हें सर्व वैभव पाहत असतांना मला त्यांचें फारसें मोठें कौतुक वाटलें नाहीं. गोवळकोंड्याच्या खाणींतून जन्माला येऊन तमसा नदीच्या कांठावरील त्या रक्तलांच्छित किल्ल्यांतील एका कपाटांत बंदिस्त असलेल्या कोहिनुरानें माझ्या मनाचा मोठा गोंधळ उडवला हेंच ह्याचें कारण असावें. आमच्या त्र्यंबकेश्वराच्या रत्नजडित मुगुट पाहून ज्या प्रकारचें समाधान लाभलें होतें तें कांहीं येथें लाभलें नाहीं. कदाचित् ह्या बंदिस्त मुगुटासाठीं उडविलेल्या डोक्यांच्या भेसूर आकृति समोर दिसल्यामुळें ह्या वैभवशाली दृश्याचा परिणाम माझ्यावर घडला नसावा. ह्या वेकफिल्ड टॉवरमध्यें निरनिराळ्या प्रकारचे राजसन्मानाचे बिल्लेहि प्रदर्शनार्थ वेगवेगळ्या कपाटांतून ठेवले आहेत. पूर्वीं संस्थानें अस्तित्वांत

असतांना संस्थानिकांच्या त्या पंधरा पंधरा, सोळा सोळा अखरीं G. C. I. E. इत्यादि पदव्या पाहून जें कळलेलें नव्हतें तें येथें कळलें. कारण, त्या पदव्या व त्यांचे बिल्ले येथें प्रदर्शित केलेले आहेत. हा किल्ला पाहण्यांत आम्ही जवळ जवळ चार तास घालविले. पण सर्व ठिकाणीं सर्व पाट्यांवरील मजकूर वाचावयाचें ठरविलें असतें तर निश्चित सहा तासहि पुरले नसते. कळावें.

आपला,
× × ×

## टिलमनस्टन कोलियरी

स. न. वि. वि.

एका शनिवारीं येथून सुमारें ऐशीं मैलावर असलेली एक ' टिलमनस्टन कोलियरी ' नांवाची कोळशाची खाण पाहण्यास आम्ही गेलों होतों. इंग्लंडमध्यें कोळशाचें उत्पादन खूप होतें हें आतापावेतों फक्त भूगोलांत वाचलेलें होतें. पण प्रत्यक्ष कोळशाची खाण पाहण्याचा हा पहिलाच प्रसंग होता. जगांत दरवर्षी ११ अब्ज टन कोळसा खाणींतून काढण्यांत येतो. ह्या एकूण कोळशापैकीं ४९ टक्के उत्पादन एकट्या अमेरिकेंत होतें. इंग्लंडमध्यें ११ टक्के होतें. इंग्लंडचें व हिंदुस्थानचें आकारमान तुलनेस जमा धरलें तर हिंदुस्थान व पाकिस्तान मिळून एकूण कोळशापैकीं २।। टक्के कोळसा उत्पन्न करतात ह्याचें आपल्याला आश्चर्य वाटल्याशिवाय राहणार नाहीं. अर्थात्च इंग्लंडमध्यें कोळशाच्या उत्पादनाकडे फार लक्ष दिलें जातें. व खाणी-कामगारांची येथील संघटना ही मोठी नामांकित संस्था समजली जाते.

आम्ही जी खाण पाहण्यासाठीं गेलों होतों ती १९१३ सालीं सुरू करण्यांत आली. ह्या खाणींत सर्व मिळून ७०० लोक काम करतात.

पैकीं फक्त २६ टक्के प्रत्यक्ष कोळसा फोडणारे असतात. खाणींत वर जमिनीवर काम करणाऱ्यांची संख्या १६ टक्के असते व जमिनीच्या खालीं भूगर्भांत काम करणारे ८४ टक्के असतात. टिलमनस्टन खाणींतून दर आठवड्याला ७ हजार टन कोळसा वर काढला जातो. ही खाण डोव्हरच्या जवळच असून फार मोठ्या खाणींपैकीं एक समजली जात नाहीं; तरीहि तेथील सर्व अद्यावत् व्यवस्था वगैरे पाहून मला मोठें आश्चर्य वाटलें.

खाण पाहण्यास जाण्यासाठीं एक स्पेशल मोटर ठरविण्यांत आली होती. तेथें कपडे घाण होतात म्हणून मळक्या कपड्यांचा एक संच, टॉवेल व साबण बरोबर घेण्याची सूचना देण्यांत आली होती. आम्ही न्याहारी आटोपून नऊ वाजतां निघावयाचें ठरवलें होतें. ९ ला ५ मिनिटें कमी असतांनाच दारांत मोटारीचा भोंगा वाजला. येथील बसेस किंवा कोचेस ह्या फारच आरामशीर आणि ऐटबाज बांधणीच्या असतात. तिच्यांत ड्रायव्हरसह २९ जणांची बसण्याची सोय असते. आम्ही ठीक ९ ला निघालों. लंडनच्या बाहेर पडल्यावर इंग्लंडमधील निसर्गाचें दर्शन घडूं लागलें. ह्या ऋतूंत झाडांचीं पानें गळून पडत असतांनासुद्धां व झाडांवर हिरवीं पानें दिसत नसतांनासुद्धां खालीं अंथरलेल्या हिरव्यागार गालिचामुळें निम्नोन्नत असा तो सर्वच भूभाग चांगला दिसत होता. वर्ड्स्वर्थनें ज्या निसर्गाचें वर्णन केलें तें सर्व डोळ्यांसमोर आणून मी बाहेर पाहत होतों. पण आपल्या तिकडील निसर्गशोभेहून ही शोभा कांहीं वेगळीच वाटते. मी क्रमाक्रमानें हिंदुस्थानांतील आपले मोटारींचे प्रवास आठवून ते मनांतल्या मनांत ह्या प्रवासांशीं ताडून पाहत होतों. रावळपिंडी ते श्रीनगर, पेहेलगाम ते जम्मू, त्रिवेंद्रम् ते कन्याकुमारी, कोईमतूर ते उटकमंड, हृषिकेश ते देवप्रयाग ह्यांपैकीं एकाहि प्रवासांतील निसर्गशोभेपुढें इंग्लंडमधील हें निसर्गवैभव अगदींच तुच्छ वाटत होतें. सस्यश्यामल व हरिततृणांकुरयुक्त अशा भारतांतील निसर्गशोभेपुढें इंग्लंडमधील हें निसर्गसौंदर्य अगदींच बेगडी वाटत होतें. नाहीं म्हणायला रस्ता मात्र फारच गुळगुळीत व सुंदर होता. अगदीं त्रिवेंद्रम् ते कन्याकुमारी मोटार-रस्त्याइतका सुंदर होता असें म्हटलें तरी चालेल.

दोन तासांच्या प्रवासानंतर थोडी विश्रांति घेऊन व फराळ करून आम्ही पुढें निघालों व सुमारें दोन वाजतां खाणीच्या प्रवेशद्वाराशीं जाऊन पोहोंचलों. आमच्या आगमनाची पूर्वसूचना दिली गेली असल्यामुळें दोन माहीतगार कामगार आमची व्यवस्था पाहण्याकरितां नियुक्त करण्यांत आले होते. कॉलेजमधून वा शाळेमधून येणाऱ्या मुलांनीं भरपूर माहिती विचारावी व त्यांनीं ती सांगावी असा येथें संकेत असतो. शालेय सहलींत हें फार महत्त्वाचें कलम असून प्रत्येक मुलाला सहलींतील टिपणाची वही शाळेंत दाखवावी लागते. माझ्याबरोबर असणाऱ्या मुलांनींहि आपापल्या वह्या-पेन्सिली सरसावल्या आणि त्या कामगारांनीं माहिती सांगण्यास सुरुवात केली.

भूगर्भांत अनेक ठिकाणीं दगडाच्या स्वरूपांत खूप कोळसा असतो. कोळशांत सामान्यत: ९३ टक्के कार्बन, ४॥ टक्के हैड्रोजन व २॥ टक्के ऑक्सिजन असतो. क्वचित् ठिकाणीं कोळशांत हीं प्रमाणें वेगळींहि असूं शकतात. शिवाय, कांहीं एक प्रकारचा कोळसा हा जास्त ज्वालाग्रही असतो. ऑक्सिजनशीं याचा संयोग झाला कीं, तो पेट घेण्याचा संभव असतो. हें सर्व ठरविण्यासाठीं प्रथम कोळशाचें रासायनिक पृथक्करण केलें जातें व कोणता कोळसा काढावयाचा व कोणता काढण्यांत धोका आहे हें आधींच ठरवून दिलें जातें. तसेंच भूगर्भाचे वेगवेगळ्या ठिकाणीं छेद घेऊन किती किती फुटांवर किती किती फूट जाडीचा कोळशाचा थर आहे हें सुद्धां प्रथम तपासलें जातें. व मग एकदां सर्व माहितीच्या आधारें एक खाणीचा नकाशा तयार केला जातो. (येथें आम्हांला प्रत्यक्ष नकाशा दाखविण्यांत आला. आणि कोठला कोळसा काढून झाला व आतां सध्यां कोटला कोळसा काढण्याचें काम चालू आहे हें दाखविण्यांत आलें.) नंतर एका ठिकाणीं चांगलें मोठें बोअरिंग करून आंत लिफ्टस् जातील असा शॅफ्ट तयार करण्यांत येतो. व ह्या बोअरिंगच्या तळापासून सर्व वेगवेगळ्या दिशांना बोगदे खणण्यास सुरुवात होते. बोअरिंगच्या तळाला 'पिट बॉटम्' म्हणतात. गाडीच्या चाकाच्या मध्यापासून सर्व बाजूस जसे आरे असतात. तसेंच कांहींसे बोगदे असतात असें म्हटलें तरी चालेल. ह्या बोगद्यांतून कोळसा काढीत काढीत पुढें जातात व कोळसा वाहून आणण्याचें काम सुलभ करण्यासाठीं मग ह्या बोगद्यांत एक छोटीशी आगगाडी टाकण्यांत येते.

बोगदा बराच लांब तयार झाला म्हणजे पानाच्या मधल्या शिरेला जशा दोन्ही अंगांना लहान लहान शिरा फुटतात तसे त्या लांब बोगद्याच्या दोन्ही बाजूंस लहान लहान बोगदे पाडतात. अशा प्रकारें सर्व लहान लहान बोगद्यांतील व मोठ्या बोगद्यांतीलहि कोळसा आगगाडींतून पिट बॉटमपर्यंत आणला जातो. व तेथून लिफ्टमधून वर जमिनीवर पाठवला जातो.

ही सर्व माहिती सांगून झाल्यावर श्री. व्हाईटहाऊस ह्या आमच्या वाटाड्यानें आम्हांला खाणीचें एक मॉडेल केलेलें ठेवलें आहे तें दाखविलें. मॉडेलमध्यें सर्व गोष्टी हुबेहूब दाखविण्यांत आल्या होत्या. आपण आतां कोठून जाणार व कोणत्या बोगद्यांत व त्यांतल्या कोणत्या गल्लींत जाणार हें त्यानें त्या मॉडेलमध्यें आम्हांस दाखविलें. व दिवे कुठें आहेत, डेव्ही सेफ्टी लॅम्प कोठें आहेत व त्यांचा उपयोग कसा होतो, हे सारें प्रथम वरतींच समजावून सांगितलें. खालीं गेल्यावर आम्ही जें जें पाहणार होतों त्याचें अशा प्रकारचें पूर्वदर्शन आम्हांला घडविण्यांत आलें. हें सर्व पाहून झाल्यावर आम्ही कपडे काढण्यासाठीं कामगारांच्या लॉकर्सरूममध्यें गेलों. रांगेनें लॉकर्स उभे केलेले असून त्यांत कपडे टांगण्याची सोय होती. आंत ठेवलेले कपडे वाफेनें गरम राहावेत अशीहि त्यांत सोय होती. पलिकडे अशाच ओळीनें दोनशें बाथरूम्स् होत्या. प्रत्येकांत गरम पाण्याचा फवारा लावून उत्तम सोय केली होती. अर्थात् ह्या बाथरूम्स् अगदीं साध्या बिनदारांच्या व गरम पाण्यानें अंग धुऊन बाहेर पडतां यावें एवढ्याच उपयोगापुरत्या केलेल्या होत्या. आम्ही कपडे काढून जुने मळके कपडे चढविले व निघालों.

प्रथम एका रजिस्टरांत आम्हांला नांव, गांव व पत्ता मूळच्या देशांतील पत्ता इत्यादि सर्व माहिती लिहून देऊन एका करारावर स्वाक्षरी करावी लागली. मग प्रत्येकास एक इलेट्रिकचा दिवा देण्यांत आला. आंत गेल्यावर कुणीहि कुठेंहि भटकायचें नाहीं व सर्वांनीं एकत्र राहायचें ह्यासंबंधीं आग्रहाच्या सूचना दिल्या गेल्या व आम्ही बोअरिंगच्या तोंडाशीं तर आलों. ह्या बोअरिंगमधून लिफ्टस् वरखालीं ओढण्याची पद्धत आपल्याकडील पोहोऱ्याच्या रहाटासारखीच थोडीशी आहे, असें म्हटलें तरी चालेल. पोहोरे खालून वर ओढण्यासाठीं पंधरा हजार अश्वशक्तीचें एकवीस फूट व्यासाचें चक्र असलेलें एक अजस्र यंत्र बसविलेलें आहे. एका बाजूनें पोहोरे

खालीं गेले कीं दुसऱ्या बाजूनें दुसरे वर येतात. असा चक्रनेमिक्रम चालतो. माणसें बसलेला पोहोरा शाफ्टमध्यें कुठेशी आहे हें यंत्राजवळ बसलेल्या माणसाला एका घड्याळावर दिसतें. व त्यानुसार तो पोहोरा पिट बॉटम्‌-जवळ येतांच तो यंत्र बंद करतो. एकामागून एक आम्ही सारे पिट-बॉटमला जाऊन पोहोंचलों. ज्या बोगद्यांत आम्हांस जावयाचें होतें तो सुमारें पावणेदोन मैल लांब होता. बोगद्यांत रूळ टाकलेले असल्यानें ट्यूब रेल्वेची कल्पना डोळ्यांसमोर आली. सुमारें शंभर यार्ड चालून गेल्यावर ट्रॉलींगची एक छोटीशी आगगाडी उभी होती. त्यावर आम्ही बसलों व त्या ट्यूब रेल्वेनें निघालों. बरेंच अंतर गेल्यावर एका ठिकाणीं आम्ही उतरलों व बोगद्याशीं काटकोनांत कोरलेल्या एका गल्लींत शिरण्यासाठीं सज्ज झालों. गल्लीच्या व बोगद्याच्या काटकोनावर एक डेव्ही-लॅम्प बसविलेला होता. बोगद्यांत सर्वत्र उंची जरी अंदाजें ७॥ फूट असली तरी त्या गल्लींत मात्र ५ फूट व पुढें पुढें तर ४ फूटच होती. लोखंडी व लांकडी गर्डर्सच्या साहाय्यानें वरचें छप्पर उचलून धरलेलें होतें. व सर्व गल्लीच्या लांबीभर अडीच फूट उंचीवरून एक रबरी पन्हळ बसविलेली होती. गल्ली खोदत खोदत मजूर जसजसे पुढें जातात तसतसा कोळसा गल्लीच्या तोंडाशीं आणून खोक्यांत भरण्याचें काम जड जाऊं लागलें. म्हणून ही रबरी पन्हळ बसविण्यांत आलेली असते. काम सुरू असतांना ती सतत फिरत असते व गल्लींत काम करणाऱ्या मजुरांनीं ह्या पन्हळीवर कोळसा टाकला कीं, तो आपोआप सरकत सरकत बोगद्याच्या बाजूस येतो आणि तेथें उभ्या केलेल्या खोक्यांत पडतो. ह्या खोक्यांतून तो कोळसा पिट बॉटम्‌कडे आगगाडीवरून ढकलला जातो व तेथून पोहोऱ्यांत पडून तो वर जमिनीवर जाऊन पोहोंचतो.

आम्ही वाकत वाकत गल्लीच्या आंत सुमारें दोनशें यार्ड तरी गेलों. तेथें कोळसा फोडण्याचें यंत्र आम्हांला दाखविण्यांत आलें. १२० पौंड वजनाचें तें इलेक्ट्रिक ड्रील व त्यांत बसविण्याचें सात फूट लांबीचें तें पातें पाहिल्यावर भद्रावतीच्या कारखान्याच्या चमनगुंडीमध्यें पाहिलेल्या यंत्राची आठवण झाली. तेथें लोखंडाचे ओअर काढतांना ह्याच प्रकारचें यंत्र आपल्याला दाखविण्यांत आलें होतें. ह्या ड्रीलनें खोल भोकें पाडून व त्यांत

दारू ठासून सुरुंग उडविण्यांत येतो व अशाप्रकारें फुटलेला कोळसा मग बारीक करून खोक्यांत भरून वर पाठवतात.

बोगद्याशीं काटकोनांत असलेल्या ह्या गल्ल्या खोदतांना तुम्ही सरळ रेषेंत कसें जातां वेडेवांकडे जाऊन दुसऱ्या गल्लीला जाऊन कसे मिळत नाहीं ?' असा प्रश्न मी विचारल्यावरून त्या कामगारानें गल्लीच्या तोंडाशीं छपराला एकमेकांपासून सुमारें ५ फूट अंतरावर बांधलेल्या दोन दोऱ्या दाखवल्या. व कंपासच्या साहाय्यानें एंजिनियर ह्या दोन दोऱ्या बांधून देतात आणि मग त्यांचा बंदुकीचा फ्रंट साइट व बॅक साइट सारखा उपयोग करून कामगार सरळ रेषेंत पुढें खोदत जाऊं शकतात असा त्यानें खुलासा केला. सरळ रेषेंत जाण्यासाठीं आपण निशासंचलनांत ह्याच पद्धतीचा अवलंब करतों. त्याच तत्त्वाचा हा उपयोग पाहून मोठी गंमत वाटली.

आम्ही आतां भूपृष्ठभागापासून १७०० फूट खोलवर होतों. परंतु पिट बॉटमपासून आंत सर्वत्र हवा खेळविण्याची व आंतील दूषित हवा काढून ओढून घेण्याची सोय पंख्यांच्या साहाय्यानें केलेली असल्यानें यत्किंचित्‌हि गुदमरल्यासारखें वाटत नव्हतें. मात्र कोळशाचा वास सगळीकडे सुटला होता. व उष्णतामान जास्त वाटत होतें. बाहेर असतांना जी थंडी वाजत होती ती जाऊन आंत चांगलेंच उकडायला लागलें होतें. मजूर आंत काम करतांना कमींत कमी कपडे अंगांत घालतात असें आमच्या माहिती देणाऱ्यानें सांगितलें.

ह्या प्रकारच्या हवेंत सारखें तासान् तास काम करीत राहिल्यानें खाणींतील मजुरांचें आयुष्य कमी होतें कीं नाहीं ? ह्या प्रश्नाला त्यानें 'थोडेंसें कमी होतें,' असें उत्तर दिलें. परंतु कांहीं विशिष्ट रोग मात्र त्या प्रकारच्या कामानें निर्माण होत नसून शक्ति लवकर क्षीण होते असें त्यानें सांगितलें.

प्रत्येक मजूर दर आठवड्याला चाळीस तास काम करतो. त्याची मजुरी टनावर ठरविण्यांत आलेली असते. युद्धापूर्वी मजुराला एक टन कोळसा फोडून भरण्याबद्दल तीन पेनी मिळत. सध्यां त्या कामाबद्दल त्याला १४ पेनी मिळतात. परंतु पूर्वीं हंड्रेडवेट कोळशाला ७ पेनी पडत. आतां

५ शिलींग पडतात. प्रत्येक मजुराला आठवड्याला किमान् ९ पौंड व कमाल १२ पौंड म्हणजे सुमारें १६० रु. मिळतात. म्हणजे महिन्याला सुमारें ६०० रु. झाले. आठवड्याला पांच दिवस काम आणि दोन दिवस विश्रांति असें ह्या मजुरांचें जीवन असतें.

अमुक एका मजुरानें इतके टन कोळसा फोडला हें तुम्ही कसें ठरवितां? असा प्रश्न मीं विचारला असतां त्याला उत्तर म्हणून त्यानें सांगितलें कीं, तीन मजुरांना मिळून एका गल्लींतील कोळसा फोडण्याचें काम आम्हीं दिलेलें असतें, तर आठवड्याच्या शेवटीं किती क्यूबिक फूट कोळसा फोडून झाला हें मापावरून काढून त्या क्यूबिक फुटांचे टन करतां येतात. किंवा ज्या खोक्यांतून कोळसा भरून वर पाठविला जातो त्या खोक्यावर मजुरांचीं अद्याक्षरें खडूनें लिहितात. ह्या खोक्यांतील कोळशांचें वजन स्वतंत्रपणें करतां येतें व त्यावरून त्याची मजुरी नेमकी ठरवितां येते. हे दोन्ही मजुरी ठरविण्याचे प्रकार ऐकून मोठी गंमत वाटली.

ह्यानंतर आमच्या माहिती देणाऱ्यानें श्री. व्हाईटहाऊसनें आम्हांला बोगद्यांतील आगगाडीचे सिग्नल, कोळशांची खोकीं फिरविण्याकरितां केलेलें एक साधेंच यंत्र दुसऱ्या एका गल्लींत चाललेलें कोळसा फोडण्याचें एक वेगळेंच यंत्र इत्यादि अनेक गमतीच्या गोष्टी दाखवल्या व भरपूर माहिती सांगितली. नंतर पुन्हां एकदां आम्ही पिट बॉटमपाशीं आगगाडींत बसून आलों. बोगद्यांतील सर्व रस्ता एकाच लेव्हलमध्यें नसल्यासारखा वाटल्यावरून आमच्यापैकीं एकानें त्यासंबंधीं प्रश्न विचारला. तेव्हां खाणीच्या मूळ नकाशांत ज्या लेव्हलप्रमाणें जावयाचें ठरविण्यांत आलें असेल त्याप्रमाणें आम्ही खोदत जातों. कोळशाच्या थरावर बोगद्याची लेव्हल कशी अवलंबून असते इत्यादि त्यानें समजावून सांगितलें. व त्यानंतर ज्या खाणींत पिट बॉटमकडून बोगदा वरवर चढत गेला होता त्या खाणींत झालेल्या एका अपघाताचीहि सविस्तर माहिती सांगितली. तेथेंच असलेल्या एका कोळशाच्या खोक्यावर खडूच्या साहाय्यानें त्यानें आम्हांला त्या अपघाताची संपूर्ण हकिगत सांगितली. आणि नंतर अपघात कां व कसे होतात? ते न होण्यासाठीं आम्ही काय उपाय करतों इत्यादि मीमांसाहि उत्तम प्रकारें केली. नंतर तेथून सिग्नल देऊन आम्ही पुन्हां एकदां पोहोऱ्यांत बसून वर जमिनीवर

आलों. स्नान उरकून कपडे बदली पावेतों ७ वाजले होते. म्हणजे सुमारें पांच तास हा कार्यक्रम झाला. मला श्री. व्हाईटहाऊसच्या एकंदर सर्व बोलण्या-चालण्यावरून त्याचें शिक्षण किती झालें आहे हें जाणण्याची इच्छा झाली व इतर अनेक प्रश्नांमध्यें मी हाहि प्रश्न त्याला विचारला. साध्या शाळेंत केवळ सहा यत्ता शिक्षण घेतलेल्या ह्यानें अनुभवाच्या शाळेंत मात्र अनेक वर्षें शिक्षण घेतल्यानें तो आतां तरबेज झाला होता. मला ही सर्व माहिती हिंदुस्थानांतील एका विद्यार्थ्याला लिहून पाठवायची आहे असें सांगितल्यावर तो फारच खुष झाला व तुम्हांला आणखी कांहीं विचारावयाचें असलें तरी विचारा असें त्यानें सांगितलें. मी तेथून निघतांना त्याच्या खाणीचे कांहीं आंकडे पाठविण्याचें सांगून माझा पत्ता दिला होता. दोनच दिवसांपूर्वीं मी मागितलेली सारी माहिती, ज्या अंकांत खाणींतील अपघाताचें संपूर्ण वर्णन व चित्रें दिलीं होतीं तो ' कोल ' मासिकाचा एक अंक व बिनचूक चांगल्या इंग्रजींत लिहिलेलें एक पत्र त्याच्याकडून आलें आहे.

बंगलोरचे व म्हैसूरचे कारखाने, जमशेटपूरजवळील पाहिलेली खाण, भद्रावतीचा प्रचंड संसार ह्या सर्वच ठिकाणीं जें पाहिलें व जें मिळविलें त्यापेक्षां पद्धतशीर, हिशेबी व चोख माहिती देण्याची येथील पद्धत मला अनुकरणीय वाटते. आपल्या तिकडील कारखान्यांतून प्रत्यक्ष पाहण्यास सुरुवात करण्यापूर्वीं पाहण्याच्या सर्व गोष्टींची स्पष्ट कल्पना देणारीं ह्या पद्धतीचीं मॉडेल्स, कारखान्याचे कांहीं बोलके आंकडे, नकाशे, प्रदर्शन इ. जर ठेवण्याची पद्धत सुरू केली गेली तर किती चांगलें होईल, असेंहि ही खाण पाहून आल्यावर वाटलें. येतांना आठवण म्हणून प्रत्येकानें कोळशाचा तुकडा बरोबर आणलेला आहे. येथील मुलांबरोबर खाण पाहण्यास गेल्यानें अनायासेंच त्यांच्या समवेत टिपणें करणें भाग पडलें व त्या टिपणांच्या साहाय्यानेंच एवढ्या लहानशा सहलीवर एवढें मोठें वर्णनात्मक पत्र मी लिहूं शकलों आहें. कळावें.

आपला,
× × ×

# स्कॉटलंडची सफर

स. न. वि. वि.

वर्षाच्या तिसऱ्या टर्मला येथें प्रारंभ झाला कीं, विद्यार्थ्यांची चित्तवृत्ति द्विधा होण्यास सुरवात होते. प्रबंध पूर्ण करून द्यावयाचे असतात, परीक्षा समोर दिसूं लागलेल्या असतात, ग्रंथालयांतील पुस्तकांच्या परिशीलनाची अंतिम मर्यादा जवळ आलेली असते; ह्या सर्व गोष्टींकडे लक्ष देणें हें अत्यंत आवश्यक असतें, पण याच सुमाराला हवा सुंदर पडूं लागलेली असते. बागा व क्रीडोद्यानें फुलांनीं बहरलेलीं असतात, उन्हें छान पडण्यास सुरुवात झालेली असते आणि लंडनच्या आसपासच्या रम्य स्थलांना भेटी देण्याचा मोसम सुरू झालेला असतो. शिवाय, महाविद्यालयें आतां बंद होणार असल्यानें संमेलनें, नृत्य-समारंभ इत्यादि गोष्टींकडेहि लक्ष देणें जरूर असतें. ह्या प्रकारच्या मनःस्थितींत असतांनाच येथील उन्हाळ्याच्या प्रारंभाची सूचना देणारी "व्हिटसन"ची सुटी येते व त्या सुटीचा उपयोग प्रवासार्थ करण्याची संधि परदेशस्थ विद्यार्थी सहसा वायां जाऊं देत नाहींत. आगगाड्यांचीं सवलतीचीं तिकिटें ह्या सुटीप्रीत्यर्थ दिलीं जातात व आपणांकडे मागें 'झोन' तिकिटें असत तशींच येथलीं सुप्रसिद्ध Holiday Run-about Tickets ही मिळण्यास सुरवात होते. उन्हाळ्याच्या सुटींतील कार्यक्रमांच्या प्रवासांच्या जाहिराती फडकूं लागतात आणि सर्वसामान्य नागरिकाच्या व विशेषतः विद्यार्थ्यांच्या जीवनांत उत्साहाचें एक नवें वारें ह्या दिवसांत संचरूं लागते.

विद्यापीठास आठ दिवसांची संपूर्ण सुटी असल्यानें यंदां मीं या सुटीचा फायदा घेण्याचें ठरविलें आणि एका महाराष्ट्रीय मित्रासमवेत इंग्लंडचा उत्तरभाग विशेषतः यॉर्कशायरचा रम्य भूभाग आणि स्कॉटलंड पाहण्याचें निश्चित केलें. मागच्या वर्षींच्या युरोप-सहलींत ओळख झालेल्या एका इंग्रज मैत्रिणीनें यॉर्कला येण्याबद्दल आग्रहाचें निमंत्रण दिलेलें होतें त्याचाहि फायदा अनायासें मिळणार होता.

सोमवारीं लंडन सोडून यॉर्कला घेऊन पोंहचलों. सपाट आणि मुख्यत्वें

करून औद्योगिक इंग्लंडमध्यें आगगाडीनें प्रवास करतांना सृष्टिसौंदर्याची अपेक्षा धरणें व्यर्थ होतें. फक्त एकदांच मध्यें थांबून चार तासांत प्रवास संपवणारी ‘ मिडलोथियन एक्स्प्रेस ’ आम्हीं गांठली असल्यानें गाडीला वेग चांगलाच होता. आणि म्हणून बाहेर फारसें लक्ष न देतां एक सुंदर पुस्तक वाचून संपविण्यापलिकडे प्रवासांत इतर कांहींहि पदरांत पडण्याजोगें नव्हतें.

यॉर्क हें इंग्लंडमधील पुरातन शहरांपैकीं एक असून रोमन संस्कृतीचे अनेक अवशेष हे अद्यापि येथें दिसूं शकतात. अतिप्राचीन कालापासून ह्या शहराभोंवतीं तटाची भिंत घातलेली आहे व आज ही या कोटावरून— ‘ सिटी वॉल्स ’वरून—हिंडत जाऊन नगरप्रदक्षिणा पूर्ण करतां येते. या तटाच्या भिंती अर्थातच खूप रुंद असून आंतून मारा करतां येण्यासाठीं बंदुकांकरितां व तोफांकरितां मोठालीं खिंडारें आहेतच. शहरांत येण्यासाठीं असलेल्या दरवाजांना अजूनहि पूर्वींचींच नांवें आहेत व त्यांना ‘ बार ’ हे अन्वर्थक नांव आहे. ‘ बूथमबार, मायकेल गेट बार ’ असें प्राचीन बार मोठ्या कलाकुसरीनें बांधलेले आहेत. दुसरें एक नावीन्य म्हणजे ‘ गेट ’ म्हटलें असतां आपणांस प्रथम दरवाजा किंवा बुरुजावर जाण्याचें महाद्वार असा अर्थ वाटतो त्याच्याऐवजीं येथें रस्त्यांना ‘ गेट ’ असें नांव आहे. जिली गेट, स्टोन गेट, पीटर गेट हीं रस्त्यांचीं नांवें गमतीचीं वाटतात कीं नाहीं ?

यॉर्क हें प्रामुख्यानें प्रसिद्ध असलें तर तें धार्मिक महत्त्वामुळें. कँटरबरीच्या खालोखाल इंग्लंडमधील दुसरें धार्मिक महत्त्वाचें शहर यॉर्कच होय. तेथील नामांकित ‘ मिन्स्टर ’ हें बांधणीच्या दृष्टीनें सौंदर्याच्या दृष्टीनें आंतील रंगीत कांचेच्या खिडक्यांच्या दृष्टीनें व पुरातन शिल्पकलेच्या दृष्टीनें पहिल्या प्रतीचें कॅथीड्रल समजलें जातें. ‘ मिन्स्टर ’ची बांधणी पुष्कळशी कँटरबरी कॅथीड्रलसारखीच आहे. आणि सेंट अल्बान्समधील पुरातन ॲबेसारखीच आहे.

कोटावरून नगरप्रदक्षिणा करून आणि शहरांतील मुख्य बाजारपेठेचा भाग पाहून आम्ही तेथल्या नदींत बोटिंगहि केलें. मिन्स्टर पिक्चर गॅलरी व कॅसल म्यूझियम् हीं येथील तीन प्रेक्षणीय स्थळं आहेत. तींहि यथावकाश पाहिलीं. कॅसल म्यूझियम ह्यास ‘ कर्क ’ नामक एका पुराणवस्तुसंशोधकानें सुरुवात केली असल्यानें त्यास ‘ कर्क म्यूझियम् ’ असेंहि म्हणतात.

ह्या म्यूझियमचें एक वैशिष्ट्य आहे तें हें कीं, वेगवेगळ्या ऐतिहासिक काळांतील घरांचे व आंतल्या सजावटींचे उत्तम नमुने येथें ठेवलेले आहेत. ट्यूडर, जॉर्जियन, व्हिक्टोरियन कालांतील दिवाणखान्याचे प्रत्यक्ष नमुने उभे केलेले आहेत व ह्याहीपेक्षां नवलपूर्ण वैशिष्ट्य म्हणजे म्यूझियमच्या इमारतींतच तळमजल्यांत भरपूर जागा आंखून घेऊन दुतर्फा दुकानें असलेले असे वेगवेगळ्या काळांतील रस्ते तयार केले आहेत.

दगड रचलेला खडबडीत रस्ता व त्याच्या दोन्ही बाजूंस नालबंदांचीं, मेणबत्त्यांचीं, खोगीर तयार करणाऱ्या चांभारांचीं, कपडे शिवणाऱ्यांचीं दुकानें, दुकानांवर पाट्यांऐवजीं धंदे-निदर्शक खुणा, हें सारें पाहतांना गंमत वाटते.

डॉक्टरच्या दुकानावर खलबत्त्याची खूण रास्तच आहे. पण बँकेवर नाकतोड्याची ( ग्रासहॉपर ) खूण मजेदार वाटते. म्यूझियममध्यें इतरहि चांगल्या वस्तू खूपच आहेत. प्रत्यक्ष गांवाव्यतिरिक्त यॉर्कच्या आसपासचे भूभाग पाहणें हें आमचें खरें उद्दिष्ट होतें व त्यानुसार यॉर्कच्या आसपासची 'मूर्स' आणि तिकडील निम्नोन्नत भाग 'डेल्स' हींहि पाहण्यांत कांहीं काल घालविला. अत्यंत सपाट प्रदेशांत लहानशा सुद्धां टेकड्या किती आदरणीय वाटतात आणि त्यामुळें निर्माण झालेले निम्नोन्नत प्रदेश लोकप्रिय कसे होतात त्याची 'यॉर्कशायर डेल्स्' हें मूर्तिमंत उदाहरण आहे.

यॉर्क सोडून मोटार कोचनें आम्ही न्यूकॅसलला आलों. टाइन नदी, तिच्यावर एकावर बांधलेले तीन मोठे पूल, मोठी बाजारपेठ, एक पुरातन किल्ला व एक मोठें जुनें कॅथीड्रल एवढ्याच गोष्टी न्यूकॅसलमध्यें पाहण्याजोग्या आहेत. मार्केट नामक मध्यवस्तीच्या ठिकाणाहून सर्वत्र जाणाऱ्या बसेस् आणि कोचेस निघतात. आणि आगगाड्यांचें व जवळपास जाणाऱ्या कोचेसचें स्थानक 'सेंट्रल स्टेशन' नामक आहे. न्यूकॅसलहून सुमारें २० मैलांवर शॉटले ब्रिज नामक ठिकाणीं माझा एक गतवर्षींचा इंग्रज मित्र सहकुटुंब राहातो त्याचें निमंत्रण असल्यानें त्याच्याकडे एक दिवस मुक्कामास गेलों.

न्यूकॅसल, शॉटले ब्रिज व कॉन्टेट पाहून दुसऱ्या दिवशीं स्कॉटलंडकडे जाण्यासाटीं मार्गस्थ झालों व संध्याकाळीं एडिंबरोला येऊन पोहोंचलों एडिंबरोला मुक्काम तेथील सेंट अँड्रयूज स्ट्रीटवरील वाय्. एम्. सी. ए. मध्यें

ठेवला होता; कारण तेथून सर्वच गोष्टी जवळ होत्या. स्कॉटलंडमधील सर्वांत प्रेक्षणीय भाग जो ट्रोसॅक्स नांवाचा आहे व जीं सुंदर नयनरम्य सरोवरें–ह्यांना 'लॉख्स्' अशी संज्ञा आहे–तेथें जाण्यासाठीं एडिंबरोहून रोज मोटारी जातात. या सर्व मोटारी वाय्. एम्. सी. ए. जवळील सेंट अँड्र्यूज स्क्वेअरपासूनच सुटत असल्यानें आमच्या फार सोयीच्या होत्या. खुद्द एडिंबरोमध्येंहि कॅल्टन हिल, नेल्सन् मेमोरिअल, एडिंबरो कॅसल, नॅशनल गॅलरी, पोर्ट्रेट गॅलरी, अँटिक्वेरियन म्यूझियम, एडिंबरो म्यूझियम, प्राणिसंग्रह, युनिव्हर्सिटी ऑर्थरसीट इत्यादि अनेकविध गोष्टी पाहण्याजोग्या आहेत. आमच्या तीन दिवसांच्या कार्यक्रमांत आम्ही या साऱ्या गोष्टी भरगच्च बसविल्या आणि रोज खूप हिंडून हें सारें पाहून घेतलें.

वेव्हरले स्टेशनापासून वेस्ट एंड पर्यंतचा एडिंबरोंतला मुख्य रस्ता–प्रिन्सेस् स्ट्रीट–हें ह्या गांवाचें वैभव समजतात आणि खरोखरच हा रस्ता फारच सुंदर आहे. एडिंबरोंतील रस्त्यांवर ट्राम्स हें जरा जुनें समजलें जाणारें वाहन जरी दिसलें तरी इतर सर्व अद्यावत् आहे. याबद्दल वादच नाहीं. प्रिन्सेस स्ट्रीटवर सर्वांत डोळ्यांत भरणारें स्मारक हें 'स्कॉट मेमोरियल' होय. हें सुंदर बांधलेलें असून त्यावर जाण्यासाठीं आंतून जिने आहेत. सातव्या मजल्यावर गेले असतां तेथून सर्व एडिंबरो शहर सुंदर आंखलेलें दिसतें. ह्याच रस्त्यापुढें सुंदर बागा आहेत. मागें उंच टेकडी, टेकडीवर भव्य किल्ला आणि पुढें उतरणीवर रचलेली बाग हें दृश्य विलोभनीय आहे.

एका बागेंत एक भलें मोठें घड्याळ जमिनीवर आंखलेलें असून तें फुलांनीं आणि फुलांच्या ताटव्यांनीं तयार केलेलें आहे. ह्याचे कांटे पन्हळीचे केलेले असून ह्या पन्हळींतून छोटीं छोटीं फुलझाडांचीं रोपें लावलेलीं आहेत. घड्याळाच्या शेजारींच एका खांबावर एक छोटें पक्ष्याचें घरटें बांधलेलें आहे व दर पंधरा मिनिटांनीं एक पक्षी घरट्याबाहेर येऊन आपल्या आवाजानें वेळ सांगतो. तासाच्या शेवटीं जितके वाजले असतील तितक्या वेळां 'कुऽकू' स्वर काढून तो वेळनिदर्शन करतो. ह्या प्रकारचें हें 'फ्लोरल कुकू क्लॉक' हें एकटेंच आहे म्हणतात.

किल्ला चांगला उंचावर बांधलेला आहे आणि आवारहि खूपच मोठें

आहे. किल्ल्यांत वेगवेगळीं दालनें पाहाण्यासाठीं तिकिटें आहेत. 'वॉर मेमोरियल चॅपल' हें फारच प्रेक्षणीय आहे.

श्रीरंगपट्टण येथील टिपूशीं झालेली लढाई ज्यांनीं जिंकली त्यांत मुख्य सेनापति स्कॉचमन हा होता. त्यानें प्रत्यक्ष लढाई जिंकल्यावर श्रीरंगपट्टणहून आणलेल्या महत्त्वाच्या गोष्टी, चित्रें, नकाशे हे या संग्रहांत आहेत.

टिपूचा अंगरखा, त्याची तलवार, दंडावरचा ताईत इत्यादि दुर्मिळ गोष्टी येथें प्रथमच पाहावयास मिळाल्या. किल्ला पाहण्यास चांगलें तीन-चार तास तरी लागतातच.

किल्ल्याच्याच जवळ उंच अशा एका मनोऱ्यावर एक कॅमेरा–ऑबस्कुरा बसवला आहे. पेरिस्कोपसारखी रचना असलेल्या या कॅमेऱ्याच्या साहाय्यानें भोंवतालचा खूपसा प्रदेश एका ठिकाणीं पडद्यावर पाहतां येतो. आपल्याकडे कॉमनवेल्थ इमारतीच्यावर असा कॅमेरा बसविल्यास किती चांगला उपयोग होईल, असा विचार मनांत आला खरा! एडिंबरो युनिव्हर्सिटी शिक्षणक्षेत्रांत नांवाजलेली मरे हाऊस ही संस्था व येथील म्यूझियम् याहि संस्था पाहाण्याजोग्या वाटल्या. सेंट गाइल्स् कॅथीड्रल हें चर्चहि सुंदर आहे.

एडिंबरोहून सकाळीं ९ वाजतां निघून अॅबर फॉइल्स, ट्रॉसॅक्स, लॉख कॅट्रीन, कॅलेंडर इ. ठिकाणीं जाणाऱ्या सहलींत आम्हीं नांवें नोंदविलीं व स्कॉटलंडमधील हा रम्य भाग पाहण्याचें सृष्टिसौंदर्य मनमुराद उपभोगिलें. भौगोलिकदृष्ट्या हा भाग पुष्कळसा महाराष्ट्रासारखा आहे. टेकड्या दऱ्याखोऱ्यांवर इकडील लोक नेहमींच खूप असतात. त्यांतच त्या सखल भागांत नयनमनोहर सरोवरें असलीं आणि टेकड्यांवरील वनश्री नटलेली असली तर हा भाग फारच लोकप्रिय व्हावा यांत नवल करण्याजोगें काय आहे? दुपारच्या विश्रांतीच्या वेळांत एका टेकडीवर जाऊन बसलों असतां सभोंवार पाहून आम्हां दोघांनाहि घरची आठवण झाली. आणि 'होमसिक' वाटलें हें नाकबूल करण्याचें कारण नाहीं. ट्रॉसॅक्स व आसपासचा भाग हा स्वातंत्र्यप्रिय स्कॉटस्चें वसतिस्थान असल्याबद्दल जेव्हां तेथें समजलें व तत्संबंधीं कांहीं दंतकथा जेव्हां तेथें ऐकल्या, तेव्हां या साम्यांत आणखीच भर पडून आनंद झाला.

एडिंबरोहून पुढचा मुक्काम ग्लासगोला करण्याचें ठरवून तिकडे

निघालों. ग्लासगोला चिपलकट्टी व दामले असे दोन पुण्याचे स्नेही राहात असल्यानें तेथील सर्व कार्यक्रम त्यांच्यावर सोपवून आम्हीं निर्धास्त होतों. ग्लासगो हें मुख्यत्वें करून उद्यमनगर आहे. कारखाने व गिरण्या हा ग्लासगोचा आत्मा आहे. येथील पांचशें वर्षांचें जुनें विद्यापीठ, नामांकित जहाजें बांधण्याचें महाविद्यालय, एंजिनिअरिंग कॉलेज ह्या इंग्लंडला ललामभूत झालेल्या संस्था आहेत.

श्री. दामले यांनीं आम्हांस हें सारें नीट दाखवून हंटर म्यूझियम् व ग्लासगोची पिक्चर गॅलरी, म्यूझियम इत्यादिहि स्थळें दाखविलीं. आज चार अस्सल पुण्याचे महाराष्ट्रीय एकत्र आल्यानें जेवणास व गप्पांसहि खूप रंग भरला दुपारीं आम्ही बसनें स्कॉटलंडमधून लोकगीतांतून गाइल्या गेलेल्या लॉख लोमंडला गेलों. लॉख लोमंड सत्तावीस मैल क्षेत्रफळाइतकें मोठें असून आंत हिंडायला जायला वल्हवायच्या होड्या, मोटारलँचेस मिळूं शकतात. शिवाय, दर दोन तासांना एक मोठी मोटारलँच उतारू घेऊन एका विवक्षित मार्गानें सरोवर दाखविण्याची सहल करीत असते.

आम्ही एक मोटारलँच भाड्यानें घेऊन स्वतःच ती हाकायचें ठरविलें व आंत हिंडायला गेलों. काश्मीरमध्यें दाल सरोवरांत जशा हाऊस बोटी आहेत तशाच कांहीं हाऊस बोटी येथेंहि आहेत. पण मला तरी निदान काश्मीरमधील हाऊस बोटी शतपटीनें जास्त सुंदर वाटल्या. इतर अनेक दृष्टींनीं मात्र हें सरोवर 'दाल' सरोवराशीं किंबहुना 'मानसबल' सरोवराशीं तुलना करतां येण्याजोगें आहे.

संध्याकाळीं ग्लासगोला परत येऊन चिपलकट्टीकडे सुग्रास जेवण झालें. आज महाराष्ट्रीय जेवण, गप्पा, संगीत इ. गोष्टींचा अनेक दिवसांनीं लाभ झाल्यानें ग्लासगोचा मुक्काम फारच आनंदाचा झाला.

परतीच्या प्रवासांत पुनः एकदां एडिंबरो, न्यूकॅसल, शॉटले ब्रिज, कॉन्सेट इ. पाहून आम्ही डरहम नांवाच्या एका नवीन गांवास भेट दिली. डरहम येथें एक सुंदर किल्ला आहे. येथें आतां विद्यापीठाची योजना झालेली आहे. किल्ल्याच्याच जवळ डरहम कॅथीड्रल आहे. हें कॅथीड्रल रोमन काला-इतकें जुनें असून अकराव्या शतकापासूनचें शिल्पशास्त्र येथें पाहावयास मिळतें. इंग्लंडमधल्या सुप्रसिद्ध कॅथीड्रलमध्यें ह्या डरहम कॅथीड्रलची गणना होते.

डरहम गांवहि छोटें पण सुंदर बांधणीचें आहे. गांवाच्यां मधून नदी गेल्यानें सौंदर्य जास्तच वाढलें आहे. नदीच्याच कांठीं उंच टेकडीवर किल्ला व कॅथीड्रल आहे.

डरहमहून यॉर्कला येऊन तेथून आम्ही परत लंडनला येऊन पोहोंचलों आहोंत. दोन आठवड्यांची ही सहल केल्यानें उत्तर इंग्लंड व बरेचसें स्कॉटलंड पाहून झालें व मुख्यत्वेंकरून स्कॉच लोकांच्या पुष्कळशा गोष्टी नव्यानें समजल्या.

पहिल्या एलिझाबेथनें स्कॉटलंडच्या राणी मेरीच्या वधाच्या हुकुमावर स्वाक्षरी केली असल्याचें अजूनहि स्कॉच लोक विसरलेले नाहींत आणि म्हणून ते नव्या राणीला 'एलिझाबेथ' एवढ्याच नांवानें ओळखतात. "दुसरी एलिझाबेथ" ह्या नामाभिदानास स्कॉच लोकांनीं विरोध केला तो ह्याचमुळें !

लंडनमधून पळविलेला 'कॉरोनेशन स्टोन' स्कॉटलंडमध्यें सांपडला हेंहि सत्य आहे. पण स्कॉच लोकांमधील व इंग्लिश लोकांमधील हा फरक जाणण्यास प्रत्यक्ष स्कॉटलंडमध्यें जायला पाहिजे हेंच खरें ! कळावें.

आपला,
×××

## वर्ड्स्वर्थच्या लेकलँडमधून

ग्रासमीअर

स. न. वि. वि.

ग्रासमीअर नांवाच्या खेड्यांत 'डव्ह कॉटेज' नांवाच्या घरापलिकडील एका छोट्या टेकडीवर ह्या पत्रास प्रारंभ केला आहे. ह्या स्थानास मोठें माहात्म्य आहे. इंग्रजी भाषेंतील एक महान् कवि ह्या खेड्यांतील 'डव्ह कॉटेज'मध्यें राहत असे व त्यांनीं वाङ्मयांत अमर केलेल्या अनेक कविता

ह्या टेकडीवर जन्माला आल्या आहेत. ह्या झोपडीला ह्या कवीनें-वर्ड्स्वर्थनें-- " The loveliest cottage in the guardian nook." ह्या शब्दांनीं अमर केलें आहे. वर्ड्स्वर्थच्या सुप्रसिद्ध Daffodils, Primroses, Daisies इत्यादि फुलांच्या पुष्पवाटिका ह्याच परिसरांत खूप आहेत. विंडरमिअर, ग्रासमिअर, कॉनिस्टन, रिडाल, डर्वेंट वॉटर इत्यादि पंधरा मोठ्या व चाळीस लहान सरोवरांनीं आणि सुमारें एकशेंऐशीं टेकड्यांनीं निसर्ग-रमणीय बनलेला हा भूभाग 'लेक डिस्ट्रिक्ट' ह्या नांवानें प्रसिद्ध आहे. आणि आंग्ल वाङ्मयाचे अध्ययन करणाऱ्या कुणालाहि हा अपरिचित असणें शक्य नाहीं. वर्ड्स्वर्थ, सदे, कोलरिज, रस्किन, अर्नाल्डस् इत्यादि नामांकित साहित्यिकांनीं ह्या पारेसरांत वास्तव्य करून उत्कृष्ट साहित्य-निर्मिति केलेली आहे व त्यांनींच ह्या प्रदेशास आंग्ल साहित्यांत महत्त्वाचें स्थान प्राप्त करून दिलें आहे. ह्यामुळें अवघ्या तीस चौरस मैल क्षेत्रफळाच्या ह्या लेकलँडला सर्व जगांत प्रसिद्धि मिळाली असून इंग्लंडला आलेला कोणताहि प्रवासी येथें येऊन गेल्याशिवाय राहत नाहीं.

इंग्लंड हा देश प्रामुख्यानें सपाट आहे. समुद्र-सपाटीपासून शंभर-दोनशें फूट गेलें तरी उंचावर गेल्यासारखें वाटावें असा येथें प्रघात आहे. त्यामुळें सातशें-आठशें फूट उंचीचे उंचवटे हे येथल्या लोकांना भूषणास्पद वाटतात. अशा देशांत तीन हजार फूट उंचीच्या टेकड्यांना पर्वत नामा-भिधान मिळावें, त्या टेकड्या चढण्याच्या कर्तबगारीस ' माउंटेनियरींग ' असें गौरवपूर्ण नांव दिलें जावें आणि असे शें-दीडशें पर्वत असलेल्या प्रदेशास इंग्लंडच्या भूगोलांत अग्रपूजेचा मान मिळावा ह्यांत काय आश्चर्य आहे ! ग्रेट गेबल, स्काफेल, स्किडॉ ह्यांची गणना येथें श्रेष्ठ पर्वतांत होते. आणि तरीहि हीं टेकाडें चार हजार फुटांपेक्षां जास्त उंच नाहींत. मात्र, सभोंवार सर्वत्र टेकाडें आणि तळीं असलेला हा प्रदेश वर्ड्स्वर्थनें वर्णन केल्याप्रमाणें " Who comes not hither, never can konw how beautiful is the world below." प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय गंमत नाहीं.

इंग्लंडकडून स्कॉटलंडकडे जाणाऱ्या केंडाल कार्लाईल ह्या हमरस्त्याच्या डाव्या बाजूस लेक डिस्ट्रिक्टच्या केंद्रस्थानीं एक ' केसिक ' नांवाचें रमणीय

खेडें आहे. लोकवस्ती आठ-दहा हजारांपेक्षां जास्त नसावी, पण प्रेक्षक, प्रवासी, टूरिस्ट ह्यांनीं गांव गजबजलेलें असतें. १८७५ सालापासून येथें दरवर्षी एक ख्रिश्चन धर्मपरिषद भरत असते. ह्या 'केसिक' कन्व्हेन्शनसाठींच फक्त चार-पांच हजार ख्रिश्चन लोक येथें जमतात. जुलैच्या दुसऱ्या शनिवारपासून एक आठवडा ही परिषद् चालते. परिषदेची एक तरुणांसाठीं शाखा आहे व त्या शाखेतर्फे हिंदु-धर्माच्या मूलतत्त्वासंबंधीं प्रवचन करण्यासाठीं मला निमंत्रण मिळाल्यानें मी ह्या 'केसिक' ग्रामीं आलेलों आहें. उद्यां संध्याकाळीं सुमारें तासभर मला ह्या प्रवचनासाठीं देण्यांत आलेला आहे. स्वामी विवेकानंदांचीं व्याख्यानें व गीता ह्यांवर आधारून प्रवचनाची बैठक ठेवलेली आहे आणि प्रवचन बरें होईल अशी खात्रीहि आहे. पण प्रचंड मोठ्या तबूंत सात-आठ हजार लोकांपुढें धर्म-प्रवचन करण्याचा पहिलाच प्रसंग असल्यानें किंचित् धाकधूक आहे एवढेंच.

लॉट्रिक नांवाच्या एका छोट्याशा टेकडीच्या पायथ्याशीं एका विस्तीर्ण पटांगणांत तंबू लावून पाहुण्यांची उतरण्याची व्यवस्था केली आहे. माझ्या-करितां उत्तम शाकाहारी जेवणाची सोय केलेली आहे. आल्या दिवसापासून जेवणाचा व एखाद्या सभेचा वेळ सोडून मी आसपास हिंडण्यांतच विशेष वेळ खर्च करीत आहें. लंडन, केंब्रिज ऑक्स्फर्डचे पंधरा-वीस विद्यार्थी-हि माझ्याबरोबर येत असतात. डर्वेंट वॉटर ग्रासमिअर व विंडरमिअर हीं तळीं परिसरासह हिंडून झालीं. काल स्किडॉवर जाऊन आलों. आपल्याकडे कार्ल्याच्या लेण्याच्या मागच्या टेकडीवर चढलें, कीं मागचें तळें व त्या सभोंवातलचा भाग जसा दिसतो तसा देखावा हुबेहूब लॉट्रिकच्या टेकडी-वरून दिसत होता. स्किडॉ हा डोंगर तीन हजार एकशेंवीस फूट उंच आहे. आकार आपल्या लोणावळ्याच्या ड्यूक्सनोजसारखा सामान्यतः आहे. स्किडॉच्या माथ्यावर बसून आसमंतांत दृष्टि टाकली कीं, अगदीं महाराष्ट्रांत लोणावळ्याला किंवा खंडाळ्याला आल्यासारखें वाटतें. आज ग्रासमिअर खेडें व वर्ड्स्वर्थचें घर, आणि त्याला जेथें पुरलें आहे तें चर्च पाहायला आलेलों आहें. येथूनच पुढें आज स्काफेल पर्वत चढण्याचा मानस आहे. परत जातांना लोडोरचा धबधबा—ह्यावर सदेनें केलेली कविता प्रसिद्ध आहे— पाहून जाणार आहें.

एका गोष्टीचा उल्लेख येथें करणें भाग आहे. ह्या सर्व जागा, वर्ड्स्वर्थनें येथें बसून ही कविता लिहिली, डॅफोडिल्सनें भरलेले तें हें शेत, सदेच्या कवितेचें उगमस्थान असलेला धबधबा तो हा– इ. इ. ठिकाणें हीं सर्व नॅशनल ट्रस्ट आहेत. प्रत्येक ठिकाणीं त्या त्या प्रसंगांच्या पाट्या व छायाचित्रें आहेत. कवींचे ग्रंथसंग्रह आहेत. एवढेंच काय त्यांच्या साहित्यांतील उतारे काढून लावून ठेवलेले आहेत. ह्या सर्व ठिकाणांची उत्तम निगा राखण्याचें कार्य सरकार करतें. ह्या गोष्टीलाहि मला वाटतें फार महत्त्व आहे. कळावें.

आपला,
×××

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 2६३७४ वि: भू-प्रवास
क्रमांक १७३ नों: दि:

## ४

# इंग्लिश लोक आणि त्यांचें सामाजिक जीवन

## लंडनवासीय प्रामाणिक लोक

लंडन

स. न. वि. वि.

शनिवारीं ट्रॅफल्गार स्क्वेअरच्या एका खूप रहदारीच्या रस्त्याच्या मधोमध कोणा तरी व्यक्तीनें एका अर्ध्या पेनीचें तांब्याचें नाणें नेऊन चिकटविलें. त्याचा उद्देश त्यांत काय होता हें अद्याप समजलें नाहीं. कारण, ती व्यक्ति गर्दींत अदृश्य झाली होती. पण तेथें अनेक लोक अनेक उद्देशानें वेगवेगळ्या गंमती करतात त्या अनेकांपैकीं ही एक असावी असें आम्हांस वाटलें. याच्या संदर्भांत मागें येथें झालेली एक गोष्ट ओघानें आली म्हणून सांगतों.

मागच्या वर्षी ऑक्टोबरच्या सुमारास अमेरिकेहून आलेल्या एका गृहस्थानें एकूण पंधरा दिवसांच्या अवधींत आपला पत्ता लिहिलेलीं ४० पाकिटें लंडनच्या वेगवेळ्या विभागांत रस्त्यांवर, इमारतीच्या ओटयांवर, दुकानाच्या खिडक्यांत, उपाहारगृहांच्या टेबलावर, अशीं टाकलीं. त्यांपैकीं कांहीं उघडीं होतीं व कांहीं बंद होतीं. बंद व उघडया दोन्ही प्रकारच्या कांहीं पाकिटां-तून कांहीं शिलिंगज्च्या पोस्टल ऑर्डर्स होत्या. याव्यतिरिक्त ६० पाकिटें

त्यानें नुसतें आपलें नांव व C/o पोस्टमास्तर इत्यादि पत्त्यावर जातील अशीं त्याचप्रमाणें वेगवेळ्या ठिकाणीं टाकलीं होतीं. डिसेंबरअखेरीस त्याला ह्या सर्व १०० पत्रांपैकीं ८९ पत्रें परत मिळालीं. पोस्टल ऑर्डर्स आंत असलेलें फक्त एकच पत्र त्यांस परत मिळालें नाहीं, बाकी सर्व पत्रें आंताल पोस्टल ऑर्डरींसह व्यवस्थित परत मिळालीं. ह्या १०० पत्रांपैकीं ७५ पत्रांना त्यानें तिकिटें डकविलेलीं होतीं व २५ बिनतिकिटांचीं होतीं. यावरून १४ लोकांनीं आपलीं पदरचीं तिकिटें लावून पत्रें पोस्टांत टाकलीं होतीं, असें अनुमान निघतें.

हा सर्व खटाटोप आपण वेगवेगळ्या शहरांतील लोकांचा प्रामाणिकपणा व सच्चा नागरिकपणा ( Civic Sense ) पाहण्यासाठीं करीत आहोंत असें त्यानें मागाहून जाहीर केलें व आपल्या प्रयोगाचे निर्णय-तक्तेहि मागाहून प्रसिद्ध केले.

परवांच्या अर्ध्या पेनीच्या नाण्याचें रहस्य अजून समजलें नाहीं. प्रत्यक्ष तेथें असें घडलें कीं, चौकांत नेल्सन्च्या पुतळ्याजवळ लहान मुलें जमलीं होतीं. त्यांनीं येणाऱ्या-जाणाऱ्या वाहनांचीं पर्वा न करतां तेथें जाण्याची धडपड सुरू केली व ती चिकटवलेली अर्धी पेनी कोण काढून आणतो याची त्यांच्यांत चढाओढ सुरू झाली. कोणी तरी पळावें, मोटार आली कीं परत पळत यावें, ही धामधूम मिनिटभर चालली; एवढ्यांत तेथें असलेल्या एका गृहस्थानें टेलिफोन बूथमध्यें शिरून पोलिसाला टेलिफोन केला व दोनच मिनिटांनंतर एका फटफटीवाल्या पोलिसानें येऊन ती अर्धी पेनी तेथून काढून नेली. येणाऱ्या-जाणाऱ्या वाहनांपासून मुलांना धोका असल्यानें मुलांना स्वैर पळूं न देणें इष्ट होतें व त्यासाठीं पोलिसानें ती अर्धी पेनी उचलूनच नेली होती.

लंडन शहरांत सर्वत्र रहदारीचें नियंत्रण हें स्वयंप्रेरित नियंत्रण दिव्यांच्या साहाय्यानें ( Automatic Traffic Lights ) होत असतें. यासंबंधींहि थोडी गंमतीची माहिती मिळाली ती सांगतों. प्रत्येक रस्त्यावर जेथें जेथें आडवा रस्ता छेदून जाईल तेथें तेथें हे दिवे बसविलेले असतात. अशा प्रत्यक्ष छेदावर ४ दिवे असतात. ( प्रत्येक रस्त्याकडे तोंड करून याप्रमाणें ) ह्या दिव्यांच्याच

शेजारीं पादचाऱ्यांना रस्ता ओलांडतां यावा यासाठीं मर्यादा आंखलेली असते. पादचाऱ्यानें कोपऱ्यावर येतांच वर दिव्याकडे पाहावें व तो तांबडा असल्यास निःशंकपणें रस्ता ओलांडून समोर जावें. सर्व वाहानें तांबडा दिवा होण्यापूर्वींच पिवळा दिवा असतांना मर्यादेच्या अलिकडे येऊन थांबतात. ह्याप्रकारें एका बाजूस तांबडा दिवा लागला कीं, मर्यादेच्या रेघेमागें मोटारीची ही रांगच्या रांग लागते. तों पावेतों आडव्या रस्त्या-वरील मोटारी चाललेल्या असतात. याप्रमाणें क्रमाक्रमानें ही वाहतूक चालते ह्या दोन रस्त्यांपैकीं कोणता रस्ता अधिक वेळ रहदारीस खुला ठेवायचा हें ठरविण्याची पद्धत अशी आहे कीं, प्रत्येक रेघेच्या मागें २० यार्डांवर एक रबराची मोठी आडवी फळी बसविलेली असते. दर सहा महिन्यांनीं ती फळी उघडून पाहतात व त्यावरून त्या रस्त्यावरून सहा महिन्यांत किती वाहनें गेलीं याचा आंकडा काढतात. समजा ' अ ' आणि ' ब ' रस्ते एका चौकांत एकत्र येत असले तर ' अ ' रस्त्यावरून किती वाहनें पळतात व ' ब ' रस्त्यावरून किती वाहनें पळतात हें याप्रमाणें ठरवितां येतें व त्यानुसार ' अ ' रस्ता जास्त वाहतुकीचा असला तर त्याला हिरवा दिवा जास्त वेळ मिळतो. ह्याप्रमाणें दिव्यांच्या वेळेंत केलेला बदल प्रायः फिरवावा लागत नाहीं.

प्रत्येक गोष्ट मोजून-मापून व त्यानुसार योग्य प्रमाणांत करायची ही तेथील पद्धत रहदारीच्या दिव्यांनासुद्धां लागूं केलेली पाहून गंमत वाटते. कळावें.

आपला,
×××

ө ө ө

# ब्रिटिश कुटुंब व हिंदी विद्यार्थी

लंडन.

स. न. वि. वि.

लंडनला येऊन आतां मला जवळ जवळ पांच महिने होत आले आहेत. त्या अर्थी येथील सर्वसामान्य जीवनाची मला आतां संपूर्ण माहिती झाली आहे, अशी समजूत करून घेऊन अनेकांनीं मला येथील लोकांसंबंधीं, येथील पाहुण्यांच्या राहण्या-उतरण्याच्या सोयींसंबंधीं व अंदाजें दरमहाच्या खर्चासंबंधीं अनेक प्रश्न विचारले आहेत. यापुढें इकडे येऊं इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना या उत्तरामुळें पुष्कळ मदत होईल, असेंहि कांहींनीं सुचविलें आहे. त्यामुळें आजच्या पत्रांत ह्यांपैकीं कांहीं गोष्टींचा खुलासा मी करणार आहें. मी कोठें व कसा राहतों, या प्रश्नाला बरेंच खाजगी स्वरूप असल्यानें त्याची चर्चा करण्याचा माझा मानस नाहीं. पण ओघानें माहिती म्हणून कदाचित् मी त्याचा उल्लेख करीन. शाकाहारी व मांसाहारी भोजनाच्या व्यवस्थे-संबंधीं अर्थात्च सांगणें भाग आहे.

आज इंग्लंडमध्यें असलेल्या २८०० भारतीय विद्यार्थ्यांतील सुमारें १८०० विद्यार्थी खुद्द लंडनमध्यें आहेत व त्यांतील बहुसंख्य किंबहुना शेंकडा ८५ वेगवेगळ्या संस्थांच्या वसति-गृहांतून राहत आहेत. वेगवेगळ्या कॉलेजांचीं, युनिव्हर्सिटीचीं व खाजगी संस्थांचीं वसतिगृहें येथें आहेत. व त्यांतूनच आपल्या भारतीय विद्यार्थ्यांना राहावें लागतें. या व्यतिरिक्त येथें येऊन अनेक वर्षें स्थायिक झालेलीं अशीं कांहीं हिंदी कुटुंबें येथें आहेत. व त्यांच्यापैकीं कांहींच्या घरीं ७–८ विद्यार्थ्यांची राहण्याची सोय आहे. या प्रकारचीं बोर्डिंग्ज सोडलीं तर प्रत्यक्ष येथील ब्रिटिश कुटुंबांत वास्तव्यास असलेली भारतीय विद्यार्थी मंडळी अगदींच थोडी निघतील व ज्यांना अशा प्रकारें राहावयास मिळालें आहे अशांची येथें राहण्याची मुदत बहुधा तीन ते पांच वर्षांची असलेली सांपडेल.

ब्रिटिश कुटुंबांत जाऊन राहायचें यासंबंधीं आपल्याकडे फार सवंग कल्पना आहे. कोणालाहि कोणत्याहि कुटुंबांत गेल्याबरोबर जागा मिळते, असा एक

फार मोठा गैरसमज आपल्याकडे पसरला आहे व तो लवकर दूर होणें फार जरूर आहे. मी स्वतः तेथून निघतांना ह्याच कल्पनेनें निघालों होतों व गेल्यानंतर महिन्याभरांतच कोणत्या तरी कुटुंबांत रहायला मिळेल अशा समजुतींत होतों, पण आज पांच महिन्यांनंतरहि मला तें अजून जमलेलें नाहीं.

येथील कुटुंबांत जागा न मिळण्याचीं अनेक कारणें सांगतां येतील. कांहींच्या मतें 'काळ्या' माणसास या प्रकारें जागा मिळणें दुरापास्त होतें असें आहे, पण मी त्याच्याशीं सहमत नाहीं. आतांपावेतों वर्णद्वेषाचा एकहि अंधुकसा सुद्धां नमुना मला औषधाला सुद्धां दिसलेला नाहीं. वर्णद्वेष हें कारणच नव्हे. पण खरें व मुख्य कारण नाइलाजानें सांगणें भाग आहे. आपणाकडील येथील यापूर्वीं आलेल्या सज्जनांनीं अशाप्रकारची पुण्याई येथें संपादन करून ठेवली आहे कीं, त्याचा परिणाम म्हणून आजहि आमचा विद्यार्थी दाराशीं गेला असतां तेथील गृहिणी त्याचें स्वागत करील, त्याला चहा देईल, कदाचित् एखाद्या सप्ताहांत सुट्टींत जेवायला बोलावील, पण घरांत थारा कदापि देणार नाहीं. एका छोट्याशा घरीं राहायला गेलेल्याला आठवड्याच्या आंत तेथून चंबूगवाळें आवरून परत यावें लागलें. चौकशी करतां मालकिणीनें, "I simply could not put up with them." असें थोडक्यांत उत्तर दिलें. येथील समाजपद्धतीच अशी आहे कीं, राहायला गेलेल्या विद्यार्थ्याचा मालकाशीं फारच थोडा—सकाळीं न्याहरीच्या वेळेपुरतां व रात्रीं जेवणापुरता संबंध येतो, पण आलेला हा विद्यार्थी राहतो कसा, कपडे घालतो कसा, बोलतो कसा, स्वच्छता कशी ठेवतो, यावर सारें लक्ष मालकिणीचें असतें. विद्यार्थ्यानें आठवड्याच्या आठवड्याला पैसे द्यावयाचे तेहि मालकिणीजवळच. काय हवें असेल, आवडत असेल, नसेल तें सर्व तिला सांगायचें, असें असल्यामुळें विद्यार्थ्यासंबंधींचें तिचें मत तयार व्हायला फारसा वेळ लागत नाहीं. नवीन ठिकाणाहून आलेला पाहुणा, परदेशस्थ या दृष्टीनें येथील आचरण्याच्या पद्धति ती एकदां फार तर दोनदां सांगेल, पण फरक न आढळल्यास शनिवारीं संध्याकाळीं आठवड्याच्या बिलाबरोबर आठवड्याची नोटीस ती हातांत ठेवील. या तिच्या निर्णयावर अपील नसल्यामुळें आठवडाभरांत दुसरी जागा शोधणें विद्यार्थ्यास भाग पडतें.

मालकिणीस पसंत न पडणाऱ्या गोष्टींत प्रामुख्यानें स्नानगृहांत सर्वत्र पाणी सांडून ठेवणें व तें न पुसणें, शौचकूपाचा योग्य तो उपयोग न करणें, रात्रीं–दिवसा वेळीं–अवेळीं बाहेर पडणें वा बाहेरून येणें. मित्रांना खोलींत बोलावून मोठ्यानें गप्पा मारणें वा खिदळणें, जेवणांत फार आवडी–निवडी असणें इत्यादि गोष्टींचा अंतर्भाव केला पाहिजे. पण कमींत कमी म्हणजे रात्रीं झोपेंत बरळणें वा घोरणें व जास्तींत जास्त म्हणजे शिष्टाचारास सोडून असभ्य वर्तन करणें या गोष्टी समजल्या जातात.

भारतांतील वेगवेगळ्या प्रातांत नीतिमत्तेच्या कल्पना वेगवेगळ्या असूं नयेत, पण तरीहि कांहीं विशिष्ट ठिकाणांहून आलेल्यांच्या येथील नीतिमत्ते-संबंधींच्या कल्पना फारच कोत्या असतात. ह्या पूर्वकल्पनानुसार ते कांहीं ठिकाणीं जास्त लगट करण्याचा प्रयत्न करतात व त्यांत ते स्वतःचा अवमान व हंसें तर करून घेतातच, पण तद्देशीय इतरांच्याहि चारित्र्यावर निष्कारण डाग आणतात. यासंबंधींचा एक मी प्रत्यक्ष पाहिलेला प्रकार लिहिणार नव्हतों. पण मुद्दाम लिहितों. ख्रिस्तमसमधील बर्फावरच्या खेळांत प्रौढ मुलांमुलींचा एक बर्फाचे गोळे मारण्याचा म्हणजे आपल्याकडील रप्पारप्पीचा म्हणा हवें तर–खेळ चालू होता. येथील सर्व सामाजिक खेळांत एक वैशिष्ट्य असें आहे कीं, त्यांत वैयक्तिक कांहीं नसतें. गोळे ज्याला मारायचे ती व्यक्ति कोण आहे याकडे लक्ष द्यावयाचें नसतें. तथापि, आमच्या एका पठ्ठ्यानें त्यांत Personal लक्ष घालून खेळण्यास प्रारंभ केला. त्या मुलीच्या तें लक्षांत यावयास फार वेळ लागला नाहीं. पण तिनें तिकडे दुर्लक्ष केल्यासारखें दाखविलें. थोडीशी संधि साधून या गृहस्थानें एक भला मोठा बर्फाचा गोळा करून व तिच्या अगदीं जवळ जाऊन तो तिच्या डोक्यावर आपटला व तें बर्फ तिच्या तोंडाला फासण्याचा प्रयत्न केला. पण, क्षणार्धांतच तिनें त्याच्या दंडास धरून त्यास जोरांत खालीं ढकललें व त्याचें तोंड चांगलें बर्फांत खुपसून, त्याच्या मानेवर गुडघा देऊन व बर्फ त्याच्या कानशिलावर घासून त्याची अगदीं भंबेरी उडविली ! पण असे साग्रसंगीत धडे मिळाल्यावांचून मात्र आमच्या विद्यार्थ्यांची तेथील मुलींच्या सवंगपणाची कल्पना बदलत नाहीं. पुढें या मुलीनें एका प्रश्नास उत्तर देतांना, " We are quite capable of protecting

ourselves. " असें सांगितलेलें ऐकलें. असो. ह्याप्रमाणें येथील समाज-स्थितीबद्दलच्या खोट्या व चुकीच्या कल्पना ह्या कुटुंबांतून बाहेर पडण्यास कारणीभूत होतात. ब्रिटिश मुलींच्या नीति-अनीतीसंबंधींच्या कल्पना लिहिण्याचा प्रसंग हा नव्हे. पण आपणाकडे ह्यासंबंधीं पसरलेला जो प्रवाद तो एक मोठा गैरसमज आहे असें मला वाटत आहे. अर्थात् हें विधान करतांना मी घरंदाज कुटुंबांतील मुली, युनिव्हर्सिटींत शिकणाऱ्या मुली, चांगल्या ठिकाणीं नौकरीस असलेल्या मुली यांसंबंधीं बोलत आहें. 'बार'-मधून मद्याचे चषक भरून देणाऱ्या मुलींच्या नीति–अनीतीसंबंधीं मी बोलत नाहीं व बोलण्याचें प्रयोजनहि नाहीं.

एतावता ब्रिटिश कुटुंबांत राहण्यास जागा न मिळण्याचें एक महत्त्वाचें कारण आमच्या पूर्वींच्या विद्यार्थ्यांनीं येथें केलेली असभ्य वर्तणूक हें आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं. याशिवाय युद्धोत्तर जागेची टंचाई ( क्वचित् प्रसंगीं जांवई मुलीसह त्याच घरांत राहावयास आल्याचीं उदाहरणें आहेत. ) व महागाईच्या काळांत पाहुण्यांकरितां कांहीं खास कराव्या लागणाऱ्या गोष्टींची अडचण इत्यादि कारणें आहेतच.

या व अशा अनेक कारणांमुळें आमच्या विद्यार्थ्यांपैकीं बहुसंख्य विद्यार्थ्यांना वसतिगृहांतून राहावें लागतें. अमेरिकेहून येणाऱ्या ऐवढेंच नव्हे तर आफ्रिकेंतून येणाऱ्या 'काळ्या' लोकांना सुद्धां आमच्या आधीं कुटुंबांत जागा मिळूं शकते, हें वाचून खेद वाटल्यांखेरीज राहणार नाहीं. मागच्या 'किर्लोस्कर' मध्यें भारतीय लंडन रहिवाश्यांसंबंधीं अत्यंत सौम्यपणें माझे मित्र श्री. साठ्ये यांनीं लिहिलें आहे तें जहालपणें लिहितां येणें मला शक्य आहे. पण तसें करण्याचा माझा मानस नाहीं. फक्त अनेक गोष्टी पाहून मनस्वी चीड येते व ह्या प्रकारच्या लोकांना परत बोटीनें भारतास कां पाठवीत नाहींत असें वाटल्यावांचून राहत नाहीं.

विद्यार्थ्यांची येथील राहण्याची, वसतिगृहांची व्यवस्था, तेथील जीवन, सामान्यतः लागणारा खर्च यांसंबंधीं पुढच्या पत्रांत लिहीन. कळावें.

आपला,

×××

# गाय फॉक्स डे व पॉपी डे

लंडन

स. न. वि. वि.

गेल्या आठवड्यांत येथील जें थोडेंसें समाज-जीवन दिसलें त्यासंबंधींच आज लिहिणार आहें. येथें प्रत्येक गोष्ट पाहत असतांना माझ्या मनांत तत्सदृश आपल्याकडील गोष्टींचे विचार यावेत हें स्वाभाविकच आहे आणि म्हणूनच क्वचित् आपल्या समाज-जीवनासंबंधींहि त्यांत एखादा शब्द येणेंहि शक्य आहे. कॉलेजमधील निवडणुकी कोणास ठाऊक नाहींत? आपल्या कॉलेजांत Vote and canvass for चीं कार्डें छापण्याचा हा मोसमच असतो. कोणाचीं मतें आपल्याला मिळतील, कोणत्या गटासाठीं कोणास गांठावयाचें, कोणत्या मुलीस वळवलें असतां हमखास सर्व मुलींचीं मतें आपणांस मिळतील इ. चर्चा आपणा सर्वांच्या उत्तम परिचयाच्या आहेत. आमच्या कॉलेजांत यूनियनच्या निवडणुकी गेल्या आठवड्यांत झाल्या. प्रेसिडेंट, व्हाईस प्रेसिडेंट व नऊ सभासद अशा अकरा जागांसाठीं निवडणुका होत्या. प्रेसिडेंटच्या जागेसाठीं चार, व्हाईस प्रेसिडेंटच्या जागेसाठीं तीन व सभासदत्वासाठीं चौदा अर्ज आलेले होते. एक दिवस प्रेसिडेंट निवडणूक, एक दिवस व्हाईस प्रेसिडेंट निवडणूक आणि दोन दिवस सभासद निवडणुकी-साठीं नियुक्त करण्यांत आले होते.

अध्यक्षीय निवडणुकीच्या दिवशीं एका मोठ्या फळ्यावर चार फोटो व उमेदवारांची माहिती लावण्यांत आली होती. माहितींत वय, देश, शिक्षण, आवडी-निवडी, राजकीय पक्ष व आतांपावेतों सामाजिक व राजकीय कार्य केलें असल्यास त्याचा उल्लेख होता. प्रत्येक उमेदवारानें आपापल्या परीनें ही माहिती मनोरंजक पद्धतीनें दिलेली होती. उदाहरणार्थ, मॅथ्यु कम्पबेल नामें एक विद्यार्थी युद्धकालांत सैनिक होता. (असे बरेच विद्यार्थी मध्यंतरीं सैनिक म्हणून नौकरी केलेले आतां पुनः सरकारी खर्चानें शिक्षण पूर्ण करण्यासाठीं आलेले आहेत.) त्यानें युद्धकालांत आपण केलेल्या कामगिरीचें मोठें विनोदी चित्र मांडलें होतें. अशाच प्रकारें प्रत्येक उमेदवारानें आपलें

कर्तृत्व त्या माहितींत मांडलें होतें. असा हा चौघांची माहिती व फोटो असलेला फळा प्रवेशद्वाराच्याच जवळ उभा करून ठेवला होता. त्याच्याच मागें एक छोटेंसें टेबल घेऊन एक मुलगी बसली होती. ही मागच्या वर्षाची चिटणीस होती. प्रत्येक आंत येणाऱ्या विद्यार्थ्याला त्याच्या नांवामागें खूण करून मतपत्रिका देत होती. प्रत्यक्ष उमेदवार किंवा त्याचे हस्तक असे कुणीहि तेथें हजर नव्हते. " अमक्यालाच मत द्या ! " इत्यादि कांहीं भाषाहि नव्हती. प्रत्येकजण फळ्यावरील माहितीवरून आपलें मत ठरवून तें योग्य त्या उमेदवाराला देत होता. संध्याकाळीं सहा वाजेपावेतो हळूहळू मतदान सुरूच होतें. आमच्या कॉलेजांत ८०० विद्यार्थिनी-विद्यार्थी आहेत. ( मुली जास्त असल्यानें त्यांचा क्रम आधीं ) त्यांपैकीं सरासरी ७५ टक्के मतदान झालें.

उपाध्यक्षपदाच्या व सभासदत्वाच्या निवडणुकाहि अशाच प्रकारें शांतपणें आटोपल्या. सभासदांच्या निवडणुकीच्या दिवशीं शेंकडा ९० मतदान झालें तेव्हां कुठें थोडीशी गर्दी व गडबड झाली. एका आफ्रिकन उमेदवारासाठीं इतर आफ्रिकन बरीच खटपट करतांनाहि आढळले. आपला त्रावणकोर-मधून आलेला एक विद्यार्थी उभा होता. पण तो पडला.

ह्या निवडणुकीच्या निमित्तानें येथील मुलांमुलींत असलेली शिस्त प्रथमच उत्कटपणें माझ्या निदर्शनास आली. म्हणून व ती सहजसाध्य आहे, प्रयोगार्ह आहे असें वाटलें. म्हणून मुद्दाम विस्तारानें लिहून पाठवीत आहें. आपल्या-कडील कॉलेजांत एखादें वर्ष ह्या पद्धतीनें गोंधळ होऊं न देतां निवडणुका घेतां आल्या तर पहा असें मी यांतून सुचविणार आहें.

निवडणुकी संपल्या त्या दिवशीं म्हणजे शुक्रवारीं संध्याकाळीं सर्व नूतन निवडून आलेल्या मंडळाच्या सन्मानार्थ एक ' सोशल ' घडविण्यांत आलें. प्रथम सामाजिक खेळ नंतर अल्पोपाहार व शेवटीं डान्स असा कार्यक्रम होता. सुमारें दोन-दोनशें विद्यार्थ्यांचे ४ गट केले होते. प्रत्येकाला आपल्या कोटावर, झग्यावर लावायला एक लेबल दिलें होतें. त्यावर आपलें नांव व देश लिहावयाचें अशी कल्पना होती. मी ज्या गटांत होतों तेथें एक-दोन गंमतीचे पण सोपे खेळ झाले. प्रथम आम्हांला प्रत्येकाला पांच-पांच वाल वांटण्यांत आले. नंतर सूचना अशी कीं, प्रत्येकानें सर्वत्र हिंडून जास्तींत

जास्त लोकांना भेटावयाचें व त्यांच्याशीं संभाषण करावयाचें. प्रश्नोत्तरांत कुणीहि एकाक्षरीं ' होय ' किंवा ' नाहीं ' म्हणावयाचें नाहीं. जो केवळ ' होय ' किंवा ' नाहीं ' एवढेंच फक्त म्हणेल त्यानें आपल्या पांचांपैकीं एक वाल त्या प्रश्न विचारणाऱ्याला द्यावयाचा. होकारात्मक किंवा नकारात्मक उत्तर देण्यास प्रतिबंध नव्हता, परंतु एका शब्दांत उत्तर देणें मान्य नव्हतें. खेळास सुरुवात झाली आणि सर्व हॉलभर जी दंगल उसळली, ती कांहीं विचारूं नका. गेल्या महिनाभरांत भेटलों नसेन इतक्या विद्यार्थ्यांना त्या दिवशीं भेटलों. ह्या दंगलींत प्रथम प्रथम मी हारलों व माझ्याजवळचे पांचांपैकीं चार वाल गेले. पण पुढें चातुर्यानें मी बरेच वाल जिंकले व खेळ संपला तेव्हां मजजवळ अकरा वाल जमले होते. जास्तींत जास्त २३ वाल जमविणाऱ्या एका मुलीला आइस्क्रीमच्या दोन कांड्या बक्षीस देण्यांत आल्या. अगदीं अपरिचित अशा लोकांतहि परस्पर मनसोक्त संभाषण घडवून आणण्यासाठीं योजिलेला हा खेळ नवीनच एकत्र आलेल्या लोकांसाठीं उपयुक्त आहे असें मला वाटलें.

दुसऱ्या खेळास प्रारंभ झाला. ह्यांत एक बक्षीस एका गृहस्थाजवळ देण्यांत आलें होतें व ह्या गृहस्थास जो प्रथम हुडकून काढील त्याला तें मिळणार होतें. प्रत्येकानें सुरुवातीस त्या मेळाव्यांत पोस्टमन कोण आहे तें शोधून काढावयाचें. नंतर पोस्टमन वॉशरमनला विचारण्यास सांगे. वॉशरमन सांपडलाच तर पोलिसमनला भेट म्हणून आदेश देई. पोलिस-मननें प्रोफेसरला भेट म्हणून सांगावें तर प्रोफेसरनें टीचरचा शोध कर असें सांगावें व अखेर टीचरजवळ हें ट्रेझर सांपडावें अशी योजना होती. खेळास सुरुवात होतांच प्रथम प्रत्येकजण दुसऱ्यास " Are you a postman ? " असा प्रश्न विचारूं लागला. आमच्यामध्यें दोनशें जणांत एक कुणी तरी पोस्टमन होता. पण तो सांपडावयाचा कसा ? ह्या निमित्तानें प्रत्येकानें जवळ जवळ इतर सर्वांस दोन तीनदां तरी वेगवेगळे प्रश्न विचारले असावेत. मीच जवळ जवळ दीडशें जणांना तरी त्या दिवशीं ह्या निमित्तानें भेटलों. परस्पर ओळखी जरी ह्या गडबडींत झाल्या नाहींत तरी एकमेकांतील संकोच नाहींसा करण्यास ह्या खेळाची फार मदत होते असें माझ्या निदर्शनाला आलें. एरव्हीं दोन वर्षांत सुद्धां मी ज्यांच्याशीं

बोललों नसतों किंवा ज्यांच्याशीं बोलण्यास मला संकोच वाटला असता अशा विद्यार्थ्यांशीं बोलण्याचा प्रसंग ह्या निमित्तानें आला. माझी स्वतःची मजल ह्या खेळांत प्रोफेसरला भेटण्यापर्यंत आली होती. पण एवढ्यांत न्यूझीलंडमधून आलेल्या एका विद्यार्थ्याला टीचर सांपडला व बक्षीस त्याला मिळालें. नंतर मग कुणी कुणी पोस्टमन, वॉशरमन, पोलिसमन इ. चें काम केलें तें सांगण्यांत आलें.

अल्पोपाहार व सामुदायिक परिचय-विधीनंतर नृत्याच्या कार्यक्रमास सुरुवात झाली व नंतर हा कार्यक्रम संपला. येथील समाजजीवनांतील एक भाग अशा प्रकारें अनायासें पाहावयास मिळाला. आपल्याकडे अशा प्रकारचीं संमिश्र समाजाचीं संमेलनें घडण्याची शक्यता फार कमी. त्यामुळें अशा प्रकारच्या खेळांचें आपल्याकडे फारसें कार्य नाहीं असें वाटतें. पण येथें अशा प्रकारचीं संमेलनें सारखींच होत असतात व ह्या ना त्या निमित्तानें परिचय सारखे वाढतच जातात. आणि अखेर अगदीं मोकळें वातावरण निर्माण होतें. असाच विद्यार्थ्यांनीं साजरा केलेला दुसरा एक उत्सव सांगतों.

मागच्याच बुधवारीं संध्याकाळीं कॉलेजमधून घरीं चाललों होतों. वळणावर एका हॉकी स्टिकवर हॅट ठेवून व त्याला कपडे चढवून बुजगावण्याच्या धर्तीचा एक मनुष्य उभा करून त्याच्या शेजारीं दोन छोटीं मुलें उभीं होतीं. बहीण-भावंडें असावींत बहुधा. मला येतांना पाहून ती छोटी मुलगी पुढें झाली व "Care to drop a penny for the Guy, Sir." असें मोठ्या झोकांत तिनें मला विचारलें. गेले कांहीं दिवस सर्वत्र Take care of children च्या पाट्या पाहून मी त्या पाट्यांचें प्रयोजन एका स्थानिक मित्राला विचारलें होतें व त्यानें मुलांचा गाय फॉक्स डे साजरा करण्याचा उत्साह मला सांगितला होता. त्यामुळें हें गाय फॉक्स-प्रकरण मी ओळखलें होतें. पण मुद्दाम तिची परीक्षा पाहण्याकरितां मी तिला विचारलें, "What is this?" तिनें विचारलें "Don't you know he is a Guy?" मग मीं विचारलें, "त्याला पेनी कशाला पाहिजे?" मुलगी क्षणभर निरुत्तर झाली. पण तिचा भाऊ झटकन् पुढें झाला व त्यानें उत्तर दिलें, "For crackers, of course!" नंतर

मी त्याला हा गाय कोण आहे असें विचारलें. पण मुलगा फारच लहान होता. आणि त्याला इतिहास माहिती असण्याची शक्यताहि नव्हती. आपणांस प्रश्नाचें उत्तर देतां येत नाहीं असें पाहून तो हिरमुसला झाला. पण त्याच्या मनावरचें ओझें काढून टाकण्यासाठीं मी एक पेनी त्याच्या हातावर ठेवून पुढें सटकलों.

१६०५ मधील नोव्हेंबरच्या ५ तारखेला गाय फॉक्स ह्या उपद्व्यापी गृहस्थानें मोठा थोरला गन पावडर प्लॉट रचून संपूर्ण पार्लमेंट उडवून देण्याचा कट रचला होता. पार्लमेंटगृहाच्या खालीं सुरुंगाच्या दारूचीं पिपें भरून कटाची संपूर्ण तयारी झाली होती. परंतु कटांतील एका व्यक्तीच्या नात्याचा एक गृहस्थ पार्लमेंटमध्यें होता. त्याला त्यानें "आज पार्लमेंटमध्यें उपस्थित राहूं नकोस, धोका आहे," अशी सूचना दिली होती. त्यामुळें सर्व कट उघडकीस आला व पार्लमेंटगृह वांचलें. पुढें गाय फॉक्सवर कायदेशीर खटला चालून त्याला देहान्त शासन देण्यांत आलें. तेव्हांपासून लोकस्वातंत्र्याच्या ह्या द्वेष्ट्याचें स्मरण ठेवून दरवर्षी त्याला जाळण्याचें व्रत इंग्लंडमधील मुलांनीं अखंड चालविलें आहे. ऑक्टोबरच्या शेवटच्या आठवड्यापासून त्याच्याच तयारीस सुरुवात होते. चिंध्या आणि रद्दी कागद इत्यादींपासून गायच्या मोठाल्या प्रतिमा करण्यांत येतात व त्यांचें सामुदायिक 'हवन' नोव्हेंबरच्या ३, ४ व ५ तारखांना करण्यांत येतें. फटाके, फुलबाज्या, भुईनळे इ. दारूकाम उडविण्यांत येतें व मोठाल्या होळ्या करण्यांत येतात.

ह्या प्रकारच्या उत्सवांत मोठे लोक जरी भाग घेत असले तरी बाल-बालिकांचा उत्साह ह्यांत नेहमीं जास्त असतो. लहान मुलें सोंगें घेऊन दाढीमिशा लावून गाय बनतात व फटाक्यांसाठीं पेनी गोळा करतात. सामान्यतः त्यांचें कौतुक करण्याची इकडे प्रथा असल्यानें मुलांना चांगले पैसे मिळतात. मी माझ्या रस्त्याच्या कोपऱ्यावरील मुलाला "आज किती पेनी मिळाल्या रे?" असें विचारल्यावर त्यानें ४ शिलिंग ६ पेन्स मिळाल्याचें सांगितलें. "But of course, they are for two of us, mysetf a my sister." असें त्यानें सांगितलें. एका साधारण मोठ्या मुलाला मी मुद्दाम गाय फॉक्सची ऐतिहासिक भूमिका विचारली. तो

क्षणमात्र गोंधळा, पण दुसऱ्याच क्षणाला त्यानें अशी गप्प झोकून दिली कीं, ती कोणत्याच इतिहासांत नमूद असणें शक्य नाहीं. हजरजबाबीपणा-बद्दल मात्र त्याचें कौतुक करणें आवश्यक होतें. आपल्याकडे शिराळशेट करतात हें तुम्हांस माहितीच आहे. तो शिराळशेट आणि होळीचा एकत्र कार्यक्रम म्हणजेच 'गाय फॉक्स डे' उत्सव असें मानण्यास हरकत नाहीं.

कॉलेजमधील मुलें व मुलीं एकत्र जमून हा उत्सव करतात व सर्व कॉलेजें मिळून एक मोठा उत्सव एका ठिकाणीं साजरा करतात. आमच्या युनि-व्हर्सिटीच्या सर्व कॉलेजांचा उत्सव येथील युनिव्हर्सिटी कॉलेजच्या पटांगणांत शुक्रवारीं रात्रीं आठ वाजतां करण्यांत आला. भाड्याच्या मोटार ट्रक्स घेऊन त्यावर मोठमोठासे गायचे पुतळे बसवून त्यांत मुलें व मुलीं बसल्या. व पत्र्याच्या टिमक्या वाजवीत आणि आपआपल्या कॉलेजच्या आरोळ्या ठोकीत ह्या मोटार ट्रक्सची एक मोठी मिरवणूक सर्व चौकांतून हिंडून आली. ह्या सर्व प्रकारास गंमतीचें स्वरूप असल्यानें 'पुरें झालें शिक्षण', 'खड्डयांत घाला शिक्षण-संस्था' ह्या आरोळीस प्रामुख्य देण्यांत आलें होतें. सर्व मोटारींची मिरवणूक हिंडून शेवटीं युनिव्हर्सिटी कॉलेजमध्यें आली. तेथें जवळ जवळ १५०० विद्यार्थी व इतर लोक जमलेले होते. मध्यभागीं प्रतिमा ठेवून त्या पेटवून देण्यांत आल्या. व मग एकामागून एक प्रत्येक कॉलेजच्या वेगवेगळ्या आरोळ्या सुरू झाल्या. येथें प्रत्येक कॉलेजचा जसा एक गणवेष असतो तशीच एक आरोळीहि असते. आपल्याकडच्या कॉलेज किंवा शाळांमधून ही प्रथा फारशी नाहीं. तेथील मुलांनीं आरोळी दिली कीं, त्या त्या कॉलेजचीं मुलें-मुली त्याभोंवतीं एकत्र होतात. नंतर Folk dance सारखें नृत्य होतें व फटाके, भुईनळे, बाण, फुलबाज्या इ. उडविण्यांत येतात. तोंपावेतों इतर कॉलेजांच्या मिरवणुकी येऊन त्यांचा तसाच कार्यक्रम सुरू होतो. ह्या सर्व उत्सवास उत्तम सामाजिक स्वरूप दिलें गेलेलें असून बीभत्स, ओंगळ, या प्रकारच्या कोणत्याहि कार्यक्रमांस ह्या उत्सवांत स्थान नव्हतें. पुष्कळसे पालक आपल्या लहान मुलांना होळीची गंमत दाखविण्यासाठीं घेऊन आले होते. पुष्कळशी बायका-मुलेंहि आलीं होतीं. आणि मला कांहीं प्राध्यापकहि सहकुटुंब सपहारिवार आलेले दिसले होते. कांहीं गोंधळ वगैरे होऊं नये एतदर्थ पोलिस बहुसंख्य उपस्थित होते. पण त्यांची भूमिका

सर्वथैव प्रेक्षकांचीच होती. व त्यांना कोठेंहि हस्तक्षेप करावा लागला नाहीं. दोन हजार लोकांच्या समुदायांत विशेषतः संमिश्र समजांत, होळीसारखा कार्यक्रम कांहींहि गैरशिस्त किंवा वावगा प्रसंग न घडतां पार पडला; ह्याचा परिणाम माझ्या मनावर झाल्याशिवाय कसा बरें राहील?

परवां रविवारीं सकाळीं पाहिलेलें एक दृश्य अविस्मरणीय आहे. ट्रॅफल्गार स्क्वेअरमधील नेल्सनच्या पुतळ्याकडून पार्लमेंटकडे जाण्याच्या रस्त्यावर मध्यभागीं १९१४ ते १९१८ व १९३९ ते १९४४ ह्या दोन महायुद्धांत कामीं आलेल्या सैनिकांचें एक स्मारक आहे. ११ नोव्हेंबर हा दिवस येथें ' पॉपी डे ' म्हणून मानला जातो. त्या दिवशीं युद्धांत कामीं आलेल्या सर्व सैनिकांचें स्मरण करावें व त्यांच्या कुटुंबांच्या आर्थिक परिस्थितीस साहाय्य करावें असा संकेत असतो. रविवारीं सकाळीं ह्या स्मारकाजवळ सामुदायिक प्रार्थनेचा कार्यक्रम झाला. स्वतः राजेसाहेब समारंभास उपस्थित होते. प्रथम प्रार्थना झाल्या. ' ईश्वर सर्व मृतांच्या आत्म्यास शांति देवो ! " असें म्हणून झाल्यावर दोन मिनिटें मृतांच्या सन्मानार्थ शांतता पाळावी हा संदेश ध्वनिक्षेपकावरून देण्यांत आला. आणि माझें मलासुद्धां खरें वाटलें नाहीं, पण आश्चर्य सांगतों त्या प्रचंड लोकसमुदायांत—आपल्याकडे शनिवार-वाड्यासमोर किंवा स. प. क्रीडांगणावर सावरकरांच्या भाषणाला जमतो तेवढ्याच समुदायांत—एक शब्द सुद्धां ऐकूं आला नाहीं. व्हाईट हॉलच्या पटांगणांतील झाडांच्या पानांची सळसळ व दूर नदींतून जाणाऱ्या वाफरांची खळबळ सुद्धां स्पष्ट ऐकूं येऊं लागली. एवढा मोठा जनसंमर्द अत्यंत शांत उभा राहिलेला मी परवां प्रथमच पाहिला. राजेसाहेब मान लववून उभे होते. नंतर प्रथम राजेसाहेबांनीं व मग ग्लाउसेस्टरच्या ड्यूकनें स्मारकास पुष्पहार समर्पण केले. नंतर संध्याकाळपावेतों एकसारखे लोक स्मारका-जवळ जाऊन आपापले पुष्पगुच्छ तेथें ठेवीत होते असें म्हणतात. मी हा समारंभ पाहण्यास मुद्दाम गेलों होतों. नंतर तेथून मी वेस्ट मिन्स्टर ॲबे येथें पॉपी डे वर एका बिशपचें भाषण होतें तेथेंहि गेलों होतों. येथें ॲबेच्या बाहेरील पटांगणांत निरनिराळ्या पलटणींचे ध्वज लावण्यांत आले होते. व त्या त्या पलटणींच्या कामीं आलेल्या सैनिकांच्या स्मरणार्थ लाकडाचे छोटे छोटे क्रॉस त्या ध्वजांच्या सभोंवार पुरण्यांत आले होते. लोक सारखे येथें

येत होते व ज्यांचे नातलग युद्धांत मृत झाले ते येथें येऊन एका गृहस्था-जवळून एक लाकडी क्रॉस घेऊन त्यावर नांव लिहून तो क्रॉस तेथें नेऊन पुरीत होते. मी गेलों तेव्हां बाहेरील पटांगणांत अक्षरशः असंख्य क्रॉस पुरले गेलेले होते.

क्रॉस देणाऱ्या गृहस्थाजवळ उभ्या असलेल्या एका गृहस्थाला मी पॉपी डेचा इतिहास विचारीत होतों. आमचें संभाषण सुरू असतांना एक गरीबशी तरुण बाई एका चार-पांच वर्षांच्या मुलाला घेऊन तेथें आली. एक पेनी डब्यांत टाकून तिनें एक क्रॉस घेतला. व आम्ही उभे होतों त्याच्या पलिकडे एका खिडकीच्या ओट्यावर मुलाला बसवून तिनें त्या क्रॉसवर नांव लिहिलें. नंतर थोड्या अंतरावर जाऊन एका ठिकाणीं तिनें तो क्रॉस पुरला व ती परत आली. माझें लक्ष तिकडेच होतें. परत आल्यानंतर उचंबळून आलेल्या भावनांना अश्रूंच्या रूपानें वाट करून देऊन ती क्षणमात्र तेथें थांबली. चष्मा काढून डोळे पुसून तिनें मुलाला ओट्यावरून खालीं उतरवलें. व ह्या प्रकारानें किंचित् गोंधळलेल्या त्या मुलाला बरोबर घेऊन ती पलिकडे दूर जाऊन व्याख्यानासाठीं बसली.

व्याख्यानांत वक्त्यानें पॉपी डे चें स्मरण कां केलें पाहिजे हें सांगितलें व मागच्या वर्षीच्या पॉपी डे च्या वर्गणींतून ७० हजार कुटुंबियांना मदत देण्यांत आल्याचें सांगितलें. ह्यावरून हें उत्पन्न किती असेल ह्याची सहज कल्पना येऊं शकेल. व्याख्यानानंतर प्रश्न विचारतांना एकानें विचारलें, " जर युद्धें थांबणारच नसतील, जर कोरियांतील सध्यांची परिस्थिति चालू आहे तशीच राहणार असेल तर माझीं दोन मुलें युद्धांत मारलीं गेलीं तीं व्यर्थ गेलीं—त्यांनीं आपले प्राण व्यर्थ घालविले असाच ह्याचा अर्थ नाहीं का ? " त्यावर वक्त्यानें उत्तर दिलें, " त्यांचें बलिदान मुळींच व्यर्थ गेलेलें नाहीं. आपणांस शांततेनें राहतां यावें ह्यासाठीं त्यांनीं प्राण खर्ची घातले पण जें त्यांना मृत्यु स्वीकारूनसुद्धां साधलें नाहीं, तें आपणांस जिवंतपणीं साधावयाचें आहे. हें जर आपणांसहि साधलें नाहीं तर पुढच्या पिढीला शांततेनें व सुखानें जगतां यावें एतदर्थ आपल्यालाहि बलिदान करणें आवश्यक ठरेल. "

सभा फारच उत्तम रीतीनें पार पडली. गेल्या आठवडाभरांतच हे सर्व

वेगवेगळे प्रसंग एकामागून एक माझ्या डोळ्यासमोरून गेले आणि त्यांनीं इंग्लंडच्या सामाजिक जीवनासंबंधीं मला बरीच माहिती मिळवून दिली. कळावें.

आपला,
×××

० ० ०

## ख्रिस्तमस

लंडन

स. न. वि. वि.

नाताळ अगदीं जवळ आला असल्यानें आतां सर्वत्र शाळा-कॉलेजें यांना सुट्या लागल्या आहेत व मुलें व मुली रस्त्यावर बर्फांत खेळूं लागलेलीं दिसत आहेत, पण त्यांची निराशा करण्यासाठींच जणूं काय बर्फ पडण्याचें थांबलें आहे. थंडी मात्र अजूनहि भेसूर आहेच. 'बर्फाच्छादित' पांढरा नाताळ पाहावयास मिळेल कीं नाहीं, याबद्दल मुलांना शंका वाटूं लागली आहे.

लंडनच्या रस्त्यांतून सर्व दुकानांत आरास करण्याची मोठी धामधूम नेहमींच असतें, मग आतां तर काय? सर्व शोकेसेस अगदीं फुलल्या आहेत. हॉलीच्या तांबड्या फळांनीं आणि 'ख्रिस्तमस ट्री'च्या प्रदर्शनांनीं देणग्या देण्यासाठीं वस्तु इतक्या विविध स्वरूपाच्या व किंमतीच्या आहेत कीं, प्रत्येकाला त्यांतील कांहीं तरी घेतां यावें. 'यंदाच्या ख्रिस्तमसला त्याला हॅट द्या' किंवा 'तिला ख्रिस्तमसला ही देणगी देऊन खुश करा.' या प्रकारचीं सूचक वाक्येंहि देणग्यांच्या निवडीसाठीं शेजारीं लावलेलीं असतात. सर्व मोठ्याल्या रस्त्यांवरचीं दुकानें इतकीं भरगच्च भरलेलीं असतात ह्या वेळीं कीं—

ज्याला लंडनची बाजारपेठ पाहावयाची असेल त्यानें नाताळांतच येथें

यावें असें म्हणावेंसें वाटतें. ऑक्स्फर्ड स्ट्रीट आणि पिकॅडली हीं दोन लंडन-मधील सर्वांत जास्त रहदारीचीं आणि अतएव जास्त आकर्षक ठिकाणें आहेत. लंडनमधील सगळ्यांत मोठें दुकान सेल्फ्रिजीस हें ऑक्स्फर्ड स्ट्रीट-वर आहे. आपल्या सरस्वती-विलासइतका दर्शनी भाग त्यानें व्यापल्या असून इमारतीच्या चारहि मजल्यांवर वेगवेगळे विभाग करून सर्व माल आकर्षक पद्धतीनें मांडून ठेवला आहे. पण ह्या प्रकारच्या दोन-तीन दुकानांचें स्वतंत्रच वर्णन मी पुढें केव्हां तरी लिहीन—ह्या सेल्फ्रिजीसनें संपूर्ण दुसऱ्या मजल्याची बाहेरची बाजू मोठाल्या सुंदर ख्रिस्तमस ट्रीच्या रांगेनें सजवली असून रेनडियरच्या बर्फावरून घसणाऱ्या गाडींत देणग्यांनीं भरलेलें गाठोडें घेऊन बसलेला "फादर क्रिस्तमस" भल्या मोठ्या आकारांत मांडून ठेवला आहे. सर्व क्रिस्तमस झाडांवर रंगीबेरंगी छोटे छोटे दिवे लावलेले असून त्यांची लुकलुक सतत चालू असते.

पिकॅडलीमध्यें तरी निऑनच्या ट्यूबस्नें सर्व चौक प्रकाशित केला असून सर्व प्रकारच्या विद्युद्दीपांच्या साहाय्यानें जाहिरातदारांनीं आपापल्या मालाची ठळक जाहिरात करण्याची अगदीं शर्थच केली आहे. स्वॉन अँड एडगर हे या भागांतील सर्वांत मोठें दुकान सेफ्रिजीसप्रमाणेंच फारच सुशोभित केलेलें आहे. इंग्लंडमध्यें कोणता ऋतु आहे हें या स्वान अँड एडगार किंवा सेल्फ्रिजीसच्या दुकानावरून एक फेरी मारली असतां सहज ध्यानांत येतें, असें एका ग्रंथकारानें म्हटलें आहे. कारण त्यांच्या शो-केसेस-मधून त्या त्या ऋतूंत खपणारा व आवश्यक असाच माल त्या त्या वेळेस मांडून ठेवण्यांत येतो. असा त्याचा लौकिक आहे.

ट्रफल्गार स्क्वेअर हें मानवी वर्दळीचें आणखी एक महत्त्वाचें स्थान आहे. आपल्या शनिवारवाड्यासमोरील पटांगणाएवढें मोठें पटांगण असून त्याच्या दोन बाजूस दोन मोटालीं व सुंदर बांधलेलीं उंच उडणारीं कारंजीं आहेत. नाताळनिमित्त कारंज्यांवर आंतून व बाहेरून रंगीत मोठाले दिवे लावले असल्यानें आपल्याकडील म्हैसूरच्या वृंदावन बागेंत जसें रंगीत कारंजाचें सुंदर दृश्य पाहावयास मिळतें तसेंच सध्यां येथें दिसतें. दोन कारंजांच्या मध्यें सुमारें ४० फूट उंचीचें ख्रिस्तमस झाड उभें केलेलें असून त्यावरहि विविध रंगांचे दिवे लटकवण्यांत आलेले आहेत. हें झाड

ह्याप्रसंगासाठीं खास नॉर्वेहून येतें व त्याचा येथें २३ डिसेंबरला मोठ्या समारंभानें उद्घाटन-समारंभ होतो.

नाताळांत क्रिस्तमस ट्रीचा प्रवेश प्रथम जर्मनांनीं केल्याचें नमूद आहे. त्यांनीं ह्या झाडास शुभ समजून घरांत आणून २५ डिसेंबरला त्याची पूजा वगैरे करण्याचा प्रघात सुरू केला. झाड शृंगारणें इत्यादि कल्पनांहि प्रथम त्यांचीच. आपणांकडे जशी ' तुळस ' ही आपण शुभ व पवित्र समजतों तसेंच हें क्रिस्तमस झाड येथें समजलें जातें. त्यामुळें मी ह्या झाडाच्या घरीं आणून शृंगारणें इ. प्रकारास " तुळशीचें लग्न " असें गमतीनें म्हटलें तरी फारसें चुकणार नाहीं. ट्रॅफल्गार स्क्वेअरमधील झाड हें दरवर्षीं नॉर्वे ह्या देशांतील ऑस्लो नामक परगण्यांतून सर्वांत उंच वाढलेलें असें निवडून भेट म्हणून पाठविण्यांत येतें. स्कॉटलंडमध्यें हीं झाडें खूप होतात. व तेथून येथें वॅगन्सच्या वॅगन्स सारख्या येत असतात. मोठालीं दुकानें, रेल्वेचीं मोठालीं स्टेशन्स, टाऊन हॉल इत्यादि ठिकाणीं मोठालीं झाडें लावण्यांत येतात. पण इतर ठिकाणीं लहान लहान झाडें उपयोगांत आणतात. मात्र प्रत्येक घरांत ३–४ दिवस अगदीं छोटेंसें का होईना पण क्रिस्तमस झाड असतेंच. त्या झाडावर आरास करून त्याच्या फांद्यांवर छोट्या छोट्या देणग्या टांगून ठेवलेल्या असतात व क्रिस्तमस-पार्टीनंतर सर्व पाहुणे एकत्र जमल्यावर फादर क्रिस्तमस येऊन झाडांवरील देणग्या सर्वांना वांटतो अशी येथें प्रथा आहे.

एका मोठ्या दिवाणखान्यांत मध्यभागीं हें क्रिस्तमस झाड उभें करून शृंगारून व देणग्या टांगून तयार केलेलें असतें. सर्व दिवाणखान्यांत खूप आरास केलेली असते आणि भिंतीवर दोऱ्या टांगून यजमानाला आलेलीं सर्व क्रिस्तमस कार्डें प्रदर्शन मांडून ठेवलेलीं असतात. ज्यांच्याकडून क्रिस्तमस-बद्दल सदिच्छा आल्या ते सर्व मूर्त स्वरूपांत समारंभास उपस्थित आहेत असा त्यांत गर्भित अर्थ आहे असें मला सांगण्यांत आलें. अर्थांत्च जितकीं कार्डें जास्त तितकीं यजमानांची प्रसिद्धि व लोकप्रियता जास्त असाहि यांतून अर्थ निघतोच. सामान्यतः कोठेंहि गेलें तरी टेबलावर व ' फायर प्लेस ' वर रांगेनें व व्यवस्थित मांडून ठेवलेलीं अशीं ५०-७५ कार्डें तरी पाहावयास मिळतात.

हें नाताळांतील भेट-कार्डांचें व देणग्यांचें प्रस्थ इतकें प्रचंड प्रमाणांत आहे कीं, हें काम उरकण्यासाठीं डिसेंबर व जानेवारीचे पहिले ६ दिवस एवढ्या दिवसापुरतें दीड लक्ष पत्रांचा व्यवहार करणारें स्वतंत्र पोस्ट ऑफिस उघडावें लागतें. ११ हजार नवे पोस्टमन तात्पुरत्या कामासाठीं घेतले जातात. आणि अहोरात्र हें कार्ड व देणग्या पाठविण्याचें काम हातावेगळें केलें जातें. प्रत्यक्ष नाताळांत पोस्टाला सुटी तर नसतेच, पण जादाच काम असतें. नाताळांत रविवारींसुद्धां बटवडा होतो. पण रोज तीन वेळां बटवडा होतो तो ह्या दिवसांत एकदां होतो २५ तारखेला दुपारीं खांद्यावर मोठाल्या पिशव्या घेतलेले किंवा ढकलगाडीवरून पिशव्या टाकलेले पोस्टमन पत्रांचे भारेच्या भारे घरांतून टाकत आलेले मला परवा पाहावयास मिळाले. ह्या पोस्टेजमुळेंच पोस्टाला दरसाल आपल्या अंदाजपत्रकांत शिल्लक दाखवितां येते असें मला चौकशी करता समजलें. इतर सर्व खात्यांचीं अंदाजपत्रकें तुडित असतांनासुद्धां फक्त नाताळामुळें पोस्टाचें खातें शिल्लक दाखवितें. यावरून पोस्टांतून होणाऱ्या व्यवहाराची कल्पना येईल.

आणि चॅन्सेलर ऑफ एक्स्चेकर तर फारच खुषींत असतो ह्या वेळेस. कारण ह्या कार्डावरच्या विक्रीकराचे भरपूर पैसे त्याच्या तिजोरींत एकदम यावयाचे असतात. येथें विक्रीकर जबर म्हणजे ४० पासून ६५ टक्क्या-पर्यंतों आहे. नाताळच्या भेट-कार्डांवर ४५ टक्के विक्रीकर आहे. यंदा एकूण साडेसहा कोटी पौंडांचीं नाताळ-कार्डें खपलीं. या प्रचंड रकमेवरून अंदाज करतां आला तर किती कार्डें खपलीं असतील पहा ! चॅन्सेलरसाहेबाला आठ दिवसांत तीन कोटी पौंडांचें उत्पन्न आलें, मग काय झालें खुषींत नसायला ?

अठराव्या शतकांत रॉयल ॲकेडमींतील एका नामांकित चित्रकारानें नाताळांतील एक पत्र पाठवितांना त्याच्या आंतल्या पानावर ख्रिस्तजन्मा-निमित्त एका कुटुंबांतील सर्व लहान-थोर मंडळी एका टेबलाभोंवतीं बसून आनंद उपभोगीत आहेत असें एक चित्र काढलें होतें व त्याखालीं Merry Christamas असें लिहिलेलें होतें. हें पत्र रॉयल ॲकेडमीच्या तत्कालीन अध्यक्षाला पाठवलें होतें. तें त्याला फारच आवडलें व त्यापेक्षांहि ती कल्पना त्याला फारच आवडली. त्यानें तें कार्ड राजास दाखविलें व राजे-साहेबांनीं कार्ड लिहिणाऱ्याचा मोठा गौरव केला व त्या चित्राच्या कांहीं

प्रती करून मागितल्या. ही खरी नाताळच्या भेट-कार्डाची जन्मकथा! यानंतर इतक्या विविध प्रकारचीं चित्रें ह्या क्रिस्तमस कार्डावर काढलीं जाऊं लागलीं. त्यांतून तत्कालीन सामाजिक परिस्थितीचें असें सुंदर प्रतिबिंब दिसूं लागलें कीं, एका मोठ्या अभ्यासू गृहस्थानें हीं विविध प्रकारचीं जुनीं व नवीं नाताळ भेट-कार्डें जमविण्याचा छंद सुरू केला. महत्प्रयासानें जुनीं कार्डें त्यानें जमा केलीं आणि आजच्या त्याच्या संग्रहांत ४००० कार्डें आहेत. आपण लहान मुलांच्या पोस्टाच्या तिकिटें जमविण्याच्या इ. छंदांत जें पाहातों तेंच नेमकें येथें आहे. पण हा संग्रह करणारे गृहस्थ सामान्य नसून येथील शिक्षण-खात्यांतील एक फारच वरच्या दर्जाचे अधिकारी आहेत. हें वाचल्यावर वाचकांना आश्चर्य वाटेल. पण येथें मोठाल्या लोकांना सुद्धां असे छोटे छोटे छंद असतात, असें मला समजलें आहे.

२४ डिसेंबर हा नाताळचा पहिला दिवस. सकाळीं जगाला शांतीचा पाठ देणारा व धर्म-संस्थापना करणारा महात्मा जन्माला येणार म्हणून सर्वजण त्याच्या आगमनाची तयारी करण्यासाठीं घरें शृंगारतात, खाण्या-पिण्याच्या वस्तूंची जमवाजमव करतात व जन्मोत्सव साजरा करण्यासाठीं आप्तेष्टांना निमंत्रणें करतात. लहान मुलांच्या पलंगांना मोठाले मौजे लटकावून पालक मुलांना हव्या असलेल्या वस्तू त्या मोज्यांतून भरून ठेवतात. रात्रीं मोठाल्या चर्चेसमधून जन्मोत्सवाच्या प्रार्थना होतात व मग खरी आनंदोत्सवास भरती येते.

आपल्या कृष्ण-जन्माप्रमाणेंच येशूचा जन्म रात्रींचा एका गोठ्यांत झाला आहे. फक्त आपण जन्माष्टमीनिमित्त उपवास करतों व येथें २५ तारखेला सकाळपासून रात्रीपर्यंत लोक अखंड खात व पीत असतात.

२५ तारखेला संध्याकाळीं सर्व निमंत्रित पाहुणे व आप्तेष्ट यांचे समवेत मोठी मेजवानी होते व त्यानंतर दिवाणखान्यांत क्रिस्तमस झाडाच्याभोंवतीं जमून येथें वेगवेगळे खेळ खेळले जातात. कांहीं खेळ झाल्यावर यजमान किंवा कोणी तरी मोठा गृहस्थ "फादर क्रिस्तमस"चा तांबडा डगला व तांबडी टोपी घालून पांढऱ्या दाढीमिश्या लावून येतो व तेथें जमलेल्या सर्वांना देणग्या व आशीर्वाद देतो. फादर क्रिस्तमस हा फारच चतुर, गोड बोलणारा, व हजरजबाबी असावा लागतो. कारण देणगी देतांना त्या

व्यक्तीशीं बोलून त्याला तीच देणगी कशी आवश्यक आहे व ती त्याला कशी उपयुक्त ठरणार आहे, यासंबंधीं त्याला बोलावयाचें असतें. शिवाय, शक्य तितका विनोदहि उत्पन्न करण्याची जबाबदारी त्याचेवर असते.

देणग्या वगैरे वांटून झाल्यावर पुनः एकदां खाद्यपेयांकडे लक्ष देऊन लहान मुलें झोपावयास जातात व मग मोठ्यांमध्यें नृत्य-गायन इत्यादि कार्यक्रम सुरू होतो. रात्रीं मध्यंतरांत एक धर्मोपदेशक लहानसें व्याख्यान देऊन येशूचा त्रिसूत्री संदेश सर्वांना समजावून देतो.

( १ ) Peace within— अंतःकरणांत शुद्धपणा व शांति.
( २ ) Peace without— बाह्य शुचिता व शांति.
( ३ ) Peace with the world— सर्व जगाशीं शांततामय वागणूक.

रात्रीचे कार्यक्रम ज्याच्या त्याच्या मर्जीनुसार वाटेल तितका वेळ पावेतों चालूं शकतात. ह्या दोन्ही दिवसांत मात्र लोक बाहेर फारसे पडत नाहींत त्यामुळें रस्त्यावर रहदारी मुळींच नसते. पण हा सण मुख्यत्वें करून कौटुंबिक स्वरूपाचा असल्यामुळें असें होणें स्वाभाविक आहे. कळावें.

आपला,
×××

## आदर्श गृहाचें प्रदर्शन

लंडन

स. न. वि. वि.

मानवाच्या कलाप्रियतेचें आणि कल्पकतेचें मूर्तिमंत प्रतीक असें एक प्रदर्शन सध्यां येथील ऑलिंपिया विभागांत भरविण्यांत आलेलें आहे. त्या प्रकारचें प्रदर्शन येथें दरवर्षींच भरतें म्हणतात, पण मी यंदाच आलों असल्यानें मला ह्या प्रदर्शनासंबंधीं कुतूहल होतेंच. डेली मेल या वृत्तपत्रानें हें प्रदर्शन भरविलेलें असून ह्या प्रदर्शनाच्या प्रचंड पसाऱ्यांत ५२२ लहान-मोठे

अनुक्र. २६२७४ वि: मू-प्रवास १४३
क्रमांक १७२ नों: दि:

स्टॉल्स् मांडण्यांत आले आहेत. नीटपणें सर्व पाहावयाचें झाल्यास किमान दोन दिवस तरी या प्रदर्शनांत राहणें आवश्यक वाटतें. मी नऊ तास या प्रदर्शनांत हिंडलों. खूप नावीन्यें पाहिलीं, पण समाधान होण्यासाठीं आणखी ३–४ तास तरी हवे होते इतकें हें प्रदर्शन मनोहर झालेलें आहे. प्रदर्शन, आदर्श गृह कसें असावें याचें असल्यानें सर्वंकष झालें होतें ह्यांत नवल नाहीं. 'घर' म्हटलें तर त्यांत काय नको? जें जें हवें तें तें अद्यावत् हवें. तेथें अद्यावत् अशा सर्व वस्तूंचे कारखानदार आपापल्या मालाचें प्रदर्शन करण्यांत तत्पर असावेत यांतहि काय नवल आहे!

अशा प्रकारचीं प्रदर्शनें येथें सततच भरत असल्यानें ह्यासाठीं लंडनच्या ऑलिंपिया विभागांत एक मोठी इमारत कायमचीच बांधून ठेवली आहे. इमारतीच्या तळमजल्याचे तीन मोठमोठाले भाग करून ह्यास ग्रँड हॉल नॅशनल व एम्पायर हॉल अशीं नांवें आहेत. तीनहि दिवाणखान्यांवर, दुसऱ्या मजल्यावर गॅलरी असून एम्पायर हॉलवर तिसरा मजलाहि आहे. प्रत्येक दिवाणखाना सुमारें ७००० चौरस फूट क्षेत्रफळाचा असावा. इमारतींत प्रेक्षकांना लागणाऱ्या सर्व सोयी मुताऱ्या, लिफ्टस् व चढते-उतरते जिने हेहि कायमचेच बांधलेले आहेत.

आदर्श गृहाच्या प्रदर्शनाचें वर्णन समग्रपणें करणें हें अशक्य कोटींतलें असल्यानें त्यांतील फक्त कांहीं ठळक वैशिष्ट्यांचा उल्लेख करण्याचा माझा बेत आहे, आणि सर्वांत मोठें वैशिष्ट्य जर मला कांहीं आढळलें असेल तर तें म्हणजे चॉकोलेट तयार करण्यासाठीं प्रसिद्ध असलेल्या 'नेल्सन' नें एम्पायर हॉलच्या एका भागांत बांधलेलें "शिशुविहारगृह". तेथें ३ ते ९ दरम्यानच्या वयांतील मुलांना खेळण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे. विहारगृहांत मुलांना आवडणार सर्व खेळ आहेत. छोट्या छोट्या घसरगुंड्या आहेत. ट्रायसायकली आहेत. मोटारगाड्या आहेत, पाळणे आहेत, सी-सॉ आहेत, मेरी गो राऊंड आहेत, रॉकिंग हॉर्स आहेत. उड्या मारण्यासाठीं, लोळण्यासाठीं वाळूचे आखाडेहि आहेत. किंडर गार्टनमध्यें खेळावयास देतात त्या प्रकारचे सर्व खेळ, छोट्या बाहुल्या व बाबागाड्या सर्व कांहीं आहे. एवढेंच नव्हे तर, घरें बांधण्याचे सेटस्, मेकॅनोचे सेटस् इत्यादि सर्व साहित्यहि भरपूर आहे. लहान मुलांना थकल्यानंतर मोफत

दूध देण्याची व्यवस्था येथें केलेली पाहून मला फारच आश्चर्य वाटलें. छोट्या खुर्च्या, छोटीं टेबलें व झोपण्यासाठीं छोट्या कॉटस् मुलांवर देखरेख करण्यासाठीं सुमारें ३० दाया व नर्सेस हें सर्व मुलांच्या सुखाकरितां सज्ज आहे. आणि सर्वांत मोठें आश्चर्य म्हणजे ही सर्व सोय मोफत आहे. प्रदर्शनांत येतांच आपल्याबरोबरच्या लहानग्या मुलाला सर्व प्रदर्शनभर चालवण्याचें, श्रमविण्याचे कष्ट पडूं नयेत, गर्दींत व जास्त गर्दीच्या ठिकाणीं धक्काबुक्कींत त्यांचे हाल होऊं नयेत म्हणून पालकांनीं फक्त या 'विहार-गृहां'च्या दाईच्या स्वाधीन करायचें व सायकलीकरितां बिल्ला घेतो तसा बिल्ला घ्यायचा, मात्र या विहारगृहांत मुलास दोनच तास ठेवण्यांत येतें. माझा सुमारें अर्धा तास तरी ह्या विहारगृहांतील मुलांचे खेळ पाहण्यांतच गेला. मुलें आई-बापांबरोबर जाण्याचा हट्ट न धरतां न रडतां येथें मजेंत खेळत होतीं. याचेंही मला कौतुक वाटल्याखेरीज राहिलें नाहीं. मुलाला आंत सोडल्यावर आई-बापहि बाहेरून तो मजेंत खेळतांना पाहून खूप आनंदित होत असत व आपण प्रदर्शन पाहण्यास आलों आहोंत हें विसरून त्या बाललीला पाहतच बराच वेळ थांबत.

प्रदर्शनाच्या मुख्य विभागांत घरबांधकामाच्या साहित्याचा एक, मुलांच्या खेळण्यांचा एक, घरकामांतील काटकसर सुचविण्याचा एक, सौंदर्य-प्रसाधनांचा एक, भोजनसाहित्य व स्वयंपाकाचा एक, बागेचा व बाग-कामाच्या साहित्याचा एक, करमणूक व विश्रांतीच्या साधनांचा एक व वीज, गॅस, रेडियो, रेफ्रिजरेटर इत्यादींचा एक असे विभाग आहेत. नॅशनल हॉलचे प्रवेशद्वारांतच एक आदर्श घरांचें खेडें वसविण्यांत आलें आहे. ह्या खेड्यांत मध्यभागीं सुरेख हिरवळीसह एक बाग तयार करण्यांत आली आहे. बागेच्या मध्यभागीं एक सुंदर निळ्या पाण्याची पुष्करिणी बांधली आहे. "वापी चास्मिन मकरतशिलाबद्धसोपानमार्गा" असें उतर-मेघांतील वर्णन प्रथमदर्शनींच स्मरलें व मग यक्षाच्या घराची खूण "दूराल्लक्ष्ये सुरपतिधनुस्वारुणा तोरणेन" हीहि आठवली. अलका नगरींतील यक्षानें वर्णन केलेलें सर्व माधुर्य ह्या आदर्श खेड्यांत मला आढळलें असें म्हटलें तरी फारशी अतिशयोक्ति होणार नाहीं. खेड्यांत बागेसभोंवतीं ८ घरें बांधलेलीं आहेत. त्यांपैकीं चार एक मजली असून चार दुमजली

आहेत. शिवाय मोटारीला बांधून हवीं तेथें नेतां येण्याजोगीं गाड्यावर बांधलेलीं मोटार-घरें आहेत. ह्या छोट्याशा मोटार-घरांत दिवसा दिवाणखाना रात्रीं निजायची खोली, स्वयंपाकघर इत्यादि सर्व सोयी कमींत कमी जागेंत बसविण्यांत आलेल्या पहावयास मिळाल्या. ह्या खेड्यांतील घरांत अद्यावत् सुखसोयींची समृद्धि पाहावयास मिळाली.

मुलांच्या खेळांच्या विभागांत पुष्कळच नवीं खेळणीं पहावयास मिळालीं. टेलिफोन, टेलिग्राफ इत्यादींची चालू मशीन्स विक्रीस होतीं व तीं लहान मुलांना उपयोगांत आणतां येतील अशीं होतीं. विमानें करणें, आगगाडी बांधणें, लांकडाच्या पट्ट्यांनीं जहाज बांधणें या प्रकारच्या बांधणीशास्त्र शिकविणाऱ्या खेळण्यांचा भरणा जास्त दिसला. बाहुल्या आणि ठोकळ्याचे खेळ अनेक प्रकारचे होते.

घरकामांतील साधनांच्या विभागांत शिवणकमाचीं, भरतकामाचीं यंत्रें, व्हॅक्यूम क्लीनर्स, कपडे धुण्याचीं यंत्रें, इस्तरीचे नवेनवे प्रकार, कपबश्या व भांडीं घासण्याचें यंत्र, फिरतीं कपाटें, भाड्यांना पॉलिश करण्याचें पॉलिश व यंत्र, इत्यादि हरतऱ्हेचीं साधनें दाखवलीं आहेत व त्यांचा उपयोगहि करून दाखविला जात आहे.

सौंदर्यप्रसाधनांच्या विभागाचें वर्णन काय करावें ? मॅक्स्फॅक्टर व हॉलीवूड या कंपन्यांनीं प्रत्यक्ष मुलींना तेथल्या तेथें रंगवून दाखविण्याचें प्रात्यक्षिक सतत सुरू ठेवलें आहे. अपरिमित प्रकारचीं प्रसाधनें तेथें आहेत.

भोजन-साहित्याच्या प्रदर्शनांत पीठ मळण्याचें यंत्र, फ्रेंक्स करण्याचें यंत्र, बटाटे कापण्याचें यंत्र, इत्यादि अनेक प्रकारचीं यंत्रें आहेत. सर्वांत जास्त गर्दी ह्या विभागांत आढळते व तें स्वाभाविकच आहे.

टेबलें, खुर्च्या, पलंग, स्टुलें, कपाटें, सर्व प्रकारच्या लाकडी सामानांचा विभाग खूपच मोठा आहे. पण त्यांतच पडदे, भिंतीला डकवायचे कागद, आंथरण्याचे, गालिचे, गाद्या-उश्या इत्यादींचाहि समावेश आहे.

इलेक्ट्रिकचा साध्या घरकामांत इतका उपयोग केला जातो कीं, त्याचा एक स्वतंत्र विभाग बनविण्यांत आला आहे. त्याच्याच जवळ गॅसच्या सर्व प्रकारच्या साधनांचाहि प्रदर्शन-विभाग मांडण्यांत आला आहे. एका घरांत

कोठें कोठें कशाप्रकारें इलेक्ट्रिक वापरतां येईल त्याचें प्रात्यक्षिक करून दाखविलें जातें.

प्रदर्शनाच्या एका भागांत एक फारच रम्य अशी वाटिका बांधण्यांत आलेली आहे व सोबतच बागकामाच्या साधनांचें, बीं-बियाण्यांचें, फळझाडांचें-फुलझाडांचें वेगवेगळ्या प्रकारच्या कुंडयांचें एवढेंच काय बागेंत बांधण्याच्या झोपाळ्याचें, कारंज्यांचें पुतळ्यांचें सर्व प्रकारच्या साहित्याचें प्रदर्शन मांडण्यांत आलेलें आहे. बागेंत मुलांना पाळीव पक्षी, ससे, इत्यादि ठेवण्याची हौस असते, त्यांचे पिंजरे, सशांचीं बिळें, वेगवेळ्या जातींचे व रंगांचे पक्षी सर्व कांहीं येथें विक्रीस आहे.

पुष्करिणींत सोडायला मासे हवेतच. त्यांचें प्रदर्शन शेजारींच आहे. जातीजातींचे मासे, लहान लहान मत्स्यालयें तयार करण्याच्या कांचेच्या पेट्या, माशांचें अन्न, आंत लावावयाच्या पाणवेली हें सर्व आहेच.

एका विभागांत एक साखर-विभाग स्वतंत्र आहे. येथें उसापासून साखर करण्याची कृति दाखविली आहे व जवळच एक प्रचंड यंत्र आहे. या यंत्रांत एका बाजूस कागदाचा रोल लावलेला आहे व वर साखरेचा सांठा ठेवलेला आहे. रोलमधून कागद निघतो. त्याचें चौकोनी खोकें तयार होतें. तें तयार होतांच त्यांत वरून तोललेली एक पौंड साखर येऊन पडते. लगेच खोक्याचें तोंड आपोआप बंद होतें व तें चिटकविलें जाऊन खोकें पॅकिंगसाठीं तयार होऊन जातें. २८ खोक्यांचें एक पार्सल बांधलें जाऊन तें परगांवीं पाठविण्यासाठीं तयार होतें १ सेकंदास १ डबा तयार होतो. सध्यां प्रदर्शनांत रोज ४०,००० डबे तयार होत आहेत.

या प्रकारें "आदर्श गृहाचें" हें प्रदर्शन सर्वच प्रकारें आदर्श बनलें आहे. सर्व वस्तु अगदीं उघड्यावर मांडलेल्या आहेत. प्रामाणिकपणा हें गृहीत कृत्य आहे. दुकान सजविण्याची हौस, माल विकायला नेमलेल्या सुंदर मुलींचें विक्रीकौशल्य, पराकाष्ठेचा लाघवीपणा इत्यादींचें वर्णन करणें दुरापास्त आहे. तेव्हां शेवटच्या पुस्तक-विभागाची माहिती देऊन थांबतों.

आदर्श अशा घरांचीं प्रदर्शनें येथें दरवर्षीं भरत असलीं तरी यांतील "पुस्तक-विभागाचें" प्रदर्शन यंदाच प्रथम भरविण्यांत आलें आहे. आणि आदर्श गृहांत पुस्तकाचें स्थान महत्त्वाचें आहे हें कोण नाकबूल करील !

लहान मुलांना अक्षर-ओळख करून देणाऱ्या प्राथमिक पुस्तकापासून तों गृहिणीला घर-कामांत सोयी सुचविणाऱ्या पुस्तकांपर्यंत व सुरस व चमत्कारिक गोष्टींच्या संग्रहापासून तों सावकाश मनन करून वाचण्याऱ्या तत्त्वज्ञानाच्या ग्रंथांपर्यंत सर्व तऱ्हेचीं पुस्तकें ह्या प्रदर्शनांत अत्यंत सुंदर सजावटीनें मांडलीं आहेत.

१७० प्रकाशकांनीं या प्रदर्शनास साहाय्य दिलेलें असल्यानें कोणत्याहि गोष्टीची उणीव त्यांत भासत नाहीं. शास्त्रीय वाङ्मय, कला, शिशुसंगोपन हे विभाग तर फारच सुंदर आहेत.

अगदीं लहान मुलांकरितां केलेलीं Rag Books म्हणजे कापडी पुस्तकें तर फारच मोहक आहेत आणि मुलांकरितां ग्रंथालय असा जो विभाग केला आहे त्यांतील खेळ व छंद यांवरील पुस्तकें फारच छान आहेत.

ऑलिंपियांतील एम्पायर हॉलच्या तिसऱ्या मजल्यावर या ४००० पुस्तकांच्या प्रदर्शनांत एका बाजूस येथील सुविख्यात श्री. पिकल्स यांनीं आपल्या आवडीच्या १०० पुस्तकांचा एक संच प्रदर्शनास ठेवला आहे.

येथेंच शेजारीं नामांकित लेखकांचीं व्याख्यानें रोज करण्यांत येत आहेत. आज एवढेंच लिहून थांबतों. कळावें.

आपला,
×××

# ‘ फेस्टिव्हल ऑफ ब्रिटन ’

लंडन

स. न. वि. वि.

अनेक दिवसांपासून गाजलेलें ब्रिटनचें फेस्टिव्हल सुरू झालें सुद्धां ! आम्ही येथें आलों तेव्हां वॉटर्लू स्टेशनासमोरच्या जागेंत साफसफाई चालू होती. आज तेथें कोठलें वैभव प्राप्त झालें आहे म्हणून सांगूं ? माझ्या

पाहण्यांत किंवा वाचण्यांत आलेल्या कोणत्याहि गोष्टीच्या वर्णनापेक्षां किंबहुना रम्यतम अशा कल्पनेपेक्षांसुद्धां सरस असें नगर तेथें निर्माण झालें आहे. ब्रिटनसारख्या देशानें शतसांवत्सरिक महोत्सव करण्याचें ठरवावें यांत नवल नसलें तरी युद्धाच्या आगीनें जळलेल्या इमारतींचा भीषणपणा भेडसावेनासा होतो न होतो तोंच राष्ट्राची सर्व आघाडीवरची प्रगति दाखविणारें प्रदर्शन भरवून त्यासाठीं सर्व जगांतील नागरिकांना निमंत्रण देण्याचें धाडस करणें हें नवल म्हणूं नये तर काय म्हणावें?

इंग्लंडमध्यें अन्नधान्याचा तुटवडा आहे, इंग्लंडमध्यें पैशाची टंचाई आहे, इंग्लंडचा व्यापार मंदावला आहे, इंग्लंडचें उत्पादन कमी झालें आहे, इंग्लंडांत अशांतता आहे, इत्यादि अनेक निरर्गल प्रलापांना ह्या एकाच प्रदर्शनानें ठणठणीत उत्तर दिलेलें आहे. आज येथें परदेशस्थ पाहुण्यांची नुसती रीघ लागली आहे. प्रदर्शन सुरू होऊन दोनच दिवस झाले आहेत, पण ह्या दोन दिवसांत प्रदर्शन पाहून गेलेल्यांची संख्या सव्वा लक्ष आहे. म्हणजे तीस हजार पौंड हे नुसत्या दरवाजांतून आंत जाण्याच्या तिकिटांचें उत्पन्न झालें. आंत वेगवेगळ्या विभागांना अर्थातच वेगवेगळीं तिकिटें आहेत व त्यांचें उत्पन्न वेगळेंच आहे. आजच्या बिकट परिस्थितींतसुद्धां ब्रिटन सर्व जगाचें आदरातिथ्य करायला सज्ज झालें आहे ह्याचें एक महत्त्वाचें कारण आहे; युद्धोत्तर-जगांत ब्रिटनचें महत्त्व पुन: प्रस्थापित करण्याची भासत असलेली गरज. ब्रिटनच्या उत्पादनास भरपूर मोठी बाजारपेठ निर्माण करण्याची आवश्यकता आहे व युद्धानें दिलेल्या तडाक्यास न जुमानतां ब्रिटन हें कला, शास्त्र व अभ्युदय यांत आपलें उच्च स्थान टिकवून ठेवूं शकतें हें दाखविण्याची लालसा ही या शतसांवत्सरिक महोत्सवाची भूमिका वाटते. आणि इंग्रज लोक एकदां कामास लागले कीं, कसें काम करतात ह्याचें प्रात्यक्षिक मी येथें गेले ६ महिने पाहात आहें. हा आपल्या घरचाच उत्सव आहे या भावनेनें प्रत्येक जण घर शृंगारण्यांत, उत्सवांत हरतऱ्हेनें मदत करण्यांत गर्क झालेला आहे. पार्लमेंटसमोर बॉंबनें उध्वस्त झालेली जागा परवां फेब्रुवारीपर्यंत तशीच होती. दोन महिन्यांत बुलडोझर्स कामाला लावून तेथें सुंदर पटांगण करून हिरवीगार हिरवळ निर्माण करून, भोंवताली फुलझाडांचे ताटवे लावून व रंगीत दिव्यांची आरास,

करून त्या जागेचें आज नंदनवन तयार केलें आहे. ठिकठिकाणीं रस्त्यांवर पाहुण्यांसाठीं माहितीचे तक्ते, लंडनचे नकाशे, प्रदर्शनाच्या जागा व तेथें जाण्याचे मार्ग, अशी सर्व प्रकारची माहिती उपलब्ध करून दिली आहे. व्हिक्टोरिया स्टेशनवर उतरण्याचा अवकाश कीं, “ Festival ” चे मोठाले फलक डोळ्यांत भरतील असे ठळक आढळणारच ! स्टेशनमधून बाहेर पडण्यापूर्वीं तुमच्या हातांत १५–२० तरी माहितीपत्रकें गोळा झालींच पाहिजेत ! ठिकठिकाणीं सूचना तर इतक्या खुबीनें व गंमतीनें दिल्या आहेत कीं, आकर्षण वाटलें नाहीं तर माणसांत कांहीं विकृति असली पाहिजे असें समजण्यास हरकत नाहीं. ”

लंडनमध्यें तर लोकांचा उत्साह नुसता ओसंडून चालला आहे. मोठमोठ्या रस्त्यांवरील लोकांनीं तर स्वखुशीनें व स्वखर्चानें गांव सुशोभित करण्यास हातभार लावला आहे. वॉटर्लू पुलाच्या अलिकडील सर्व दिव्यांचे खांब एका रात्रींत रंगवून काढण्याचा विक्रम येथें मागच्या आठवड्यांत झाला. माणसांनीं इरेस पेटून अहोरात्र कामें केलीं. पैसे चापून घेतले, त्यांत कांहीं कमी केलें नाहीं, पण पैसे घेऊन तरी कामें चोख व आपुलकीनें केलीं हें नोंद करणें मला जरूर वाटतें.

आजच्या येथील प्रदर्शनाचें यश येथील लोकांच्या राष्ट्रीय वृत्तीला आहे असा माझा समज आहे. आणि या राष्ट्रीय वृत्तीच्या आधारावरच हें जगड्व्याळ प्रदर्शन उभारण्याची ब्रिटननें धडाडी दाखविली असें म्हटलें तरी चूक होणार नाहीं.

आज ब्रिटनमध्यें वेगवेगळ्या १२१ निरनिराळ्या गांवीं वेगवेगळीं मोठालीं प्रदर्शनें भरलेलीं आहेत. लीडस्, मँचेस्टर, ग्लासगो, बर्मिंगहॅम, एडिंबरो इ. ठिकाणीं लंडनसारखींच भव्य स्वरूपाचीं प्रदर्शनें आहेत. शिवाय, प्रदर्शनाच्या फिरत्या गाड्या आहेतच. खुद्द लंडनमध्यें संगीताचें एका ठिकाणीं, स्थापत्याचें एका ठिकाणीं, वाहनांचें एका ठिकाणीं, चित्रकलेचें व शिल्पकलेचें एका ठिकाणीं अशीं वेगवेगळ्या ठिकाणीं प्रदर्शनें आहेत. “ साऊथ बँक एक्झिबिशन ” या नांवानें प्रसिद्धीला आलेलें एक मोठें प्रदर्शन हें टेम्स नदीच्या दक्षिण तीरावर वॉटर्लू स्टेशनाच्या समोर निर्माण

केलेलें आहे. रॉयल फेस्टिव्हल हॉल, डॉम ऑफ डिस्कव्हरी इत्यादि ह्या प्रदर्शनाचीं मुख्य आकर्षणें आहेत. प्रदर्शनाच्या अंतरंगासंबंधीं पुढें विस्तारानें लिहिणार आहें.

परवां प्रदर्शनाचा उद्घाटन-समारंभ झाला त्या रात्रीं मी वॉटर्लू पुलावर जाऊन ह्या प्रदर्शनाचें रात्रीं दिसणारें वैभव पाहण्याचा मोह टाळूं शकलों नाहीं. वॉटर्लू पुलावर उभें राहिलें म्हणजे डाव्या हाताला सेंट पॉलचें विद्युद्दीपांनीं नटवलेलें स्वरूप मनोहर वाटतें, तर उजव्या हाताला प्रदर्शनाच्या मागें तशाच विजेच्या दिव्यांच्या झोतांनीं प्रकाशमान झालेलें "बिग बेन" त्याच्या भव्यपणाची शोभा दाखवितें. समोर विजेच्या रोषणाईची नुसती रेलचेल केली आहे. ३०० फूट उंचीच्या "स्कायलोन" सर्व बाजूंनीं दिव्यांच्या झोतांनीं प्रकाशित केलेला आहे व कोठेंहि आधार नसलेला ३०० फूट उंचीचा हा स्कायलोन पाहून आश्चर्य परमावधीला पोहोंचतें. शॉट टॉवर व फेस्टिव्हल हॉलची रोषणाई अप्रतिमच आहे, पण त्याहिपेक्षां खेळ-विभागांत पोहोण्याकरितां केलेली पुष्करिणी व नौकाविहारासाठीं केलेली सोय अतुलनीय आहे. प्रदर्शनाच्या दरवाजांतून आंत जाण्याचें प्रवेशमूल्य पांच शिलिंग ठेवलेलें आहे व आंत विभागा–विभागाला वेगळें प्रवेश-मूल्य आहे.

दिनांक ३ मे रोजीं सकाळीं रॉयल फेस्टिव्हलचा उद्घाटन-समारंभ होता. कोणत्याहि कार्यापूर्वी आपली जशी कसब्याच्या गणपतीला अक्षत जाते तशी येथें श्रीमान राजेसाहेबांची स्वारी सहकुटुंब सहपरिवार सेंट पॉलच्या प्रार्थना-मंदिरांत प्रार्थनेस आशीर्वाद मागण्यासाठीं आली हा समारंभ पाहण्यास लंडनच्या बाहेरून लक्षावधि लोक आलेले होते व सर्व फ्लीट स्ट्रीटचा रस्ता नुसता फुलला होता. 'रघुवंशांत' किंवा 'कादंबरींत' राजपुत्राचें नगर-प्रवेश वर्णन करतांना ज्या गोष्टींचें वर्णन आलें आहे त्या सर्व मला ह्या फ्लीट स्ट्रीटवरच्या मिरवणुकीच्या वेळीं पुन्हां आठवल्या. अशी मिरवणूक मी फक्त संस्कृत काव्यांतच वाचली होती, पण प्रत्यक्षांत कधींच पाहिली नव्हती. हिंदुस्थानांत बडोदें व म्हैसूर संस्थानांत राजेसाहेबांची मिरवणूक पाहण्याचा योग मला आला होता. पण त्या मिरवणुकीची हिच्याशीं तुलनाच कशी होणार ! १६४० सालीं प्रचारांत असलेले क्रॉम्वेलच्या वेळचे पोषाख,

चिलखतें, लाल पिसांच्या शिरस्त्राणांची शोभा, सर्व प्राचीन तऱ्हेचे लढाऊ वेष अजूनहि घातलेले शरीररक्षक हें सर्व प्रेक्षणीय होतें.

परंपरा व प्राचीन पद्धति ह्यांची आवड व गरज इंग्लंडमध्यें मला अतोनात आढळत आहेत. जितकें प्राचीन तितकें सांभाळून लोकांना त्यांची सतत आठवण देत राहणें हें येथील एक वैशिष्ट्य आहे.

सेंट पॉलच्या प्रार्थनामंदिराजवळचा समारंभ पाहतांना आपण १७ व्या शतकांतील एक ऐतिहासिक घटनाच पाहत आहोंत असा भास निर्माण व्हावा अशी योजना केलेली आहे. " हल्लींचे दिवस हे निराशाजनक आहेत असें मला मुळींच वाटत नाहीं. त्या शतसांवत्सरिक महोत्सवाच्या रूपानें ब्रिटननें आपलें धैर्य व स्थैर्य हीं जगाच्या निदर्शनाला आणून दिलीं आहेत, " इत्यादि भाषणानंतर राजेसाहेबांनीं प्रदर्शन उघडल्याचें जाहीर केलें व तें यशस्वी होण्याबद्दल ईश्वराची प्रार्थना केली.

गेल्या कांहीं दिवसांच्या माझ्या निरीक्षणांत एक गोष्ट सतत येत आहे व तीही केव्हां तरी सांगावी म्हणत होतों ती या ओघांत सांगतों.

कितीहि भौतिक व ऐहिक सुखांत इंग्रज माणूस गर्क असला तरी त्याच्या आयुष्यांतील स्थायीभाव ' धर्म-भावना ' ह्यांतच आहेत. आपण इतर सर्व पाहतों व हें मात्र नेमकें पाहत नाहीं असें मला वारंवार वाटतें. आज हें एवढेंच वर्णन करून थांबतों. पुढच्या पत्रांत यासंबंधींचें आणखी वर्णन करीन म्हणतों. कळावें.

आपला,
×××

o o o

# शतसांवत्सरिकासंबंधीं आणखी थोडें

लंडन

स. न. वि. वि.

"फेस्टिव्हल ऑफ ब्रिटन" या विषयानें तूर्त येथील दैनिकें, साप्ताहिकें व नियतकालिकें यांना भरपूर खाद्य पुरविलें आहे. लंडनमध्यें पाहुण्यांची संख्या पराकाष्ठेची वाढत असल्यानें व प्रत्येक दुकानदार आपापल्या मालाची भरपूर जाहिरात करण्याची संधि वायां दवडत नसल्यानें वर्तमानपत्रांचा आकार या जाहिरातींमुळें थोडा वाढला आहे व त्याप्रमाणें किंमतहि वाढली आहे. पूर्वीं पेनीला मिळणारें दैनिक आतां दीड पेनीस घ्यावें लागतें. रद्दी जास्त पदरांत पडते हा मुद्दा वेगळा !

सुदैवानें सध्यांचें हवामान महोत्सवास शोभेंसें आहे. सध्यां दिवस सकाळीं ४॥ ला सुरू होतो. सूर्योदयाची वेळ ४ वाजतां आहे. तसेंच रात्रीच्या ९ वाजेपावेतों भरपूर प्रकाश असतो. कारण सूर्यास्ताची वेळ ८ वाजतां आहे. ह्या १६ तासांपैकीं सतत १२–१३ तास ऊन पडण्याचें सुदैव गेल्या ५–६ दिवसांत लाभलें. अर्थात् संध्याकाळचे खेळ, पोहणें इत्यादि कार्यक्रम आतां जोरांत सुरू झाले आहेत. मागच्या शनिवारीं आमच्या इन्स्टिटयूट-स्पर्धा झाल्या. पोहणें-स्पर्धांत ४४० यार्डांचे बाबींत मीं भाग घेतला व दुसरा आलों. पहिला आलेला मुलगा ह्या बाबींत मला फारसा सरस न ठरल्यानें व इतर दोन बाबीं तो पोहणार असल्यानें ४४० यार्डांचे स्पर्धेत युनिव्हर्सिटी-स्पर्धांचे वेळीं इन्स्टिटयूटतर्फे मीं पोहावें असा निर्णय देण्यांत आला आहे व तदनुसार येत्या शनिवारीं मी युनिव्हर्सिटी स्पर्धांत ४४० यार्ड पोहणार आहें. येथील विश्वविद्यालयीन स्पर्धांत कोण-कोणत्या बाबी असतात व कशा स्वरूपांत होतात त्यासंबंधीं आतांच न लिहितां पुढच्या पत्रांतच लिहीन म्हणतों. या निमित्तानें लंडन युनिव्हर्सिटीचें बोधचिह्न कोटाला लावण्यासाठीं मोठ्या समारंभानें मिळालें या फायदा काय कमी आहे ! युनिव्हर्सिटी स्पर्धांत माझी डाळ शिजणार नाहीं हें मला स्पष्टच दिसत आहे. कारण, युनिव्हर्सिटी कॉलेजांतील एक व किंग्ज कॉलेजमधील एक अशीं दोन मुलें सुरेख पोहतात, हें मी रोज पाहातच आहें.

मागच्या आठवड्यांत येथील बॅटरसी पार्कमधील क्रीडोद्यान खुलें झालें. आपल्याकडे जत्रेच्या वेळीं जसे वेगवेगळ्या प्रकारचे खेळ वेगवेगळ्या तंबूंतून सुरू करतात त्या प्रकारचें हें ' फन्-फेअर ' आहे. असंख्य वेगवेगळे खेळ या फन्-फेअरमध्यें असून प्रत्येक ठिकाणीं फी दणदणीत आहे. वर-खालीं डुगडुग करीत जाणाऱ्या आगगाडींत बसून सहल करण्यास एक शिलिंग द्यावा लागतो. पेनी-स्लॉट मशीन्स तर पावलोंपावलीं आहेत. ह्या फन्-फेअरमधून प्रचंड उत्पन्न होणार असें दिसत आहे. फन्-फेअर ज्या बागेंत आहे ती बाग मुद्दाम या महोत्सवासाठीं खास मेहनतीनें उत्तम प्रकारें सजविण्यांत आली आहे. रंगीत कारंजीं, वेगवेगळ्या रंगांच्या फुलांचे गालिचे, मनोहर व आकर्षक पद्धतीनें लावलेले फुलांचे ताटवे व दिव्यांची आरास ह्या सर्वांमुळें ' बॅटरसी पार्क ' हें उद्यान नितान्तरम्य झालें आहे.

म्हैसूरला वृंदावन बागेंत संध्याकाळीं दिव्यांची आरास झाल्यावर व रंगीत कारंजीं उडूं लागल्यावर जी शोभा दिसते त्यांत काश्मीरच्या निशात बागेंतील फुलांच्या ताटव्यांची शोभा मिळविली कीं जें दृश्य डोळ्यांसमोर दिसेल तें येथें बॅटरसी पार्कमध्यें पाहाण्यास मिळत आहे. माझ्याबरोबर कांहीं मुलांनीं काश्मीरच्या बागा व म्हैसूरची वृंदावन बाग दोन्हीहि पाहिलेल्या आहेत त्यांना या वर्णनावरून कल्पना येऊं शकेल शेजारूनच ' टेम्स ' वाहत असल्यामुळें दोन-तीन सुंदर नावा तेथें उभ्या करून त्या सर्व नावांवर दिव्याची रोषणाई करण्यांत आली आहे. प्रणयी युगुलांसाठीं ' शिकारे ' सज्ज आहेतच. थोडक्यांत जिवाचें ' लंडन ' करणाऱ्यांची उत्तमोत्तम सोय करून ठेवण्यांत आली आहे. ह्या बागेला स्वतंत्र बसेसची व्यवस्था करण्यांत आली आहे हें वेगळें लिहायला नकोच.

ह्या शतसांवत्सरिकाप्रीत्यर्थ खुद्द लंडनमध्यें आणखी दोन महत्त्वाचीं व भव्य प्रदर्शनें भरविण्यांत आलीं आहेत. गेल्या पांच शतकांतील पुस्तकांचें वाङ्मय, शास्त्र, कला इत्यादि सर्व विषयांवरील अत्युत्तम पुस्तकांचें एक प्रदर्शन येथील साउथ केन्सिंग्टनमधील व्हिक्टोरिया आलबर्ट म्यूझियममध्यें भरलें आहे. ज्या ब्रिटिश म्यूझियममधून पुस्तक कालत्रयीं बाहेर दिलें जात नाहीं त्या ब्रिटिश म्यूझियमनें आपल्या संग्रहांतील १२००–१५०० दुर्मिळ पुस्तकें ह्या प्रदर्शनासाठीं तेथें पाठविलीं आहेत. यावरून या ग्रंथसंग्रहाचें

महत्त्व घ्यावीं येईल. अजूनपावेतों पुस्तकांचें असें जंगी प्रदर्शन कधींच भरलें नव्हतें म्हणतात. मला अद्याप या प्रदर्शनासंबंधीं माहिती वाचायलाहि पुरेसा वेळ झालेला नाहीं. पण दोन आठवड्यांत हातांतील काम थोडें आवाक्यांत आलें कीं पहिली भेट या पुस्तकाच्या प्रदर्शनाला देईन म्हणतों. म्यूझियमची जागा फारशी मोठी नाहीं. आंत एका वेळीं १५००० पेक्षां जास्त प्रेक्षक राहूं शकत नाहींत. परवाच्या रविवारीं आंत १५००० प्रेक्षक झाल्यानें दोन तास दारें बंद करावीं लागलीं म्हणतात.

असेंच आणखी एक मोठें प्रदर्शन म्हणजे सायन्स म्यूझियममध्यें भरविण्यांत आलेलें आधुनिक शोधांचें प्रदर्शन. ह्यांतील अणुशक्तीच्या विभागांत फारच सुंदर प्रात्यक्षिकें मांडलीं आहेत असें प्रसिद्ध झालें आहे. इतर विभाग माहितीपूर्ण आहेतच. हें प्रदर्शन तेथें नसतांनासुद्धां सायन्स म्यूझियम पाहण्यास मला दिवस पुरला नव्हता, तेव्हां आतां हें सर्व नवीन मांडलेलें पाहण्यासाठीं एक संपूर्ण दिवस तेथें घालवावा लागणार हें दिसतेंच आहे.

१८५१ ते १९५१ मधील शिक्षणशास्त्राच्या प्रगतीचें, वर्गांतील शिकविण्याच्या पद्धतींतील बदलांचें, शिक्षकांच्या पेहेरावांत, मुलांशीं वागण्याच्या पद्धतींत झालेल्या फरकांचें सचित्र प्रदर्शन येथील Preceptors' College नांवाच्या संस्थेनें भरविलें आहे. पेस्टोल्लॉत्सी, फ्रोबेल, मॉंटेसरी इत्यादि शिक्षणशास्त्रज्ञांच्या सिद्धान्तांचे शिक्षणपद्धतीवरील परिणाम दाखविण्यांत आले आहेत.

शिक्षकांच्या—पुरुषांच्या व स्त्रियांच्या—वेतनश्रेणींत कसे कसे फरक होत गेले हेंहि आलेखाच्या साहाय्यानें छान दाखविलें आहे. विद्यार्थ्यांच्या बुद्धि-मापनाचा इतिहास फारच चांगला दाखविला असल्याचें ऐकल्यावरून मी हें प्रदर्शन मुद्दाम पाहण्यास गेलों होतों. हा बुद्धिमापनाचा विभाग खरोखरच फार चांगला मांडलेला आहे. पण त्या प्रकारचें प्रदर्शन आपल्याला आपल्या-जवळ असलेल्या ज्ञानाच्या जोरावर पुण्यासमुद्धां मांडतां आलें असतें असें वाटल्यावांचून राहिलें नाहीं.

ट्रेनिंग कॉलेजमधील ज्या विद्यार्थ्यांच्या साहाय्यानें हें प्रदर्शन भरविण्यांत आलें त्यांना, त्यांनीं केलेल्या प्रदर्शनांतील विभागाच्या विषयांत उत्तीर्ण

करण्यांत आलें असून एक एक स्वतंत्र प्रशस्तिपत्रकहि देण्यांत आलें आहे. विद्यार्थ्यांचा तो विषय या निमित्तानें संपूर्ण पक्का झाला याबद्दल वादच नाहीं, पण त्याचा व्यवहारांत फायदाहि देण्याचें धोरण येथें आहे हें मुद्दाम लिहावेंसें वाटतें. टिळक कॉलेज, अध्यापक-संघ यांसारख्या संस्थांना ह्या प्रकारचें प्रदर्शन भरवितां येणें सहजसाध्य आहे असें जातां जातां म्हणावेंसें वाटतें. ‘ योजक ’ सुलभ झाला म्हणजे झालें.

ह्याचप्रमाणें मोठमोठाल्या कारखान्यांनीं आपली गेल्या शतकांतली प्रगति दर्शविणारीं छोटीं छोटीं प्रदर्शनें भरविलीं आहेत. त्यांचें वर्णन करणें दुरापास्त आहे. हा महोत्सव पाहायला येणाऱ्या प्रेक्षकाला येथें पहायला, शिकायला व अनुकरण करण्यासाठीं टिपणें करायला भरपूर वाव आहे असें थोडक्यांत म्हणतां येईल. येथें प्रदर्शनाची माहिती विविध स्वरूपांत वेगवेगळ्या पत्रकांच्या द्वारें देण्यांत येत आहे, कीं हीं पत्रकें गोळा करणें हा मोठा उद्योगच होऊन बसेल. दुर्दैवानें मला तेवढा वेळहि नाहीं व अशीं पत्रकें वैयक्तिकरीत्या पाठविणें मला जमणारहि नाहीं. शक्यतों चांगल्या गोष्टींचें मी टिपण करीत आहें व त्यांतील वेंचक तेवढें मी या प्रकारच्या पत्रांतून पाठवीन. तेव्हां प्रदर्शनविषयक माहितीपत्रकें मागविणाऱ्यांनीं स्वतंत्र पत्राची अपेक्षा धरूं नये ही विनंति. कळावें.

आपला,
×××

० ० ०

## इंग्लिश रंगभूमि

लंडन

स. न. वि. वि.

ब्रिटनच्या शतसांवत्सरिक महोत्सवानिमित्त येथें ज्या अनेक संस्मरणीय गोष्टींचीं प्रदर्शनें भरत आहेत त्या सर्वांचीं वर्णनें करणें हें अशक्यप्राय काम झालेलें आहे. जेवढें पाहावें तेवढें नवीनच आणि थोडेंच आहे.

मी प्रथम प्रत्येक पाहिलेल्या गोष्टीचें टिपण ठेवण्याचा प्रयत्न केला होता. पण लवकरच तो थांबवावा लागला. तरीहि कांहीं चांगल्या चांगल्या गोष्टींची थोडीशी कल्पना या पत्रांतून देण्याचा माझा विचार अद्याप कायम आहे.

'फेस्टिव्हल ऑफ आर्टस्' नामक संस्थेनें सर्व कलाविभागांचें एकत्रीकरण करून चित्रकला, शिल्पकला, स्थापत्य, गायन-वादन, नृत्य व नाटक यांचा एक भला जंगी कार्यक्रम नुकताच छापून प्रसिद्ध केला आहे. पैकीं गायन-वादनाचे बहुतेक कार्यक्रम हे रॉयल आल्बर्ट हॉलमध्यें सुरू झालेले आहेत. ऑर्केस्ट्राचीं ऑगस्टअखेरपर्यंतचीं तिकिटें संपलीं आहेत, यावरून त्याच्या लोकप्रियतेची कल्पना येईल. याशिवाय इतरत्रहि हे ऑर्केस्ट्रा इत्यादि कार्यक्रम आहेत, पण ते पहिल्या दर्जाचे समजले जात नाहींत.

नृत्य अथवा येथील भाषेंत बोलायचें म्हणजे "बॅले" यांच्या पहिल्या दर्जाच्या कार्यक्रमांचा भर येथील कॉन्हेंट गार्डनमधील थिएटरमध्यें व सॅडलर्स वेल्सच्या नामांकित नाट्यगृहांत आहे. अभिनयाऐवजीं नृत्यांतून संपूर्ण कथावस्तु प्रेक्षकांसमोर मांडायची हा 'बॅले'चा मुख्य हेतु असतो. मी अजून हा प्रयोग पाहिला नाहीं; पण ऐकलें आहे त्यावरून एवढीच माहिती लिहीत आहें. प्रत्यक्ष प्रयोग पाहिल्यावर विस्तारानें लिहीनच ! येथें 'बॅले' फारच लोकप्रिय असून दोन्हीहि नाट्यगृहें भरगच्च असतात हें नमूद करणें आवश्यक आहे.

शतसांवत्सरिकाच्या निमित्तानें जीं खास नाटकें आतां तयार झालीं आहेत तीं येथील सेंट जेम्स थिएटर, रॉयल वड्रयुअरी लेन या तीन नाट्यगृहांतून चालू झालीं आहेत. शेक्स्पिअरचीं नाटकें ओल्ड व्हिक ह्या प्राचीन व अत्यंत लोकप्रिय नाट्यगृहांत व स्ट्रॅटफर्ड ऑन एव्हन येथील शेक्स्पिअर मेमोरियल थिएटरमध्यें सुरू झालीं आहेत.

हें सर्व आज लिहिण्याचें कारण असें कीं, येथें या शतसांवत्सरिकाच्या निमित्तानें किती वेगवेगळ्या क्षेत्रांत किती मोठमोठ्या गोष्टी मुद्दाम घडवून आणण्यांत येत आहेत व कोणत्याहि रुचीच्या माणसाला त्याच्या आवडीच्या विषयाचें सुंदर स्वरूप दाखविण्याची ब्रिटननें कशी योजनाबद्ध व्यवस्था केली आहे, हें मला दाखवावयाचें आहे. आणखीहि एक कारण आहे. जॉर्ज बर्नार्ड शॉनें लिहिलेलें, "सीझर अँड क्लिओपात्रा" परवां मीं

येथील सेंट जेम्स थिएटरमध्यें रंगभूमीवर पाहिलें. व इंग्रजी रंगभूमीसारख्या विषयाकडे आपण इतके दिवस अगदीं संपूर्ण दुर्लक्ष केल्याबद्दल माझेंच मला आश्चर्य वाटलें. आणि म्हणूनच आज त्या नाटकासंबंधीं व त्यांत काम करणाऱ्या नटश्रेष्ठांसंबंधीं चार ओळी लिहिण्याचा मी निश्चय केला आहे.

इसवी सनापूर्वी ४८ वर्षांत सीझरनें ईजिप्तच्या सीरियन सरहद्दीवर ताबा घेतला, येथें नाट्याचें कथानक सुरू होतें. वडिलांच्या मृत्यूनंतर छोटा टालेमी व क्लिओपात्रा यांपैकीं राज्यापत्र कोणीं घ्यावें यासंबंधीं वाद-विवाद सुरू असतांना सीझर हा प्रदेश हस्तगत करतो. क्लिओपात्राची व त्याची प्रथम भेट स्फिंक्सच्या पायथ्याशीं होते. येथून सुरू होऊन टालेमीचा पाडाव करून राज्यपद क्लिओपात्राचें स्वाधीन करून व तेथें रुफियो हा आपला प्रतिनिधि नेमून सीझर परत रोमला जातो. येथपावेतोंचा कथा-भाग ह्या नाट्यांत आला आहे.

शॉच्या लेखणीनें नाट्यांत निर्माण केलेलें सीझरचें व क्लिओपात्राचें चरित्रचित्रण न ब्रिटानस पात्राच्या माध्यमानें इंग्लंडच्या सामाजिक स्थितीवर केलेला विनोद ह्याचें वर्णन करण्याचें हें स्थान नव्हे. रसिकांनीं तें मुळांतून वाचायला हवें. कथावस्तु रम्य व आकर्षक आहे एवढेंच लिहिलें तरी पुरें !

सेंट जेम्स थिएटर हें सेंट जेम्स राजवाड्याजवळच असलेलें चार मजली भव्य नाट्यगृह आहे. नाट्यगृहाची प्रेक्षकांची बसण्याची व्यवस्था ही आपल्या-कडील किर्लोस्कर नाट्यगृहासारखीच आहे असें म्हटलें तरी चालेल. चारहि मजल्यांवरील प्रेक्षकांना पहायला, ऐकायला स्वच्छ मिळावें अशी योजना आहे.

रंगभूमीवरील प्रकार मात्र सर्वच अद्‌भुत आहे. सर्वच्या सर्व रंगभूमि गोल फिरवून वेगवेगळ्या वेळीं वेगवेगळे भाग प्रेक्षकांसमोर आणण्याचा येथें प्रघात आहे. त्यानुसार येथें पहिला प्रवेश संपल्यावर स्फिंक्सच्या पायथ्याशीं सीझर व क्लिओपात्राची ओळख झाल्यावर ती त्याला आपल्या आंतील देवालयाजवळील सिंहासनाच्या खोलींत घेऊन जाते असें दाखवितांना सर्वच्या सर्व रंगभूमि गरगर फिरूं लागतांच मला पहिला आश्चर्याचा धक्का बसला.

रंगभूमि फिरत असतांना सीझर व क्लिओपात्रा हे स्फिंक्सच्या पायथ्याकडून वेगवेगळ्या उंच खांबांच्या दालनांतून आंत देवालयाच्या गाभाऱ्याकडे चालले होते असें स्पष्ट दिसत होतें. सिंहासनाची खोली संपूर्ण समोर येतांच रंगभूमीची चक्राकार गति थांबली व पुढचा प्रवेश सुरू झाला.

पुढें समुद्र दाखवितांना, जहाज वल्हवीत आगलें जात असतांना, दीपगृह दाखवितांना, एवढेंच काय, सीझर पाण्यांत सूर मारून जात असतांनाचे दाखविलेले देखावे खरोखरच अद्भुत म्हणावयास हवेत. कोठेंहि रसभंग न होऊं देतां रंगभूमीवरील साहित्याचे साहाय्यानें प्रेक्षकाला तत्काले तत्स्थाने एव असल्याचा भास निर्माण करण्याचें येथील कौशल्य मी प्रथमच पाहत असल्यानें मला फारच कौतुक वाटलें असल्यास नवल नाहीं.

नाट्याभिनयांतील उत्कृष्ट कामगिरीचा सुद्धां येथें कसा गौरव होतो हें लॉरेन्स ऑलिव्हर यांना मिळालेल्या 'सर' या मानचिह्नावरून दिसून येतें. या नाटकांतील सीझरचें काम सर लॉरेन्स यांनीं केलेलें आहे असें म्हटलें म्हणजे त्यांत सर्व आलें. या नाटकांत सीझर क्लिओपात्राला भेटतो तेव्हां त्याचें वय ४९ व तिचें वय १६ असतें. अर्थात् सीझरचा अभिनय क्लिओपात्राच्या बाबतींत अधिक वात्सल्यपूर्ण असावा असेच शॉचें लिहिणें आहे. व नेमका तसाच अभिनय सर लॉरेन्स यांचा आहे. सर लॉरेन्स हे हिंदुस्थानांतील प्रेक्षकांना हॅम्लेट या जगद्विख्यात बोलपटामुळें परिचित आहेतच. त्यांचा सीझर या पात्रांतील प्रत्यक्ष अभिनय पाहून मला फारच आनंद झाला यांत नवल तें काय?

क्लिओपात्राचें काम प्रसिद्ध अभिनेत्री 'व्हिव्हियन ले' हीनें केलें आहे. १६ वर्षांच्या अल्लड पण हुषार व चतुर क्लिओपात्राचें काम 'ले' नें इतकें पराकाष्ठेचें चांगलें केलें आहे कीं, ह्या नाटकांत अभिनयाचें बक्षिस कोणास द्यावें याबद्दलचा निर्णय दोन दिवसांनंतर (चर्चा संपल्यावर) जाहीर करण्यांत आला. यावरून 'ले' नें ऑलिव्हर यांना 'सर' हा सन्मान मिळवून देण्यांत सहाय्य केलें या गोष्टीवर विश्वास ठेवणें आवश्यक वाटतें.

सेंट जेम्स नाट्यगृहांत सध्यां दिवसाआड दोन प्रयोग सुरू आहेत. शॉचें सीझर अँड क्लिओपात्रा व शेक्सपिअरचें "अँटनी व क्लिओपात्रा"

पहिल्यांत १६ वर्षांच्या क्लिओपात्राचें तर दुसऱ्यांत ३४ वर्षांच्या क्लिओपात्राचें अशीं दोन कामें एक दिवसाआड व्हिव्हियन ले ही सारख्याच सहजपणानें, सारख्याच कौशल्यानें व सारख्याच तन्मयतेनें करते म्हणतात. दुसऱ्यांत अँटनीचें काम ' सर लॉरेन्स ' यांचें आहे हें सांगायला नकोच.

या दोन मुख्य पात्रांखेरीज रॉबर्ट हेल्पमन हे येथील सध्यांचे पहिल्या क्रमांकाचे 'बॅलं' नृत्यकलाप्रवीण आहेत. त्यांच्या कामाचें स्वतंत्र वर्णन येथील एका ' टाइम्स ' सारख्या दैनिकांत आलें यावरून त्यांच्या कामाची लोकप्रियता ध्यानीं येईल. रूफियोचें काम मॅक्स् गार्डिनर नामक एका कसलेल्या नटानें फारच सुंदर केलेलें आहे.

शॉची कलापूर्ण लेखणी सर लॉरेन्स व ले यांचा आपापल्या कामाच्या भूमिकांचा कलापूर्ण आविष्कार, सर्व कलाप्रवीण असा नटसंच प्रयोगसुलभ अशी रंगभूमि व रसिक प्रेक्षकवृंद या सर्व संगमामुळें हें नाटक मला त्या दिवशीं फारच आवडलें. नाटक संपल्यावर सर्व नटवर्गानें एकत्र उभें राहून प्रेक्षकांना अभिवादन करण्याचें पहिलें दृश्य त्या दिवशीं मीं पाहिलें. नंतर पुन्हा टाळ्यांचा कडकडाट झाल्यावर पडदा वर जाई व फक्त महत्त्वाचे नट पडद्यावर राहात व पडदा पडे. पुन्हा टाळ्या झाल्या कीं, त्यांतले आणखी नट कमी होऊन त्यांनीं अभिवादन केलें कीं पडदा पडे. असा सहा-सात वेळां पडदा वर-खालीं झाला व सर लॉरेन्स यांनीं व व्हिव्हियन ले हिनें पुनः पुनः अभिवादन केल्यानंतर हा प्रयोग संपला. हें दृश्य मी मागें सिनेमांत 'डबल लाइफ' या बोलपटांत पाहिलें होतें. पण प्रत्यक्ष असें परवांच पाहिलें व त्याचा परिणाम मनावर किती होतो याची पूर्ण कल्पना आली.

इंग्रजी नाट्य व रंगभूमि हा माझा विषय, पण एक सामान्य रसिक या दृष्टीनें मीं पाहिलेल्या एका नाटकाचें वर्णन केवळ इकडील नाट्यसृष्टीची स्थूलशी कल्पना यावी एतदर्थ पाठविलें आहे. कळावें.

आपला,
× × ×

# इंग्लंडमधील नवें पर्व

लंडन

स. न. वि. वि.

आज इथें नवें पर्व सुरू झालें आहे. आज सकाळीं ११ वाजतां सेंट जेम्स पॅलेसच्या बाहेरील मोठ्या गच्चींत उभे राहून तांबड्या मखमलीवर सोनेरी जिगनें राजचिह्नें विणलेला डगला घातलेल्या एका राजसेवकानें "एलिझबेथ अलेक्झांड्रा मेरी" राणी झाल्याचें मोठ्या समारंभानें उद्घोषित केलें, आणि अशा प्रकारें इथल्या नव्या एलिझबेथन युगाला आज सुरुवात झाली.

परवां बुधवारीं सकाळीं अगदीं अकल्पितपणें कोणाच्या कांहीं ध्यानींमनीं नसतां ११ वाजतां राजेसाहेबांच्या मृत्यूची बातमी लंडनला आली. मागच्याच आठवड्यांत जांवयासह थोरल्या मुलीला लंडनच्या विमानतळावर निरोप देण्यासाठीं राजेसाहेब उपस्थित होते. त्यानंतर सॉड्रिंगहॅम येथें सहकुटुंब सहपरिवार गेले होते. मंगळवारीं शिकारीसाठीं बाहेर पडले असतां ९ ससे व कांहीं पांखरें मारून ते परत आले व संध्याकाळीं मुलीनें वाजविलेला पियानो ऐकून आणि नातवाला गंमतीच्या गोष्टी सांगून ते झोपण्यास गेले. त्या झोंपेंतून त्यांना कोणीहि जागें करूं शकलें नाहीं.

नुकत्याच झालेल्या शस्त्रक्रियेंतून ते वांचतील का नाहीं याबद्दलच प्रथम शंका होती. पण शस्त्रक्रियेंतून पार पडून त्यांनीं नित्यक्रमास सुरुवात केल्यानंतर लोकांना त्यांच्या प्रकृतीबद्दल चिंता नव्हती. पण बुधवारीं सकाळीं चहा घेऊन गेलेल्या नोकराला जेव्हां त्यांना त्या महानिद्रेंतून जागें करतां येईना तेव्हां गांवांत धांवपळ सुरू झाली. डॉक्टर आले; पण रात्रीं झोपेंतच देहावसान झाल्यामुळें "राजेसाहेबांना रात्रीं अत्यंत सुखानें व शांततेनें मृत्यु आला," हें जाहीर करण्यापलीकडे कांहींहि करणें शक्य नव्हतें.

"दिसो लागे मृत्यु परि न भिववूं तो मज शके" लिहिणाऱ्या साहित्यसम्राटांच्या देहावसानाची स्मृति जागृत व्हावी इतकें साम्य ह्या दोन सम्राटांच्या मृत्यूंत निश्चितपणें होतें. परवां पंतप्रधान चार्चिल यांनींहि भाषणांत त्याचा उल्लेख केला. गेले तीन महिने मृत्यु हा राजे-

साहेबांच्याबरोबर त्यांच्या जिवलग मित्राप्रमाणें सतत हिंडत असे. पण त्यांना त्याची कदापि भीति वाटली नाहीं. शेवटीं मित्राप्रमाणेंच त्यांना त्यानें सुखानें व शांततेनें उचलून नेलें. ''

राजकन्या एलिझबेथ आणि ड्यूक ऑफ एडिंबरा हे आफ्रिकेंत केन्यामध्यें दौऱ्यावर होते. मुलीला वडिलांच्या मृत्यूची बातमी ताबडतोब पाठविण्यांत आली आणि सतत प्रवास करून अटलांटा विमानांतून मुलगी व जांवई काल संध्याकाळीं येथें येऊन पोहोंचले. आठवड्यापूर्वींच ह्याच विमानतळावरून राजकन्या एलिझबेथ २५ वर्षांची स्वच्छंद हिंडणारी मुलगी आपलें साम्राज्य पहायला निघाली होती. वडिलांनीं मोठ्या आनंदानें ह्याच विमानतळावर तिला निरोप दिला होता. सकाळचीं उन्हें सुंदर पडल्यानें वातावरण आनंदी होतें आणि लोकांनाहि जनसंमर्दानें आनंदी आरोळ्यांनीं निरोप समारंभास उत्साहाचें स्वरूप आणलें होतें. पण काल संध्याकाळीं विमान उतरलें तेव्हां तेथें लोक नव्हते, आनंदाच्या आरोळ्या नव्हत्या, सकाळचीं सुंदर उन्हें नव्हतीं, वातावरणांत आनंद नव्हता ! आतां, तिचे वडील तेथें नव्हते आणि तीहि आतां स्वच्छंद हिंडणारी राजकन्या नव्हती ! ज्या भूमीवर ती आतां पाऊल ठेवणार होती तेथील ती राणी होती. तिला सम्राज्ञी म्हणून पहिला मानाचा मुजरा करण्यासाटीं पंतप्रधान चर्चिल, ॲटली, ईडन इ. लोक शांतपणें उभे होते आणि अशा ह्या शोकपूर्ण वातावरणांत, संध्याकाळच्या अंधारांत ब्रिटनची राणी लंडनच्या विमानतळावर उतरली.

घरीं बकिंगहॅम पॅलेसवर येते तों आजी दिवाणखान्यांतच भेटीसाठीं उभी होती. बाहेर दरवाजाच्या भोंवतालीं असंख्य लोक नव्या राणीच्या दर्शनासाठीं उभे होते. ह्या अत्यंत शोकपूर्ण मनःस्थितींत सुद्धां लोकांकडे पाहून मंद स्मित करून त्यांच्या सांत्वनाचा मूक स्वीकार करतांनाचें तिचें छायाचित्र येथील सर्व वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झालें आहे.

अशा प्रकारें राजकन्या एलिझबेथ प्रत्यक्ष इंग्लंडमध्यें नसतांना राणी झाली असल्यानें येथल्या ॲक्सेशन कौन्सिलनें तिच्या अनुपस्थितींत कागदोपत्रीं सारी व्यवस्था करून ठेवली होती. पण इंग्लंडच्या राजानें राज्यपद स्वीकारण्यापूर्वीं प्रॉटेस्टंट धर्माला आपला पाठिंबा असल्याचें जाहीर करावें

लागतें. तें जाहीर केल्याशिवाय राज्यपद स्वीकारतां येत नाहीं. म्हणून आज सकाळीं साडेदहा वाजतां हा शपथविधि झाल्यावर मगच एलिझबेथ सम्राज्ञी झाल्याचें उद्घोषित करण्यांत आलें.

सेंट जेम्स पॅलेसवर प्रथम घोषणा झाल्यावर राणीचे दूत, घोषणा करणारे उद्घोषक, राजदंड व राणीचे शरीररक्षक ह्यांची मिरवणूक गांवांत ठिकठिकाणीं ही घोषणा करण्यासाठीं निघाली. तांबडे कोट, निळ्या विजारी, पितळेचीं लखलखीत चिलखतें व पोलादी शिरस्त्राणें असा शरीररक्षकांचा पोषाख होता. इतरांचे कपडे सोनेरी जिगनें भरगच्च विणलेले होते. मिरवणुकीचा थाट फारच भव्य होता. मात्र पडघमांवर काळे पडदे टाकलेले होते व डाव्या हातांवर काळे पट्टे घातलेले होते.

ट्रॅफलगार स्क्वेअरमध्यें, नेल्सनच्या पुतळ्याखालीं, चार्लसच्या पुतळ्या-समोर उभें राहून सर चार्लस यांनीं घोषणा वाचली व राणीचे सर्व प्रजाजन तिच्या आज्ञेंत राहतील अशी ग्वाही दिली. मिरवणूक तेथें थांबतांच प्रथम तुतारीनें “ फॅनफेअर ” वाजविलें नंतर राजदंड हातांत घेऊन उद्घोषकानें घोषणा वाचली व पुन्हां एकदां तुतारीनें मंजुळ स्वर काढून घोषणा संपल्याचें कळविलें.

मी ट्रॅफलगार स्क्वेअरपर्यंत मिरवणुकीबरोबर मुद्दामच आलों होतों. येथें प्रचंड गर्दी झालेली होती. सर्व घरांच्या खिडक्यांतून आणि चौकांत सर्वत्र दाटीवाटीनें लोक गर्दी करून, पण शांतपणें उभे होते. तुतारी संपतांच लोक पांगूं लागले आणि एवढ्यांत बँडवर राष्ट्रगीत सुरू झालें. प्रत्येक जण जागेवर खिळल्यासारखा उभा राहिला. हॅट्स् हातांत घेऊन राष्ट्रगीत संपेपर्यंत प्रत्येकजण निश्चल उभा होता. नतर मिरवणूक पुढें सुरू झाली. राष्ट्र-गीताच्या वेळच्या शांततेचे व वातावरणाचें वर्णन करणें अशक्य आहे.

व्हाइट हॉल, वेस्टमिन्स्टर, ट्रॅफलगार स्क्वेअर स्टॅंड हा भाग शहरांत मोडला जात नाहीं. सिटी ऑफ लंडनची हद्द टेंपलबारजवळ सुरू होते. तेथें रस्त्यावर आडवे तांबडे गालिचे टाकून त्यावर शहराचे अधिकारी उभे होते. एक निळी रेशमी दोरी गांवाची हद्द दाखविणारी तेथें बांधण्यांत

आलेली होती. मिरवणूक तेथपर्यंत आली व पुढें रस्ता बंद केला असल्यानें थांबली. तुतारींनें फॅनफेअर वाजविलें. शहररक्षकानें खड्या स्वरांत " Who goes there ? " सवाल टाकला. " Her Majesty's officers of arms who demad entrance to the city of London to proclaim Her Royal Majesty Queen Elizabeth. " असें उत्तर मिळाल्यावर दोरी काढून घेण्यांत आली. दोन शरीररक्षकांसह उद्घोषक पुढें झाले आणि त्यांनीं घोषणापत्र नगराध्यक्षांच्या ( लॉर्ड मेयरच्या ) हातांत दिलें.

गांवांत एकंदर चार ठिकाणीं घोषणा करण्यांत आली. परंपरागत सर्व गोष्टी अत्यंत कसोशीनें जशाच्या तशा प्रकारें करण्यांत इंग्लंड फार चौकस आहे.

राजाचा मृत्यु असो वा राणीचें राज्यारोहण असो, लग्नसमारंभ असो वा कोणताहि राजकीय समारंभ असो, त्यांत कोणी कसा भाग घ्यायचा, कोणी कोणते कपडे घालावयाचे, एवढेंच काय कोणी कोठें उभें राहावयाचें येथपर्यंत सर्व गोष्टी ठरवून लिहून ठेवण्यांत आलेल्या आहेत आणि त्यांत यत्किंचित्हि फरक पडूं देण्यांत येत नाहीं.

राणी आतां सॉडरिंगहॅमला पित्याच्या शवदर्शनार्थ गेलेली आहे. शव घातलेली पेटी सॉडरिंगहॅमच्या राजाच्या इस्टेटींतील ओक लांकडाची केलेली आहे. ती करणाऱ्या सुतारानेंच मागच्या राजाची–पंचम जॉर्जची–शवपेटी केलेली होती. पेटी सध्यां सॉडरिंगहॅममधील राजाच्या खाजगी चर्चमध्यें ठेवलेली आहे. सोमवारीं ती समारंभानें लंडनला आणण्यांत येईल व वेस्टमिन्स्टर हॉलमध्यें मंगळवार, बुधवार, गुरुवार तीन दिवस ठेवण्यांत येईल. लोकांना दर्शनासाठीं सकाळीं ८ ते रात्रीं १० पर्यंत वेळ ठेवलेला आहे. पंचम जॉर्जच्या वेळीं अशाच प्रकारें तीन दिवस पेटी तेथें असतांना आठ लक्ष लोक तेथें येऊन गेले म्हणतात. शुक्रवारीं पेटीची मिरवणूक पॅडिंग्टन स्टेशनापर्यंत जाईल व तेथून ती विंडसरला नेण्यांत येऊन तेथें अंत्यसंस्कार करण्यांत येतील. सर्व दिवसाचे कार्यक्रम तयार झाले असून मिरवणुकीचे मार्ग इत्यादि छापून झाले असून लोकांच्या गर्दीचा उपसर्ग होऊं नये म्हणून बॅरिअरर्स बांधण्याचें कामहि सुरू झालें आहे.

वेस्टमिन्स्टर हॉलमध्यें जाण्यासाठीं क्यूमध्यें ५–६ तास तरी उभें राहावें लागतें म्हणतात. मिरवणुकीच्या मार्गावर तर आदल्या दिवशीं रात्रींपासून लोक उभे राहण्यास येतात असें कळतें.

गेले तीन दिवस वृत्तपत्रांत राजकुटुंबाचीं चित्रें, मृत राजाचें चरित्र, राणीचीं वेगवेगळ्या वेळचीं वक्तव्यें इ. भरपूर माहिती येत आहे. ह्या दुसऱ्या एलिझबेथच्या राजवटीनें सर्वांनाच ४०० वर्षांपूर्वीच्या पहिल्या एलिझबेथची कारकीर्द आठवावी हेंहि स्वाभाविक आहे. एका वृत्तपत्रानें तर ड्रेकनें स्पॅनिश आरमाराचा धुव्वा उडविल्यावर पहिल्या एलिझबेथनें केलेल्या भाषणाचा उतारा छापून शेजारच्या स्तंभांत दुसऱ्या एलिझबेथनें एकविसाव्या वाढदिवसाच्या वेळीं केलेल्या भाषणाचा उतारा छापला होता.

मागची एलिझबेथहि वयाच्या पंचविसाव्या वर्षींच राज्यावर आली होती. तिच्या राजवटींत साम्राज्य वैभवाच्या शिखरावर होतें. वेगवेगळ्या क्षेत्रांतील ड्रेक, जॉन्सन् इ. नामांकित माणसें त्या वेळीं चमकून गेलीं. त्याचा सुदीर्घ उल्लेख करून हें नवें एलिझबेथन युगहि तसेंच समृद्धीचें होवो इत्यादि लिहिलें आहे.

वृत्तपत्रव्यवसायाचें उत्कृष्ट उदाहरण गेलें तीन दिवस मी पाहात आहें. इ. स. १४०० मधील घटनांचे फोटो, वृत्तान्तांचीं कात्रणें, वक्तव्यांतील उतारे इ. मजकूर भरपूर प्रमाणांत वाचायला मिळत आहे.

पार्लमेंटच्या सर्व सभासदांनीं राणीच्या आज्ञेंत राहण्याची प्रतिज्ञा नुकतीच घेतली आहे. राजाच्या मृत्यूनिमित्त कोणत्याहि संस्थेस किंवा कचेरीस एकहि दिवस सुट्टी देण्यांत आलेली नाहीं. फक्त शुक्रवार दि. १५ ला सर्वांनीं दोन मिनिटें स्तब्ध राहून आदर व्यक्त करावा असें जाहीर करण्यांत आलें आहे. या गोष्टीचा उल्लेख मुद्दाम करावासा वाटतो. कळावें.

आपला

×××

७०७

ग्रंथ सं. ... ठा
अनुक्रम २६३७४ ... वि: भू- ४४
क्रमांक ...१८३........ नों: दि: .......

# सहाव्या जॉर्जची अंतिम यात्रा

लंडन

स. न. वि. वि.

इथल्या ॲक्सेशन कौन्सिलमधील आपलें काम आटोपतांच राणीनें आपल्या पतिसहवर्तमान ताबडतोब सॉडरिंगहॅमचा रस्ता सुधारला. राणीला स्वतंत्र आगगाडीची व्यवस्था करणें शक्य होतें. पण स्वतःच्या गाडींतून जाणें जास्त बरें असें ठरवून राजदांपत्य स्वतःच्या गाडींतूनच निघालें. ड्यूक ऑफ एडिंबरानें स्वतः चाक हातीं घेतलें आणि वायुवेगानें ते सॉडरिंगहॅमकडे निघाले. तेथील चर्चमध्यें ठेवलेल्या आपल्या पित्याच्या शवपेटीचें दर्शन घेतांना राणीला मागच्याच आठवड्यापूर्वीं विमानतळावर निरोप द्यायला आलेल्या पित्याची मूर्ति समोर दिसणें स्वाभाविकच होतें. “ प्रिय बाबांस, तुमच्या आवडत्या ‘ लिलिबेट ’कडून–” असें कार्ड अडकविलेला एक हार तिनें तेथें समर्पण केला. सोमवार सकाळपावेतों सॉडरिंगहॅमच्या लोकांनीं चौघा-चौघांनीं तेथें अखंड पहारा ठेविला व सोमवारीं सकाळीं आगगाडीनें शवपेटी लंडनला आणण्यांत आली.

किंग्ज् क्रॉस स्टेशनावरून पेटीची अत्यंत साधी मिरवणूक गांवांतून वेस्ट-मिन्स्टर हॉलकडे निघाली. राजा पुनश्च एकदां आपल्या राजधानीला आलेला होता; पण किती वेगळें स्वरूप होतें आजचें ! युनिव्हर्सिटीच्या समोरूनच मिरवणूक जाणार असल्यानें मी थोडा आधीं तेथें जाऊन उभा होतों. रस्त्याच्या दोन्ही बाजूंस प्रचंड गर्दी होती. पण तरीहि आश्चर्यकारक शांतता पसरलेली होती. सहा घोड्यांनीं ओढलेल्या तोफेच्या गाडीवर शवपेटी ठेवलेली होती. त्यावर राजाचें स्वतःचें निशाण अंथरलेलें होतें व त्यावर राजदंड, राजमुगुट व राणीनें घातलेला पांढऱ्या शुभ्र फुलांचा एकच हार ठेवलेला होता. पेटीच्या मागें ड्यूक ऑफ एडिंबरा–( जांवई ) व ड्यूक ऑफ ग्लाउसेस्टर–( भाऊ ) हॅटस् हातांत घेऊन चालत होते. मागें आणखी थोडे लोक होते व घोडेस्वारांचें एक पथक होतें. छोटीशीच व साधी अशी ही प्रेतयात्रा पाहतांना लोकांचे मात्र डोळे भरून आले व कंठ दाटले.

सोमवारीं संध्याकाळीं योग्य त्या धार्मिक विधीनंतर शवपेटी ही पार्लमेंट हाऊसमधील सुविख्यात वेस्ट मिन्स्टर हॉलमध्यें एका आधींच तयार केलेल्या उंच चबुतऱ्यावर ठेवण्यांत आली. आणि मंगळवार सकाळपासून शुक्रवार पहांटेपर्यंत लोक दर्शन घेऊन आपली श्रद्धांजलि वाहण्यासाठीं तेथें जाऊं लागले. वेळ सकाळीं आठ व रात्रीं दहापर्यंतची ठरविण्यांत आली होती. पण ती कधींच पाळली जाऊं शकली नाहीं. आंत जाण्यासाठीं जमलेल्या लोकांचा क्यू हा एका रांगेंत दहा अशा रांगांचा प्रसंगीं चार चार मैल लांबीचा होत असे. दर तासास चार हजार लोक दर्शन घेऊन बाहेर पडूं शकत असत. तरीहि ह्या अखंड लोकयात्रेंत एका वेळीं पन्नास-साठ हजार लोक उभे राहिलेले दिसत. थंडींत-बर्फांत, पांच, पांच तास उभे राहिल्यावर मग कोठें आंत जाण्याची संधि मिळे. पण तरीहि लोक शांतपणें गडबड न करतां तासानुतास मृत राजाच्या शवदर्शनार्थ उभे राहात हें दृश्य मी कधींहि विसरूं शकणार नाहीं. मी स्वतः ह्या यात्रेंत तीन-चार तासांच्या दीर्घ तपश्चर्येनंतर आंत गेलों. नऊशें वर्षांपूर्वी बांधलेल्या ह्या राजदरबारांत घडलेल्या अनेक ऐतिहासिक स्मृति माझ्या डोळ्यांसमोर दिसूं लागल्या. ॲनबुलीनला देहान्त शासन सांगणारा आठवा हेन्री, पहिला चार्ल्स, पहिला जेम्स, क्रॉम्वेल, इम्पीचमेंटला तोंड देणारा वॉरन हेस्टिंग्ज, राणी व्हिक्टोरिया आणि पांचवा जॉर्ज ह्यांच्या मागाहून आज येथें सहाव्या जॉर्जच्या आत्माविहीन फक्त पार्थिव देह उपस्थित होता. पेटीच्या चारहि बाजूंस दगडी पुतळ्याप्रमाणें निश्चल उभे असे राजदूत तलवारी उलट्या टेकून माना खालीं घालून थांबलेले होते. चारहि बाजूंस मेणबत्त्यांचा उजेड मिणमिणत होता. आणि सहस्रावधि लोक आंत असूनहि निःशब्द होते. असा तो राजदरबार कोणाच्याहि मनांत भावनांची गर्दी उसळवीत होता. तीन दिवस व तीन रात्री प्रजाजनांनीं आपल्या आवडत्या राजाला श्रद्धांजलि वाहण्याचा हा कार्यक्रम अखंड चालू ठेविला.

आणि आज सकाळीं ९॥ वाजतां तेथून शवपेटीची जी महायात्रा निघाली ती मैलभर लांबीची असून तिच्यांत जगतांतील जवळ जवळ सर्व देशांचे प्रतिनिधि होते. महायात्रा पाहण्यास काल रात्रीपासून लोकांनीं रस्त्यावर जागा धरण्यास प्रारंभ केला होता. साडेनऊ वाजले. शवपेटी

राजदरबाराच्या बाहेर आली. आणि तोफ-गाडीवर विराजमान झाली. बिग बेननें त्याच क्षणीं पहिला टोला वाजविला. टेलिव्हिजन कॅमेऱ्यानें सहस्रावधि ब्रिटिश घरांतून महायात्रेचें दर्शन घडविण्यास सुरुवात केली व टॉवरमधील तोफेनें आपल्या पहिल्या धडाक्यानें लोकांना महायात्रा सुरू झाल्याचें सूचित केलें. बिग बेननें मिनिटामिनिटाच्या अंतरानें छपन्न टोले वाजविले. टॉवरवरून ५६ तोफांची सलामी देण्यांत आली. रॉयल नेव्हींतील ऐशीं नाविकांनीं तोफ-गाडी ओढून मोठ्या वेस्ट मिन्स्टर राजपथावर आणली. कॉमनवेल्थमधील सैनिकी तुकड्यांचीं पथकें, हवाई, नाविक व सैनिक दलांचे बॅण्ड, सर्व देशांचे प्रतिनिधि व राजकुटुंब ह्यांनीं ह्या महायात्रेंत भाग घेतलेला होता. बॅण्डचे आजचे सूर शोकपूर्ण होते. आणि आजचा 'स्लो मार्च 'हि शोकोद्दीपक होता. मला अनेक वर्षांपूर्वी बडोद्यास पाहिलेल्या महाराज सयाजीराव गायकवाड ह्यांच्या महायात्रेची आठवण झाली.

पॅडिंग्टन स्टेशनवरून शवपेटी विंडसर येथील किल्ल्यांतील सेंट जॉर्ज चापल-मध्यें नेण्यांत आली आणि येथील मुख्य धर्मगुरु कॅंटरबरीचे आर्चबिशप ह्यानें धर्मविधीस अनुसरून अंत्यसंस्कार केले. "Earth to earth, ashes to ashes, dust to dust" म्हटल्यावर राणीनें शवपेटीवर मूठभर माती लोटली आणि क्षणार्धांत पेटी दृष्टिआड होऊन खालील खोल जमिनींत पोहोंचली. ह्याच चापेलमध्यें मागचे सहा राजे चिरनिद्रा घेत आहेत.

—आणि अशा प्रकारें गेले दहा दिवस येथील लोकांच्या भावनांना आवाहन करणारा असा राजाच्या अंत्यसंस्काराचा हा समारंभ संपला. कळावें.

आपला,

XXX

९

# कांहीं शैक्षणिक विचार

## ब्रेन ट्रस्ट : हिंदुस्थान

लंडन

स. न. वि. वि.

आज सकाळीं वेगवेगळ्या ठिकाणचीं तीन पत्रें मला एकदम मिळालीं आणि मग आमच्या टेबलावरच्या सगळ्या मित्रमंडळींनीं माझ्याकडे त्याबद्दल चहाची मागणी केली. पण संदर्भ समजण्यासाठीं आमच्या इथल्या वातावरणाची थोडी ओळख करून दिली पाहिजे.

येथें सकाळीं न्याहारी आटोपल्यावर जो तो आपापल्या उद्योगाला निघून जात असल्यानें एकत्र राहणाऱ्या सर्वांची सकाळीं एकदां गांठ पडावी एवढ्यासाठीं न्याहारीला सर्वांनीं एकदम जमावयाचें असा संकेत असतो. घंटा झाली कीं सर्वांनीं कपडे वगैरे करून तयार होऊन न्याहारीला यावयाचें असतें. निरनिराळ्या टेबलांवर ज्याच्या त्याच्या जागा ठरलेल्याच असतात. आम्ही पहिल्या दूध पोह्यांना सुरुवात करतों तोंपावेतों सकाळचें टपाल घेऊन हंसत हंसत आमच्या 'चिटणीस' बाई येतात. प्रत्येकाला वाटतें आपलें पत्र आलेलें असावें. मग ज्याचीं त्याला पत्रें देऊन व त्यावर विनोदी भाष्य करून बाई फराळाला बसतात. ज्यांना पत्रें मिळतात त्यांचा हेवा केला

जातो. अर्थातच गमतीनें ! आणि मग थट्टामस्करींत न्याहारी संपेपावेतों पत्रवाचन—पहिलें-वाचन—संपतें. आज मला हिंदुस्थानांतून तीन आणि लंडनमधील दोन अशीं पांच पत्रें एकदम मिळालीं. तेव्हां " There are heaps of letters for you, Mr Nawathe. " असें म्हणून बाईनीं पत्रें देतांना विनोद करण्यासाठीं Any new friends in London ? " असा जरा हंसत प्रश्न विचारला आणि मग इतकीं पत्रें येण्याइतका मी मोठा मनुष्य झालों असल्यामुळें आनंदाप्रीत्यर्थ मी सर्वांना माझ्या खर्चानें चहा द्यावा अशी थट्टेची सूचना पुढें आली.

सुमारें दीड महिन्यापूर्वीं एकदां एक मोठें लठ्ठ पाकीट मला सकाळच्या टपालांत मिळालें Council for Education in World Citizenship " कडून तें आलेलें होतें. संस्थेची सर्व माहिती, कार्याची रूपरेषा इत्यादि सर्व बाबी त्यांनीं मजकडे पाठविल्या होत्या आणि नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवड्यांत त्यांनीं मुलांकरितां एक परिषद भरवावयाचें ठरवलें होतें. त्यांत त्यांच्याशीं सहकार्य करण्यासंबंधीं विनंती होती. परिषदेचा विषय ' हिंदुस्थानांतील जीवन ' असा होता. आणि दोन दिवस लंडनमधील सुमारें १००० मुलांना या परिषदेचा लाभ देण्यांत येणार होता. या कौन्सिलनें इंडिया हाऊसकडून आलेल्या विद्यार्थी-विद्यार्थिनींचे पत्ते घेऊन त्यांपैकीं कांहीं निवडक विद्यार्थ्यांना ह्या परिषदेंत साहाय्य करण्यासाठीं बोलविलेलें होतें.

सुमारें महिनाभर आधीं हिंदुस्थानसंबंधीं उपयुक्त माहिती गोळा करून ऐतिहासिक, भौगोलिक, सामाजिक व व्यापारविषयक अशा वेगवेगळ्या सदरांत ती सुबक छापून प्रत्येकावर हिंदुस्थानचा एक छोटा नकाशा काढून एक सुंदर पत्रिका त्यांनीं तयार केली होती. परिषदेस येणाऱ्या प्रत्येक मुलाला परिषदेपूर्वीं १५ दिवस ती देण्यांत आलेली होती. कोणकोणत्या शाळेंतून कोणकोणतीं मुलें येणार ह्याचा सगळा आराखडा तयार करण्यांत आला होता आणि प्रत्यक्ष त्या दिवशीं दिवाणखान्यांत कोणी कुठें बसावयाचें हें सुद्धां चिठ्ठया लावून ठरवून ठेवलेलें होतें.

आमच्यासारख्या साहाय्यकांना परिषदेच्या दिवाणखान्याची जागा नेमकी सांपडावी म्हणून एक नकाशा काढून पाठविला होता. आणि तेथें येण्यासाठीं कोणतीं ट्यूब-स्टेशन्स जवळ आहेत आणि कोणत्या बसेस तेथें येतात यांचेंहि

पत्रक सोबत दिलेलें होतें. सकाळींच परिषदेला जावयाचें असल्यानें दुपारच्या जेवणाची सोय त्यांनींच केली होती. आणि या सगळ्या मुलांच्या दुधाची व जेवणाची सोयहि व्यवस्थितपणें करण्यांत आली होती. रोज ५०० प्रमाणें दोन दिवसांत हजार मुलें उपस्थित राहणार होतीं. त्यांचे २५ चे २० गट करण्यांत आले होते. आणि आळीपाळीनें त्यांची फराळाची व चर्चेची सोय केली होती.

युस्टन रस्त्यावरील सेंट पॅक्रिआसचा मोठा भव्य दिवाणखाना त्या दिवशीं हिंदी पद्धतीच्या तोरणांनीं सजविला होता. प्रवेशद्वारापाशीं एका अंबारीसह सजविलेल्या हत्तीचें चित्र ठेवून त्याजवर भारताचा तिरंगा ध्वज ठेवण्यांत आला होता. लो. टिळक, म. गांधी, जवाहरलाल, इत्यादि लोकनेत्यांचे मोठाले फोटो लावले होते आणि दिवाणखान्याच्या भिंतींना टेकून खूपसे चित्रसंग्रह लावून ठेवण्यांत आले होते. आपल्याकडे रेल्वे स्टेशन्सवर लावतात तीं, जी. आय्. पी. चीं आणि बी. बी. सी. आय्. चीं मोठालीं पोस्टर्स मधून मधून टांगलेलीं होतीं. हिंदुस्थानांतील जुनीं व नवीं नाणीं नीट पुठ्याला शिवून त्याच्या खालीं त्यांची शिलिंग-पेन्सांत किंमत लिहून तीं एका प्रमुख ठिकाणीं ठेवलीं होतीं. आणि त्याच्या जवळच हिंदुस्थानांतील जुनीं व नवीं पोस्टांचीं तिकिटें चिकटविलेली होतीं. ह्याशिवाय निरनिराळ्या लिपिपद्धतींचा एक तक्ता लावलेला असून एका इंग्रजी वाक्याचीं हिंदी, मराठी, गुजराथी, बंगाली इ. नऊ भाषांत त्या त्या लिपीसह भाषांतरें लिहून ठेवण्यांत आलेलीं होतीं. प्रत्येक भाषेंत छापलेलें एक एक पुस्तक तेथें ठेवण्यांत आलेलें होतें. मराठी पुस्तक कोणतें असावें तेथें? साहित्यसम्राटांनीं लिहिलेल्या लोकमान्यांच्या चरित्राचा पहिला खंड होता तो! गुजराथी पुस्तक 'धूमकेतु' ची एक कादंबरी होती. आणि हिंदी पुस्तक प्रेमचंदांचें गोदान होतें. पुस्तकाची निवड कोणत्याहि भूमिकेवरून केलेली नव्हती तरी ती उत्तम झाली होती. त्याबद्दल दुमत होणार नाहीं. हिंदुस्थानचे नकाशे व आराखडे पुष्कळसे लावलेले असून त्यांत भाषा, खनिजें, धान्यें दाखविणारे बरेचसे होते. एकंदरींत सजावट सुंदर व आकर्षक होती.

कार्यक्रमांत पहिला ९॥ ते ११ हा वेळ आमचा व विद्यार्थ्यांचा परिचय आणि प्रदर्शन पाहणें ह्याकरितां राखून ठेवला होता. प्रथम २५ मुलांच्या

गटाचा व हिंदी विद्यार्थ्यांचा परिचय करून दिल्यावर त्या हिंदी विद्यार्थ्यांनें त्या गटाबरोबर सर्व प्रदर्शन पहात हिंडायचें व मुलें विचारतील तें समजावून सांगायचें असा सर्वसाधारण कार्यक्रम होता. मी ज्या गटाबरोबर होतों त्यांतील मुलांनीं माझ्याकडून प्रत्येक पुस्तकांतून ५-५ ओळी वाचून घेतल्या आणि मग मुलींनीं त्याचें भाषांतर विचारून घेतलें. सगळ्यांत गंमत म्हणजे त्यांतल्या एका मुलीनें सर्व वेगवेगळ्या लिप्यांत माझी स्वाक्षरी मागितली. " कां हो ! ह्या सगळ्या भाषा येतात असे कांहीं लोक असतील कां ? " तिनें विचारलें मीं म्हटलें, " असतीलहि कदाचित् ! " " तुमच्या ओळखींत कोणी आहेत का ! अर्थातच नाहीं असें उत्तर देणें भाग पडलें. आणि मग जेव्हां मी त्यांना सांगितलें कीं, " आमच्याकडे मुलांना मातृभाषा म्हणून मराठी, देशभाषा म्हणून हिंदी, प्राचीन भाषा म्हणून संस्कृत व आवश्यक म्हणून इंग्रजी अशा चार भाषा शिकाव्या लागतात. तेव्हां एक छोटा मुलगा म्हणाला, " We are fortunate in being born in England ! "

११ वाजतां हा कार्यक्रम संपला आणि सिनेमाचा कार्यक्रम सुरू झाला. आपल्याकडील चांगल्या चांगल्या डॉक्युमेंटरी फिल्म्स् यासाठीं आणलेल्या दिसल्या. निरनिराळीं वाद्यें, नृत्यांचे प्रकार, चित्ताकर्षक जयपूर इत्यादि फिल्मस् होत्या. आपल्या महाराष्ट्राच्या प्रभात फिल्म कंपनीनें केलेली ' रूरल महाराष्ट्र ' ही फिल्म दाखविण्यांत आली होती. मध्यंतराच्या १५ मिनिटांत एका गृहस्थाचें हिंदुस्थानबद्दल सर्वसामान्य माहितीचें एक व्याख्यान झालें. चित्रपट-दर्शनाचा कार्यक्रम १२॥ वाजेपावेतो चालला. आम्हां प्रत्येक हिंदी विद्यार्थ्याला दोन गट देण्यांत आले होते. त्यांपैकीं एका गटाशीं चर्चा १२॥ ते २, नंतर २ ते २॥ जेवण आणि २॥ ते ४ दुसऱ्या गटाशीं चर्चा असा आमचा कार्यक्रम होता. प्रत्येक गटाबरोबर एक असा येथील लंडनमधील शिक्षक उपस्थित होता. त्याचें काम मुलांना चर्चा करण्यास लावणें, त्यांना प्रश्न विचारण्यास उद्युक्त करणें असें होतें. माझ्या वांट्याला आलेल्या एका गटांत मुली जास्त होत्या. आणि दुसऱ्या गटाला शिक्षिका मोठी कडक होती. तिनें मुलांना प्रश्न विचारून अगदीं बेजार करून सोडलें होतें.

मुलांनीं एवढी माहिती वाचली होती, एवढें प्रदर्शन पाहिलें होतें आणि शिवाय सिनेमा पाहिला होता तेव्हां त्यांना खूप विचारण्यास अवसर होता. आणि त्याचा त्यांनीं चांगला उपयोग करून घेतला हें कबूल केलें पाहिजे.

पहिल्या गटांत थोडीं मुलें होतीं तेव्हां मुलींनीं प्रश्नांची सरबत्ती सुरू करण्यापूर्वीं त्यांना संधि देण्याच्या उद्देशानें शिक्षकानें प्रथम त्यांना कोणाला कांहीं विचारावयाचें असल्यास पाहण्याचें ठरविलें. त्यांपैकीं एका मुलानें, “ तुमचे देशी खेळ कोणते ? ” असा पहिला प्रश्न विचारला. मीं हुतुतू, खो खो, आट्यापाट्या इत्यादि नांवें सांगितलीं. आणि हुतुतूची थोडी जास्त कल्पना दिली. पण सारखें वाटत होतें कीं, शंकरराव पाटणकरांना आणि त्र्यंबकराव गोडबोल्यांना खो खो–हुतुतूच्या फिल्मस् करायला सांगत होतों. त्या असत्या तर किती बरें झालें असतें ! दाखविलेल्या चित्रपटांत खेळाचें कोठेंच नांव नव्हतें आणि म्हणूनच त्या मुलानें हा प्रश्न विचारलेला होता. सर्वसामान्य ब्रिटिश लोकांत खेळासंबंधीं फार प्रेम आहे. ब्रिटिश मनुष्य वर्तमानपत्रांत प्रथम “ स्पोर्टस् न्यूज ” पाहतो अशी येथें एक रूढ म्हण आहे. त्याला अनुसरून हा प्रश्न होता. नंतर एका मुलानें, “ तुमच्या शाळांतून हॉकी सक्तीची आहे का नाहीं ? ” असाहि प्रश्न विचारला होता.

ह्यानंतर धर्मविषयक, ब्राह्मण इतरांशीं बोलत-चालत नाहींत. अस्पृश्यांना गुरांसारखें वागविलें जातें. इत्यादि खुळ्या समजुतीसंबंधीं कांहीं प्रश्न व सामाजिक रूढीविषयीं—पहिली मुलगी जन्माला आली तर तिला नदींत बुडवितात का ? इत्यादि कांहीं विचित्र प्रश्न सोडले तर बाकीचे प्रश्न मला फारच चांगले वाटले तरी Do they still cut the hair of girls who lose their husbands ? हा प्रश्न एका मुलीनें विचारलाच.

मला शिक्षणविषयक खूपच प्रश्न विचारले गेले. मुलगा शाळेंत कितव्या वर्षीं जातो, त्याची परीक्षा कशी घेतात, त्याला किती होमवर्क असतें, विषय कोणकोणते शिकावे लागतात, शाळा किती तास असते, मुलें दंगा करतात कीं नाहीं, परीक्षेंत कॉपी करतात का, मॅट्रिकला किती विषय असतात, आणि एवढे सगळे विषय शिकवितात का, इत्यादि बराच भर ह्या प्रकारच्या प्रश्नांवरच होता. मुली शाळा कितव्या वर्षीं सोडतात, मुलींचीं लग्नें कितव्या

वर्षी होतात, मुलीं खेळांत भाग किती घेतात इ. प्रश्न मुलींनीं विचारले होते. आपल्या " रूरल महाराष्ट्र " चित्रपटांत एक प्रसंग असा आहे कीं, दाराबाहेर आलेल्या बैलगाडींत नवरा-मुलगा जाऊन उभा राहतो आणि मग नवरी-मुलगी येते. तो तिला वर घेण्यासाठीं हात पुढें करतो, पण ती लाजते आणि हात पुढें करीत नाहीं असें दृश्य होतें. ह्यावर एका मुलीनें प्रश्न विचारला होता. येथें मुलगा बसमध्यें चढला तर आधीं मुलीला हात देऊन वर घेतो. तेव्हां मुलीनें हात पुढें करायला नकार द्यावा त्याचें तिला आश्चर्य वाटणें स्वाभाविकच आहे. अर्थात्च मग मुलीच्या शालीनपणाच्या आमच्याकडील कल्पना तिला समजावून देणें भाग पडलें.

राजकारणाच्या बाबतींत हिंद-पाक एकीच्या शक्यतेसंबंधीं, आतां त्यांच्यांत परस्पर असलेल्या स्नेहसंबंधासंबंधीं थोडेसे प्रश्न विचारण्यांत आले, पण ते अगदीं वरवरचे होते. आणि १५ वर्षांच्या आंतल्या मुलांकडून खोल प्रश्नांची अपेक्षा करणेंहि चुकीचेंच होतें ! शेवटीं कांहीं किरकोळ प्रश्न येऊन हें प्रकरण संपेल असें मला वाटत होतें. एवढ्यांत एका मुलानें रूरल महाराष्ट्रांतल्या फिल्ममध्यें नांगराची जुनीच पद्धत दाखविली यावरून शेती-विषयक प्रश्नांना सुरुवात केली. त्यांच्या शिक्षिकेनें ' इंग्लंडमधल्या कायद्यानुसार कुटुंबप्रमुख वारल्यावर जशी सर्व शेतीवाडी थोरल्या मुलाकडे वारसानें जाते तसें हिंदुस्थानांत होत नाहीं ती सर्व भावामध्यें वांटली जाते व अशा प्रकारें जमिनीचे लहान लहान तुकडे झाल्यानें मोठ्या प्रमाणावर ट्रॅक्टर वगैरेच्या साहाय्यानें शेती करणें परवडत नाहीं. म्हणूनच जुनाट नांगरांच्या पद्धतीनेंच येथें शेती करतात ' असा परस्पर खुलासा केला. तिचा दृष्टिकोन चुकीचा नसल्यानें मीं त्या उत्तरांत कांहीं सुधारणा केली नाहीं.

चर्चा आटोपल्यावर पुनः एकदां सगळीं मुलें मधल्या दिवाणखान्यांत जमलीं. चर्चेच्या वेळीं प्रत्येक गटाला एक स्वतंत्र खोली देण्यांत आली होती. प्रत्येक गटानें चर्चेच्या शेवटीं दोन प्रश्न लिहून मुख्य अधिकाऱ्यांना द्यावयाचे असा संकेत होता. ते सर्व प्रश्न गोळा केल्यावरच हिंदुस्थानांतील चार विद्वानांना एका टेबलावर बसवून--ह्यांपैकीं दोन पुरुष आणि दोन स्त्रिया होत्या--त्यांना ते प्रश्न विचारण्यांत आले. आणि त्यांनीं त्या प्रश्नांचीं उत्तरें देण्याचा प्रयत्न केला. ह्या प्रकारच्या प्रश्नोत्तर-पद्धतीस येथें " ब्रेन ट्रस्ट "

असें नांव आहे. व ही ब्रेन ट्रस्टची पद्धत येथें फार लोकप्रिय आहे. ज्यांना ब्रेन ट्रस्टवर निवडलेलें असतें ते जर खरेच विद्वान् असले जर या प्रश्नोत्तरांना मोठी गंमत येते.

इंडिया हौसनें पाठविलेल्या विद्वानांबद्दल मी कांहीं लिहीत नाहीं, पण त्यांतल्या दोन स्त्रिया ह्या स्टेज भूषविण्यासाठींच आलेल्या दिसत होत्या. कारण त्यांनीं उत्तरें देण्यांत फारसा भाग घेतला नाहीं ज्यांनीं उत्तरें दिलीं त्यांनीं तीं कशीं दिलीं त्यांचें वर्णन करीत नाहीं.

५ वाजतां हा कार्यक्रम संपला. मुलांना टिपणें करून घेण्यासाठीं प्रदर्शन आणखी दोन दिवस मोकळें ठेवण्यांत आलें होतें. दोन दिवसांपैकीं मी एक दिवस गेलों होतों. त्याची हकीकत विस्तारानें लिहिली आहे.

सहकार्य केल्याबद्दल मनःपूर्वक आभार मानल्याचें पत्र दुसऱ्याच दिवशीं आलें हें सांगणें नकोच. कळावें.

आपला,
× × ×

## पोहोण्याच्या स्पर्धा

स. न. वि. वि.

अखिल जागतिक पोहणें-स्पर्धा ज्या संस्थेच्या विद्यमानें होतात त्या ए. एस्. ए. ( अमॅटर स्वीमिंग ॲसोसिएशन ) च्या आंग्ल शाखेतर्फे इंग्लंड-मधील वेगवेगळ्या ठिकाणच्या स्पर्धा भरवल्या जातात. येथील प्रत्येक तलाव, प्रत्येक पोहणें, विषयांची संख्या एवढेंच काय रॉयल लाइफ सेव्हिंग सोसायटीच्या राजमान्य संस्थासुद्धां या संस्थेची सभासद आहे.

कोणासहि पोहोणें क्षेत्रांत कांहींहि घडवायचें असलें तरी या संस्थेच्या मान्यतेशिवाय तें घडवितां येत नाहीं आणि हें ए. एस्. ए. चें महत्त्व सर्वांनीं

मान्य केलेलें आहे हेंहि विसरून चालणार नाहीं. येथील स्पर्धांत जागतिक परिमाणें मात्र वापरलीं जात नसून येथील 'यार्ड' हें परिमाण उपयोगांत आणलें जातें. येथील बहुतेक तलाव १०० फूट लांब व २५ फूट रुंदीचे आहेत, कांहीं मोठेहि आहेत. वाय्. एम्. सी. ए., वाय्. डब्ल्यू. सी. ए. सेंट जॉर्जेस बाथ, इत्यादि कांहीं तलाव हे गरम पाण्याचे असून इतर अनेक थंड पाण्याचे आहेत. एक वाय एम्. चा तलाव सोडला तर इतरत्र "स्वीमिंग कॉस्टयूम" हा अनिवार्य आहे. पोहोण्याची चड्डी घालून प्रथम स्नान केल्याशिवाय कोठेंच पोहावयास मिळत नाहीं. आणि वाय. एम. चा अपवाद आहे तो वेगळाच! (म्हणजे येथें पोहतांना कांहींच नेसायला परवानगी नाहीं!)

प्रथम सर्व कपडे उतरून 'डिसइन्फिक्टेड बाथ' घेऊन मग तलावांत उडी टाकायची, हा येथील शिरस्ता आहे, पण अर्थातच इतर ठिकाणा-प्रमाणें येथें 'मिक्सड् बेदिंग' ची व्यवस्था नाहीं. प्रत्येक तलावावर रॉयल लाइफ सेव्हिंग सोसायटीच्या परीक्षा उत्तीर्ण झालेले कांहीं लोक शिकवायला व प्रसंगीं बुडणाऱ्यास वांचविण्याकरितां म्हणून नेमलेले असतात. आपल्या तेथल्याप्रमाणें येथें शिकविणारा पाण्यांत उतरून पोटाखालीं हात देऊन शिकवितांना आढळत नाहीं. उथळ पाण्यांत प्रथम चालायला, नंतर हात मारून चालायला व मग हळूहळू पाय उचलून हॉपिंग करायला, अशा क्रमानें शिकविण्याची पद्धत दिसली. पाण्यांत उतरण्यापूर्वीं जमिनीवरच सर्व हालचाली करून घेण्याचा शिरस्ता फार मोठ्या प्रमाणावर आढळला. छोट्या घडवंच्यावर पोट टेकून हात व पाय मारायला प्रथम जमिनीवरच शिकविण्यांत येतें. अगदीं सुरुवातीस ब्रेस्ट–स्ट्रोक–गोल हात–शिकवितात. पण जल-श्वसन–ॲक्वेटिक ब्रीदिंग—मात्र अगदीं प्रारंभापासूनच नियमानें करून घेतलें जातें.

श्री. पोल्टन नामक एका विख्यात गृहस्थाकडे मी सध्यां शिकत असल्यानें त्याच्याकडून मिळालेल्या माहितीप्रमाणें येथें प्रथम ब्रेस्ट स्ट्रोक नंतर साइड स्ट्रोक–कुशीवर पोहणें व मग बॅक स्ट्रोक–पाटीवर पोहणे शिकविलें जातें. क्रॉल हा सर्वांत शेवटीं व बरीच प्रगति करणाऱ्यांनाच फक्त शिकविला जातो. लाइफ सेव्हिंग प्रत्येकाला शिकविण्यांत येतेंच! सामान्यतः पंधरा ते

वीस दिवसांत मुलगा स्वतंत्रपणें १०० फूट पोहतो असें मला सांगण्यांत आलें. व्यक्तिशः मला येथील शिकविण्याच्या पद्धतींत मोठें नवीन किंवा अनुकरणीय असें कांहीं आढळलें नाहीं.

अगदीं सुरुवातीलाच पाण्यांत ढकलून पाणी पाजून मग पोहोणें शिकविण्याची प्राचीन पद्धत सोडली तर सध्यां तेथें भारतांत सुरू असलेली पद्धत उत्तम कार्यक्षम आहे व येथील अनुभवानें त्यांत कांहीं सुधारणा सुचवावीशी मला वाटत नाहीं. महाराष्ट्र जलतरण महामंडळानें याच पद्धतीनें तेथील शाळेंतील मुलांना भराभर पोहायला शिकविल्याचें उदाहरण माझ्या डोळ्यासमोर असल्यानें तेथील कार्यपद्धति मला मोठी आकर्षक वाटलेली नाहीं.

येथील अनेक तलावांवर दोन्ही बाजूंस सुंदर गॅलरी बांधून प्रेक्षकांना पाहण्याची उत्तम सोय केलेली आहे. मार्शल स्ट्रीट व स्वीमिंग बाथवर परवां आमचे सामने झाले. त्याला कमींत कमी तिकीट १ रुपयाचें होतें तरी खूपच गर्दी झाली होती. येथें आंतरमहाविद्यालयीन युनिव्हर्सिटी स्पर्धांस सुद्धां तिकीट असतें व तें भरून पहायला येणारे विद्यार्थी खूप असतात याचें मला कौतुक वाटलें.

आपणाकडे ह्या स्पर्धा फुकट पहायला मिळण्याची उत्तम सोय असून सुद्धां फारसे विद्यार्थी जमलेले मला आठवत नाहींत. येथें तिकिटांचें उत्पन्न होतें तसें जर तेथें झालें तर आंतरमहाविद्यालय व स्पर्धासमितीस स्वतःची इमारत बांधण्याइतका फायदा होईल. मात्र तिकीट काढून येणाऱ्या प्रेक्षकांची पाहण्याची सोय येथें उत्कृष्ट असते हें कबूल केलें पाहिजे.

प्रत्यक्ष स्पर्धांच्या ठिकाणीं एका वेळीं ५ खेळाडू, एक स्टार्टर व एक वेळाधिकारी एवढेच लोक असतात तीन पंच एका उतरंडीवर बसलेले असतात. त्यामुळें अवास्तव गर्दीचा प्रश्नच उरत नाहीं. तलाव बांधीव फरशीचे असतात व त्यांतील लेन्स ह्या तळावरच आंखलेल्या असतात. बहुधा स्पर्धा रात्रीं होतात व आंत दिव्यांची भरपूर योजना असल्यानें खेळाडूला फारच प्रसन्नता वाटते. स्पर्धांच्या प्रारंभीं प्रत्यक्ष पोहोण्यापूर्वीं १० मिनिटें ग्ल्युकोज व कागदी लिंबाचा (लेमन) ताजा रस पिण्यास देतात व स्पर्धा झाल्यावर बिस्किटें, गरम कॉफी व दूध भरपूर देतात.

आमच्या स्पर्धा मुलांच्या व मुलींच्या एकाच वेळीं होत्या. स्पर्धांच्या बाबींचा कार्यक्रम मुद्दाम येथें देतों. कारण त्याचा उपयोग कदाचित् करून घेतां येईल.

सुरुवात सायंकाळीं ७–३० वाजतां.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| (१) | मुलांचे | १०० | यार्ड | फ्री | स्टाईल |
| (२) | मुलींचे | ,, | ,, | ,, | ,, |
| (३) | मुलांचे | १०० | यार्ड | ब्रेस्ट | स्ट्रोक |
| (४) | मुलींचे | १०० | यार्ड | ब्रेस्ट | स्ट्रोक |
| (५) | मुलांचे | ,, | ,, | बॅक | ,, |
| (६) | मुलींचे | ,, | ,, | ,, | ,, |
| (७) | मुलांचे डायव्हिंग | | | | |
| (८) | मुलींचे डायव्हिंग | | | | |
| (९) | मुलांचे | ४०० | यार्ड | फरी | स्टाईल |
| (१०) | मुलांचे | २०० | ,, | ब्रेस्ट | स्ट्रोक |
| (११) | मुलांची | ४ × ३३ १/३ | | टप्प्यांची | शर्यत |
| (१२) | मुलींची | ४ × ३३ १/३ | | ,, | ,, |
| (१३) | मुलांची | ३ × ३३ १/३ | | मेडले | रिले |
| (१४) | मुलींची | ३ × ३३ १/३ | | ,, | ,, |

सर्व बाबी एकामागून एक फक्त पांच मिनिटांच्या कालावधीनंतर घेण्यांत आल्या. खेळाडूंना विश्रांति हवी म्हणून स्पर्धा लांबविण्याची येथें पद्धत नाहीं. शक्यतों एका विद्यार्थ्यास एकापेक्षां जास्त स्पर्धांत भाग घेण्यास उत्तेजन देत नाहींत, पण जर एखादा असा असलाच तर त्याला कार्यक्रमानुसारच पोहावें लागतें व त्याच्यासाठीं कार्यक्रम आंखण्यांत बदल करण्यांत येत नाहीं.

डायव्हिंगकरितां फक्त तीनच उड्या आवश्यक आहेत. पैकीं एक, १ मीटर स्प्रिंग बोर्डवरून, एक ३ मीटर स्प्रिंग बोर्डवरून व एक ३ मीटर फर्म बोर्डवरून. शिवाय दोन ऐच्छिक उड्यांची सवलत असते. डायव्हिंगचें कौशल्य फारसें चांगलें वाटलें नाहीं. तसेंच पोहण्याचीं रेकॉर्डस् हीं फारशीं

चांगलीं नाहींत. १०० यार्ड फ्री स्टाइलचें ५७ सेकंद, १०० यार्ड बॅक स्ट्रोकचें ६९ सेकंद, १०० यार्ड ब्रेस्ट स्ट्रोकचें ६७ सेकंद व ४४० यार्डांचें ५ $\frac{1}{2}$ मिनिटें आहे.

मुलींचें १०० यार्डांचें ७६ सेकंद म्हणजे मुळींच चांगलें नाहीं. असो.

पोहोण्याचें "स्टॅंडर्ड" फारसें चांगलें दिसलें नसलें तरी एकूण स्पर्धा घेण्याचें तंत्र व तेथील व्यवस्था हीं फारच चांगलीं पाहण्यास मिळालीं. ह्या युनिव्हर्सिटी स्पर्धांत पोहोण्याचा तादृश फायदा झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. कळावें.

आपला,
×××

## विद्यापीठांतील अभ्यासक्रम

लंडन

स. न. वि. वि.

गेल्या दोन आठवड्यांत मला आलेल्या पत्रांत बहुसंख्य पत्रें येथील वेगवेगळ्या अभ्यासक्रमासंबंधीं चौकशी करणारीं, येथें प्रवेश मिळविण्या-संबंधीं माहिती विचारणारीं व शिष्यवृत्त्यांसंबंधीं होतीं. ह्या सर्वांना वेगवेगळीं उत्तरें लिहिणें अशक्य असल्यानें ह्यासंबंधीं एकत्रच लिहिणें आवश्यक आहे असें मीं ठरविलें आणि म्हणून आज त्यासंबंधीं थोडी माहिती देत आहें.

सर्व प्रथम मला माझीच एक चूक कबूल करावयास हवी. येथील विद्यापीठांतील अभ्यासक्रमासंबंधीं व प्रवेशासंबंधीं माहिती जानेवारी महिन्यांतच मीं द्यावयास हवी होती. येथें सर्व विद्यापीठांच्या अभ्यासक्रमास सप्टेंबरचे प्रारंभास सुरुवात होते. पण त्याकरितां प्रवेश मागणाऱ्यांची निवड बहुधा मे महिन्यांतच होते. तत्पूर्वी विद्यापीठाकडे व त्यांचेकडून तद्विषयक विद्यालयाकडे विद्यार्थ्यांचे अर्ज जावयाचे असतात. त्यामुळें अर्ज इकडे

येण्याची मुदत ही फेब्रुवारी ते मार्च अखेर एवढीच अखेर जेमतेम असते. आतां मे महिना सुरू झाला असून विद्यापीठांकडून वेगवेगळ्या संस्थांकडे अर्ज पाठवले गेले आहेत—जात आहेत. लवकरच प्रत्येक विभागाच्या ॲकेडमिक बोर्डाची सभा होईल व त्यांत प्रवेश इच्छिणाऱ्यांचे अर्ज विचारांत घेतले जातील. ज्यांचा अर्ज येथपावतों आलेला नाहीं त्यांना यंदाच्या वर्षाला प्रवेश नाहीं हें ओघानें आलेंच !

येथील विद्यापीठांतून तूर्त अर्जांची इतकी गर्दी उडाली आहे कीं, आपणांकडे मॅट्रिकच्या रिझल्टकरितां हंगामी कारकून नेमतात तसे हंगामी कारकून लंडन विद्यापीठानें या कामाकरितां नेमले आहेत.

कांहीं कारणांनीं अमेरिकन पदव्यांबद्दल जागतिक मत थोडें खालावलेलें दिसतें. स्वस्त म्हणजे कमी अभ्यासांत मिळणाऱ्या पण खर्चिक अशी अमेरिकन पदव्यांबद्दलची कीर्ति येथें येणाऱ्या परदेशस्थ विद्यार्थ्यांकडून ऐकूं येत आहे. त्यामुळें म्हणा अथवा इंग्लंडच्या पदव्यांना एक परंपरेचा उजळा असल्यामुळें म्हणा किंवा येथें तूर्त प्रत्येक विषयावर उत्तम अधिकारी असल्यामुळें म्हणा, येथें जगांतील सर्व राष्ट्रांचे विद्यार्थी अभ्यासासाठीं गोळा होत आहेत. इंग्लंडमध्यें सर्वोत्तम विद्यापीठें तीन मोजलीं जातात. त्यांत अर्थातच ऑक्स्फर्ड, केंब्रिज व लंडन ह्या विद्यापीठांचा अन्तर्भाव होतो. ह्या तीन विद्यापीठांत मिळून जगांतील सर्व विषयांच्या उच्च शिक्षणाची सोय आतां झालेली आहे. सर्वत्र अध्यापकांचे जागेवर नामांकित विद्वान् आहेत. तरीहि केंब्रिज व ऑक्स्फर्ड येथें निवासासंबंधीं बंधनें असल्यानें तेथें शिक्षण घेणें लंडनशीं तुलना करतां जास्त खर्चाचें आहे शिवाय तेथें जागाहि कमी असल्यानें अर्थातच तीं दोन विद्यापीठें थोडीशीं दुष्प्रवेशच आहेत.

प्राध्यापकाला स्वतः भेटणें, त्याला आपली पात्रता पटवून देणें इ. खटपटीं येथें येऊन राहणाऱ्याला करतां येणें शक्य असतें. असें आतां माझ्या लक्षांत आलें आहे. पण हिंदुस्थानांतून परस्पर येथें प्रवेश मिळणें हें योगायोगावरच ठेवलें पाहिजे. लंडन विद्यापीठांत जवळ जवळ सर्व विषयांचे अभ्यासक्रम आहेत. सर्व विषयांकरितां खूप अर्ज येत आहेत. लढाईच्या काळांत अभ्यास सोडून युद्धावर गेलेले अनेक विद्यार्थी पुनः विद्यापीठांत

येत आहेत. त्यांना प्रवेश हा सर्वांत प्रथम मिळतो हें सांगणें नकोच. पण त्यांच्याकरितां ठराविकच जागा आहेत. नंतर देशवार जागांची संख्या आतां ठरविण्यांत आली आहे. भारतांतील अर्ज भारताच्या हायकमिशनर-तर्फे येतील असें भारतीय सरकारनें कळविल्यापासून विद्यापीठ स्वतंत्रपणें येणाऱ्या अर्जांचा विचार करीनासें झालें आहे व म्हणून येथें येणारे सर्व अर्ज हायकमिशनरतर्फेच यावे लागतात. हायकमिशनरचे कार्यालयांत ह्यासंबंधीं व्यवस्था कशी काय होते हे मी मागें एकदां लिहिलें असल्यानें त्याची पुनरुक्ति करण्याचें कारण नाहीं.

लंडन विद्यापीठाच्या सर्व पदवी परीक्षांकरितां लंडनची मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण होणें अत्यावश्यक आहे. भारतांतील पदवी-परीक्षा झाली असल्यास येथील मॅट्रिक व इंटर उत्तीर्ण झाल्याचें समजतात व तेथून पुढचा अभ्यासक्रम तीन वर्षांत करतां येतो. थोडक्यांत म्हणजे तेथून बी. एस्सी. होऊन आलेल्यांना लंडनची बी. एस्सी. मिळविण्यास तीन वर्षें लागतात. तीनहि वर्षें चांगलाच अभ्यास करावा लागतो. लेखी व तोंडीं दोनहि प्रकारें परीक्षेंत उत्तीर्ण झाल्यावर पदवी पदरांत पडते. या दृष्टीनें येथून येणारांनीं इंटर झाल्याबरोबरच इकडे येण्याचें ठरविलें, तर जास्त सोईचें आहे, असें माझें मत आहे. तेणेंकरून आपणाकडे पदवीसाटीं खर्च केलेलीं दोन वर्षें येथें वायां जातात तशीं जाणार नाहींत.

बी. ए. व एम्. ए या परीक्षांचेमध्यें येथें आतां एक ॲकेडेमिक डिप्लोमा नांवाची परीक्षा निर्माण करण्यांत आली आहे. प्रत्येक विषयांत एम्. ए. होण्यापूर्वी हा ॲकेडेमिक डिप्लोमा मिळविणें आतां सक्तीचें केलें आहे. विद्यार्थ्यांची प्रगति उत्तम असेल तर ॲकेडेमिक डिप्लोमाचें वर्ष हें एम्. ए. च्या प्रथम वर्षाच्या योग्यतेचें मानतात व डिप्लोमा घेतल्यावर एका वर्षांत एम्. ए. होता येतें. पण एरवीं एक वर्ष डिप्लोमाला व पुढचीं दोन वर्षें एम्. ए. ला अशीं तीन वर्षें एम्. ए. पदवी मिळविण्यास आवश्यक आहे. क्वचित् प्रसंगीं अपवाद म्हणून अत्यंत विद्वान् अशा विद्यार्थ्यास त्याची चांचणी घेतल्यावर ह्या डिप्लोमा परीक्षेची माफी मिळूं शकते. पण तरीहि त्यास एम्. ए. व्हावयास दोन वर्षें घालवावींच लागतात. कोणत्याहि परिस्थितींत कोणतीहि एम्. ए. येथें दोन वर्षें राहिल्याशिवाय मिळवितां

येत नाहीं. येवढें विस्तारानें लिहिण्याचें कारण तेथील एम्. ए. मिळविल्यावर येथें एका वर्षांत एम्. ए. होतां येईल असा गैरसमज झालेला मला आढळला आहे. तो समूळ नाहींसा करणें जरूर आहे. माझी स्वतःची कल्पना येथें एका वर्षांत एम्. ए. मिळविण्याची होती, पण कोणासहि एका वर्षांत डिग्री मिळतच नाहीं, असें मला स्वच्छ बजावून सांगण्यांत आलेलें आहे.

ह्यापेक्षां उच्च पदव्यांसंबंधीं आतांच लिहिणें आवश्यक नाहीं मी वैयक्तिक उत्तरें लिहीन त्यांत त्यासंबंधीं खुलासा करीनच परीक्षेच्या कठीण-पणासंबंधीं जे प्रश्न आहेत त्यांना उत्तरें देणें दुरापास्त आहे. सामान्यतः परीक्षा फारशा कठीण नसतात. पण विद्यार्थ्याला किती येत आहे व येत आहे तें किती चांगलें येत आहे हें तपासण्याकडे प्रवृत्ति दिसते. किमान ह्यांना काय येत नाहीं व किती वाचलेलें नाहीं ह्या स्वरूपाची तरी परीक्षा नसतेच, नुसतेंच किंवा नेमलेल्या भल्या मोठ्या पाठ्यपुस्तकांतून एकाद्या कोपऱ्यांतील प्रयोगा-संबंधीं माहिती विचारण्याची प्रवृत्तीहि नसते. दर तिमाहीस टर्म-पेपर सक्तीनें लिहावयास लावून अभ्यास करूनच घेतला जातो म्हटलें तरी चालेल. त्यामुळें परीक्षा कठिण वाटत नाहीं. असें सामान्य मत आहे. माझ्यावर परीक्षेचा प्रसंग आल्या नसल्यानें वैयक्तिक अनुभव सांगणें शक्य नाहीं.

आणखी एक महत्त्वाचा प्रश्न बऱ्याच पत्रांतून आला आहे त्याचा खुलासा करतों. हिंदी विद्यार्थ्यांना नोकऱ्याच द्यावयाच्या नाहींत असा येथें कोठेंहि नियम नाहीं. नोकऱ्या मिळूं शकतात व आज अनेक भारतीय विद्यार्थी येथें नोकऱ्या करीत आहेत. पण म्हणून सहजासहजीं थोड्याशा गुणावर चांगली नोकरी मिळेल अशी आशा धरून येणें इष्ट होणार नाहीं. शिवाय, नोकरी करणाऱ्यांना अभ्यास जमत नाहीं असा अनेकांचा अनुभव मी येथें पाहत आहें. येथें नोकरी करायची म्हणजे यत्किंचितहि टाळाटाळ चुकार-पणा करून चालत नाहीं. सकाळीं ९ ते संध्याकाळीं ६ पावेतों गच्च काम तें मन लावूनच करावें लागतें, त्यामुळें परत आल्यावर अभ्यास करावयास उत्साह राहत नाहीं. अशी तक्रार मी सतत ऐकत आहें. त्यामुळें तेथें नोकरी करून शिक्षण करण्याचें साधलें म्हणून तें तेथें साधेल असा गैरसमज करून घेऊं नये.

अभ्यास करणाऱ्यांना अभ्यासाचेंच ओझें इतकें असतें कीं, त्यांतून डोकें वर काढून वैयक्तिक छंद इत्यादींकडे लक्ष देण्यास सुद्धां स्वस्थता मिळत नाहीं. मग नोकरीचें नांवच कशाला ? थोडक्यांत म्हणजे केवळ अभ्यास किंवा केवळ नोकरी यांपैकीं कशाची तरी एकाची मानसिक तयारी करून इकडे यावें म्हणजे येथें आल्यावर त्यांपैकीं एक सोडतांना क्लेश होणार नाहींत. अर्थात् त्यानुसार आर्थिक योजनाहि व्यवस्थित आंखूनच यावें हें उत्तम !

शिष्यवृत्त्यांसंबंधीं एकच खुणेचा शब्द सांगतों. येथील सर्व शिष्यावृत्त्या ( अगदीं थोडे अपवाद सोडल्यास ) ब्रिटिश विद्यार्थ्यांकरितां आहेत. त्यांवर यत्किंचित्हि विसंबून राहतां येणार नाहीं. यूनोच्या किंवा तत्सदृश शिष्यवृत्त्या ह्यासंबंधीं सर्व माहिती भारतांतच उपलब्ध असल्यानें त्यासंबंधीं चर्चा करीत नाहीं.

ब्रिटिश कौन्सिलच्या शिष्यवृत्त्या थोड्याच आहेत व त्यासाठीं अर्ज करण्याची मुदत फेब्रुवारीच्या सुमारास असते. त्याचें भारतांतील कार्यालय " ब्रिटिश कौन्सिल, माल रोड, आग्रा " येथें आहे.

विद्यापीठांव्यतिरिक्त असलेल्या अभ्यासक्रमासंबंधीं माहिती देण्याचा मानस असल्यानें मी चौकशीस निघालों. तों इतकी विस्तृत व विविध स्वरूपाची माहिती गोळा झाली कीं, त्यासंबंधीं लिहिणें फारच अवघड वाटूं लागलें. त्यामुळें हातीं आलेली माहिती नीट क्रमानें व विषयवार जुळवून मगच त्यासंबंधीं थोडक्यांत टिपण करावें असें आतां ठरविलें आहे. आज फक्त एवढेंच सुचवितों कीं, असा बहुधा कोणताहि विषय नाहीं कीं, ज्याच्या शिक्षणाची सोय येथें लंडनमध्यें करण्यांत आलेली नाहीं. येथील शब्दांत सांगायचें म्हणजे, " Everything under the sun is taught under the electric lights. " तेव्हां अमुक एक अभ्यासक्रम तेथें असेल किंवा नाहीं अशी शंका बाळगण्याचें कारण नाहीं. अभ्यासक्रम दिवसा, संध्याकाळीं, दिवसभराचे ( Full time ) व अर्धदैनिक ( Half time ) स्वरूपाचे आहेत. फीचें प्रमाण तिमाहीस ५ पौंड अथवा सुमारें २५ रु. महिना असें आहे. यापेक्षां जास्त माहिती पुढें केव्हां तरी लिहीन.

तेथून पासपोर्ट मिळविण्यास हे कार्यक्रम पुरेसे ठरतात किंवा नाहीं ह्याची चौकशी तेथेंच पासपोर्ट अधिकाऱ्याकडे करणें आवश्यक आहे. ती माहिती मला येथें उपलब्ध होणार नाहीं. पण येथें कशाचाहि अभ्यास नसून सुद्धां आलेले भारतीय विद्यार्थी मी पाहात असल्यानें पासपोर्ट मिळण्यास येथील प्रवेश-पत्रिकेची खास जरूर असेल असें वाटत नाहीं.

अनेक पत्रांतील अनेक प्रश्नांना ह्या पत्रांत एकत्र उत्तर दिलें असल्यानें आतां मजकडून वैयक्तिक उत्तरांची अपेक्षा कोणीहि करूं नये. विद्यापीठा-व्यतिरिक्तचे अभ्यासक्रमासंबंधीं लवकरच लिहीन. विद्यापीठांतील वेगवेगळे विषय देणें दुरापास्त आहे. त्यासंबंधीं येथील इंडिया हाऊसकडे चौकशीचें पत्र टाकावें व उत्तराची वाट पाहत बसावें एवढेंच सुचवितों. कळावें.

आपला,
×××

## वसतिगृहें

लंडन

स. न. वि. वि.

लंडनमध्यें विद्यार्थ्यांकरितां जीं वसतिगृहें आहेत. त्यांतलीं पुष्कळशीं त्या त्या कॉलेज अथवा शिक्षणसंस्थेच्या देखरेखीखालीं आहेत. परदेशस्थ विद्यार्थ्यांचा भरणा खूप असल्यानें स्वाभाविकपणेंच हीं वसतिगृहें त्या त्या संस्थेंत शिकण्यास आलेल्या विद्यार्थ्यांकरितांच फक्त असतात व तीं फारच झटकन भरून जातात. आधीं अर्ज केलेल्यांनाच तेथें जेमतेम प्रवेश मिळतो व उशिरां येणाऱ्यांना इतरत्र सोय पाहणें आवश्यक असतें. या प्रकारच्या वसतिगृहांत राहण्याचे अनेक फायदे असतात. एकाच संस्थेंतील विद्यार्थी एकत्र असल्यानें आपुलकी जास्त असते. व एकमेकांना अभ्यासाच्या दृष्टीनेंहि

बरीच मदत होते. शिवाय येथील पर्यवेक्षक हाहि बहुधा या शिक्षण-संस्थेंतील असल्यानें विद्यार्थ्यांचे व संस्थेचे संबंध हे निकट होण्यास पुष्कळच मदत होते. ह्या प्रकारच्या वसतिगृहांत बहुधा सर्व खोल्या दोघां-दोघांकरितां असतात. कांहीं थोडया स्वतंत्र एकट्याकरितां असतात. तेथें जेवण बहुधा एकाच प्रकारचें व तेंहि मांसाहाराचें मिळतें. येथील खर्च आठवड्यास ४ पौंड ४ शिलिंग ते ५ पौंड येतो. येथें हें सर्व हिशेबानें देत आहें. ह्या पांच पौंडांत दुपारच्या जेवणाचा अंतर्भाव झालेला नसतो हं ध्यानांत ठेवणें आवश्यक आहे. ते १५ शिलिंग मिळविले तर केवळ जेवण्या-राहण्याचा खर्च सुमारें ६ पौंड म्हणजे ८० रुपयांपर्यंत येतो. साधारणतः अशा प्रकारच्या वसतिगृहांत राहणाऱ्या सामान्य विद्यार्थ्याला सुमारें महिना ३५०-४०० रुपये पुरावेत. यांत अर्थात् नाटक-सिनेमा इत्यादि कांहींहि योजलेलें नाहीं.

या प्रकारच्या वसतिगृहांव्यातिरिक्त ब्रिटिश कौन्सिल, कलोनियल डिपार्टमेंट, स्टूडंट मुव्हमेंट हाऊस, इंडिया लीग व वेगवेगळ्या वकिलातींतर्फें चालविलेलीं वसतिगृहेंहि येथें खूप आहेत. येथील थाट काय विचारावा? बहुधा सर्व स्वतंत्र खोल्या, गालिचे, पडदे, कोच–गादाच्या खुर्च्या, मोठाले पलंग इत्यादि सामान मोठें उंची असतें. अर्थात् शिष्यवृत्त्या घेऊन येणाऱ्यांकरितांच ही प्रथमतः असल्यानें इतरांना येथें प्रथम स्थान मिळणें असंभवनीय असतें. खर्चहि अर्थातच भरपूर असतो. पण तो परस्पर शिष्यवृत्तींतून भागवावयाचा असल्यानें विद्यार्थ्याला त्याची चिंता करावी लागत नाहीं. सुमारें महिना ६०० रुपये खर्चाचा अंदाज करणाऱ्यांनीं येथें येण्यास हरकत नाहीं. कॉलेज-वसतिगृहांत अभ्यासाचें वातावरण जास्त असतें तर येथें चैनीचें वातावरण जास्त असतें.

कॉलेज-वसतिगृहांतील मुलें चहाच्या वेळीं कदाचित् जर्मन शिक्षण-पद्धतींतील 'लेबर कंप 'चें महत्त्व चर्चेस योग्य समजत असतील तर येथील मुलें "फ्लाइंग डचमन" मधील "ॲव्हा गार्डनर" च्या सौंदर्याबद्दल व अभिनयाबद्दल चर्चा करतांना आढळतील.

विनोद थोडा खालच्या पातळीवर गेला तर कोणाबरोबर कोण "गर्ल फ्रेंड" काल 'शो' ला गेली होती याचाहि ऊहापोह होण्यास प्रत्यवाय

नसतो. मी ह्या दोन प्रकारच्या कांहीं वसतिगृहांतून गेलों असल्यानें वरील विधानें करीत आहें. पण याचा अर्थ हीं सर्वच वेळीं सर्वत्र खरीं ठरतील असा कोणी समजूं नये. वाऱ्याची दिशा समजावी एवढाच फक्त येथील उद्देश आहे.

याव्यतिरिक्त वाय्. एम्. सी. ए., ईस्ट अँड वेस्ट, यांसारख्या संपूर्णतः समाजपुरस्कृत अशा कांहीं संस्थांचीं वसतिगृहेंहि येथें आहेत. वाय्. एम्. सी. ए मध्यें एक सेंट्रल वाय्. एम्. सी. ए. चें मोठें वसतिगृह आहे. पण तें फक्त महिनाभर राहणाऱ्यांनाच प्रथम स्थान मिळण्यापुरतें आहे. इंडियन वाय्. एम्. सी. ए. चें एक वसतिगृहहि येथें असून तेथें फक्त पुरुष विद्यार्थ्यांची सोय आहे. या वसतिगृहाची दोन इमारतींत विभागणी झाली असून एका ठिकाणीं जेवणखाण, स्नान इत्यादि सोय आहे व दुसऱ्या इमारतींत फक्त विद्यार्थ्यांची राहण्याचीच तेवढी सोय आहे येथें फक्त विद्यार्थ्यांनाच प्रामुख्यानें प्रवेश असल्यानें येथील वातावरण संपूर्णतः भारतीय आहे. जेवण शाकाहारी व मांसाहारी उभय प्रकारचें मिळूं शकतें. येथील खोल्या बऱ्याचशा दोघांकरितां, तिघांकरितां आहेत व कांहीं थोड्या उच्च अभ्यास करणाऱ्यांना परीक्षेच्या वेळेपुरत्या मिळणाऱ्या अशा एकट्याकरितां स्वतंत्र अशा आहेत. येथें राहणाऱ्यांना सुमारें ३०० ते ३५० रुपये दरमहा खर्च येतो. येथील विद्यार्थी हे वेगवेगळ्या विषयांच्या अभ्यासासाठीं आलेले असल्यानें बहुधा सर्व प्रकारचे विषय आढळतात. तसेंच वेगवेगळ्या प्रांतांतील विद्यार्थी एकत्र आल्यानें भारताच्या सर्व प्रांतांचे Representation येथें बहुधा झालेलें आढळतें.

मी इतरत्र वसतिगृहांतून पाहिलेल्या वसतिगृहांपेक्षां या वसतिगृहांत वेगळेपणा असला तर तो त्याच्या भारतीय स्वरूपाचा आहे. येथें आरडाओरड, मोठ्यानें बोलणें इत्यादि इतकें चाललेलें असतें व येथील स्वयंपाकाचा वास इतका दूरवर पसरलेला असतो कीं, वसतिगृहाबद्दल एक असा प्रवाद सांगितला जातो कीं, ‘ रसेल स्केअरच्या कोपऱ्यावरील पोलिसाला तुम्ही जर या वसतिगृहाचा पत्ता विचारलांत तर तो म्हणेल, Gentleman stand at his corner here and you will soon hear them ( the

students ) and smell hem. (वसतिगृह ह्या कोपऱ्यापासून सुमारें फर्लांगभर दूर आहे ) असो. याच वसतिगृहांत मी सध्यां वास्तव्य करीत असल्यानें येथील जीवनाचें साग्रसंगीत वर्णन करणें मला शक्य आहे, पण तें केल्यानें कांहींहि लाभ घडण्याची शक्यता नसल्यानें मी ते करण्याचा प्रयत्न करणार नाहीं, कळावें.

आपला,
×××

० ० ०

## केंब्रिज विद्यापीठ

लंडन

स. न. वि. वि.

अनेक वर्षें मनांत जतन करून ठेवलेल्या इच्छा जेव्हां प्रत्यक्षांत पूर्ण होतात तेव्हां त्याचा आनंद किती मोठा असतो ह्याचा प्रत्यय मला परवां शनिवारीं आला. मी मॅट्रिकमध्यें असतांना विलायतेंत केंब्रिज नांवाचें एक मोठें विद्यापीठ असल्याचें प्रथमच ऐकलें होतें. त्या वेळीं गणित विषय हा माझा आवडता विषय असल्यानें आपण पुढें केव्हां तरी रँग्लर होण्यासाठीं केंब्रिजला जावें अशी इच्छा मनांत उगाचच जागृत झाली होती. त्यानंतर जेव्हां जगाचें सर्वसामान्य स्वरूप समजलें व अर्थकारणासंबंधीं थोडेंफार ज्ञान प्राप्त झालें तेव्हां केंब्रिजला शिकायला जाण्याची इच्छा असंभाव्य व अशक्य म्हणून मागें पडली. पण जन्माला आल्यासारखें एकदां केंब्रिज पहावें अशी इच्छा मनांत मात्र कायम राहिली होती आणि परवां शनिवारीं सकाळीं जेव्हां मी प्रत्यक्ष केंब्रिजला पोहोंचलों तेव्हां अनेक वर्षांपासूनची अतृप्त इच्छा पूर्ण झाल्याचा आनंद मी यथेच्छ अनुभविला. सुमारें १२ च्या सुमारास मी कोचनें केंब्रिजकडे प्रवास करीत असल्यानें केंब्रिजच्या अलिकडे सुमारें मैलापासून तिकडून सायकलवरून येणारे गाउन्स घातलेले अनेक

२५३६४ वि. १८६७ नों: दि:

विद्यार्थी-मुलें व मुली—मला दिसल्यांच त्या जगप्रसिद्ध विद्यापीठासंबंधीं माझ्या मनांत असलेली उत्सुकता आणखी जास्तच वाढली.

केंब्रिज विद्यापीठांत प्रवेश मिळविणें हें एक मोठें दिव्यच आहे. उच्च दर्जाची बुद्धिमत्ता असल्याविना येथें प्रवेशाची अपेक्षा धरणें हेंहि अगदींच व्यर्थ आहे. तसेंच येथील राहणीचा खर्चहि फारच मोठा आहे. त्यामुळें फक्त शिष्यवृत्ति मिळविणाऱ्यांनींच येथें राहण्याचें ठरविलें तर शक्य आहे. स्वतःच्या खर्चानें येथें शिकणाऱ्यांना प्रचंड पैशाचें पाठबळ असल्याशिवाय येथील शिक्षण घेणें फारच कठीण आहे. आणि ह्याचें महत्त्वाचें कारण असें कीं केंब्रिज विद्यापीठ हे फक्त शिकविण्याचें स्थान नसून राहण्याचेंहि स्थान आहे. ‘ रेसिडेन्शियल युनिव्हर्सिटी ’ म्हणून जे तंत्र आहे त्याचा संपूर्ण आविष्कार येथें पहावयास मिळतो. केंब्रिज गांव हें फक्त युनिव्हर्सिटीसाठींच आहे. येथील सर्व कारभार युनिव्हर्सिटी पाहते. वहानांचे परवाने, दुकानांचे परवाने, कोर्ट इ. सर्वच गोष्टीवर युनिव्हर्सिटीची मालकी आहे. गांवांतील प्रत्येक गोष्ट ही युनिव्हर्सिटीकरितांच निर्माण झालेली आहे. सर्व लोक युनिव्हर्सिटीकरितांच येथें वास्तव्य करतात. थोडक्यांत युनिव्हर्सिटी म्हणजेच गांव व केंब्रिज गांव म्हणजेच युनिव्हर्सिटी.

केंब्रिज हें अत्यंत छोटे व टुमदार गांव आहे. सर्व गांवाला प्रदक्षिणा घालायला चार तासमुद्धां लागावयाचे नाहींत इतकें तें छोटें आहे. मध्यभागीं बाजाराची जागा म्हणजे मार्केट प्लेस आहे व तेथें शनिवारीं बाजार भरतो. अगदीं आपल्या नसरापूरच्या बाजारासारखा. फळांपासून तों कपड्यांपर्यंत सर्व प्रकारचा माल तेथें विक्रीस असतो. फळें, फुलें, भाजीपाला, अंडीं, मांस, कापड, धान्य, जुन्या वस्तु वगैरे सर्व तेथें मिळतें. हा बाजार पाहिला कीं येथील सर्व जुन्या गोष्टींच्या आवडीची मोठी मजा वाटते. येथें फक्त आपल्या बाजारांत सांपडणारी एक गोष्ट नाहीं. आणि ती म्हणजे किंमतीबद्दल घासातीस ! १४ आणे वाराच्या कापडाला ६ आणे वाराची मागणी घालून शेवटीं १० आणे वारावर सौदा तोडण्याचें वैभव येथें नाहीं !

केंब्रिजमध्यें दोनच म्हणण्याजोगे मोठे रस्ते जाहेत. व त्या रस्त्यांवर सर्व प्रसिद्ध कॉलेजें आहेत. आपल्याकडे कॉलेज म्हणजे शिकण्याचें स्थान तर येथें

कॉलेज ह्याचा अर्थ वसतिगृह अर्थात् प्रत्येक कॉलेजला मोठी थोरली परंपरा आहे. आमच्या कॉलेजांत टेनिसन् होता, न्यूटननें येथें वास्तव्य केलें होतें, इ. कथा येथील कॉलेजांत ऐकावयास मिळतात. शिक्षण देणारी संस्था ही विद्यापीठ आणि विद्यार्थ्यांच्या राहण्या-जेवण्याची व्यवस्था व अभ्यासावर देखरेख करणारी संस्था तें कॉलेज—अशी वर्गवारी येथें झालेली आहे. येथें कॉलेजांत जावयाचें असेल तेव्हां, लेक्चरला जावयाचें असेल तेव्हां, लायब्ररींत जावयाचें असेल तेव्हां, संध्याकाळीं सूर्यास्त झाल्यानंतर बाहेर पडावयाचें असेल तेव्हां हॉटेलमध्यें जेवायला जायचें असेल तेव्हां किंबहुना सर्वत्र सर्व वेळीं झगा म्हणजे गाऊन घालणें अत्यावश्यक आहे. गाऊनशिवाय हिंडतांना विद्यार्थी दिसला कीं, झालाच दंड ! रात्रीं दहापूर्वीं प्रत्येकानें कॉलेजांत झोंपायला आलेंच पाहिजे. दोन-तीन वेळेला नियम-भंग झाला कीं केंब्रिजमधून हकालपट्टी झालीच म्हणून समजावें ! आठवड्यांतून नियमित वेळेला, सकाळा न्याहारीला, दुपारीं फराळाला व रात्रीं जेवावयास न आल्यास दंड आहेच. शिस्तीचे नियम चांगलेच कडक आहेत व ते व्यवस्थितपणें पाळले जाण्याकडे सर्व अधिकारी आस्थेनें लक्ष पुरवितात. हें फार महत्त्वाचें आहे. टर्म पूर्ण भरणें त्याचा अर्थ ठराविक दिवस फक्त व्याख्यानांना जाणें इतका मर्यादित नसून ठराविक नियमाप्रमाणें सर्वत्र सर्व वेळीं वर्तन करणें, ठराविक रात्रीं केंब्रिजमध्यें झोंपणें व ठराविक दिवस तेथें वास्तव्य करणें असा आहे.

केंब्रिजमध्यें नौकरी करून शिकणें ह्या वस्तूला स्थान नसल्यानें विद्यार्थ्यांना अभ्यास हा फक्त एकच व्यवसाय येथें आहे. अर्थात्च ह्यामुळें अभ्यासाकडेच सारेंच्या सारें लक्ष द्यावें लागणें हें स्वाभाविक आहे. करमणुकींनाहि येथें फारसें स्थान नसल्यानें टर्मच्या शेवटीं एखादा नाचाचा कार्यक्रम, एकादुसरी मेजवानी, विद्यार्थ्यांनीं बसविलेलें एखादें नाटक, आणि गांवांतील सिनेमा एवढ्यावरच विद्यार्थ्यांना 'भागवावें' लागतें. अभ्यासासाठीं सुपरवायझर पद्धत असल्यानें वैयक्तिक अभ्यासासच येथें महत्त्वाचें स्थान आहे आठवड्यांतून एक निबंध हा लिहून द्यावाच लागत असल्यानें कुचराई करण्यास अवकाशच नाहीं. प्रत्येकास स्वतःच्या गतीनें जाणें शक्य असल्यानें आपला अभ्यासक्रम झरझर संपविणें व जास्तींत जास्त सुपरवायझरकडून पदरांत पाडून घेणें हें येथें सहजसाध्य आहे. थोडक्यांत म्हणजे रेसिडेन्शिअल

युनिव्हर्सिटीचें सर्व महत्त्वाचे फायदे येथें उपस्थित असल्यानें अभ्यास म्हणजे केंब्रिज हें समीकरण सार्थ आहे असें येथें आलें म्हणजे वाटतें.

सेंट जोन, ट्रिनिटी, क्लेअर, किंग्ज इ. कॉलेजांच्या मागच्या अंगास सुंदर हिरवळीचा गालीचा पसरलेला असून त्यांतून केम नदी वळणावळणानें वाहते. नदीवर छोटे छोटे पूल असून हा सर्व भाग—ह्याला बॅक्स् असें म्हणतात. टेनिस कोर्ट इ. मुळें फारच नयनरम्य झालेला आहे. ह्या नदींत छोट्या वल्हविण्याच्या नावांची व पण्टस्‌ची रहदारी संध्याकाळीं चालू ठेवण्याचें कार्य विद्यार्थी करतात, हें सांगावयाला नकोच. आपल्या मैत्रिणीला घेऊन पण्टिंगला जाणें हें येथें एक महत्त्वाचें करमणुकीचें साधन समजलें जातें. मी गेलों तेव्हां उन्हाळा असल्यानें व हवामान फारच उत्तम असल्यानें हा कार्यक्रम फारच जोरांत होता. माझें येथील सायकॉलॉजिकल लॅबोरेटरींतील काम थोड्याच अवकाशांत संपणारें होतें. त्यामुळें तें संपवून मी येथें माझ्या एका जुन्या विद्यार्थ्याबरोबर खूप हिंडलों. माझा विद्यार्थी द. रा. पेंडसे हा येथील सीडनी कॉलेजांत असून त्यानें माझी व्यवस्था खास त्याच्या कॉलेजच्या गेस्ट हाऊसमध्यें अप्रतिम केली होती. त्यानें मला सर्व कॉलेज वगैरे दाखवून भरपूर माहितीहि सांगितली. रविवारीं दुपारीं येथील पांच महाराष्ट्रीय विद्यार्थी व आम्ही एकत्र जेवलों. द. रा. पेंडसे हा नू. म. वि. चा माजी विद्यार्थी आहे व येथें अर्थशास्त्राचें उच्च अध्ययन करीत आहे. अभ्यासाच्याबरोबरच येथें सामाजिक जीवनाचें आवश्यक धडे जे शिकावेच लागतात ते त्यानें झटकन् आत्मसात् केल्यानें आपल्याकडे Polished म्हणून म्हणतात त्या सर्व गोष्टी त्याच्याहि आचरणांत आढळून आल्यानें मला फारच आनंद झाला. शिस्त सांभाळण्यासाठीं नेमलेल्या प्रॉक्टर व बुलडॉग्ज्—म्हणजे त्याचे दोन साहाय्यक गडी ह्याचें दर्शनहि त्यानें मला घडवावयास कमी केलें नाहीं.

मॅट्रिकची परीक्षा कशीबशी उत्तीर्ण झाल्यावर एखाद्या विद्यापीठाच्या कक्षेंतील कुठल्या तरी सामान्य महाविद्यालयांत नांव दाखल करून घेऊन चार वर्षें अध्यापकांनीं लिहून दिलेल्या टिप्पणी व बाजारांत सवंग मिळणारीं गाईडस् पाठ केलेलें हें साहित्य उत्तम प्रकारें वापरून दाखवून पदवी पदरांत पाडून घेणारे आपल्याकडील विद्यापीठाचे विद्यार्थी पाहतां केंब्रिज-

मध्यें येऊन शिकणाऱ्या आणि पदवी घेऊन बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पासंगलाहि लागणार नाहींत असें अनेकवार वाटलें. कळावें.

आपला,
XXX

ө ө ө

## इंग्लंडमधील परीक्षा-पद्धति

लंडन

स. न. वि. वि.

इंग्लंडमधील खऱ्या उन्हाळ्याला आतां सुरुवात झाली आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. गेले ५–६ दिवस ओळीनें दररोज स्वच्छ ऊन पडत असून उष्णतामानहि बरेंच वाढलें आहे. ६० ते ६५ अंश कमाल व ४६ ते ६० अंश किमान असें सध्यांचें उष्णतामान असल्यानें आम्हांला सुद्धां येथें थोडा उकाडा झाल्यासारखें वाटूं लागलें आहे. दिवस सकाळीं ४ ला उगवतो व रात्रीं १० वाजेपावेतों उन्हें असतात. येथील सध्यांची लायटिंग टाईम ११-१५ आहे. यावरून येथील सध्यांच्या दिनमानाची कल्पना येईल. जुलैच्या दुसऱ्या आठवड्यापावेतों दिवस असाच मोठा राहणार असून नंतर तो लहान लहान होत जाऊन रात्र मोठी होत जाईल. डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यांत सर्वांत लहान दिवस व सर्वांत मोठी रात्र होईल. हें सारें मागें भूगोलांत वाचल्याचें स्मरतें, पण प्रत्यक्ष पाहावयास मिळाल्याचा आनंद कांहीं वेगळाच आहे. म्हणायला रात्रीचे ९॥ वाजले आहेत, पण ट्रॅफल्गार स्क्वेअरमध्यें पारवे दाणे टिपतच आहेत व चांगल्या उन्हांत लोक हातावर दाणे टिपणारे पारवे धरून फोटो काढून घेत आहेत याची गंमत वाटल्यावांचून राहात नाहीं.

ह्याचा भरपूर फायदा संध्याकाळीं बागांत हिंडायला जाऊन, प्रदर्शनें इत्यादि पाहायला जाऊन व रस्त्यावरील शो केसेसमधील मालाच्या आकर्षक

जाहिराती पाहत हिंडून येथील व परस्थ लोक घेत आहेत. परदेशस्थ मंडळींचा खूप भरणा सध्यां येथें झालेला असून सकाळपासून संध्याकाळपर्यंत पाहुण्यांच्या "कोच सर्व्हिसेस" सारख्या हिंडतांना आढळत आहेत. आपल्याकडील हिन्दी पाहुणेहि खूप आलेले आढळतात. त्यांत महाराष्ट्रीय फारसे दिसत नाहींत, असें मात्र म्हणावें लागतें. मुंबईच्या झारापकर टेलरिंग कॉलेजचे चालक श्री. काशीनाथपंत झारापकर सध्यां येथें आलेले असून शिवणकामाच्या शिक्षणक्रमाचा व येथील शिंपीकामाचा सर्वमान्य अभ्यास करण्याचा त्यांचा प्रयत्न चालू आहे. अजून प्रत्यक्ष फॅक्टरी अशी त्यांना पहावयाला मिळालेली नाहीं, पण बर्टन, हॉर्न, फिफ्टी शिलिंग इ. मोठाल्या शिवणकामाच्या फर्म्स इत्यादि ते पाहून आले आहेत. त्यांच्याकडून कांहीं माहिती उपलब्ध झाल्यास अवश्य प्रयत्न करणार आहें.

आतां येथील परीक्षांचा मोसम सुरू झाला आहे. डिग्री परीक्षा व इतर माध्यमिक परीक्षा सुरू झाल्या आहेत व थोडया वरच्या दर्जाच्या पदव्युत्तर पोस्ट-ग्रॅज्युएट परीक्षा पुढच्या आठवडयांत सुरू होतील; मला सामान्यतः ज्या परीक्षेस बसावें लागलें असतें, पण जी मी उत्तीर्ण झालों असें आतां समजलें गेलें आहे त्या 'ॲकेडेमिक डिप्लोमा इन् ग्रॅज्युएशन' परीक्षेचा थाट मी मुद्दाम पाहण्यास गेलों होतों. म्हणून त्या परीक्षेसंबंधीं व त्यानुसार येथील सर्वसामान्य परीक्षा पद्धतीसंबंधींचा आज थोडें लिहीत आहें. ह्या परीक्षेस ७५ विद्यार्थी होते व त्यांची परीक्षेस बसण्याची व्यवस्था ग्रंथालयाशेजारच्या "सायकॉलॉजी हॉलमध्यें केली होती. विद्यार्थ्यांना क्रमांक वगैरे होते, पण उत्तरपत्रिकांवर क्रमांकासह नांवहि लिहावयाचें असल्यानें क्रमांकास फारसें महत्त्व नव्हतें. प्रत्येक विद्यार्थ्यास स्वतंत्र डेस्क होतें व फूटपट्टी व निळी-तांबडी शाई प्रत्येकास पुरविली होती. रोज दोन प्रश्नपत्रिका, १० ते १ व २ ते ५ अशा होत्या. प्रश्नपत्रिकेस सुरुवात होण्याच्या आधीं दहा मिनिटेंच फक्त हॉल उघडला जाई. त्या वेळेस प्रत्येक डेस्कवर उत्तरपत्रिका, लिहिण्यासाठीं भरपूर कागदांचा एक गठ्ठा, ग्राफ पेपर्स व प्रश्नपत्रिका ही ठेवलेलीच असे. विद्यार्थ्यांना पहिलीं दहा मिनिटें प्रश्नपत्रिका वाचायला व तीन संपूर्ण तास लिहायला दिलेले असत. मध्यंतरीं किंवा शेवटीं केव्हांच घंटा वाजत नसे. फक्त वेळ

संपली कीं पर्यवेक्षक कागद बांधण्याची सूचना देत. कागद बांधून व उत्तरपत्रिका आपल्या जागेवरच ठेवून विद्यार्थ्यांनीं बाहेर जावयाचें असा संकेत असे. विद्यार्थी बाहेर गेले कीं, मागोमागच पर्यवेक्षक जाई व मागाहून गडी येऊन सर्व उत्तरपत्रिका गोळा करून नेत असे व नव्या प्रश्नपत्रिका ठेवून हॉल बंद करून जात असे. हॉलमध्यें शिरल्यावर अजिबात बोलायचें नाहीं असा निर्बंध असे, पण धूम्रपानासाठीं किंवा इतर आवश्यक कारणांसाठीं बाहेर अनिर्बंध जातां येत असे. एक पर्यवेक्षक फक्त हॉलच्या एका भागांत वाचत बसलेला असे.

प्रश्नपत्रिका मला चांगल्याच अवघड वाटल्या. पण त्यांत विकल्प भरपूर असे. तीन तासांत तीनच प्रश्न लिहिले तरी चालतील अशी सूचना असे व चारपेक्षां जास्त लिहितां कामा नयेत असा निर्बंध असे. सामान्यतः दहा ते बारा प्रश्न दिलेले असल्यानें त्यांतील चार निवडणें फारसें कष्टाचें नसे, मात्र प्रश्न संपूर्णत्वानें व साकल्यानें लिहिला जावा असा कटाक्ष असे. सर्व प्रश्न लिहून झाल्यावर ते अनुक्रमानें बांधून द्यावेत अशी सूचना असे. उत्तरपत्रिका बांधण्यासाठीं प्रत्येक रांगेंत एक स्टिचिंग मशीन असे.

ह्या परीक्षेंतील आंकडेशास्त्राच्या स्टॅटिस्टिक्स्-भागास १९ च विद्यार्थी होते. प्रत्येकास स्लाइड रूल पुरविलेला होता व दोन लहान "मनरो" कॅलक्युलेटिंग मशीन्स हॉलमध्यें आणून ठेवलीं होतीं. स्टॅटिस्टिक्सची प्रश्नपत्रिका चांगलीच दमदार होती. परीक्षा आटोपून बाहेर आल्यावर झालेल्या प्रश्नपत्रिकेंतील उत्तरांबद्दल चर्चा करणें ही मानवी धर्माची बाब सोडली, तर प्रश्न फार अवघड होते, प्रश्न कांहींच्या कांहींच विचारले आहेत, परीक्षक बेअक्कल आहे, इत्यादि प्रकार येथें आढळला नाहीं.

मी मुद्दाम ह्या गोष्टीवर बारीक नजर ठेवून होतों. एकदां तर मी माझ्या बोलण्यांत थोडी गर्भित टीका ह्या अर्थाची करून तिचा काय परिणाम होतो. हें मुद्दाम पाहिलें तेव्हां—Those qustions are not really silly or difficult you see. The examiner has to think of both ends of the curve.

परीक्षकाला अतिबुद्धिमान् व सामान्य टोकाच्या विद्यार्थ्यांचा विचार

करावा लागतो, असें मला उत्तर मिळालें. " इतका अवघड प्रश्न सोडविणारा कोणी विद्यार्थी येथें असेल असें मला वाटत नाहीं. " असें मी म्हणालों तेव्हां, " You never know, there are high potentialities. एवढेंच उत्तर त्यानें दिलें.

परीक्षेच्या निर्णयासाठीं येथें तीन गोष्टी ध्यानांत घेतल्या जातात असें आतां समजलें आहे. वर्षभर ज्या ज्या पर्यवेक्षकाच्या अध्यक्षतेखालीं विद्यार्थ्यानें अध्ययन केलें त्यानें वर्षभरांत विद्यार्थ्यानें केलेल्या कामाचें मूल्य-मापन हा पहिला भाग. प्रत्यक्ष उत्तरपत्रिकांत मिळालेल्या गुणांप्रमाणें झालेलें मूल्यमापन हा दुसरा व प्रत्येक विद्यार्थ्यास तोंडी परीक्षेंत मिळालेल्या गुणांचे मूल्यमापन हा तिसरा. तीनही विभागांतील मूल्यमापनाचें एकत्रीकरण करून विद्यार्थ्यांची श्रेणी ठरविण्यांत येते. प्रत्येक प्रश्नास स्वतंत्र गुण देण्यांत येत नसून एकूण उत्तरपत्रिकेस आल्फा, बीटा, यानुसार गुण देण्यांत येतात असें मला सांगण्यांत आलें आहे, पण प्रत्यक्ष निर्णय लागेपर्यंत मला त्याची खात्री पटलेली नाहीं. ॲकेडेमिक डिप्लोमाच्या लेखी परीक्षा आटोपल्या असून तूर्त तोंडी परीक्षा सुरू आहेत. पांच प्राध्यापक रोज तीन मुलें याप्रमाणें एक आठवड्यांत तोंडी परीक्षा संपवतात. तरी प्रत्येक विद्यार्थ्यास सुमारें तास दीड तास प्राध्यापकांच्या प्रश्नास तोंड द्यावें लागतें. सकाळीं पहिल्या गेलेल्या विद्यार्थ्यास कॉफी, दुसऱ्यास फराळ, तिसऱ्यास चहा इत्यादि प्राध्यापकासमवेत मिळतें हा भाग निराळा !

युनिव्हर्सिटीच्या सेनेट हौसमध्यें मोठ्या परीक्षाहि सध्यां सुरू आहेत. इन्स्टिट्यूटच्या इतर परीक्षा लवकरच सुरू होतील. एक गोष्ट आज मुद्दाम लिहावीशी वाटते. ती म्हणजे येथें परीक्षेचा अभ्यास सर्व वर्षभर करावा लागत असल्यानें अगदीं शेवटच्या दिवसापर्यंत सर्व इतर कारभार अव्याहत चालू राहतात. अजून यूथ हॉस्टेलचें संमेलन, ड्रामा सोसायटीचें प्रदर्शन, स्पोर्टस कमिटीचा स्पेशल डान्स सर्व चालूं आहे. ठराविक वेळेस अभ्यास व ठराविक वेळेस मनोरंजन हें तंत्र रक्तांत शिरल्याचें हें निदर्शन आहे. येथें आलेले आमचे विद्यार्थी मात्र सुकलेले चिन्ताक्रान्त चेहरे करून ग्रंथा-लयांतून घरीं जातांना फक्त ह्या लोकांच्या ह्या क्रीडोत्सवाकडे भीत भीत नजर

टाकून घरीं पळतात. याचा अर्थ एवढाच कीं आमच्या विद्यार्थ्यांनीं पुस्तकें फक्त पाहिलीं, पण अभ्यास कसा करायचा हें मात्र येथून शिकून घेतलें नाहीं. कळावें.

आपला,
×××

० ० ०

## सर रोलंड हिल स्कूल

लंडन

स. न. वि. वि.

येथील वृत्तपत्रांतून गेले कांहीं महिने येथल्या शिक्षण-पद्धतींतील ११ व्या वर्षी होणाऱ्या बौद्धिक गट-कसोट्यांबद्दल बरीच उलट-सुलट चर्चा झालेली होती. माझा प्रबंध तयार झाल्यावर प्रा. व्हर्नन ह्यांनीं दोन लेख टाइम्सच्या एज्युकेशनल सप्लिमेंटमध्यें लिहून त्यांत माझ्या प्रयोगांचें फलित आंकड्यांसह दिलें होतें. त्यानंतर त्यावर खूपसा पत्रव्यवहार झाला व ह्या सर्व लेखांची एक पुस्तिकाहि प्रसिद्ध झाली. परिणामतः येथील दोन परगण्यांनीं त्यांची ग्रामर स्कूल प्रवेशाची परीक्षाच बदलली, व मग खरी धुमश्चक्री माजली. प्रबंध लिहितांना मला आपण एवढ्या मोठ्या चर्चेस कारणभूत होऊं अशी कल्पनाहि नव्हती. असो. ह्या प्रसिद्धीमुळें सध्यां मला वेगवेगळ्या शाळा, कॉलेजें व ट्रेनिंग कॉलेजें येथें व्याख्यानांसाठीं निमंत्रणें येत आहेत. माझ्या विषयावर अध्यापकांसाठीं एक व “ भारतांतील सामान्य परिस्थिति ” या विषयावर विद्यार्थ्यांसाठीं एक, अशीं दोन व्याख्यानें प्रत्येक संस्थेंत होतात. मलाहि अनायासें विनामूल्य प्रवास, जेवण, करमणूक व प्रसिद्धि मिळत असल्यानें आठवड्यांतून चार दिवस मी या भेटींसाठीं नियोजिले आहेत. ह्याप्रमाणें पाहात असलेल्या शिक्षण-संस्थांपैकीं प्रत्येक जातीची एक एक

प्रातिनिधिक संस्था—शाळा—तुमच्या माहितीसाठीं थोडक्यांत वर्णन करण्याचें ठरवीत आहें.

येथील शिक्षण-पद्धतींत मुलांचीं 'सेकंडरी मॉडर्न स्कूल्स्' आहेत. ग्रामर स्कूल्स् आहेत. टेक्निकल स्कूल्स् आहेत. सिलेक्ट सेंट्रल स्कूल्स् आहेत. कॉम्प्रिहेन्सिव्ह स्कूल्स् आहेत. पब्लिक स्कूल्स् आहेत. याशिवाय सहशिक्षणाच्या शाळा आहेत. कमी बुद्धीच्या मुलांकरितां स्पेशल स्कूल्स् आहेत. आज मी मुलांच्या सेकंडरी मॉडर्न शाळेपैकीं एका शाळेची तुम्हांला ओळख करून देणार आहें.

गेल्या शतकांत इंग्लंडमध्यें पेनी पोस्ट सुरू करणारा सुप्रसिद्ध पोस्ट मास्टर जनरल सर रोलंड हिल हा शिक्षणशास्त्रांतहि तज्ज्ञ होता. हें ऐकून तुम्हांला आश्चर्य वाटेल. ह्या हिल महोदयांनीं टॉटनहॅम विभागांत ब्रुस कॅसल नांवाच्या एका इमारतींत एक नवीन टूम म्हणून धंदेशिक्षणाचा अंतर्भाव केलेली शाळा सुरू केली. सध्यांचें सेकंडरी मॉडर्न हें ह्या उपक्रमाचें सद्यः स्वरूप होय असें म्हणतां येईल. त्याच्या नांवाचें स्मारक म्हणून टॉटनहॅम येथें 'सर रोलंड हिल स्कूल' स्थापन झालेलें आहे. मिडल सेक्स परगणा हा शिक्षणाच्या बाबतींत फार बराच फुढारलेला आहे व येथें चार ग्रामर स्कूल्स् आहेत. शिवाय दोन सेंट्रल स्कूल्स्हि आहेत. त्यामुळें ११ व्या वर्षाची चांचणी झाली कीं पहिली २० मुलें ग्रामर स्कूलमध्यें व पुढचीं १० टक्के मुलें सेंट्रल स्कूलमध्यें जातात. उरलेला ६० टक्के गाळ हा या शाळेंत येतो. ह्या शाळेंत ५०० मुलें आहेत व त्यांचे वयाप्रमाणें चार गट असून प्रत्येक गटाच्या चार तुकड्या आहेत. शाळेंत येतांच मुलांना एका चांचणी-परीक्षेस बसवितात. त्यांत गणित, निबंध, सामान्य ज्ञान व बुद्धि कसोटी अशा गोष्टी असतात. क्रमवार विभागणी करून सर्वांत कच्च्या वीस मुलांचा स्वतंत्र वर्ग करतात व इतर ८० मुलें (सुमारें) तीन वर्गांत वांटतात. ह्या कच्च्या मुलांच्या वर्गाला अभ्यासक्रम निराळा असतो व विषयांचेंहि बंधन नसतें. Fundamentals ह्या एका शब्दानें त्यांचें संपूर्ण वेळापत्रक भरलेलें असतें. त्यांना त्यांच्या लहरीनुसार त्यांना आवडेल तें खुबीनें शिकवितां शिकवितां थोडें थोडें गणित, इंग्रजी गळ्यांत उतरविण्यांत येतें. पण बहुधा जास्त भर

हा बागकाम, लाकूडकाम, मधमाशा पाळणें इत्यादि शिकवण्याकडे असतो. चित्रकला, रंगकाम, संगीत, अभिनय ह्याहि गोष्टी शिकविल्या जातात.

शाळेंत २२ शिक्षक आहेत व त्यांपैकीं विशिष्ट विषय-शिक्षक बरेच आहेत. बागकाम, चित्रकला, छापकाम, सुतारकाम, लोहारकाम ह्या विषयांचे शिक्षक अर्थातच स्वतंत्र असावे लागतात. शिक्षकांना मोकळा वेळ भरपूर असतो आणि शिकवण्याव्यतिरिक्त वह्या व परीक्षेचे पेपर्स तपासणें सोडल्यास जादा काम नसतेंच. शाळेंत संमेलनें, नाटकें इत्यादि होतात. त्याची सर्वच जबाबदारी मुलांवर असते. शिक्षकांची मदत असतें, पण ती नाममात्रच! त्यामुळें शिक्षकांना स्वतःच्या आवडीचे उद्योग करणें व वाचन इत्यादि करणें शक्य होतें.

ह्या रोलंड हिल शाळेंत शिकवल्या जाणाऱ्या विषयांत इंग्रजी, गणित, शास्त्र, इतिहास, भूगोल, जर्मन किंवा फ्रेंच हे विषय आणि शारीरिक शिक्षण, संगीत, छपाई, पुस्तक-बांधणी, सुतारकाम, लोहारकाम, अभिनय, चित्रकला. कुंभारकाम, ह्या कलांचा अंतर्भाव होतो. बागाईत व मधमाशा पाळणें हेंहि शिकवण्याची सोय आहे. शाळेची इमारत एक मजलीच आहे. पण खूप लांब व मोठी आहे. शाळेच्या सभोंवार संपूर्ण बाग केलेली आहे व बाग-काम हा महत्त्वाचा भाग असल्याचें सर्व सोई तेथें करण्यांत आल्या आहेत. एक कांचेचें घरहि (‘ हॉट हाऊस ’) केलेलें असून त्यांत फुलझाडें व नवीन रोपटीं ठेवलेलीं आहेत. असेंब्ली हॉल व स्टेज चांगलेंच मोठें आहे. तसेंच व्यायाम-शाळा व जेवणघर हेहि दिवाणखाने मोठे आहेत. प्रत्येक वर्गांत रेडिओ बसवलेले आहेत. आणि मोठ्या आकाराचे फिरते फळे आहेत. सुतारकाम, लोहारकाम व कुंभारकाम ह्यांचें वर्गांत अगदीं अद्यावत् साहित्य आणलेलें आहे. शाळेची छोटी फोटोग्राफिक डॉर्करूमहि आहे व तेथें चांगल्या प्रकारचें काम होतें असें मला दिसलें.

वेळापत्रकाची येथील पद्धत जरा विचित्र आहे म्हणून ती लिहितों. एकूण विषयांच्या महत्त्वानुसार त्यांची १३ विभागांत वांटणी केली आहे. ह्या विभागांना सेशन्स असें म्हणतात. सोमवार ते गुरुवार रोज २ सेशन्स होतात. सकाळीं ८-५५ तें १०-५, पंधरा मिनिटें सुटी व १२ वाजेपावेतों

पहिलें सेशन व मग १-३० ते २-५०, दहा मिनिटें सुटी व ४ वाजेपावेतों दुसरें सेशन. शुक्रवारीं पहिल्या सेशनला साप्ताहिक परीक्षा—ही इंग्रजी व गणित ह्या विषयांची आलटूनपालटून होते. व दुसऱ्या सेशनला संपूर्ण ॲसेंब्ली, असा कार्यक्रम असतो. पुढच्या आठवड्याला नव्या सेशनपासून सुरुवात होते. ह्यानुसार दर सोमवारीं पहिला तास गणित किंवा इंग्रजी असें होत नाहीं. तेरा सेशन्स संपलीं कीं मग पहिल्या सेशनला पुन्हां सुरुवात.

शाळेचा गणवेश निळा कोट, निळी टोपी, तीन रंगी टाय असा आहे. ध्येयचिह्न 'समुद्रांतील तलवार व किल्ला' असें आहे. आणि ध्येयवाक्य "Blade straight and steel true" असें आहे. शाळेंत १५ व्या वर्षापर्यंत सक्तीचें मोफत शिक्षण घेतल्यानंतर विद्यार्थी शाळेंत शिकलेल्या धंद्यांत उमेदवार म्हणून एखाद्या कारखान्यांत लागतात. थोडीशीं वरच्या दर्जाचीं मुलें मॅट्रिकला—येथें जनरल सर्टिफिकेट ऑफ एज्युकेशन म्हणतात—बसतात. मॅट्रिक पास झालें कीं, युनिव्हर्सिटींत जायला द्वार खुलें झालें असें समजूं नये. कारण, ह्या मॅट्रिकच्या परीक्षेंत पुनः विभाग आहेत. पण त्याचें विवरण येथें कर्तव्य नाहीं. एकंदरीनें पाहतां या शाळेचें यश मोठें आहे असें म्हणतां येईल.

॥ ६ ॥

# ऑलिंपिक स्पर्धा १९५२

## ब्रिटनची तयारी

लंडन

स. न. वि. वि.

पुढच्या महिन्याच्या १९ तारखेला हेलसिंकी येथें जेव्हां ऑलिंपिक स्पर्धांचा उद्घाटन-समारंभ होईल तेव्हां युनियन जॅकचे मागून चालणाऱ्या खेळाडूंचा संघ हा जगाला हादरा देणारा व्हावा अशी योजना A. A. A. नें करण्याचें मनांत आणलेलें आहे. त्या संघाकरितां ४९ पुरुष व ३३ स्त्रियांची निवड कालच जाहीर झाली. आतांपावेतों ऑलिंपिक्ससाठीं गेलेल्या सर्व संघांपेक्षां हा संघ बलाढ्य आहे असें येथील तज्ज्ञांचें मत आहे.

१५०० मीटर्स दौडीसाठीं जागतिक विक्रम घडवणारा रॉजर बॅनिस्टर आलेला आहे व बिल नॅन्केव्हिल हाहि त्याच्याच तोडीचा आहे. ३००० मीटर्स स्टीपल चेसचेंहि तसेंच आहे. आतांपावेतों ह्यांत जागतिक उच्चांक गांठणाऱ्या युगोस्लाव्हियांतील पीटर सेगेदिनला परवांच्या आंतरराष्ट्रीय स्पर्धांत नॉन् डिस्लेनें मागें टाकलें आहे. आतांपावेतों ५००० व १०,००० मीटर्सच्या लांब अंतराच्या दौडींत झेकोस्लोव्हेकियांतील झाटोपेक ह्यानें जगाला चमत्कार करून दाखवले आहेत. त्या बाबीकरितां येथून गॉर्डन पीरी आणि चॅटवे ह्यांची निवड करण्यांत आलेली आहे. सर्वांपेक्षां ब्रिटनला यशाची जास्तींत जास्त खात्री जर कोठें असेल तर ती

२७ मैलांच्या मॅरॅथॉन शर्यतींत ! परवांच्या स्पर्धांत येथील पीटर्स व कॉक्स ह्या दोघांनींहि जागतिक विक्रमापेक्षां सहा मिनिटें कमी वेळांत हें अंतर संपवलें आहे. उच्चांक ६ मिनिटांनीं खालीं आणण्यांत कॉक्सनें ऑलिंपिकचें सुवर्ण-पदकच पटकाविण्याइतका मान मिळविलेला आहे.

स्त्रियांच्या उंच उडींत डोरोदी टायलर आणि शीला लेरबिल ह्या दोघींनींहि पांच फूट साडेसात इंच उडी मारून जागतिक विक्रम स्थापन केला आहे. ह्या दोघींच्या जोडीला बेलफास्ट येथील शाळेंतील सोळा वर्षांची थेल्मा हॉपकिन्स ही उंच उडीसाठीं निवडली गेली आहे. १०,००० मीटर्स जलद चालीसाठीं रोलंड हार्डीची निवड झाली आहे. जलद दौडीसाठीं येथें सर्व बाबींत पहिला आलेला मॅक्डोनल्ड बेली हा नियुक्त झालेला आहे. येथील क्रीडाक्षेत्रांत तज्ज्ञ समजल्या जाणाऱ्या श्री. जेम्स स्टॅगच्या मताप्रमाणें ब्रिटनला यंदाच्या स्पर्धांत किमान सहा तरी पाहिलीं सुवर्ण-पदकें मिळावींत इतका यंदाचा संघ हा बलवान आहे. १९४८ मध्यें लंडनला झालेल्या ऑलिंपिक्समध्यें ब्रिटनला एकाहि बाबींत पहिलें मानाचें स्थान मिळालें नाहीं; एवढेंच काय स्पर्धा भरविण्यापलीकडे जवळजवळ कोठलाच मान ब्रिटनच्या वांट्यास आला नव्हता. असें असून गेल्या चार वर्षांत येथील क्रीडाक्षेत्रांत इतकी प्रगति कशी काय झाली ? गेल्या वर्षीं व ह्या वर्षीं पांच जागतिक विक्रम ब्रिटननें मोडून नवे प्रस्थापित केले हा चमत्कार कसा घडून आला ह्याचें उत्तर असें—

चार वर्षांपूर्वीं उत्तर, दक्षिण, मध्यप्रदेश व वेल्स असे ब्रिटनचे चार भाग कल्पून चार नामांकित क्रीडापटु शिक्षक कोच म्हणून नेमले गेले व सर्वांवर देखरेख ठेवणारा पांचवा सर्वोत्कृष्ट कोच जेफरे डायसन हा नियुक्त केला गेला. ह्या पांच क्रीडा-शिक्षकांच्या पगाराचा ¾ भाग येथील शिक्षण-खात्याकडून दिला जातो हें जातां जातां नमूद करून ठेवतों. ह्या पांच शिक्षकांनीं सर्व देशभरांत मिळून शाळेंतील शिक्षक व इतर २००० कोच शिकवून तयार केले आणि तेव्हांपासून चित्रपट व प्रात्यक्षिक अशा दोन्ही प्रकारें शाळेंतील सर्व मुलांना व मुलींना क्रीडाक्षेत्रांत शिक्षण दिलें जात आहे. अॅथलेटिक्सच्या कोणत्या बाबींत हा मुलगा किंवा ही मुलगी उत्तम तयार होईल हेंहि सांगण्याची व ह्या प्रकारच्या मार्गदर्शनाची सोय करण्यांत

आली आहे असें मला सांगण्यांत आलें आहे. पण हें कसें ठरवतात व कोणत्या प्रकारच्या कसोट्या ह्यासाठीं उपयोगांत आणल्या जातात हें मला अद्याप समजूं शकलें नाहीं. शाळा सोडल्यावरसुद्धां चांगल्या होतकरू मुलाला ह्याच कोचिंग पद्धतीखालीं आपलें त्या बाबतींतलें शिक्षण मोफत सुरू ठेवतां येतें, ही मोठी महत्त्वाची गोष्ट आहे.

यंदाच्या वर्षीं येथील 'न्यूज क्रॉनिकल 'नें भरविलेल्या स्पर्धांनींहि ह्या क्षेत्रांत खूप साहाय्य केलें आहे. आंतरशालेय स्पर्धा, महाविद्यालयीन स्पर्धा व वृत्तपत्रांनीं भरविलेल्या स्पर्धा ह्यांतूनच ऑलिंपिक्सला जाणारे हे खेळाडू चमकलेले आहेत. ह्या नॅशनल कोचिंग स्कीमचा प्रत्यक्ष फायदा आतां हेलसिंकीला दिसेल. न्यूज क्रॉनिकल व तत्सम कांहीं क्रीडाप्रेमी वृत्तपत्रांनीं 'हेलसिंकीला खेळाडू पाठविण्यांत तुम्हीहि मदत करूं शकतां' इत्यादि शीर्षकांनीं सामान्य जनतेकडे द्रव्ययाचना केली हें खरें, पण एकंदर जनतेची ह्यासंबंधींची आवडहि इतकी दिसून आली कीं, तेथें भाग घेण्यास योग्य अशा प्रत्येक खेळाडूस पाठविण्याइतका पैसा येथें उभा झाला आहे.

ह्या सर्व प्रकरणापासून आपणांस बरेंच शिकतां येईल असें मला वाटतें. कळावें.

आपला,<br>
×××

ӨӨӨ

# चलो हेलसिंकी

लंडन

स. न. वि. वि.

हेलसिंकी या फिनलंडमधील समुद्रकांठच्या रम्य शहरांत १५ व्या जागतिक ऑलिंपिक स्पर्धा लवकरच सुरू होणार असल्यानें त्यासंबंधींच्या नौबती सर्वच देशांतून वाजण्यास प्रारंभ झालेला आहे. ह्या स्पर्धांत इंग्लंडतर्फे

भाग घेण्याचा मान कोणास मिळणार ह्याच्या निर्णयासाठीं येथील चांचणी-स्पर्धा नुकत्याच झाल्या. त्या चांचणी-स्पर्धा पाहण्यासाठींसुद्धां १० शिलिंगांपासून पुढें तिकिटें असल्यानें व कांहीं ठिकाणीं वेळाहि गैरसोयीच्या असल्यानें मी जाऊं शकलों नाहीं. स्त्रियांची Gymnastic Team निवडण्याकरितां झालेल्या स्पर्धांना मात्र मला निमंत्रण मिळाल्यानें मी उपस्थित राहूं शकलों होतों.

ह्या चॅंपियनशिप ऑफ इंग्लंड स्पर्धा स्टॅफर्ड हिलजवळ असलेल्या ओरायन हॉलमध्यें संध्याकाळीं ६ वाजतां सुरू झाल्या. निरनिराळ्या विभागांतील १५ उत्कृष्ट तयार झालेल्या मुलींनीं ह्यांत भाग घेतलेला होता व त्यांत पॅट हर्स्ट नांवाची १९५१ ची ब्रिटिश चॅंपियनहि उपस्थित होती. रात्रीं १० वाजेपावेतों स्पर्धा चालल्या व ब्रिटनमधलें चांगल्या प्रकारचें Gymnastic काम पाहायला मिळालें याचें समाधान मला लाभलें.

५ मीटर लांब १·२ मीटर उंचीवर आडवी असलेली एक १० सेंटीमीटर ( ४ इंच ) रुंदीची फळी ही कसरतीकरितां नियुक्त केलेली होती. ह्या चार इंच रुंदीच्या फळीवर केलेल्या कोलांट्या, उत्तोल, मयूरासनें, नृत्यप्रकार इ. कसरती फारच प्रेक्षणीय झाल्या. प्रत्येक खेळाडूस दीड मिनिटांत आपलें सारें कौशल्य दाखविणें आवश्यक होतें. पॅट हर्स्टनें ह्या फळीवर केलेल्या कसरती जमिनीवर करणें भल्याभल्यांना कठीण जाईल असें मला वाटतें. एक हातीं मयूरासन करून दुसरा हात त्याला लगत ठेवतांच " फुल आर्म बॅलन्स " उचलणें व पाय वांकवून डोक्याला लावून पुन्हां ते अलगद नेमके फळीवर टेकून पुन्हां फळीवर उभें राहणें हें सारें अद्भुत वाटलें. स्वानसीहून आलेली डेव्हिड नांवाची मुलगी ह्याच प्रकारची एक कसरत करतांना पडली. चटकन् उठून तिनें दीड मिनिट होईपावेतों आपलें कौशल्य दाखविण्याची पराकाष्ठा केली. पण वेळ संपतांच आपल्या शिक्षिकेकडे जाऊन ती ओक्साबोक्शीं रडली. हेलसिंकीला जाण्याची तिची संधि गमावली होती. त्यामुळें हें घडणें स्वाभाविक होतें.

पण ह्या देशांत हें मीं पूर्वी पाहिलें नसल्यानें मला त्याचें नावीन्य जाणवलें. खोखोची मॅच हरल्यावर खुंटाजवळ बसून रडणाऱ्या मुलींत

व फळीवरून पडल्याबद्दल रडणाऱ्या मुलींत हजारों मैलांच्या अंतरापेक्षां जास्त फरक नाहीं हें पाहून थोडें बरेंहि वाटलें.

दुदांडीच्या स्पर्धेकरितां वापरण्यांत येणारी दुदांडी ही आपल्याकडील दुदांडीहून फारच भिन्न असते. दोन दांड्यांमधील अंतर आपल्याप्रमाणेंच ४२ ते ४६ सेंटीमीटर असतें, पण एक दांडी जमिनीपासून १·५ मीटर उंचीवर असून दुसरी २·३ मीटर उंचीवर असते. त्यामुळें ह्यावर आपल्या-कडील एक दांडीप्रमाणें सर्व प्रकार उंच दांडीवर करतां येतात. शिवाय, खुर्चीवरील बॅलन्सप्रमाणें सर्व उत्तोलांचींहि कामें सुंदर करतां येतात. धाकट्या दांडीवर उत्तोल करून झोक टाकून वरच्या दांडीवर पाठीचा ताजवा करणें किंवा वरच्या दांडीवर पोटाचा ताजवा करून खालीं घसरून धाकट्या दांडीवर पडणें व पोटाचें चक्र करून त्याला जोडून " अपस्टार्ट " इ. प्रकार दिसायला मोठे छान दिसले. आपल्याकडे जोड-मल्लखांबावर अशा अनेक गंमती दाखवितां येतात, तशी ही उंचनिंच दुदांडीची गंमत वाटते.

१·१ मीटर उंचीच्या व ३५·३७ सेंटीमीटर रुंदीच्या घोड्यावरील कसरतीहि उत्तम झाल्या. आपण तेथें मिलिटरींतील खेळाडूंचें उत्कृष्ट घोड्याचें काम पाहतों त्या दर्जाचें काम येथें पहायला मिळालें. फुल आर्म बॅलन्स उचलून एका हातावर तो आणणें व नंतर " फुल बॅलन्स कट " टाकणें हें जवळ जवळ प्रत्येक मुलीनें केलेलें पाहून कौतुक वाटल्यावांचून राहिलें नाहीं. घोड्यावरील सर्वच मुलींचीं कामें फार छान झालीं.

रोमन रिंग्जवरहि फार छान कामें पाहावयास मिळालीं. ' बॅक प्लॅट ' किंवा आपण ज्याला " फिश " म्हणतों तो व डबल बेंड, क्रूसिफिक्स इ. कामें पॅट हर्स्टनें फारच छान केलीं. पॅट ही १९५२ ची ब्रिटिश चॅंपियन ठरली असून तिचा एक स्वतंत्र कार्यक्रम नुकताच येथें टेलिव्हिजनवर दाखविण्यांत आला.

ह्या स्पर्धांच्या निमित्तानें १९३६ च्या बर्लिन ऑलिंपिक्समध्यें भाग घेतलेली एडना ग्रोस, १९४४ च्या लंडन ऑलिंपिक्समध्यें भाग घेतलेली ऑड्री बेट्स इ. खेळाडूंची ओळखहि झाली. १९३२ मध्यें भाग घेतलेल्या व तूर्त शिक्षिका म्हणून काम करणाऱ्या मिसेस् वुडस् नांवाच्या ऑलिंपिक

खेळाडूंच्या ओळखीनें गेल्यामुळें मला सर्व चांगल्या खेळाडूंची प्रत्यक्ष ओळख करून घेतां आली व स्पर्धांहि जवळून मनसोक्त पाहायला मिळाल्या. पंच म्हणून काम करणाऱ्या बाया ह्या एडना ग्रोस, बेटस्, इ. गतकालांतील चॅंपियन्स होत्या.

आतां हेलसिंकीच्या स्पर्धांकडे माझे डोळे लागलेले आहेत. तेथील विस्तीर्ण क्रीडांगण, प्रेक्षकांच्या सोयीकरितां बांधलेला प्रचंड स्टेडियम् इ. चीं चित्रें सतत येथें येत आहेत. कार्यक्रमाच्या प्रतीहि मिळालेल्या आहेत. मी जाण्यायेण्याचा प्रवासमार्ग आंखून त्यानुसार बोटीवर तिकिटें काढून ठेवलीं आहेत व तेथील प्रवेशाचीं तिकिटेंहि काढलीं आहेत. जुलैच्या तिसऱ्या आठवड्यांत हेलसिंकीला पोहोंचून खेळ संपेपावेतों तेथें राहण्याची व्यवस्थाहि झालेली आहे. खेळांचें व तेथील इतर गंमतीचें वर्णन शक्यतों लवकर पाठविण्याची खटपट करीन, असें आश्वासन देऊन तूर्त तरी थांबणें आवश्यक आहे. कळावें.

आपला,
× × ×

## सामन्यांतील कांहीं प्रसंग

आलिंपिक

स. न. वि. वि.

ऑलिंपस पर्वतावर सूर्यकिरणांच्या साहाय्यानें चेतवलेला अग्नि आणि स्वीडनमध्यें मध्यरात्रीं १२ वाजतां सूर्यकिरणांनीं चेतवलेला अग्नि यांचें सम्मीलन स्वीडन व फिनलंडच्या सरसीमेवर झालें व तेथून हा ऑलिंपिक अग्नि "होता कविक्रतुः सत्यश्चित्रश्रवस्तमः" असा हा दिव्य अग्नि दिनांक १९ ला प्रेक्षागृहांत आणून प्रस्थापित करीपर्यंत अनेक प्रतिष्ठित खेळाडूंनीं त्याच्या आगमनाच्या दौडींत भाग घेतला होता. "त्वमग्ने भद्रं करिष्यसि"

इत्यादि अर्थाच्या मंत्रोच्चारासहित त्याची स्थण्डिलावर प्रस्तापना झाल्या-नंतर मुख्य प्रेक्षागृहांतून स्पर्धांस प्रारंभ झाला.

रविवार हा स्पर्धांचा पहिला दिवस ! काल पाऊस बराच होऊन गेला होता तरीहि आज पळण्याच्या स्पर्धांसाठीं ट्रॅक उत्कृष्ट तयार होता. महाबळेश्वरच्या तांबडया मातीसारखी काळसर तांबडी माती असलेला हा ट्रॅक पांढऱ्या लेन्स नव्यानें टाकल्यानें सुंदर दिसत होता. १००, ४०० आणि ८०० मीटर्स दौडी संपल्यावर १०,००० मीटर्सची निर्णायक स्पर्धा सुरू झाली ब्रिटनचा पेअरी व फ्रान्सचा मीमॉन हे प्रारंभापासून आघाडीस होते, पण ८ फेऱ्या संपण्यापूर्वींच झेकोस्लोवाकियाच्या झाटोपेकनें एकदम जोरानें वेग घेऊन आघाडी गांठली व नंतर सातत्यानें तोच वेग ठेवून त्यानें मागचे उच्चांक पार मागें टाकले. त्याच्या ह्या वेगामुळें इतरांचेंहि वेग इतके वाढले कीं, स्पर्धेतल्या पहिल्या चौघांनींहि मागचा ऑलिंपिक उच्चांक गांठला.

प्रेक्षागृहाच्या डाव्या अंगाला एक भव्य फलक निर्माण केला असून त्यावर इलेक्ट्रिकनें निर्णय जाहीर होत असत. पहिल्या सहा खेळाडूंचीं नांवें, त्यांचे देश, खेळांतील त्यांचा वेळ वा गुण एकाच वेळीं सर्व कांहीं फलकावर येई. हीं अक्षरें दूर असलेल्या एका टाइपरायटरवर टाइप केलीं जात व तेथून फलकावर उमटत. अक्षरें इतकीं मोठीं असत कीं, प्रेक्षागृहांतील कोणत्याहि कोपऱ्यांत बसलेल्या प्रेक्षकाला तीं वाचतां येत. नंतर लगेच पारितोषिक-वितरण होई. विजयपीठ मध्यभागीं आणून ठेवलें कीं, तीन खेळाडू त्यावर क्रमांकानुसरा उभे राहात, आणि पहिल्याला सुवर्णपदक, दुसऱ्याला रजतपदक व तिसऱ्याला ब्रॉंझ पदक देण्यांत येई. लगेच फलकावर उभ्या केलेल्या तीन ध्वजस्तंभांवर तीन खेळाडूंच्या देशांचे ध्वज चढविले जात व पहिल्या खेळाडूच्या देशाचें राष्ट्रगीत बॅंडवर वाजविलें जाई. सुवर्णपदक हातांत घेऊन आपल्या देशाचा ध्वज डौलानें मधल्या ध्वज-स्तंभावर चढत असतां आणि आपलें राष्ट्रगीत वाजलेलें ऐकत असतांना पहिल्या येणाऱ्या खेळाडूला किती आनंद होत असेल याची कल्पना करणें कठीण आहे.

१५०० मीटर्समध्यें अकल्पितपणें पहिल्या आलेल्या लक्झेंबर्गच्या बार्दलला ह्या प्रसंगीं इतकें गहिंवरून आलें कीं, लक्झेंबर्गचें राष्ट्रगीत वाजत

असतां तो मोठ्यानें रडूं लागला. विजयपीठावर डोळे पुसत असतांनाचें त्याचें छायाचित्र सर्वत्र प्रसिद्ध झालें आहे.

यंदाच्या खेळांत झाटोपेक व ऑस्ट्रेलियाची मार्जरी जॅक्सन ह्यांना खूपच गौरव प्राप्त झाला. मुलींच्या दौडींत मार्जरी जॅक्सननें सर्व प्रतिष्ठित उच्चांक पार नाहींसे केले. मुलींच्या टप्प्याच्या शर्यतींत ऑस्ट्रेलियाच्या मुलीचें हातांतील काठी पडल्यामुळें सुवर्णपदक गमावलें. एरवीं ऑस्ट्रेलियानें पळणाऱ्या मुलींत अग्रेसरत्व कायम ठेविलेलें होतें.

भालाफेकींत झाटोपेकच्या बायकोनें सुवर्णपदक मिळवून आणखी एक विक्रम निर्माण केला. नवरा-बायकोनें मिळून चार सुवर्ण-पदकें ऑलिंपिक्समध्यें मिळविल्याचा हा पहिलाच प्रसंग आहे.

थाळीफेकींत तीन रशियन मुलींनीं पहिले तीन क्रमांक पटकावले आणि तीनहि ध्वजस्तंभांवर रशियन ध्वज फडकाविले. अमेरिकेनेंहि हा विक्रम कांहीं वेळां करून दाखविला. ४ × ४०० च्या टप्प्यांच्या शर्यतीसारखी चुरशीची शर्यत क्वचितच इतरत्र झाली असेल. अमेरिकेनें ह्या शर्यतीसाठीं जीव टाकून प्रयत्न केला. पण जमेकाच्या खेळाडूंनीं त्यांची कांहीं मात्रा चालूं दिली नाहीं. 'ऱ्होडीन' व 'वींट' या जमेकाच्या दोन खेळाडूंनीं ह्या शर्यतींत जो वेग दाखविला तो अतुलनीय होता असें म्हणतात.

अनेक वेळां निर्णय फोटोच्या साहाय्यानें ठरवावे लागले. स्टॉप वॉच सेकंदाच्या शतांशापर्यंतच वेळमापन करूं शकतें. १०० मीटर्सला पहिल्या चौघांचेहि वेळ सारखे आले. सेकंदाचा सहस्रांश किंवा लक्षांश मोजण्याइतकें सूक्ष्म मापन उपलब्ध नसल्यानें निर्णय फोटोवरून घेतला. त्यांत अमेरिकेचा रेमिजिनो पहिला ठरला.

मुख्य प्रेक्षागृहांत घडलेल्या स्पर्धांत प्रेक्षकांचें प्रोत्साहन हा महत्त्वाचा भाग असे. ठराविक देशाच्या ठराविक आरोळ्या ठोकून व छोटे छोटे ध्वज फडकावून प्रेक्षक आपल्या खेळाडूला प्रोत्साहन देत. पण क्वचित् प्रसंगीं सर्वच खेळाडूंना प्रोत्साहन देण्याकडेहि प्रेक्षकांचा कल असे. मॅरॅथॉन शर्यत परत आली तेव्हां मात्र प्रेक्षकांनीं झाटोपेकच्या नांवाचा एकच घोष केला.

धर्मवर्णराष्ट्रनिरपेक्ष खिलाडू वृत्तीचा हा स्वयंस्फूर्त उत्स्फोट पाहून अनेक वेळां बरें वाटलें. अमेरिकेच्या पहिल्या आलेल्या खेळाडूनें दुसरा आलेल्या

रशियाच्या खेळाडूच्या गळ्यांत मिठी घातल्याचें छायाचित्र प्रसिद्ध झालें आहे. हें क्रीडाक्षेत्राव्यतिरिक्त घडणें संभाव्य नाहीं असाच छायाचित्राचा गर्भितार्थ असावा काय ? कळावें.

आपला,
×××

## ऑलिंपिक नगरींतील संचार : १

ऑलिंपिक

स. न. वि. वि.

फिनलंडच्या साऱ्या श्रमांचें आज सार्थक झालें आहे. बारा वर्षांपासूनची ऑलिंपियड भरविण्याची त्यांची आकांक्षा आज तृप्त झालेली आहे. जंगलवेष्टित आणि समुद्रवलयांकित अशा या देशांत स्पर्धा भरविण्याचा निर्णय जेव्हां पांच वर्षांपूर्वीं घेतला तेव्हांपासून केलेल्या कष्टांचें आज उद्यापन झालेलें आहे. १९०८ सालीं ग्रेट ब्रिटनमध्यें स्पर्धा झाल्या तेव्हां फिनलंडला 'रशियाचा ध्वज तरी घ्या किंवा ध्वजाऐवजीं खेळाडूंना चालूं द्या !' असें प्रारंभींच्या परेडसंबंधीं सांगण्यांत आलें होतें. आज परेडच्या शेवटीं फिनलंडचा ध्वज घेऊन फिनलंडचे खेळाडू जेव्हां प्रेक्षकांसमोरून चालत गेले तेव्हां सर्व प्रेक्षकांपेक्षां 'फिन' प्रेक्षकांच्या माना अधिक उंच झाल्या आहेत हें साहजिक आहे.

सकाळपासून पावसानें बुरबूर लावलेली आहे. अतिशय कष्टानें तयार केलेल्या शर्यतीचा आंखीव भाग– ट्रॅक ओला झाला आहे, पण उत्कृष्ट बांधलेलें प्रेक्षागृह–स्टेडियम मात्र फुलून गेलेलें आहे. ६९ वेगवेगळ्या देशांचे खेळाडू आज अहमहमिकेनें विजयश्रीच्या आराधनेसाठीं आलेले आहेत व प्रारंभिक मानवंदनेसाठीं आणि शपथाविधीसाठीं रंगणांत गोळा झालेले आहेत.

७०,००० प्रेक्षकांसमोरून हे वेगवेगळ्या गणवेषांतील ५३०० खेळाडू जेव्हां आपापल्या देशाचा ध्वज घेऊन मिरवीत गेले तेव्हां जपान, जर्मनी

फार दिवसांनीं परत आल्यानें त्यांचें हार्दिक स्वागत झालें. रशियाचे पांढरे सूट घातलेले पुरुष व निळे कोट घातलेल्या मुली असे सारे मिळून ३०० हून अधिक खेळाडू पावलाचा एकहि ठोका न चुकवितां गेले. तोहि एक नाट्यमय क्षण वाटला. अमेरिकेचेंहि तसेंच झालें. फेटे बांधलेल्या भारतीय तरुणांबरोबर तरुणी आज प्रथमच रंगणांत आलेल्या दिसल्या.

२८ सालापासून हॉकीचें अजिंक्यपद जिंकत आलेल्या ह्या तरुणांनींहि क्रिडाक्षेत्रांत दबदबा निर्माण केला यांत शंका नाहीं.

ऑलिंपिक स्पर्धांचे प्रारंभीं दोन रूढ संकेत नेहमीं पाळले जातात. एक म्हणजे स्वागताध्यक्षांच्या भाषणानंतर हजारों कबुतरें सोडण्यांत येतात. हे शांतिदूत आहेत अशी कल्पना असते. दुसरा म्हणजे ग्रीसमधील ऑलिंपस पर्वतावर सूर्याच्या किरणांपासून निर्माण केलेली ऑलिंपिक ज्योत देशां-देशांतील तरुणांनीं पळत पळत तेथपर्यंत आणलेली असते. ती स्थानिक खेळाडूनें आणून मुख्य स्थंडिलावर ठेवून सतत जळणारा " ऑलिंपिक वह्नि चेतवावयाचा " असतो.

आतांपावेतों झालेल्या सर्व लांब अंतर पळणाऱ्यांत सर्वप्रथम असा ९ सुवर्णपदकें मिळविणारा फिनलंडचा लाडका पॉव्होनुर्मी ५३ वर्षांचा असूनसुद्धां आज ती ज्योत हातांत घेऊन जेव्हां पळतांना दिसला तेव्हां ' फिन ' लोकांचे डोळे आनंदाश्रूंनीं पाणावले आणि आपल्या या अजिंक्य खेळाडूचें ७०,००० प्रेक्षकांनीं नव्हे, साऱ्या क्रीडाप्रेमी जगानें कौतुक केलेलें पाहून त्यांना धन्यता वाटली.

पण या दोन रूढ संकेतांपेक्षांहि अभिनव असा अभूतपूर्व प्रकार यंदां घडतांना पाहून सर्वच प्रेक्षक आणि अधिकारीवर्गहि आश्चर्यचकित झाला. पांढरें शुभ्र वस्त्र परिधान केलेली ग्रीक वेषांतील एक मूर्तिमंत शांतिदूतिका रंगणांतून पळत आली आणि विजयपीठावर उभी राहून तिनें ध्वनिक्षेपक ताब्यांत घेतला. पण असंकल्पित असा हा कार्यक्रम आगंतुकपणें हातीं घेतलेल्या ह्या जर्मन तरुणीस थांबविण्यांत आलें आणि पुढच्या कार्यक्रमास प्रारंभ झाला.

मैदानी स्पर्धा पाहण्यास आज मुद्दाम थांबलों होतों. विलक्षण द्रुतगतीनें न दमतां पळणारें तें झेकोस्लाव्ह मशीन—झाटोपेक पाहण्याची फार इच्छा होती. दहा हजार मीटर्स दौडींत झाटोपेकनें त्याच्या बरोबरीच्या सर्वांना

पार दमवून आणि मनाला वाटेल तेव्हां जोरांत स्प्रिंट घेऊन अजिंक्यपद सहजीं मिळविलें. झाटोपेकचा सुरुवातीपासूनचा वेग जोरदार होता. त्यांतच तो मधूनच झेप घेई. त्या चुरशीच्या स्पर्धेमुळें पहिल्या चौघांनीं मागचा विक्रम मोडला.

मुलींची थाळीफेक-स्पर्धाहि प्रेक्षणीय झाली. ह्यांत रशियाच्या तीन मुलींनीं पहिले तीन क्रमांक मिळविले आणि पहिलें सुवर्णपदक मिळविणाऱ्या नीनानें मागच्या जागतिक विक्रमापेक्षां १२ फूट लांब थाळी फेंकून नवा विक्रम निर्माण केला.

ब्रिटनविरुद्ध भारताचा हॉकीचा सामना पाहण्यासाठीं आज तुफान गर्दी जमलेली होती. ब्रिटननें युरोपियन सामन्यांत हॉलंडचा पराभव केल्यामुळें आज कोण जिंकणार ह्याबद्दल प्रेक्षकांत फारच कुतूहल होतें. पण भारताचे ते पादत्राणाशिवायचे लवलवीत खेळाडू आपल्या स्टिक्ससह रंगणांत उतरले मात्र आणि सर्वत्र उत्तेजनाच्या टाळ्या भारतास मिळाल्या. त्यांतच पहिल्या अर्ध्या भागांत जेव्हां बलवीरसिंगानें आपल्या स्टिकची करामत दाखवून इंग्लंडवर पहिला गोल लावला तेव्हां तर ' इंडिया ' चा जयघोष सर्व प्रेक्षागृहांत दुमदुमला.

बलवीरनें यानंतर लागोपाठ गोल लावून इंग्लंडची जयाची आशा पार नाहींशी केली. दुसऱ्या अर्ध्यांत इंग्लंडनें कसा-बसा एक गोल लावला पण तोच शेवटचा ठरला.

हॉलंडविरुद्ध पाकिस्तानचा सामनाहि मोठा चुरशीचा झाला. हॉलंडच्या खेळाडूंचें टीमवर्क छान जमल्यामुळें त्यांनीं अखेरीस सामना जिंकला. कळावें.

आपला,

× × ×

## ऑलिंपिक नगरींतील संचार : २

ऑलिंपिक

स. न. वि. वि.

सर्व जगभर प्रवास न करतां जगांतील सारीं वैशिष्ट्यें पहावयाचीं असतील त्यानें ऑलिंपिक्स् पहायला यावें. साऱ्या जगांतून आणि बहुतेक

२६२७४ वि भू-प्रवास २०९ १७३ नों: दि:

साऱ्या देशांतून सर्व वर्णांचीं, सर्व भाषांचीं, सर्व धर्मांचीं, आणि सर्व स्वभावधर्मांचीं माणसें आज येथें एकत्र झालेलीं आहेत. सर्वांचें समान धर्मत्व क्रीडाप्रेम हें एकच आहे. स्टेडियममध्यें बसतांना शेजारी आपल्या भाषेंत बोलणारा असला तर संभाषणाची शक्यता नाहीं, तर सर्वांच्या बरोबर ओरडायला मिळेल तेवढेंच भाषण !

सारें शहर ऑलिंपिकच्या पंचचक्रांनीं सजविलेलें आहे. पाहुण्यांची सोय करण्यांत हेलसिंकीनें कांहींहि कसी ठेवलेलें नाहीं. लक्ष भोजनाची व्यवस्था दोन फर्लांग लांबीचा भोजन मंडप घालून केलेली आहे. टपाल-वाहतूक तर सातत्यानें चालू आहे. फिरत्या मोटारी स्टॅम्प्स् विकायला व टपाल न्यायला सज्ज आहेत. ऑलिंपिक स्मरणदर्शकें—सुवेनिर्स—खंडोगणती विक्रीस तयार आहेत. कशासहि रेशन नाहीं. फळें, सुकामेवा, भाज्या आणि मांस-मासे-अंडीं भरपूर आहेत. स्वस्ताई मात्र नाहीं. हा देश दूध-लोणी-तुपाचा, पण दूध-बाटलीस ६५ मार्क म्हणजे १ रुपया पडतो. चांगलें पोटभर जेवायचें म्हणजे ३ रुपये तरी होतात.

फिनलंडचे लोक मोठे हौशी खरे ! दोन अवाढव्य मोठे स्टेडियम, तीन छोटे स्टेडिअम्स् आणि दोन ऐक्झिबिशन हॉल्स् हे सारे इतके सुंदर सजविले आहेत कीं, सर्व जगाच्या लोकांनीं खरोखरच त्यांचें कौतुक करावें. साऱ्यांचा पाहुणचार उत्तम व्हावा म्हणून कसोशीनें खटपटहि हेलसिंकीच्या लोकांनीं खूप केलेली आहे. वेगवेगळ्या भाषा बोलणारे दुभाष्ये गाइडस् म्हणून नेमून त्यांना त्या त्या भाषिक देशांचीं निशाणें भाषादर्शक लावायला दिलीं आहेत. त्यामुळें " ओपस "-गाइड हें एक मोठें प्रकरण झालें आहे असें वाटते. ट्राम आणि बसेस-त्याहि अपुऱ्या तेव्हां प्रेक्षकांना खास सवलतीचीं तिकिटें देऊन कोणत्याहि वाहनानें कोठेंहि जाण्याची सोय केली आहे. स्टेडियममध्यें बसण्याची रिझल्टस् मोठ्या फलकावर ताबडतोब लावण्याची, सामने वेळेवर कसोशीनें घडवण्याची तर पराकाष्ठा केलेली आहे. त्याचें वर्णन पुढच्या स्वतंत्र पत्रांत करीन.

खेळाडूंचा थाट तर काय वर्णावा ? ऑलिंपिक व्हिलेज हें आदर्श गांव खास खेळाडूंकरितां सजविलें आहे. त्यांना जेवणखाण उत्तम, डॉक्टरी

तपासणी, मालिश इत्यादि व्यवस्था व टपाल-तारा, टेलिफोन, वाहतूक सर्वत्र फुकट व उत्तम आहे. प्रत्येक खेळाडूला एक पासपोर्टासारखें आयडेंटिटी कार्ड दिलेलें आहे. तें सर्व हेलसिंकींत कोठेंहि कशाहीकरितां चालतें. त्यांना खरेदीवर सवलत आहे, सिनेमावर सवलत आहे, सहलीवर सवलत आहे. व्हिलेजमधून दर दहा मिनिटांनीं शहरांतल्या वेगवेगळ्या भागांत जाण्यासाठीं व स्टेडियमला जाण्यासाठीं गाड्या सुटत असतात, त्यांना तिकीट नाहीं. अशी खेळाडूंची उत्तम सोय आहे.

पोहण्याचा तलाव ५० मीटर्सचा सुंदर आहे. आठ लेन्स रंगवलेल्या असून आंत वॉटरपोलोचे खुंट अडकविण्याची खास सोय आहे बरोबर मध्यावर बॉल तरंगत ठेवण्यासाठीं एक रबरी कडें तरंगवण्याची आणि तें खालीं तळाला बुडविण्याची खास योजना येथें प्रथमच पाहिली. बॅक स्ट्रोकचे वेळीं पोहणाऱ्याला कांठाचा अंदाज यावा म्हणून २ मीटर्सवर एक निशाणांची दोरी बांधण्याकरितां खास खुंट बसविलेले आहेत.

सूर मारण्यासाठीं या तलावापलीकडे स्वतंत्र तलाव आहे व त्याचेहि पलीकडे सरावाकरितां छोटा तलाव आहे. पोहोण्याच्या स्पर्धांची इतकी उत्कृष्ट व्यवस्था पाहून मला फारच आनंद झाला.

पण आतां हें धांवतें वर्णन थांबवून खेळाच्या वर्णनाला प्रारंभ करण्यापूर्वीं आपल्या खेळाडूंचें काय झालें तें थोडक्यांत असल्यानें प्रथम सांगतों. नंतर इतर वर्णन देईन.

वॉटरपोलोमध्यें आपली प्रथम रशियाशीं गांठ पडली. त्या सामन्यासारखा सामना न भूतो न भविष्यति ! रशियाचे खेळाडू बॉल घेऊन सरळ गोलमध्यें घुसत म्हटलें तरी चालेल. त्यांचा एकहि गोल आम्हांला चुकवितां आला नाहीं, आणि आम्हांला त्यांचेवर एकहि गोल लावतां आला नाहीं. इतके हाल कोणाचेच झाले नाहींत. असो. इतर बाबतींत आमचीं मुलें पोहलींच नाहींत. सारीच नव्या उच्चांकांची गर्दी उडाली त्यांत आम्ही कोठें बसलों असतों हा प्रश्न वेगळा; पण Not to win but to take part, अशी प्रतिज्ञा घेऊन ती पूर्ण केली नाहीं याची खंत वाटली. पण याचा वचपा आपण हॉकींत काढून घेतला यांत शंका नाहीं. ब्रिटनविरुद्ध ३ व हॉलंडविरुद्ध ६ गोल लावतांना सारें प्रेक्षागृह 'इंडिया !'

'इंडिया !' च्या घोषानें दुमदुमून गेलें होतें. भारतीय संघाचें त्याबद्दल फारच कौतुक झालें. इतर बाबींत जेथें आपण थोडासा भाग घेतला तेथें आपला फारसा टिकाव लागला नाहीं. सध्यां रशिया व अमेरिका ह्यांनींच सारें सोनें व चांदी लुटली आहे. ब्रॉंझ इतर देशाच्या वांट्याला आलें आहे हें मात्र खरें. कळावें,

आपला,
XXX

ɵ ɵ ɵ

## ऑलिंपिक नगरींतील संचार : ३

ऑलिंपिक

स. न. वि. वि.

वेगवेगळे बरेचसे खेळ पाहण्याची इच्छा असलेल्या प्रेक्षकांची हेलसिंकीला फारच तारांबळ उडाली. कारण, ज्या वेळीं मुख्य प्रेक्षागृहांत मैदानी स्पर्धा चालत त्याच वेळीं एक्झिबिशन हॉलमध्यें कुस्त्या सुरू होत आणि त्याच वेळीं टेनिस हॉलमध्यें बास्केट बॉलचे सामने रंगांत येत. ६ वेगवेगळ्या प्रेक्षागृहांत ६ प्रकारच्या स्पर्धा सुरू असतांना त्यांतलीं एकच पाहतां येणें प्रत्येकाला शक्य असे; शिवाय प्रत्येक प्रेक्षागृहाला स्वतंत्र तिकीट असे आणि प्रवेश-फी जबर असल्यानें तितकीच महत्त्वाची बाब असल्याशिवाय दोन तिकिटांचे पैसे खर्च करणेंहि परवडत नसे. शिवाय प्रेक्षागृहें एकमेकांपासून दूर असल्यामुळें हें साधणेंहि कठीण असे. झाटोपेकची ५००० मीटर्स दौड, त्याच्या बायकोची भालाफेंक व भारताचा हॉकीचा निर्णायक सामना असे एकाच दिवशीं दुपारीं होते. तेवढ्या दिवशीं धांवपळ करून मी दोन्ही साधले. इतर दिवशीं मात्र एका वेळीं एकाच प्रेक्षागृहांत बसून संपूर्ण वेळ तेथील सर्व स्पर्धा पाहण्याचा कार्यक्रम आंखला होता.

ग्रीशिओ-रोमन पद्धतीच्या व खुल्या कुस्त्यांना रंग भरण्याची शक्यताच दिसेना. कार्यक्रम कंटाळवाणाच जास्त होई. कुस्ती अनेक वेळां सोडवावी लागे व तें कां करावें लागे हें कळत नसे. आपल्या अ. म. शा. शि. च्या

फरीगदग्याचे सामने जसे सुरू होतात न होतात तोंच तीन वार झाल्यामुळें थांबवावे लागतात. प्रत्यक्ष झटापटीच्या वेळेपेक्षां इतर गुणगणन व पूर्वतयारी ह्यांतच जसा जास्त वेळ खर्च होतो तसें ह्या कुस्त्यांचें होई.

वजन उचलण्याच्या स्पर्धा खूप वेळपावेतों चालत. सर्व खेळाडूंचें एका-मागून एक प्रत्येक वजनाला आवाहन होई. नंतर पांच किंवा अडीच किलोग्रॅम वजन वाढवून पुनः सुरुवात होई. ह्याप्रमाणें प्रथम प्रेस Press नंतर Snatch व शेवटीं Jerk असे तीनहि प्रकार संपले म्हणजे एकूण बेरीज करून त्यानुसार क्रमांक ठरविले जात. रोज जेमतेम एक गट संपे. यंदा हेवी वेटच्या बाबतींत अमेरिकेचा शेमान्स्की ५० ग्रॅम वजनानें वजनांत वाढला, पण त्यासाठीं अंगावर इंचभरहि कपडा न ठेवतां वजन करावें लागलें आणि रशियाचा नोव्हाक हा आपला ५० ग्रॅम वजनामुळें वरच्या वजनांत आला. अखेर रात्रीं १२ पावेतों स्पर्धा चालली.

शेमान्सकी ४४५ किलोग्रॅम उचलून प्रथम व नोव्हाक ४२५ बेरीज होऊन दुसरा ठरला. रात्रीं १२ वाजतां पारितोषिक-वितरण झालें. शेमान्स्कीनें जागतिक उच्चांक मोडून नवीन विक्रम निर्माण केले. १८२½ किलोग्रॅम वजनाचा Jerk उचलला तेव्हां नवीन विक्रम होत असल्यानें स्टेजवर वजनाचा कांटा आणून बारचें व खेळाडूंचें वजन करण्यांत आलें. व सर्व पंचांची व सरपंचांची खात्री झाल्यावर नवीन विक्रम जाहीर करण्यांत आला.

ज्यांत मला कांहींहि समजूं शकलें नाहीं अशा कनुइंग, रोइंग व यॉटिंगच्या स्पर्धा समुद्रावर ऑलिंपिक हार्बरवर होत. मी फक्त एकदां ओझरता तेथें जाऊन आलों. रोइंगच्या स्पर्धा ऑक्स्फर्ड-केंब्रिजसारख्या दिसत असल्यानें कळूं शकत. पण तद्व्यतिरिक्त कांहीं कळत नसे. यॉटिंगच्या स्पर्धेच्या वेळीं छोटीं छोटीं दोन शिडें असलेल्या त्या नौका लाटांवर डोलूं लागल्या म्हणजे सुंदर दिसत एवढें मात्र खरें !

नेमबाजीच्या स्पर्धा फारच दूर होत्या. वेगवेगळ्या अंतरांवरून वेगवेगळ्या उभ्या राहण्याच्या व बसण्याच्या स्थितींत स्थिर व चल लक्ष्यांवर नेम मारणें ही मुख्य बाब होती. अनेक प्रथितयश वयोवृद्ध नेमबाज या स्पर्धेत भाग घेतांना पाहून गंमत वाटली. प्रत्येक खेळाडूकरितां स्वतंत्र खोलीसारखी पेटी

केलेली होती. त्यामुळें बाहेरच्या वातावरणाचा त्याच्या मनावर परिणाम न पडावा ही गोष्ट सहजसाध्य होती.

फेन्सिंगच्या स्पर्धांच्या वेळीं तें फेन्सिंगचे खास पोषाख, स्पर्धांची खास ऐट, इलेक्ट्रिकच्या झगझगाटांत पट्ट्याची लखलखणारी फेक हें मनोहर होतें. गुणगणनाची कांहींच कल्पना नसल्यानें बोर्डावर दोन्ही प्रतिस्पर्ध्यांचे गुण लागले म्हणजे निर्णय समजे. चांगलें कसब दाखविलेल्या गड्याला कमी गुण मिळालेले पाहिल्यावर आपल्या संपूर्ण अज्ञानाची लाज वाटून क्रीडाक्षेत्रांत आपल्याला अज्ञात असलेल्या गोष्टींबद्दल आदर वाटूं लागला.

बॉक्सिंगच्या स्पर्धांना यंदा खूप रंग भरला. फेन्सिंगच्या स्पर्धांचेच हॉलमध्ये बॉक्सिंग रिंग्ज बांधल्या होत्या. इलेक्ट्रिकच्या प्रकाशांत रात्रीं ८ वाजतां स्पर्धांना प्रारंभ होई. त्या रात्रीं १२ पावेतों चालत. प्रत्येक वजनांतल्या दोन दोन जोड्या बहुधा रोज खेळत. निर्णयासंबंधीं जातां जातां एक गोष्ट सांगणें जरूर आहे. संपूर्ण ऑलिंपिक खेळांमध्यें बॉक्सिंगच्या निर्णयासंबंधींच फक्त वृत्तपत्रांतून टीका झाली. अनेक वेळां उभय प्रतिस्पर्ध्यांचे गुण सारखे होत आणि मग निर्णयाबाबत दुमताला जागा होई. झेक व रशियन वृत्तपत्रांतून बॉक्सिंगच्या अखेरच्या फेरींतील कांहीं निर्णयाबाबत कडक टीका झाली आहे.

आरंभींच्या दिवसांत दुदांडी, घोडा व फळीवरील तोल ह्या मुलींच्या आणि रिंग्ज, दुदांडी इ. वरील मुलांच्या मर्दानी स्पर्धा फारच सुरेख झाल्या. रशियन मुलींचा संघ इतका उत्तम होता कीं, मुलींच्या संघांतील आजिंक्यपदाबद्दल कोणालाहि शंका उरली नव्हती. रशियन मुलींचे फळीवरील व उंचनिंच दुदांडीवरील कसरतींचें कौशल्य अजब होतें. स्वीडिश मुलींची स्वीडिश कवायत अप्रतिम झाली. फिनलंडमधल्या मुलींची कवायतहि सुरेख झाली. रिंग्जवरचें कांहीं अलौकिक काम पहायला मिळालें यांत संदेह नाहीं.

दोन संध्याकाळीं डेमॉनस्ट्रेशनचा कार्यक्रम होता; व कांहीं नवीन उत्तम गोष्टी पहायला मिळतील म्हणून एक वॉटरपोलोची चांगली मॅच बुडवून मी तेथें गेलों होतों, पण हँडबॉल व फिनलंडचा राष्ट्रीय खेळ पेसेपेलो हे पाहण्यास मिळालें. इतर कवायती वगैरे पाहण्यास मिळाल्या, पण त्यांत

नावीन्य असें नव्हतें. त्यामुळें डेमॉनस्ट्रेशननें निराशा केली म्हटलें तरी चालेल. थोडेंसें मसलकंट्रोलचें काम पाहायला मिळालें, पण त्यांतहि फारसें नवीन्य नव्हतें.

० ० ०

## ऑलिंपिक नगरींतील संचार : ४

ऑलिंपिक

स. न. वि. वि.

वाचकहो, आज तुम्हांला ह्या ऑलिंपिक नगरींतून माझ्याबरोबर फेरफटका करायला न्यायचा बेत आहे. पायींच चालविणार आहें तुम्हांला अर्थात्. कारण गांव आणि नावीन्य पाहण्यास वाहन उपयोगी नाहीं.

हा पहा इथला मोठा मानरहाइम ॲव्हेन्यू. हेलसिंकीच्या बरोबर मध्यांतून गेला आहे. हा आणि सर्व मोठ्या इमारती आणि कचेऱ्या ह्या रस्त्यावरच आहेत. हें मोठें घड्याळ दिसत आहे ना? तें मोठें रेल्वेस्टेशन. आणि त्याच्या अलीकडची ही भव्य इमारत पोस्टाची आहे. सध्यां सर्वच इमारतींवर ऑलिंपिकचीं पांच चक्रें लावलेलीं आहेत. इथलें हें मोठें डिपार्टमेंट स्टोअर! स्टॉकमनचें हें दुकान लंडनमधल्या सेल्फिजेस एवढें मोठें सहज आहे. यायचें आहे का आंत? फिनलंडमधील कांहीं वैशिष्ट्य पाहूं दिसलें तर!

सुंदर लांकडी फर्निचरनें मोहून जाल इथें! इथें सर्वांत जास्त कांहीं निर्माण होत असेल तर लांकूड! फिनलंडमध्यें ७३ टक्के उत्पन्न जंगलांचें आहे. त्यामुळें इथें लांकडाची सुबक कारागिरी पाहावयास मिळते. इथला कारागीर उत्तम शिसवीचें लांकूड हातांत घेऊन त्यांतून काव्य निर्माण करतो. हे मेणबत्त्यांचे स्टँड पहा. उदाहरणार्थ हें झुंबर पहा; पाणी किंवा बीअर पिण्याचे हे ग्लास तर फारच सुंदर आहेत.

हे आपल्या जंबियासारखे यांचे चाकू पाहून ठेवा. हेंहि फिनलंडचें वैशिष्ट्य समजलें जातें बरें का! प्रत्येक तरुणीच्या सुद्धां कंबरपट्ट्याला हा जंबिया

असतो. ह्या वेगवेगळ्या आकारांच्या मनोहर पाइप्स पाहिल्यात का? ऑस्ट्रियामध्यें अशा पाइप्स करतात आणि लोक मोठ्या हौशीनें या पाइप्स-मधून तंबाखू ओढतात. किंमतीची चौकशी करून घाबरूं नका. फिनिश मार्कस् ह चलन बरेंच खालीं जातें. पौंडाला ९०० मार्कस् किंवा आपल्या रुपयाला ६४ मार्कस् मिळतात; त्यामुळें १५-२० रुपयांची वस्तु सुद्धां इथें हजार मार्कांवर जाते. आणि चार आंकडी किंमत पाहून छाती दडपते.

पण हेलसिंकी हें स्वस्त मात्र समजूं नका. एका वेळच्या साधारण जेवणालासुद्धां २००-२५० मार्कस् सहज पडतात. दूध, लोणी, चीज भरपूर आहे. कशालाहि रेशन नाहीं. काय हवें तें भरपूर खा! 'मानरहाइम ॲव्हेन्यु'वरचीं सारीं दुकानें गच्च भरलेलीं आहेत मालानें.

चला इथून पुढें उंच चर्चसारखें दिसत आहे तें म्यूझियम. कांहीं चांगल्या चित्रकारांचीं चांगलीं चित्रें आणि जुन्या वस्तु उत्तम मांडल्या आहेत. हा डावीकडे रस्ता जातो हा समुद्रावर ज्या कॅनो आणि वल्हविण्याच्या शर्यती होतात तिकडे जातो.

समोर अगदीं उंच दिसते तीच ऑलिंपिक ज्योत! त्या मोठ्या टॉवरच्या खालींच अवाढव्य प्रेक्षागृह आहे. ह्या डाव्या हाताच्या मोठ्या इमारतींत या! मेसुहली म्हणजे एक्झिबिशन् हॉल, बास्केटबॉलचा सामना चालला आहे इथें. अमेरिका विरुद्ध चिली. अमेरिकेचे १०५ गुण झालेले आहेत. हेंहि ऑलिंपिकचें रेकार्ड दिसतेंय! एका एक्झिबिशन् हॉलमध्यें, मर्दानी स्पर्धा, वजन उचलणं बॉक्सिंग इत्यादि होतात.

पोहणें, सूर मारणें इत्यादींकरितां स्वतंत्र प्रेक्षागृह आहे. सायक्लिंग फूटबॉल, इत्यादींकरितां व्हेलोड्रोम नांवाचा एक स्वतंत्र विभाग येथून दीड मैलावर आहे. तिथूनच जवळ ऑलिंपिक व्हिलेज् आहे तिथें जायचें असलें तर मात्र ट्रॅमनें जायला हवें. खेळाडूंना नेण्याकरितां फुकट बसेस् आहेत म्हणा. पण आपल्याला २५ मार्कस पडतील जायला. ह्या उजव्या हाताला लांबच्या लांब पडळी बांधल्या आहेत तिथें चला जरा. मागच्या अंगाला अवाढव्य स्वैंपाकघर आहे आणि तिथून इकडे आणून सर्व प्रेक्षकांकरितां जेवण मिळण्याची इथें व्यवस्था केलेली आहे. रोज एक लक्ष

लोकांना जेवण देतां यावें अशी व्यवस्था आहे. जेवणहि उत्तम असतें बरं का !

हें 'ओपस' काय प्रकरण आहे कळलें का ? 'ओपस' म्हणजे गाईड--वाटाड्या--दुभाष्या. अशीं सुमारें ६०० ठिकाणें गांवांत उभीं केलेलीं आहेत. चार-पांच भाषा जाणणारे लोक इथं परस्थ पाहुण्यांच्या सेवेसाठीं हजर आहेत. ह्या बाईच्या कोटाला ती फीत आहे ना त्यावर चार देशांचीं निशाणें आहेत, म्हणजे ही बाई फ्रेंच, जर्मन, इंग्लिश व स्पॅनिश बोलते असें समजायचें.

ह्या फर्लांगा-फर्लांगावर पोस्टाच्या खास गाड्या उभ्या केलेल्या आहेत. त्यांचाहि उपयोग करून घ्या. खास ऑलिंपिक तिकिटें मिळतात इथें. कार्डें, पाकिटें, रंगीत चित्रें इ. घेऊन तिकिटें लावून तेथेंच टाकून द्यायचें कीं पत्र घरपोंच चाललेंच ! ही व्यवस्था छान आहे नाहीं !

पाहुण्यांकरितां ज्या ज्या म्हणून जास्तींत जास्त सोयी करतां येतील त्या कटाक्षानें केलेल्या आहेत इथल्या लोकांनीं. इथें दुसरें एक आढळेल तुम्हांला. सामान्य फिनिश नागरिक हा मोठा हंसरा आणि आनंदी आहे. श्रीमंत, गरीब हाहि भेद आढळायचा नाहीं इथें ! सर्व एका पातळीवर दिसतात.

खेळ सध्यां खूप जोरांत आहेत. पोहोण्याच्या स्पर्धांत नवे नवे विक्रम प्रस्थापित होत आहेत. हॉकीचा सामना आपण हॉलंडविरुद्ध जिंकला त्या व्हेलोड्रोमवर तुफान गर्दी उसळली होती. वॉटरपोलोमध्यें मात्र रशियानें आपल्या संघावर बारा गोल लावले आणि आपल्या संघाला एकहि गोल लावतां आला नाहीं. असो. आपल्या इथें आलेल्या खेळाडूंना निदान पहिल्या दर्जाचें कौशल्य पहायला मिळालें हा तरी काय कमी फायदा आहे ? कळावें.

आपला,
×××

स्थळमत.

दा. क्र. ११३.९१
वि: भू-प्रवास...

REFBK-0011391